UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण प्रथम प्रश्नोत्तरे घेऊ या.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

**पृ.शी. :** राज्याचे महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी केलेल्या वक्तव्याबाबत

**मु.शी. :** राज्याचे महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी केलेल्या वक्तव्याबाबत माननीय मुख्यमंत्री यांचे निवेदन

श्री. देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 47 नुसार पुढील प्रमाणे निवेदन करीत आहे :

अध्यक्ष महोदय, राज्याचे महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी मराठवाड्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याबाबत काल सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यावर श्री. श्रीहरी अणे यांच्या वक्तव्याशी सहमत नसल्याबाबत शासनाकडूनही सभागृहात भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. श्री. श्रीहरी अणे यांनी त्यांच्या वक्तव्याविषयी शासनाकडे स्पष्टीकरण केलेले आहे. तथापि, आज सकाळी श्री. श्रीहरी अणे यांनी त्यांच्या महाधिवक्ता पदाचा राजीनामा राज्यपाल महोदयांकडे सपूर्द केलेला आहे. राज्यपाल महोदय त्यावर विहित पध्दतीनुसार कार्यवाही करीत आहेत.

............

...2/-

... ( गोंधळ ) ...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा राज्यपाल महोदयांकडे सपूर्द केलेला आहे, असे सांगितलेले आहे. राज्यपाल महोदय त्यावर उचित कारवाई करणार आहेत. परंतु, त्यांचा राजीनामा अद्याप पर्यंत स्वीकृत झालेला नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी केलेले वक्तव्य तसेच, राज्याच्या विभाजनाबाबत सातत्याने त्यांनी जी भूमिका मांडली, ती निश्चितच आपल्या राज्याकरिता घातक आहे. राज्याच्या महधिवक्त्यांनी अशी भूमिका मांडणे योग्य नव्हते. मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या निवेदनात शासनाची भूमिका मान्य केलेली आहे. यासंबंधात खरे तर श्री. श्रीहरी अणे यांनी सभागृहासमोर येऊन या सभागृहाची माफी मागितली पाहिजे, ही आमची मागणी आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, महाधिवक्ते श्री. श्रीहरी अणे यांनी दिलेल्या राजीनामाच्या आधी ... ( अडथळा) ...

**<u>पॉईंट ऑफ प्रोसिजर</u>**

श्री. गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, विधानसभा नियमानुसार निवेदनावर चर्चा, प्रश्न विचारता येत नाहीत. संबंधित विषयासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी सुस्पष्ट निवेदन केलेले आहे. नियमानुसार निवेदनानंतर चर्चा व प्रश्नोत्तरे होत नाहीत. त्यामुळे मी आपल्याला व सभागृहाला विनंती करतो की, आता हा विषय संपलेला असल्याने आपण पुढील कामकाज सुरु करावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपल्याला या विषयावर बोलता येणार नाही. आपल्याला कोणत्या विषयावर बोलावयाचे आहे ?

**<u>हरकतीचा मुद्दा</u>**

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या निवेदनात महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी मराठवाड्यासंदर्भात केलेल्या विधानाबाबतीत राजीनामा दिल्याचे सांगितले आहे. मला मुख्यमंत्री महोदयांना हे विचारावयाचे आहे की, विदर्भाबाबत श्री. श्रीहरी अणे यांनी यापूर्वी जे विधान केले आहे, त्याच्याशी सरकार असहमत आहे काय ?

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपला हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी.** : तोंडी उत्तरे

***पुणे महानगर परिवहन महामंडळाने भरतीबाबत जाहिरात***

***देऊन तरुणांची फसवणूक केल्याबाबत***

*(१) * ४०४२४ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएल) वाहक व चालक भरतीबाबत तपशील जाहीर करून रिझल्ट नेशन या संकेत स्थळावर जाहिरात देऊन दिनांक ४ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी, २०१५ या दरम्यान ऑनलाईन पद्धतीने रु. २५० व रु.५०० भरून घेऊन अनेक तरुणांना फसवल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अश्या जाहिराती देऊन तरुणांना फसवणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,*

*(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*डॉ. रणजित पाटील श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे.*

*दिनांक १६.१.२०१६ रोजी खोटी जाहिरात दिल्याची बाब महामंडळाच्या निदर्शनास आल्यावर त्याच दिवशी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सदर बाब नागरीकांच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती.*

*सदर जाहिरातीच्या अनुषंगाने कोणत्याही नागरिकाने अर्ज भरल्याबाबत, फी जमा केल्याबाबत व त्याद्वारे फसवणूक झाल्याबाबत लेखी किंवा तोडी स्वरुपात तक्रारी परिवहन महामंडळाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.*

*(२) या बाबत महामंडळाने तात्काळ सायबर क्राईम शाखा पोलिस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचेकडे तक्रार नोंदविण्यात आलेली आहे तसेच पोलिस निरिक्षक, स्वारगेट पोलीस स्टेशन यांनाही कळविले आहे.*

*याबाबत नागरिकांची फसवणूक होऊ नये म्हणून परिवहन महामंडळामार्फत अशा प्रकारची कोणतीही भरती प्रक्रीया या कालावधीसाठी चालू नाही, असा खुलासा प्रेस नोटद्वारे दिनांक १६.१.२०१६ रोजी करण्यात आला. सदरचा खुलासा दिनांक १७.१.२०१६ रोजीच्या दै. लोकमत पुणे व दिनांक १८.१.२०१६ रोजीच्या दै. पुण्यनगरी, पुणे या दोन वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झालेला आहे.*

*(३) प्रश्न उद्भवत नाही.*

...४/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 40424 ....

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, या तारांकित प्रश्नाच्या लेखी निवेदनात प्रश्न क्रमांक एकचे उत्तर, 'अशंतः खरे आहे' असे नमूद केलेले आहे, त्याचा अर्थ बोध होत नाही. सायबर क्राईम शाखेकडे नोंदविलेल्या गुन्ह्यानंतर गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली, गुन्हेगाराला अटक झाली आहे काय ? महामंडळाने गुन्हा घडल्यानंतर एका वर्षानंतर खुलासा केलेला आहे. त्यामुळे एका वर्षात किती उमेदवारांची फसवणूक झाली, त्याचाही खुलासा होत नाही. महामंडळाकडून अशाप्रकारे वारंवार घटना घडत असताना किमान यापुढे तरी, अशाप्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी यावर देखरेख ठेवण्यासाठी गुप्तहेर वार्ता पथक नेमणार काय व गुन्हेगारांना अटक झालेली आहे काय, याचा कृपया खुलासा करावा. ... ( अडथळा ) ...

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय,

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मी आपल्याला प्रश्नोत्तराच्या तासानंतर बोलण्याकरिता संधी देईन.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक वर्षानंतर गुन्हा नोंदविला गेला आहे, याबाबत प्रश्न विचारलेला आहे. या अनुषंगाने मला हे सांगावयाचे आहे की, या परीक्षेचा दिनांक 4.2.2014 ते दिनांक 26.2.2014 हा ओरिजनल कालावधी रेप्लीकेट करुन त्याच कालावधीत केवळ वर्ष बदलून असे भासविण्यात आले होते. त्यामुळे दिनांक 16.1.2016 रोजी सायबर क्राईमकडे तक्रार नोंदविली गेली. त्यामध्ये असे लक्षात आले की, क्लिक केल्यानंतर कोठेही पेमेंट गेटवे येत नव्हता. यामध्ये कोणाकडूनही कोठेही पैसे जमा झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. परंतु, तरीही साधारणतः या सर्वांचा इंटरनेटचा प्रोटोकॉल ॲड्रेस, कोणाच्या नावे ब्रॉडबँड आहे, याबाबतीत सायबर क्राईम पुढचा तपास करीत आहे. इन्व्हेस्टिगेशन अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीनुसार असे समजते की, वेब सर्व्हर वॉशिग्टंनमध्ये आहे. इन्व्हेस्टिकेशन ऑफिसर्सकडून याचा पुढचा तपास सुरु आहे.

............

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा पॉइंट ऑफ ऑर्डर आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य सभागृहात प्रश्नोत्तराचा तास सुरु आहे. आपला पॉईंट ऑफ ऑर्डर प्रश्नोत्तराबाबत आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचा उत्तरावर पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**<u>पॉईंट ऑफ ऑर्डर</u>**

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, आपण माझे म्हणणे केवळ ऐकून घ्यावे. मुख्यमंत्री महोदयांनी निवेदन केले. त्यावर माननीय संसदीय कार्यमंत्री म्हणतात की, निवेदनावर प्रश्न विचारता येणार नाहीत. परंतु, विधानसभा नियम 47 मध्ये सन्माननीय सदस्यांना निवेदनावर प्रश्न विचारण्याची तरतूद आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य आपल्याला त्या विषयावर बोलता येणार नाही. आता आपण पुढील कामकाज घेत आहोत.

श्री. योगेश सागर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांना पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडावयाचा असल्यास त्यांनी वेगळा हक्कभंगाचा प्रस्ताव आणावा. ... (अडथळा) ...

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ....

**अध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, कृपया प्रश्नोत्तराचा तास होऊ द्या. त्यानंतर मी आपले म्हणणे ऐकेन.

........



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ठाणे शहरातील लोकमान्यनगर परिसरातील मतिमंद*

*तरुणीवर सामुहिक बलात्कार केल्याबाबत*

*(२) * ४९७०० श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय औटी (पारनेर), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) ठाणे शहरातील लोकमान्यनगर परिसरातील २२ वर्षाच्या मतिमंद तरुणीला दारु पाजून ४ तरुणांनी दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास एका टेम्पोमध्ये सामुहिक बलात्कार केला, हे खरे आहे काय,*

*(२) असल्यास, सदर प्रकरणी वर्तकनगर पोलीस स्थानकात तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,*

*(३) असल्यास, उक्त प्रकरणी आरोपीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,*

*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*डॉ. रणजित पाटील श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता : (१) होय.*

*(२) होय.*

*(३) वर्तकनगर पोलीस स्टेशनचे हद्दीत दि. ८.१.२०१६ रोजी पाच आरोपींनी संगनमत करुन पिडीत मतिमंद मुलीच्या मंदबुध्दीचा गैरफायदा घेवून, तिला लग्नाचे अमिष दाखवून पळवून नेवून आरोपीच्या घरात व पिकअप टेम्पोमध्ये सामूहिक बलात्कार केला म्हणून वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ०७/२०१६ भादंवि कलम ३६६, ३७६(ल), ३७६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सर्व आरोपिंना अटक करण्यात आले असून, तपास सुरु आहे.*

*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49700...

श्री. मंगेश कुडाळकर : अध्यक्ष महोदय, या प्रश्नासंदर्भातील खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून या मतिमंद मुलीस न्याय देण्यासाठी आरोपिंना जास्तीत जास्त सजा देण्याकरिता शासन प्रयत्न करणार आहे काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू गुन्हा मतिमंद मुलीच्या बाबतीत घडलेला आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांकडून झालेल्या मागणीच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, या पूर्ण प्रश्नासंदर्भातील खटला फास्ट ट्रॅक कोर्टात व विशेष महिला कोर्टातही चालविला जाईल.

................

श्री. अब्दूल सत्तार : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपला पॉईंट ऑफ ऑर्डर कोणत्या विषयावर आहे ?

**पॉईंट ऑफ ऑर्डर**

श्री. अब्दूल सत्तार : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदय जसे सत्ताधारी पक्षाचे नेते आहेत, तसे माननीय विरोधी पक्ष नेते आमचे नेते आहेत. आपण माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा आवाज दाबू शकत नाही. मी जबाबदारीने सांगतो ... (अडथळा) ...

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याकरिता संधी दिलेली आहे, मी त्यांचे म्हणणे ऐकलेले आहे. त्यांचा आवाज दाबण्याचा प्रश्नच नाही. आम्ही त्यांचा तुमच्यापेक्षा जास्त सन्मान करतो. मी त्यांना बोलण्याकरिता संधी दिलेली आहे. आपण आता पुढचे कामकाज घेतलेले आहे. आपण खाली बसावे. .. (गोंधळ)...

श्री. अब्दूल सत्तार : आपण त्यांचा सन्मान केलाच पाहिजे. आम्ही मुख्यमंत्री महोदयांचा सन्मान करतो. आपण त्यांचा सन्मान केला पाहिजे. चार-चार वेळेस त्यांनी बोलण्याकरिता अनुमती मागितल्यानंतर आपण त्यांचा सन्मान करीत नाही. त्यांच्या स्पीकरचा लाईट लागला पाहिजे. आमदार तेथून येतात आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांना अपशब्द बोलतात हे कसे चालणार ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. अब्दुल सत्तार आपण खाली बसावे. आता सन्माननीय सदस्या प्रा. वर्षा गायकवाड यांनी प्रश्न विचारावा.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी याठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांचा हरकतीचा मुद्दा स्वीकारला नव्हता. त्यांचा मुद्दा स्वीकारला असता तर मी आपल्याला बोलण्यास नक्कीच परवानगी दिली असती. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे. आता आपण पुढे गेलो आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणे यांनी राज्यपाल महोदयांकडे राजीनामा दिलेला आहे. परंतु माननीय राज्यपालांनी राजीनामा स्वीकारला किंवा कसे, याबाबत स्पष्ट झालेले नाही.

**अध्यक्ष :** राज्यपाल महोदयांनी राजीनामा स्वीकारला किंवा कसे यासंदर्भात त्यांच्याकडून कोणता निर्णय घेतला जातो, याबाबत आपण थोडी वाट पाहिली पाहिजे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, कॉन्स्टीट्युशनल प्रोव्हीजन आहे की, महाधिवक्ता यांची अपॉइंटींग ऑथॉरिटी माननीय राज्यपाल आहेत. त्यामुळे महाधिवक्ता यांनी त्यांच्याकडेच राजीनामा द्यायचा असतो. त्यांनी दिलेला राजीनामा राज्यपाल महोदय स्वीकारतात...(अडथळा)...

अध्यक्ष महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण विरोधी बाकावरील सिनिअर सन्माननीय सदस्यांना समज द्यावी. त्यांना केवळ राजकारण करायचे आहे. त्यांच्याकडून हे केवळ राजकारणाकरिता केले जात आहे. राज्यपालांकडून राजीनामा स्वीकारल्या जातो किंवा त्यांना वाटले तर ते मंत्रिमंडळाचे मत जाणून घेतात. मंत्रिमंडळाचे मत मंत्रिमंडळात ठरविले जाईल. परंतु राज्य सरकारची भूमिका स्पष्ट असून त्यांनी सदरहू राजीनामा स्वीकारावा, अशी आम्ही माननीय राज्यपालांना शिफारस करणार आहोत.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*मुंबई व उपनगरात वाढती वाहनांची संख्या लक्षात घेऊन वाहनतळ उभारण्याबाबत*

*(३) *४२३९२ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*
*(१) मुंबई व उपनगरात दिवसेंदिवस वाढती वाहनांची संख्या लक्षात घेऊन पार्किंगच्या जागेकरिता पुरेशी वाढ करण्याकरिता मुंबई महापालिकेने मोकळ्या जागांबाबत सध्याच्या धोरणाचे कोणतही उल्लंघन न करता वाहनतळ उभारण्यासाठी करावा तसेच पर्यायी जागांचाही शोध घ्यावा असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान महानगरपालिकेस दिले आहे, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, उक्त आदेशानुसार महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,*
*(३) तसेच, सन २००९ मध्ये वाहनतळास शासनाने मंजूरी दिली होती, पंरतु सहा वर्षाचा अवधी लोटूनही अपेक्षित वाहनतळाचे बांधकाम करण्यास विकासक अपयशी ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,*
*(४) असल्यास, नवीन वाहनतळासाठी पुरेशा जागेत वाढ करणे व मंजुर वाहनतळाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,*
*(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?*

*श्री. देवेंद्र फडणवीस : (१) अशी बाब नाही.*
*मा. मुंबई उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र. ६२/२०१४ मध्ये बृहन्मुंबई क्षेत्रामधील पार्किंगच्या बिकट प्रश्नावर मा. उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांवर तसेच इतर अनुषंगिक मुद्यावर चर्चा करुन सर्वसमावेशक असा तोडगा काढणेबाब संबंधितांनी बैठक घेवून निर्णय घेणेचे मा. मुख्य सचिव यांना आदेश दिलेले होते. यासंदर्भात दिनांक ४.३.२०१५ रोजी मा. मुख्य सचिव यांचेकडे बैठक पार पाडलेली आहे. सदर बैठकीमध्ये मैदानांच्या खाली वाहनतळ उपलब्ध होणेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने याबाबतचे विनियम बृहन्मुंबईची सुधारित प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करताना अंतर्भूत करण्याबाबत प्रस्ताव करावा असे ठरलेले आहे.*
*(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना ।नियंत्रण नियमावलीसह पुनप्रसिध्द होवून वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरीसाठी सादर व्हावयाची आहे.*
*(३) आजमितीस विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ६१ ठिकाणी सुमारे ४६३६६ वाहनांचे साठी प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. आजमिती पर्यंत १३ वाहनतळाचे काम पूर्ण झाले असून (एकूण ६८७२ पार्कींग) पैकी ६ वाहनतळे महापालिकेस हस्तांतरीत करण्यात आली असून सदर वाहनतळामध्ये एकूण ३०८१ पार्कींग उपलब्ध झाली आहेत.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

*(४) पूर्ण झालेले तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण न झालेले प्रकल्प लवकरच महानगरपालिकेस हस्तांतर होणार आहेत. इतर प्रकल्पांचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना देणेत येत आहेत.*

*(५) प्रश्न उद्‌भवत नाही.*

*ॲड. आशिष शेलार : सदर प्रश्न मुंबई शहरासाठी अत्यंत महत्वाचा आहे. उत्तरामध्ये असे दिलेले आहे की, विकास नियंत्रण नियमावली ३३ (२४) खाली वाहनांचे ६१ प्रस्ताव मंजूर झाले आणि १३ पूर्ण झाले पुढे असे म्हटले आहे की, मुंबई शहरासाठी पार्किंगची आवश्यकता असताना जवळवजळ ४६,३६६ वाहनांसाठी प्रस्तावांपैकी ३०८१ पूर्ण झाले. मुंबई शहरामध्ये ३३ (२४) खाली पार्किंगचा इन्सेन्टीव्ह एफएसआय देऊन मुंबई शहरात जास्तीत जास्त पार्किंगची जागा मिळाव्यात यासाठी विकासकाला एफएसआय देण्याचे प्रोव्हिजन आहे. मुंबई उच्च न्यायालयात पिटीशन पेंडींग असून त्या आधारावर माझ्या माहितीप्रमाणे २००८ ते २०१३ मध्ये ९२ लाख स्क्वेअर फुटाच्या इन्सेन्टीव्ह एफएसआयचे १३ प्रस्ताव मंजूर झाले आणि ऑगस्ट ते सप्टेंबर २०१४ पर्यंत जवळजवळ २२ लाख स्क्वेअर फुटाचा इन्सेंटीव्ह एफएसआय विकासकाला मिळेल असे प्रस्ताव मंजूर झाले.*

*अध्यक्ष महोदय, माझा पहिला प्रश्न आहे की, विकासकाला १ कोटी १४ लाख स्क्वेअर फुटाचे इन्सेंटीव्ह एफएसआयचे प्रस्ताव २००८ ते २०१३ मध्ये मंजूर झाले असताना प्रत्यक्षात किती पार्किंग मिळाली, हा माझा पहिला प्रश्न आहे. न्यायालयात तत्कालीन नगरविकास मंत्र्यांनी असे म्हटले होते की, ५०० कोटी पर्यंतचा प्रिमियम महानगरपालिकेला मिळाला. परंतु महानगरपालिकेचे असे म्हणणे आहे की, आम्हाला २०१२-२०१३ मध्ये एकही रुपयाचा प्रिमियम मिळालेला नाही. म्हणजेच प्रिमियम देखील मिळाला नाही व विकासकाला १ कोटी १४ लाख स्क्वेअर फुटाचा इन्सेंटीव्ह एफएसआय मिळाला. यासर्व प्रकरणाची महापालिकेमार्फत चौकशी करणार आहात काय, असा माझा आपल्या मार्फत मंत्रीमहोदयांना दुसरा प्रश्न आहे.*

*डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, आपण ६१ प्रकल्पांना एलओआय दिले. यातून ४६,३६६ पार्किंग निर्माण होणार होती. परंतु यातून केवळ १३ वाहनतळाचे काम पूर्ण झाले. तसेच ६ वाहनतळांचेच महापालिकेस हस्तांतरण झाले असून ही बाब खरी आहे. पूर्ण झालेल्या १३*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*डॉ. रणजित पाटील.....*

*वाहनतळातून प्रत्यक्षात ६,८७२ पार्किंग उपलब्ध झाली होती. परंतु त्यातही ६ वाहनतळाचेच हस्तांतरण झाले असल्यामुळे त्यातून ३,०८१ पार्किंग उपलब्ध झाली आहे. तसेच यातून ५०० कोटी रुपये प्रिमियम मिळणार होते. परंतु पार्किंग निर्माण न झाल्यामुळे प्रिमियम निर्माण करता आले नाही.*

*अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पार्किंग पॉलिसी बद्दल विचारले. यामध्ये असे सांगितले आहे की, मनपाला प्राप्त झालेल्या प्रिमियममध्ये शासनाचा देखील हिस्सा प्राप्त आहे. वाहनतळ प्रत्यक्षात ताब्यात येतील तसे प्रपोशनेटली इन्सेंटीव्ह एफएसआय सुद्धा देण्यात येतील. यामध्ये ३३ (२४) ला पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद मिळालेला नाही. यासर्व प्रकरणामध्ये काही गैरप्रकार झाला असेल, अनियमितता झाली असेल, काही चुकीचे घडले असल्यास ६१ प्रकल्पांपैकी पूर्णत्वास गेलेल्या १३ प्रकल्पापैकी एखाद्या प्रकरणाबद्दल सन्माननीय सदस्यांची काही तक्रार असेल तर त्याबाबत निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.*

*प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मुंबई शहर आणि उपनगराकरिता हा महत्वाचा प्रश्न आहे. वाढत्या लोकसंख्येमध्ये वाहनांच्या तुलनेत पार्किंगची संख्या फार कमी आहे. त्यामुळेच हा प्रश्न आम्ही विचारला होता. राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांना ६१ ठिकाणी ४६,३६६ वाहनांसाठी प्रस्ताव करावयाचे होते. परंतु त्यापैकी केवळ १३ वाहनतळ निर्माण झालेली आहेत. माझा पहिला प्रश्न आहे. उर्वरित वाहनतळाच्या निर्मितीकरिता टाईम बॉण्ड प्रोग्राम केला आहे काय. माझ्या माहिती प्रमाणे यास २००९ मध्ये मंजूरी देण्यात आली होती. याकरिता केव्हा मंजुरी देण्यात आली होती. तसेच यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत. याबाबत आपण चौकशी करुन संबंधितावर कारवाई करणात आहात काय, असे माझे आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहेत.*

*डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ६१ पैकी १३ वाहनतळाचे काम पूर्ण झाले असून ६ महापालिकेस हस्तांतरित झालेले आहेत. उर्वरित प्रस्तावाबाबत विकासकाकडूनच प्रतिसाद नाही. आपण यामधील पॉलिसी वेळोवेळी बदललेली असल्यामुळे विकासकांकडून कमी प्रतिसाद मिळाला असेल. आपण सुरुवातीला प्रिमियम घेत होतो. आता पूर्वीपेक्षा एफएसआय देखील बदललेला आहे. तसेच या प्रक्रियेमध्ये प्रथम कमिटीचे रिकमंडेशन, नंतर आयुक्ताचे सादरीकरण, त्यानंतर*

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*डॉ. रणजित पाटील.....*

*नगरविकास विभागाकडे ॲप्रुव्हल यामध्ये एलओआय देताना बराच काळ जात होता. म्हणजेच एलओआय किंवा आयओडीकरिता वर्ष, दीड वर्षाचा कालावधी जात होता. ही प्रक्रिया क्लिष्ट होती व त्यामध्ये वेळोवेळी बदल देखील झाले. परंतु आगामी काळामध्ये यामध्ये सुसूत्रीकरण कसे होईल, डीसीआरमध्ये कोणते बदल करायला पाहिजे याकरिता आपण प्रयत्नशील आहोत. याकरिता त्यांच्या स्तरावर डीसीआरमध्ये काय बदल करायला पाहिजे, याकरिता महापालिकेला देखील सूचना देणार आहोत. तसेच याकरिता विलंब का होत आहे, याबाबतचा आपला दुसरा प्रश्न होता. याची कारणे हीच असतील. कारण विकासकांचा ३३ (२४) करिता उत्साह कमी आहे. अर्ज केल्यानंतर ६१ प्रकरणांपैकी १३ प्रकरणे पूर्णत्वास गेले. याची कारणमिमांसा केल्यानंतर असे दिसून येते की, याबाबतची प्रक्रिया मोठी आहे. तसेच आपण इन्सेंटीव्ह एफएसआयमध्ये, प्रिमियममध्ये किंवा हाईट रिस्ट्रीक्शन यामध्ये वेळोवेळी केलेला बदल आहे.*

*प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, आमच्या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. याकरिता एवढी वर्षे का लागली. याकरिता बऱ्याच एनओसी घ्याव्या लागतात. फाईल मुव्ह करावी लागते, हे आपल्याला माहीत असतानाही एवढी वर्षे कार्यवाही का करण्यात आली नाही. तसेच याकरिता वन विन्डो सिस्टीम करणार आहात काय?*

*...c/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.42392........

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ज्यावेळी केव्हा अर्ज प्राप्त झालेले असतील, त्यामध्ये सुटसूटीतपणा येण्याकरिता नवीन पार्कींग पॉलिसी आणण्यात येणार आहे. पॉलिसी इझ् व्हावी व विकासकाला इन्सेंटिव्हज् असावेत या दोन्ही गोष्टींसंदर्भात भविष्यात काही पॉलिसीज् ठरविण्यात येतील. नवीन डी.सी.आर. तयार करण्यात येत आहे त्यामध्ये अंडरग्राउंड पार्कींगबाबतचा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, मूळ विकास नियंत्रण नियमावलीतील 33(24) संदर्भात अडचण आहे. विकासकाला इन्सेंटिव्ह ऑफर करुन 100 पेक्षा जास्त रिस्ट्रीक्शन टाकले तर कोणताही विकासक पुढे येण्यास धजावणार नाही. मुंबई शहरातील पार्कींगची अडचण सोडवावयाची असेल तर शासनाने याप्रकरणी निष्ठा दाखविण्याची आवश्यकता आहे. आताही शासन पार्कींग संदर्भातील जबाबदारी स्वीकारत नाही. तारांकीत प्रश्नातील दुसऱ्या उप प्रश्नास उत्तर देण्यात आले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना नियंत्रण नियमावलीसह पुन:प्रसिध्द होऊन वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासनास मंजूरीसाठी सादर व्हावयाची आहे. महानगरपालिका डी.सी.आर.च्या संदर्भात नवीन नियमावली तयार करणार आहे. डी.सी.आर.पॉलिसी जाहीर केल्यानंतर नियम 33(24) संदर्भात किती वेळा बदल करण्यात आला आहे ? 61 वाहनतळांपैकी 13 वाहनतळांचे काम हाती घेण्यात आले व त्यापैकी 6 वाहनतळांचे काम पूर्ण करुन दिले. इतर कामांच्या संदर्भात काहीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने सदरहू प्रकरणी तज्ज्ञांची समिती नेमून नियम 33(24) सुरळीतपणे पार पडण्याकरिता असलेल्या जाचक अटी व शर्ती संदर्भात निर्णय घेण्यात येईल काय ? मुंबई शहरामध्ये ट्रॅफिक वॉर होऊ नये याकरिता पार्कींग प्रस्तावासंदर्भात वेगळा कक्ष स्थापण करुन एक खिडकी योजना जाहीर करण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पार्कींग संदर्भात डी.सी.आर.पॉलिसीमध्ये किती वेळा बदल केला, हा प्रश्न विचारला आहे. त्यासंदर्भात सांगू इच्छितो की, सन 2009 मध्ये पार्कींग धोरण तयार करण्यात आले होते. त्यावेळी त्यास प्रतिसाद मिळाला नव्हता व त्यामध्ये प्रिमिअम न आकारता एफ.एस.आय. बांधण्याची परवानगी देण्यात येत होती.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.42392........

डॉ.रणजित पाटील.....

नंबर ऑफ फ्लोअरला रिस्ट्रिक्शन होते, अन्‌रिस्ट्रक्टेड होते. त्यामुळे सन 2013 मध्ये प्रिमिअम बंधनकारक करुन 40 टक्के प्रिमिअम बाबतचा बदल केला. त्यानंतर दिनांक 8 फेब्रुवारी, 2014 मध्ये 7 टक्के प्रिमिअम आखण्यात आला. नंबर ऑफ फ्लोअर मध्ये अगोदर 7 फ्लोअर पैकी ग्राऊंड फ्लोअर व तळमजला पार्कींगसाठी देण्यात येत होता. त्यावरील भाग पार्कींगसाठी वापरता येणार नाही, सदरहू बदल सन 2013 मध्ये आणण्यात आला. डी.सी.आर.मध्ये किती वेळा बदल केला, याबाबत मी माहिती दिली.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 33(24) ला प्रतिसाद नाही, यासंदर्भातील प्रोसेसला विलंब का होतो, याबाबत एक समिती स्थापन करण्यात येईल काय, दीड दोन वर्ष प्रस्ताव दिल्यानंतर एल.ओ.आय.मिळत नाही त्यामुळे सदरहू प्रकरणी समिती नेमण्यात येणार का, असे प्रश्न उपस्थित केले. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सदरहू प्रकरणी क्लिष्टता कमी होईल अशा प्रकारचे धोरण आखण्यात येईल. मुंबईमध्ये आजमितीला ट्रॅफिक जास्त आहे, ही गोष्ट खरी आहे. ट्रॅफिकसोबतच आयलॅन्ड सिटीमध्ये 22 लाख व्हेहिकल्स आज आहेत व पुढील 5 वर्षातील आपले प्रोजेक्शन साधारणत: 15 लाखच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. इतर भागातून दररोज मुंबई मध्ये अडीच लाख फ्लोटींग व्हेहिकल्स येतात याकरिता डिमांड मॅनेजमेंट व्हावी, यासगळ्यांना घेऊन नवीन पार्कींग पॉलिसी महापालिका आणणार आहे. याप्रकरणी विचार करुन पुढील पॉलिसी ठरविण्यात येईल.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, मुंबईतील 8 मिटरच्या गल्लीपासून इतर सर्व ठिकाणी पार्कींग जागा फुल्ल असते. मुंबई शहराचा नवीन विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. अगोदरच्या डेव्हलप प्लॅनमध्ये पार्कींगसाठी जेवढे रिझर्वेशन होते त्यामधील 40 टक्के पार्कींगच्या वापरात आणण्यात आले नाही. अगोदरच्या रिझर्व पार्कींगसह नवीन आराखड्यामध्ये आखणी किती पार्कींग रिझर्व करण्यात येणार आहे ? मी फॉरेनमध्ये गेलो होतो त्यावेळी तेथील स्टेशन किंवा एअरपोर्ट येथे पार्कींगचा लॉट तयार करण्यात आल्याचे दिसून आले. अशा प्रकारचे नियोजन मुंबईतील रेल्वे स्टेशन व पार्कींगची जागा आहे त्याठिकाणी तयार करण्याचे नियोजन करण्यात येईल काय ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.42392........

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, पार्कींग रिझर्वेशन मधील 40 टक्के पार्कींग युटीलाईज असून नवीन आराखड्यामध्ये आणखी पार्कींग रिझर्व ठेवण्यात येणार का, याबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, यासंदर्भातील परिपूर्ण माहिती माझ्याकडे आता नाही. नवीन डी.सी.आर. तयार करण्यात येत असून तो प्रोसेसमध्ये आहे.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, नवीन डी.सी.आर.मध्ये किती पार्कींग वाढविण्यात येणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सदरहू माहिती घेऊन पुरविण्यात येईल. पॉप्युलेशन जास्त आहे किंवा फ्लोटींग पॉप्युलेशन जास्त आहे किंवा फूटफॉल जास्त आहे, अशा पब्लिक प्लेसेस उदाहरणार्थ, एअरपोर्ट, एस.टी.स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन अशा जागेवर पार्कींगसाठी व्यवस्था करण्यात येईल काय, असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, सदरहू बाबीचा नवीन डी.सी.आर.पॉलिसीमध्ये निश्चितपणे विचार करण्यात येईल. पार्कींग संदर्भात माननीय न्यायालयाने काही गाईडलाईनस दिलेल्या आहेत. प्ले ग्राउंडच्या खाली पार्कींग करणे शक्य आहे काय, यासह दोन-तीन सूचना माननीय न्यायालयाने केल्या असून याप्रकरणी नवीन डी.सी.आर.पॉलिसीमध्ये विचार करण्यात येईल.

श्री राज पुरोहित : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय यहाँ पर जवाब दे रहे है और आँकड़े बता रहे है. मुंबई शहर में ट्राफिक व्यवस्था पूरी तरह से कोलॅप्स हो गई है और मंत्री महोदय कह रहे हे कि इतनी गाड़ी आएगी, ऐसा ऐसा होगा. हाईकोर्ट तक यह प्रश्न पहुंचाया गया. 60 साल के बाद भी मुंबई के विकास के मुद्दे को न जोड़कर यह पाप किया गया. मेरा प्रश्न यह है कि मुंबई में जो बिल्डिंग बन रही है, उनको कम्पलसरी, पार्किंग स्पेस जब तक न हों तब तक बिल्डिंग के काम की शुरुवात नहीं करने दी जाए. क्या आप ऐसा करेंगे ? अभी बताया गया कि पचासों परमिशन्स मांगी जाती है. लोगों को हरॅसमेंट किया जाता है. उनका हरॅसमेंट न हों, क्या सरकार इस ओर ध्यान देगी ? दिल्ली में, कॅनॉट प्लेस में नगरपालिका अण्डरग्राऊंड में बनी है. मुंबई शहर में भी सैंकड़ों मैदान है. तो क्या अण्डरग्राऊंड पार्किंग के संबंध में प्लानिंग करके काम जल्द से जल्द शुरुवात करेंगे ? पार्किंग की बहुत गंभीर समस्या है. यह प्रश्न जल्द हल होने वाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.42392........

श्री राज पुरोहित.....

नहीं है. मुंबई के भविष्य का यह प्रश्न है. इस बारे में क्या सभी विधायकों को साथ में लेकर, एक्सपर्ट लोगों को साथ में लेकर, मुंबई की ट्राफिक की समस्या का परमनंट हल निकालने के लिए एक हाईपॉवर कमिटी का गठन किया जाएगा ?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सदरहू प्रकरण माननीय उच्च न्यायालयामध्ये होते, त्यासंदर्भात प्रश्न विचारला आहे. माननीय उच्च न्यायालयाने सदरहू प्रकरणी बऱ्याच बाबी सांगितलेल्या आहेत. माननीय उच्च न्यायालयाने सांगितलेल्या महत्वाच्या बाबीमध्ये सूचित केले होते की, मल्टिस्टोरीड पार्कींग असावे, अंडर ग्राउंड पार्कींग असावे. तसेच, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पार्कींग संदर्भातील पुराव्या शिवाय करण्यात येणाऱ्या खरेदी विक्रीवर निर्बंध असावेत, तसेच अनअॅथोराईज्ड पार्कींगसाठी पेनाल्टी आकारली पाहिजे, यागोष्टींचा विचार करुन पुढील प्लॅनिंग करण्यात येत आहे.

यानंतर D-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता. प्र. क्र.42392........

डॉ. रणजित पाटील.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा शेवटचा प्रश्न असा होता की, याबाबत हाय पॉवर कमिटी स्थापन करणार आहात काय, सन्माननीय सदस्यांना मला हे सांगावेसे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित आणि संबंधित अधिकाऱ्यांनी घेऊन मी माझ्यात दालनात या बाबतीतील बैठक सुध्दा घेतली आहे, जेणेकरुन संबंधित अधिकाऱ्यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी ती बैठक स्पेसिफिक ए वॉर्डसंबंधी होती. या संदर्भात हाय पॉवर कमिटी स्थापन केली जाईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राज पुरोहित यांनी जो शेवटचा प्रश्न विचारला होता, तो हाय पॉवर कमिटी संदर्भातील अत्यंत महत्वाचा प्रश्न होता. यापूर्वी मुंबईतील डी.पी.च्या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी त्यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे आणि अनेक भानगडी झाल्याचे उघड झाले आणि शेवटी तो डी.पी. या सभागृहात रद्द करावा लागला. हे धोरण स्वीकरताना पुन्हा अधिकाऱ्यांच्या स्वाधीन राहून आपण हे धोरण करण्याचा प्रयत्न केला तर त्यातील हितसंबंधित मंडळी, मुंबईचे बिल्डर्स, आणि ही जी ग्रीड किंवा हावरटपणा की ज्यामधून मुंबईची वाताहत निर्माण झाला असून हे चित्र उभे राहिले आहे, यासंबंधी मला वाटते की, हा प्लॅन तयार करताना किंवा डी.पी. तयार करताना त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्यात लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याची आवश्यकता आहे. हा धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आपण तो निर्णय करणार आहात काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी डी.पी.च्या संदर्भात विचारलेल्या प्रश्न आहे. या ठिकाणी आपण पार्किंगबद्दलचा प्रश्न डिस्कशन करीत आहोत. पण तरीही जी काही पार्किंग पॉलिसी निश्चित होईल, ती महानगरपालिकेकडे पाठविण्यात येईल आणि तेथे चर्चा करुन सर्वांना विश्वासात घेऊन म्हणजे त्यामध्ये विधीमंडळ सदस्य आणि महापालिकेचे लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊन चर्चा करुन टप्प्याटप्प्याने या पॉलिसीची आपण अंमजबजावणी करु.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, या पार्किंग पॉलिसीबद्दल अंडरग्राऊन्ड पॉलिसीमध्ये मुंबई शहरामध्ये....

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता. प्र. क्र.42392........

अध्यक्ष : इतर सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. कारण सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू मुंबईचे महापौर होते त्यामुळे त्यांना मुंबईची माहिती आहे.

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, अंडरग्राऊन्ड पार्किंगच्या बाबतीत जेथे जेथे अंडरग्राऊन्ड पार्किंग झाल्या आहेत त्या ठिकाणी सफोकेशन होते आणि इलेक्ट्रिसीटी सुध्दा बऱ्याच प्रमाणात लागते. त्यामुळे सरकारने किंव नगरविकास खात्याने यावर अभ्यास करुन अंडरग्राऊन्ड पार्किंग पॉलिसीच्या बाबतीत नवीन उपाययोजना करण्यासाठी काही अभ्यास वगैरे केला आहे काय, तसे असेल तर माननीय मंत्री महोदयांनी त्यासंबंधी माहिती द्यावी.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांनी अंडरग्राऊन्ड पार्किंगच्या बाबतीत जो प्रश्न विचारला तोच प्रश्न सन्माननीय राज पुरोहित यांनी विचारला होता. ते म्हणाले की, दिल्लीच्या कॅन्नॉट प्लेस प्रमाणे अंडरग्राऊन्ड पार्किंगच्या संदर्भात देशामध्ये प्रयोग झालेला आहे. त्या बाबतीत जो तांत्रिक अभ्यास करावयाचा असेल तो करुन आपल्याला आयलॅन्ड सिटीमध्ये आपल्याला जमिनीच्या खाली पार्किंग करता आले तर बरीच जमीन आपल्याला एक्सप्लॉईट करता येईल. कोर्टाच्या सुध्दा तशा शिफारस आहेत की, आपण त्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. आपण ग्लोबली विचार केला तर हे पाहण्यात आले आहे की, जेथे जेथे अशा हाय डेन्सीटी असलेली शहरे आहेत तेथे अंडरग्राऊन्ड पार्किंगला चालना दिलेली आहे.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, मला आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, आतापर्यंत आपण ज्या ज्या बिल्डरांना इमारती बांधण्याच्या परवानग्या दिलेली आहेत. त्या बिल्डरांची पार्किंगच्या संदर्भात महापालिकेकडे जे डीपीआर किंवा प्लॅन दिलेले आहेत महापालिकेमध्ये दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी झाली नाही, असे जितके बिल्डर्स असतील आणि ज्या ज्या लोकांनी महापालिकेसमवेत तसे करारनामे केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी केलेली नाही अशांच्या विरोधात खासकरुन पार्किंगच्या बाबतीत शासन कारवाई करणार आहे काय?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो माझ्या लक्षात आलेला नाही. अंमलबजावणी म्हणजे बिल्डरांनी की, अधिकाऱ्यांनी केली नाही. तर यामध्ये जो निरुत्साह हा विकासकांकडून सुध्दा आहे.

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता. प्र. क्र.42392........

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, माझा एकच प्रश्न आहे की, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी बिल्डर्सना परवानगी देताना त्यांच्या ओपन स्पेसमध्ये किती पार्किंग स्पेस राहील हे निश्चित करुन त्या इमारती बांधल्या आणि डेव्हलप केल्या आहेत. परंतु ज्यांनी पार्किंगसाठी जागा सोडल्या नाहीत अशा लोकांवर आपण कोणती कार्यवाही करणार आहात काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्नासंबंधी स्पेसिफफिक काही उदाहरण असेल या 61 प्रकल्पांपैकी तर सांगावे.

**अध्यक्ष :** सन्माननीय मंत्री महोदय त्यांनी हा जनरल प्रश्न विचारला आहे.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न ओपन स्पेसच्या बाबतीत नाही तर निजी मालिकीच्या जमिनीवर ज्या विकासकांनी असे पार्किंग केले नसेल तर त्यांची चौकशी केली जाईल.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी जुलै 2015 च्या अधिवेशनात हाच प्रश्न आला होता, त्यावेळी आपण असे सांगितले होते की, आपण त्यांना इन्सेंटिव्ह देतो, त्यांच्या बिल्डींगच्या पार्किंग वेगळ्या आहेत. बिल्डर्सकडून एक्स्ट्रा पार्किंग घेऊन आपण त्यांना एफएसआय जास्त देतो. आणि आपण एफएसआय नंतर देतो तर पार्किंग स्लॉट अगोदर घेतो. मागच्या अधिवेशनामध्ये अशा बिल्डरांची यादी आपण पटलावर ठेवणार असल्याचे सभागृहात सांगितले होते. अशा ज्या बिल्डरांनी एफएसआय वापरला परंतु पार्किंग स्लॉट दिला नाही आणि अधिकाऱ्यांनी ते घेणे क्रमप्राप्त होते, अशा बिल्डरांना दंड आकारुन पुढील अधिवेशनापर्यंत त्यांच्यावर पूर्ण कारवाई करणार आहात काय, ज्या अधिकाऱ्यांनी पार्किंग स्लॉट न घेता अगोदार एफएसआय वापरास दिला आहे, त्यांच्यावर आपण एफआयआर दाखल करणार आहात काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत बंब यांनी विचारले की, ज्या विकासकांनी पार्किंग स्लॉट न देता इन्सेंटिव्ह एफएसआय घेतला, अशी जर कोणी लोक असतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कार्यवाही केली जाईल. अशा बिल्डरांवर जी काही आवश्यक असेल ती कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

4.....

ता. प्र. क्र.42392........

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. आपण मागच्या अधिवेशनात सांगितले होते की, अशा बिल्डरांची यादी पटलावर ठेवतो. परंतु सदर यादी अद्यापही पटलावर ठेवलेली नाही. त्यामुळे आपण आता जे उत्तर दिले आहे की, लवकरात लवकर तर या लवकरात लवकरची व्याख्या काय असते, आपण यामध्ये स्पष्ट करावे की, तीन महिन्यात, किंवा सहा महिन्यात, जे काही सांगावयाचे असेल ते स्पष्टपणे बोलावे आणि त्याचा पिरीएड द्यावा.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, 3 महिन्यात माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

श्री अमिन पटेल : अध्यक्ष महोदय, पिछले तीन सालों में मुंबई और उपनगर में नियम 33(24) के अन्तर्गत कितना पार्किंग स्लॉट बनाने की परमिशन दी गई है और कितना पार्किंग स्लॉट आपको मिल चुका है ? दिनांक 4 मार्च, 2015 को मुख्य सचिव ने एक बैठक लेकर कहा था कि मुंबई महानगरपालिका ग्राऊण्ड के नीचे पार्किंग बनाने की योजना तैयार करेगी. तो ऐसे कौनसे ग्राऊण्ड है जिसके ऊपर मुंबई महानगरपालिका ने अण्डरग्राऊण्ड पार्किंग का प्लान मुंबई शहर और उपनगर में किया है ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही माहिती आधीच दिलेली आहे की, आपण 61 प्रकल्पांना एलओआय दिले होते आणि त्याच्यातून आपल्याला 46366 पार्किंग्स निर्माण होणार होत्या. यापैकी प्रत्यक्षात 13 प्रकल्प पूर्ण झाले असून त्यातही 6 प्रकल्पांचे हस्तांतण झालेले आहे. त्यामुळे आपण यातून 3081 पार्किंग स्लॉट आपण निर्माण केले आहेत.

**अध्यक्ष :** ज्या सन्माननीय सदस्यांना उत्तर मिळाले नसेल त्यांना यावर अर्धा तास चर्चा उपस्थित करता येते.

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा असा प्रश्न विचारला आहे की, आपल्याला अंडरग्राऊन्ड पार्किंग आपण तयार करता येते. आजच काही आपण अशी मैदाने निश्चित केलेली नाहीत. पण जी काही आझाद मैदानसारखी जी काही मैदाने असतील त्यांच्या ठिकाणी आपल्याला अंडरग्राऊन्ड पार्किंग तयार करता येते. अशा 4-5 मोठ्या ग्राऊन्ड्सची माहिती घेऊन मी त्याची यादी नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

यानंतर E-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.42392........

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, अंडरग्राऊंउ पार्किंगचे टेंडर महानगरपालिकेमध्ये सन्माननीय आयुक्त श्री.स्वाधीन क्षेत्रीय यांनी त्यावेळेस मांडले होते आणि स्थायी समितीने मंजूर केलेले होते. याकडे मंत्री महोदयांनी लक्ष द्यायला हवे. अंडरग्राऊंउ पार्किग मुंबई शहरामध्ये 6 ठिकाणी महापालिकेने टेंडर काढून प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केला होता. सदर प्रस्तावावर कोटामध्ये मॅटर पेंडींग आहे. शासन हे 6 ही प्रस्ताव मुंबई शहरात एक्झीक्युट व्हावेत जे स्थायी समितीने व महानगरपालिकेने मंजूर केले आहेत. वाहन तळ मंजूर होण्याची भूमिका कोर्टासमोर शासन घेणार काय?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, बृन्हमुंबई विकास नियोजनामध्ये जी काही मैदाने होती त्या क्षेत्राखाली वाहनतळाचे बांधकाम अनुज्ञेय होते. तथापि, ओव्हल मैदान, क्रॉस मैदान, आझाद मैदान, शिवाजी पार्क याखाली वाहनतळाचे बांधकाम अनुज्ञेय नाही.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांना अपेक्षित उत्तर मिळाले नाही तर यावर वेगळ्या मार्गाने पुन्हा उपस्थित करा. त्यामुळे आवश्यक असेल तेच प्रश्न विचारण्यात यावेत.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये ज्या-ज्या मैदानाखाली अशी वाहनतळे करण्याची मागणी होती. महानगरपालिकेने अशा 6 ठिकाणचे टेंडर काढले होते. त्याला शासनाने सपोर्ट केलेला आहे. आवश्यक असल्यास त्याप्रमाणे बदल करुन सकारात्मक विचार करण्यात येईल.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उदगीर (जि.लातूर) शहरातील पाणीपुरवठा**

**(4) *44739 श्री.सुधाकर भालेराव (उदगीर)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) उदगीर (जि.लातूर) शहरास पुरवठा होणाऱ्या, बनशेळकी, भोकणी तलावातील साठा संपल्यामुळे, उदगीर शहरासाठी देवर्जन मध्यम प्रकल्पातून पाणी पुरवठा योजनेद्वारे शहरास पाणी पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, देवर्जन मध्यम प्रकल्पात मुबलक पाणीसाठा असूनही उदगीर शहरास, 3 महिन्यातून एकवेळा सुध्दा पालिका नागरिकांना पाणी पुरवठा करीत नसल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, 2015 मध्ये वा त्यादरम्यान प्रशासनाच्या निदर्शनास आणले असता जिल्हाधिकाऱ्यांनी उदगीर शहरास जूनपर्यत पाणीपुरवठा होईल असा अहवाल दिला होता, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, देवर्जन मध्यम प्रकल्पात मुबलक आणि असुनही पालिका प्रशासनाने नागरिकाना पाणी पुरवठा करण्याऐवजी पाणी नसलेल्या तिरु प्रकल्पातील तात्पुरता पाणी पुरवठा योजनेसाठी साडेबारा कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवून शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, पाणी टंचाईकाळात नागरीकांची व प्रशासनाची दिशाभूल करणा-या पालिका प्रशासनावर व नगराध्यक्षावर शासनाने कोणती कारवाई केली वा ा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे खरे आहे.

(2) सद्यस्थितीत देवर्जन धरणामध्ये 1.10 द.ल.घ.मी. पाणीसाठा उपलब्ध आहे. धरणातील पाणी साठ्यातून उदगीर शहरास सन 2013 मध्ये घेण्यात आलेल्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेतून 11 गावांच्या पाणीपुरवठा योजनेसह पाणी पुरवठा केला जात आहे.

सद्यस्थितीत उदगीर शहरास 40 दिवसातून एकवेळ पाणीपुरवठा केला जात आहे.

उदगीर शहरातत जून पर्यंत पाणीपुरवठा होईल असा अहवाल दिला होता, हे खरे नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले आहे.

(3), (4) व (५) वर अ.क्र. 2 मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार देवर्जन मध्यम प्रकल्पात मुबलक पाणी साठा नाही. तथापि, टंचाई काळातील शासन निकषाप्रमाणे उदगीर शहरास पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन लघु पाटबंधारे विभागाच्या तिरु प्रकल्पावरुन दररोज 4.50 द.ल.घ.मी. ची तातडीची पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44739.....

दि. 17.11.2015 रोजी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर करण्यात आला होता. त्यावेळी तिरु प्रकल्पात 3.10 द.ल.घ.मी. इतका पाणी साठा उपलबध होता.

जिल्हाधिकारी, लातूर यांनी तिरु प्रकल्पातून 1.5 द.ल.घ.मी. पाणी आरक्षणास दि. 07.12.2015 रोजी मान्यता दिली होती. सद्यस्थितीत तिरु प्रकल्पात 0.8 द.ल.घ.मी. एवढाच पाणी साठा शिल्लक आहे. सदचा पाणी साठा पुरेसा नसल्याने संबंधित यंत्रणेने अंदाजपत्रक तांत्रिक मान्यता दिलेली नाही.

श्री.सुधाकर भालेराव : अध्यक्ष महोदय, लातूर जिल्ह्यातील उदगीर शहरामध्ये पाण्याचा भीषण प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये उदगीर शहराला पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या बनशेळकी, भोकणी तलाव कोरडे पडलेले आहेत. आज उदगीरमधील परिस्थिती गंभीर झालेली असल्याने शहर व परिसरातील लोक स्थलांतर करतील की काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. मख्यमंत्री महोदय लातूर दौऱ्यावर आले असता 12 कोटी रुपये उदगीर शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी टंचाईच्या माध्यमातून मंजूर केलेले आहेत. याठिकाणी देवर्जन प्रकल्पाच्या अंतर्गत सन 2013 मध्ये पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केली. सदर योजना अत्यंत निकृष्ट दर्जाची राबविण्यात आलेली आहे. आपल्या लक्षात असेल की मी हिवाळी अधिवेशनामध्ये सुध्दा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून नगरपालिकेचा होत असलेला भ्रष्टाचार आणि काळाबाजार याबाबत नगरपालिकेवर कारवाई करण्यात यावी अशा पध्दतीची लक्षवेधी सूचना मांडली होती. टंचाईमध्ये सदर प्रकल्पाच्या झालेल्या कामाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात येईल काय?

अध्यक्ष महोदय माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अटल अमृत योजनेमध्ये उदगीर शहराची निवड झालेली आहे. कृती आराखडा 126 कोटी रुपयांचा मंजूर झाला असून केंद्र शासनाने त्यापैकी 10 टक्के रक्कम दिलेली आहे. सदर रक्कम जिल्हाधिकारी यांच्या खात्यावर जमा झालेली आहे. या टंचाईमध्ये लिंबोटी धरणातून 45 कोटी रुपये खर्च करुन पाणी पुरवठा केला तर निश्चितरुपाने उदगीर शहरासाठी टंचाई परिस्थितीमध्ये पाणी पुरवठा होईल हे कार्यान्वित करण्यात येईल काय?

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44739.....

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, देवर्जन प्रकल्पासाठी 3.60 कोटी रुपये मंजूर केल्याचे सन्माननीय सदस्य श्री.सुधाकार भालेराव यांनी सांगितले. मंजूर काम पूर्ण करताना यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याच्या प्रकरणामध्ये निश्चितपणे चौकशी केली जाईल. दुसरा प्रश्न असा विचारला की, कलेक्टरकडे 12 कोटी रुपये आलेले आहेत. अटल अमृत योजनेमध्ये 124 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. या प्रस्तावामध्ये जर अटल अमृत योजनेमधून पाण्याचे आरक्षण होत असेल, तसा प्रस्ताव इरिगेशनकडे जात असेल आणि यातून जर पूर्ण माहिती मिळाली तर अटल अमृत योजनेमध्ये पूर्ण सहकार्य करण्यात येईल. अर्बन डेव्हलपमेंटकडून सदर प्रस्तावाला मान्यता दिली जाईल.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, उदगीर हे जवळ जवळ 125 लाख लोकसंख्येचे गाव आहे. याठिकाणी भीषण पाणीटंचाई निर्माण झालेली आहे. बनशेळकी आणि भोकणी धरणामध्ये पाणी नसल्याचे सन्माननीय सदस्य सुधाकर भालेराव यांनी सांगितले. आता फक्त देवर्जन धरणातून पाणी मिळण्याची शक्यता आहे. सदर धरणामध्ये किती पाणीसाठा उपलब्ध आहे. जून महिन्यापर्यंत पाणी उपलब्ध होऊ शकेल असा जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल दिलेला आहे हे खरे नाही. जर जून महिन्यापर्यंत पाणी टिकणार नसेल तर ते कधीपर्यंत टिकणार आहे. आमतपूर पासून 40 किलोमीटर अंतरावर लिंबोटी धरण आहे ते शासन तातडीने मंजूर करणार आहे काय? दोन्ही धरणांमध्ये पाणी साठा नसून मृत साठा आहे. मृत साठ्यामध्ये उदगीरला किती दिवस पाणी देता येईल याबाबत स्पष्टता व्हायला पाहिजे. गावतील 117 बोअरवेल पैकी 15 बोअरवेल चालू आहेत. नगरपालिकेने 50 टँकरची मागणी केलेली आहे. उदगीर शहरामध्ये पाण्याचा मोठा गंभीर प्रश्न असल्याने लोकांचे स्थलांतर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट खरी आहे की, उदगीर शहरामध्ये जवळ जवळ दीड लाख लोकसंख्या आहे आणि पाण्याची भीषण परिस्थिती याठिकाणी निर्माण झालेली आहे. तिरुवर याठिकाणी सुध्दा मुबलक पाणी साठा नाही. दुवर्जन धरणाचेही पाणी जूनपर्यंतच पुरेल असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे. याबाबत तातडीने काही करु शकतो काय तर यामध्ये शॉर्ट टर्म आणि लॉंग टर्म मॅनेजमेंटचा विचार केला तर शॉट टर्ममध्ये टँकर आणि परिसरातील बोअरवेल

......5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.44739.....

डॉ.रणजित पाटील........

अधिग्रहीत करुन यासाठी लागणाऱ्या टँकरसाठी जिल्हाधिकाऱ्यांना 12 कोटी रुपये वर्ग करण्यात आलेले आहेत. तातडीचा निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना तसे अधिकार दिलेले आहेत. परंतु लाँग टर्ममध्ये जर असा प्रस्ताव असेल तर 20-25 वर्षाचे होरायझन पाहून पाण्याचा साठा उपलब्ध होत असेल तर अटल अमृत योजनेतून साधारणपणे 124 कोटी रुपयांचा एक प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. याबाबत आरक्षणाचा प्रस्ताव सुध्दा सादर करण्यात आलेला आहे. असा प्रस्ताव झाला आणि त्याला इरिगेशनने आरक्षणाची मान्यता दिली तर निश्चितपणे अटल अमृत याजनेसाठी विभागाकडून मान्यता देण्यात येईल.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये विसंगती आहे. उत्तर असे दिलेले आहे की, जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांनी पाणी जूनपर्यंत टीकणार नाही असे सांगितले आहे. पाणी कधीपर्यंत टिकेल?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, स्टॉकमध्ये बाष्पीभवन किंवा संचित गाळामुळे पाण्याचा साठा जून महिन्यापर्यंत पुरेल की नाही याबाबत निश्चित माहिती घेतली जाईल. जर तातडीची काही व्यवस्था करावी लागेल त्यासाठी 12 कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांना वर्ग केलेले आहेत. टँकर व परिसरातील बोअर इमरजनसी मॅनेजमेंटची व्यवस्था केलेली आहे.

श्री.सुधाकर भालेराव : अध्यक्ष महोदय, आताच मंत्री महोदयांनी शॉर्ट टर्मसाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना करण्यात येतील अशी माहिती दिलेली आहे. बनशेळकी तलाव हा नगरपालिकेच्या मालकीचा आहे. याठिकाणी 10-15 फूट काळी माती साठलेली आहे. जलयुक्त शिवार अभियानामध्ये मोठ्या प्रमाणात काम करण्यात येते हे धोरण राज्याने आखलेले आहे.

F-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधाकर भालेराव.....

सदर साठवण तलावातील दोन फुट गाळ काढण्यासाठी जिल्हाधिका-यांना 2 कोटी रुपयांची तरतूद केली तर निश्चितपणाने भविष्यामध्ये साठवण तलावाची खोली वाढेल. त्यामुळे पाणीसाठा वाढेल. याकरिता जिल्हाधिका-यांना सूचना करण्यात येतील काय ?

श्री.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वागतार्ह सुचना केली आहे. शिल्लकी साठवण तलावामध्ये जलयुक्त शिवारामधून असेल किंवा तेथील नियोजनामधून डी.पी.सी. मधून काही करता आले किंवा त्याही पेक्षा पुढे जाऊन काही अशा स्वरुपाचे प्रस्ताव असतील तर जे 12 कोटी रुपये पाठविले आहेत. त्यामधून निधी देता येईल. जेणे करुन पावसाळयाच्या आधी तलावामधील गाळ काढता येईल.

श्री. विनायकराव जाधव : अध्यक्ष महोदय, उद्‌गिरच्या पाणी टंचाईबाबत सर्वांनाच अडचण जाणवते. उद्‌गिर असेल किंवा लातूर असेल परंतु कोणीही लिंबोटी धरणाच्या पाण्याची मागणी करीत आहे. लातूरला किंवा उद्‌गिरला पाणीपुरवठा करण्यासाठी लिंबोटी धरणाचे पाणी फिजिबल आहे किंवा नाही हे पहावे लागेल. माझी आपल्या माध्यमातून मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, लेंडी प्रकल्प लिंबोटी धरणापेक्षा तिनपट क्षमतेचा मोठा प्रकल्प आहे. तो प्रकल्प मार्गी लावण्याची सर्वांनी प्रयत्न केला तर लिंबोटी धरणातून उदगिरला पाणी देण्याचे ठरविले तर ती योजना या वर्षी पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे उदगिरची तहाण भागणार नाही. तुम्हाला कायम पाणी कसे मिळू शकेल या दृष्टीकोनातून प्रयत्न करायला पाहिजेत. उठसूट लिंबोटी धरणाचे पाणी तुम्हाला मिळू शकत नाही. जे तुम्हाला मिळू शकते त्याची मागणी केली तर उदगिरच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

श्री.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी लिंबोटी ऐवजी लेंडी प्रकल्पाबद्दलचा प्रस्ताव आणि त्याबाबत विचार मांडले त्या दृष्टीने विचार केला जाईल.

श्री.दिपक चव्हाण : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी 12 कोटी रुपयांची तरतूद केली. तिरु प्रकल्पामध्ये 3.10 दशलक्ष घनमिटर इतक्या पाण्याचासाठा उपलब्ध होता. सदरचा पाणीसाठा पुरेसा नसल्याने समयंत्रणेने अंदाजपत्रकात

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिपक चव्हाण ......

अनुमान दिलेले आहेत. परंतु पर्यायी व्यवस्था काय केली आहे ? बोअर किती खोल पर्यंत करण्याची शासनाची परवानगी आहे ? आणि तेथे पाण्याची पातळी किती आहे ?

श्री.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, इमरजन्सी मॅनेजमेंटमध्ये मी सांगितले की, परिसरामध्ये ज्या काही बोअर असतील त्यांना पाणी आहे. त्या बोअरना अधिग्रहण करुन, त्यासोबत तातडीने इमरजन्सी मॅनेजमेंटमध्ये जर नवीन बोअर करायच्या असतील तर ज्या पातळीपर्यंत बोअर करायला परवानगी आहे ती कदाचित सिंचनासाठी कुठली अट असेल, पिण्याच्या पाण्यासाठी शासन स्तरावर विचार केला जाईल. ती रिवाईज करुन किंवा पिण्यासाठी जर आपल्याला अधिकची बोअरींग डिप करण्याची परमिशन लागत असेल तर शासन स्तरावर त्यासाठी सुध्दा विचार केला जाईल.

श्री.सुधाकर भालेराव : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक पाटील यांनी एक प्रश्न विचारला व त्याचे उत्तरही त्यांनीच सभागृहाला दिले. उदगिर शहरासाठी पाणी लिंबोटी धरणातून पाणी आरक्षित करता येणार नाही. अशा पध्दतीचे नैतिक अधिकार सन्माननीय सदस्यांना आहेत का ?

**अध्यक्ष :** हा मुद्दा पॉईंट ऑफ ऑर्डर होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्यांनी त्यांनी त्यांचे मत मांडले आहे. त्यांनी एकच सूचना केली की, लेंडीच्या मोठया प्रकल्पामध्ये अधिक पाणी मिळेल. सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचे आहेत का ?

श्री.सुधाकर भालेराव : अध्यक्ष महोदय, लिंबोटी धरणाच्या प्रस्तावाबाबत उदगिर शहराला पाणी देण्यासाठी प्रस्ताव शासन स्तरावर आलेला आहे. ज्यासाठी केंद्र सरकारने 22 कोटींच्या मुकाबल्यात 10 टक्के रक्कम अदा केलेली आहेत. उदगिरच्या पाण्यासाठी लिंबोटी धरणातून पाणी आरक्षित करण्याचा जो प्रस्ताव आलेला आहे तो तात्काळ मंजूर करुन कायम स्वरुपी पाणी पुरवठा करण्यात येणार का ?

श्री.रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, मी मगाशी सांगितले की, प्रथम इरिगेशन विभागाकडून आरक्षण प्रस्ताव पाठवून त्यावर मान्यता घ्यावी लागते. आमच्याकडे प्रस्ताव आला की आम्ही त्याला मान्यता देतो.

.....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अकोला येथील पोलिस गस्ती पथकाने वीज महावितरण कंपनीची तार चोरुन नेत असलेला ट्रक जप्त केल्याबाबत**

*(५) * ४८५२७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

*(१) अकोला येथील खदान पोलिस स्टेशनच्या गस्ती पथकाने वीज महावितरण कंपनीची सुमारे १२-१३ लाख रुपये किमतीची अल्युमिनियम तार चोरुन नेत असतांना एम.एच.-२० बी.टी.-३५६३ क्रमांकाचा ट्रक दिनांक ४ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास जप्त केला, हे खरे आहे काय,*
*(२) असल्यास, प्राथमिक चौकशीमध्ये हस्तगत करण्यात आलेली तार महावितरण कंपनीची असून खरेदी करणारी टोळी औरंगाबाद येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,*
*(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,``*
*(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?*

*श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.*
*अकोला येथील खदान पोलीस स्टेशनच्या गस्ती पथकाने नाकाबंदी चेंकीग दरम्यान रु. १२,१५,०००/- किमतीची तार घेऊन जात असताना ट्रक क्रमांक एम.एच.-२० बी.टी.-३५६३ जप्त केला असून ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.*
*(२) व (३) गुन्ह्याचे अन्वेषण दरम्यान हस्तगत करण्यात आलेली तार ही महावितरण कंपनीची नसून केईसी इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीची असल्याचे निष्पन्न झालेले आहे. गुन्ह्यांतील ३ आरोपी हे औरंगाबाद येथील असून २ आरोपी हे पश्चिम बंगाल येथील आहेत. अधिक तपासामध्ये याच संदर्भात पोलीस स्टेशन जउळका, जि.वाशिम येथे अप. क्र.१४/१६, भा.दं.वि. कलम ३७९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन, खदान यांनी मूळ कागदपत्र पोलीस स्टेशन, जउळका, वाशिम यांचे ताब्यात दिले असून पोलीस तपास सुरु आहे.*
*(४) प्रश्न उद्‌भवत नाही.*

-----------------

श्री.रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, या प्रश्नांमध्ये स्पेसिफिक प्रश्न होता की, चौकशीमधून काय निष्पन्न झाले, व काय आढळले ? उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदयांनी छापल्याप्रमाणे असे उत्तर दिले. माननीय अध्यक्ष महोदय, मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अकोला जिल्हयात मागील तिन महिन्यापासून अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले आहेत. महाराष्ट्राची परिस्थिती वेगळी असेल यामध्ये हाय प्रोफाईल मुळ टोळी पकडली जात नाही. त्याबाबत शासन स्पेसिफिक रियालीटी ओपन करील का ?

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, चौकशीमध्ये नेमके काय आढळले ? ज्या चौकशीमध्ये दिनांक 4 फेब्रुवारी 2016 रोजी नाकाबंदीमध्ये ही तार आढळून आली. सुमारे 12 लाख 15 हजार रुपये किंमतीची तार आणि ट्रक जप्त केला. या प्रकरणामध्ये जवळपास 6 आरोपी आढळून आले. हे आरोपी अकोला जिल्हयामध्ये 379 कलमा खाली ताब्यात घेण्यात आले. त्यांची चौकशी झाली. त्यातून असे निष्पन्न झाले की, त्यांनी जी तार चोरुन किंवा हस्तगत केली होती. ती तार वाशिम जिल्हयातील होती. संबंधित इलेट्रीकल इंजिनिअरच्या असिसटं मॅनेजरने वाशिम जिल्हयामध्ये गुन्हा दाखल केला. म्हणून ते गुन्हेगार वाशिम जिल्हयात वर्ग करण्यात आले. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाला उपप्रश्न विचारला की, अशा संदर्भामध्ये सातत्याने घटना घडत असतील तर हाय प्रोफाईल टोळी कार्यरत असेल तर निश्चितपणे अशा स्वरुपाचा सूचना पोलीस अधिक्षकांना देण्यात येऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, या तार चोरांची पाळेमुळे पूर्ण महाराष्ट्रात पसरलेली अहेत. त्यातील 2 आरोपी पश्चिम बंगाल येथील आहेत. अकोला, वाशिम, अमरावती जिल्हयात शेतक-यांच्या पिकाचे कृषी पंपांची तार चोरीला जाते. या आतरराज्य टोळीचा छडा लावण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांचे विशेष पथक नेमावे. हे प्रकार विशेषतः ज्या जिल्हयात शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत अशा जिल्हयात हे प्रकार घडत आहेत. या प्रकरणासंदर्भात विशेष पथक नेमून कारवाई करणार आहात का ?

श्री.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, ही चोरी होत असताना नाक्यावर नाकाबंदी लावली होती. त्योवळी ही चोरी आढळून आलेली आहे. हा प्रश्न पर्टीक्युलर सबजेक्टशी संबंधित आहेत. जर सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचाची बाब निदर्शनास आणून दिली आणि जर त्याची निकड आणि गरज लक्षात घेऊन त्यांचे निश्चित स्वरुपात मत विचारात घेऊन कारवाई करण्यात येईल.

.....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश भारसाकळे : अध्यक्ष महोदय, या प्रकारच्या घटना अकोला जिल्हयात खूप मोठया प्रमाणात होत आहेत. माझा अकोट आणि तेल्हारा मतदार संघ आहे. तेथे गेल्य दोन तीन वर्षाआधी संशयीत डिपी चोरीला गेली. वाण धरणाच्या चोरीचा तपास आजपर्यत लागलेला नाही. ही चौकशी पूर्ण होण्यास किती दिवस लागतील ? या प्रकरणामध्ये मोठे गुड असल्यामुळे त्याच्या चौकशीचे आदेश आपण देणार आहात का ?

श्री.राम शिंदे : अध्यक्ष महोदय, होय.

**अध्यक्ष :** प्रश्नोत्तराचा तास संपला.

G-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**गॅलरीतून सभागृहामध्ये पत्रके फेकत घोषणा देऊन सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय निर्माण करण्याच्या केलेल्या प्रयत्नाबाबत माननीय अध्यक्षांनी केलेली घोषणा**

**अध्यक्ष** : दिनांक 21 मार्च, 2016 रोजी दुपारी 01.32 वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष यांनी महाराष्ट्र विधनसभा सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित केल्यावर सभागृहाच्या प्रेक्षक गॅलरीत बसलेले श्री.सचिन दयानंद खरात यांनी सभागृहामध्ये पत्रके फेकून घोषणा दिल्या व सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय निर्माण करण्याचा प्रयत्न केला व पर्यायाने सभागृहाचा विशेषाधिकार भंग व अवमान केला म्हणून श्री.सचिन दयानंद खरात यांना सभागृहाच्या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्याच्या ताब्यात काल दिनांक 21 मार्च, 2016 रोजी रात्री 8.00 वाजेपर्यत ठेवण्यात आले व सक्त ताकीद देण्यात येऊन सोडून देण्यात आले.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सदरील व्यक्ती कोणाच्या शिफारशीने विधान भवनात आले होते.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.बालाजी किणीकर यांच्या शिफारशीने श्री.सचिन दयानंद खरात हे विधान भवनात आले होते. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी विचार करीत आहे की, ज्या आमदारांचे शिफारसीने प्रवेश पत्रिका घेऊन लोक आतमध्ये येऊन काजकाजात व्यत्यय आणतील, पत्रके फेकतील त्या आमदारांच्या पत्रावर पाच वर्षे किंवा सत्र संपेपर्यत त्याने कोणालाही पास देऊ नये अशा प्रकारचा निर्णय करायचा का ?

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....2

**पृ. शी.** : लेखी उत्तरे

**मु. शी.** : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव (1) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 21 मार्च, 2016 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**अध्यक्ष :** दिनांक 21 मार्च, 2016 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : शोक प्रस्ताव

**मु.शी.** : श्री. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे, वि.स.स. व माजी मंत्री यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, श्री. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे, वि.स.स. व माजी मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे, वि.स.स. व माजी मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांचा जन्म दिनांक 3 मार्च, 1937 रोजी पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील वढू येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.एल.एल.बी. पर्यंत झाले होते.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांनी श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, शिरूर तालुका सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तसेच घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-संचालक म्हणूनही उत्तम कार्य केले होते. शिरूर तालुक्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांनी शिरूर पंचायत समितीचे सभापती तसेच पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून शिरूर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे, सन 1985 व 1990 असे दोन वेळा पुणे जिल्ह्यातील शिरूर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. जून 1991 ते नोव्हेंबर, 1992 या काळात राज्याचे गृह राज्यमंत्री म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. तसेच मे, 1994 मध्ये बारामती मतदारसंघातून ते लोकसभेवरही निर्वाचित झाले होते. एक अभ्यासू व कार्यक्षम लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 19 मार्च, 2016 रोजी दु:खद निधन झाले. अशा या थोर समाजसेवकाला मी सभागृहाच्या वतीने तसेच वैयक्तिकरित्या भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

-----

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील (विरोधी पक्ष नेता) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांच्या निधनाबाबत मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांनी शिरुर या कर्मभूमीत अनेक संस्थांच्या उभारणीतून स्वकर्तृत्वातून समाजमनावर वेगळी छाप त्यांनी पाडली होती. अतिशय सामान्य परिस्थितीतून त्यांची वाटचाल सुरु झाली. कायद्याचे ज्ञान संपादन करुन विशेषत: ग्रामीण भागात सातत्याने लोकसंपर्क त्यांनी कायम ठेवला. त्यांनी राजकीय जीवनाला सुरुवात शिरुर पंचायत समितीचे सभापती म्हणून केली. नंतरच्या काळात पुणे जिल्हा परिषदचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सहकार, शिक्षण क्षेत्रात काम करण्याची आवड असलेले कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांचे श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्था, शिरुर तालुका सहकारी साखर कारखाना व घोडगंगा सहकारी साखर कारखान्याची स्थापनेत महत्वाचे योगदान राहिले. 1995 ते 1990 असे दोन वेळा ते महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचीत झाले. राज्याचे गृहराज्यमंत्री म्हणूनही त्यांना काम करण्याची संधी मिळाली. 1994 मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून लोकसभेचे प्रतिनिधीत्व करण्याची त्यांना संधी मिळाली. अभ्यासू व कार्यक्षम लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख राहिली आहे. सातत्याने राजकारण व समाजकारणामध्ये त्यांचा केवळ पुणे जिल्हयात नव्हे तर अहमदनगर जिल्हयाशीही त्यांचे अतुट नाते होते. समाजाभिमुख व लोकाभिमुख अशा प्रकारचा नेता गेल्याचे दु:ख स्वाभावीपणे आपणा सर्वांनाच आहे. अशा नेत्याचे दिनांक 19 मार्च, 2016 रोजी दु:खद निधन झाले. विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....5

श्री.अजित पवार (बारामती) : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देण्याकरिता मी उभा आहे. राज्याचे माजी गृहराज्यमंत्री तसेच बारामती लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांचे दु:खद निधन झाले. कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे आणि माननीय श्री.शरद पवार साहेबाचे 1962 पासून अतिशय मैत्रीचे संबंध होते. अतिशय विश्वासू सहकारी म्हणून महाविद्यालयीन जीवनापासून ते साहेबांचे मित्र होते. त्यांनी त्याच काळात राजकीय चळवळीत भाग घेतला. पुणे जिल्हयातील शिरूर हा दुष्काळी तालुका होता. तेथे विकास नव्हता, तेथे एमआयडीसी नव्हती. भौगोलिकदृष्टया पाण्याचा कमी स्त्रोत असणारा हा भाग होता. त्याच काळात त्यांची पंचायत समितीचे तरुण सभापती म्हणून त्यांची निवड झाली. शिरूर तालुक्यात त्यांनी मोठया प्रमाणावर पाझर तलाव केले. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधले. रस्ते व वीज पुरवठयाची कामे केली. शिरूर या दुष्काळी तालुक्याचा चेहरा बदलण्याकरिता व ग्रामीण तरुणांना रोजगार मिळण्याकरिता महाराष्ट्रात काढण्यात आलेल्या पंचतारांकित एमआयडीसीमध्ये त्यांनी काढलेल्या रांजणगाव पंचतारांकित एमआयडीसीचा उल्लेख करता येईल. याकरिता कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांनी मनापासून प्रयत्न केले होते. त्यांच्यामुळे आता तेथील चित्र एकदम बदलून गेलेले आहे. पवार साहेबांनी त्यांना या कामात मदत केली. 1995 साली रांजणगावची एमआयडीसी उभी राहिली. त्यांनी सर्व ट्रेडची सोय असलेल्या आयटीआयची स्थापना केली. त्यात शिरूर, पारनेर, श्रीगोंदा तालुक्यातील अनेक तरुण तरुणींना औद्योगिक वसाहतीमध्ये व औषधनिर्माण क्षेत्रात रोजगार मिळवून दिला. याकरिता त्यांनी केईएम हॉस्पीटलशी विनंती करुन वढूला उपशाखा काढली. शिरूरच्या सर्वांगीण विकासासाठी घोडगंगा सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यात त्यांचे योगदान मोलाचे होते. खरे तर शिरूर तालुक्यात घोडगंगा व शिरूर सहकारी साखर कारखाना असे दोन कारखाने काढले जात होते. परंतु पवार साहेबांनी कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे व रामसाहेब दादा पवार या दोघांना एकत्र बसविले. त्यांना सांगितले की, आपण सुरुवातीस एकच कारखाना काढू. अशा प्रकारे त्यातून घोडगंगा सहकारी साखर कारखाना उभा राहिला. यामध्ये कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे हे संस्थापक संचालक होते. वढू

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार.....

येथील छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारणीमध्ये देखील त्यांचे मोलाचे सहकार्य होते. चासकमान धरण शिरूर तालुक्यात व्हावे व त्याचे पाणी शिरूरला यावे याकरिता त्यांनी प्रयत्न केले. तसेच थिटेवाडी धरणही केले. अशा अनेक कामामध्ये त्यांनी स्वतः योगदान दिले आहे. दोन वेळा ते विधानसभेचे सदस्य होते. मला आठवते की, 1991 ते 1996 या पाच वर्षाच्या काळामध्ये बारामती लोकसभा मतदारसंघात तीन वेळा निवडून झाल्या.

यानंतर एच-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अजित पवार........

त्यावेळी एक्प्रेस हाय वे नव्हते. पुण्यातील सर्व आमदार डेक्कन क्वीननेच प्रवास करीत होते. तिस-या पंचवार्षिक निवडणुकीच्या वेळी मी आणि कै.बापूसाहेब थिटे डेक्कन क्वीनने प्रवास करीत असतांना कै.बापूसाहेब थिटे यांना विचारले की, आपण आमदार, राज्यमंत्री, सभापती, जिल्हापरिषदेचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. आपण आता बारामती लोकसभा मतदारसंघाचे खासदार झाले तर तुम्हाला कसे वाटेल ? ते म्हणाले की, कसे शक्य आहे ? मी म्हटले की, तुमच्या मनात आहे का ? तर ते यावर होय असे म्हणाले. त्यानंतर आम्ही डेक्कन क्वीनमधून उतरल्यावर तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.शरद पवार यांना फोन करुन याबाबत सांगितले. लोकसभा मतदारसंघाच्या पोट निवडणुका लागल्यानंतर त्याकरिता कै.बापूसाहेब थिटे उभे राहिले. कै.बापूसाहेब थिटे हे प्रचंड मतांनी विजयी झाले होते. 94-96 अशी दोन वर्षाचीच त्यांना खासदारकीची टर्म मिळाली होती. अशा प्रकारे त्यांना खासदार म्हणून प्रतिनिधीत्व मिळाले होते. मी व सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील अशा अनेक जणांनी त्यांच्याबरोबर काम केलेले आहे. स्व.सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळातही त्यांनी राज्यमंत्री म्हणून काम केलेले आहे. आम्हालाही त्यावेळी त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली होती. स्व.बापूसाहेब थिटे यांच्याबरोबर काम करीत असतांना त्यांच्या मिश्कील स्वभावाची प्रचीती आम्हाला येत होती. आमच्यामध्ये जनरेशन गॅप असला तरीही आम्ही चर्चेकरिता एकत्र बसत होतो. जिल्हयाच्या विकासाकरिता, शेतक-यांच्या प्रश्नांकरिता चर्चेकरिता बसत होतो. त्यावेळेस स्व.बापूसाहेब थिटे यांची सर्व स्तरातील लोकांना आपलेसे करण्याची हातोटी आम्ही जवळून अनुभवलेली आहे. परंतु नियती व काळापुढे कोणाचेच काही चालत नाही. दिनांक 18 मार्च,2016 रोजी ते आपल्या सर्वांना सोडून निघून गेले. अशा या नेत्याला मी सभागृहाच्या वतीने व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख ( सांगोला ) : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय यांनी सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता व पाठिंबा देण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू शोक प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेते व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते सन्माननीय सदस्य श्री.अजित पवार यांनी अनुमोदन दिलेले आहे. माननीय मुख्यमंत्री यांनीही याबाबत काही भावना व्यक्त केलेल्या आहेत. या सर्व भावनांशी मी सहमत आहे. स्व.बापूसाहेब थिटे यांनी आपल्या राजकारणाची सुरुवात शिरूर तालुक्याच्या पंचायत समितीचे सभापती म्हणून केली होती. शिरूर तालुका हा दुष्काळी तालुका आहे. शिरूर तालुक्यातील दुष्काळ निर्मूलन करण्यासाठी स्व.बापूसाहेब थिटे यांनी फार मोठे प्रयत्न केलेले आहेत. या दुष्काळी शिरूर तालुक्याला आजही स्व.बापूसाहेब थिटे यांची आठवण येते. ते दोन वेळा या सभागृहाचे सदस्य होते. एकदा ते खासदारही होते. तसेच, पुणे जिल्हापरिषदेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. शिरूर तालुक्यामध्ये दोन सहकारी साखर कारखाने चालू करण्यामध्ये स्व.बापूसाहेब थिटे यांचा सहभाग होता. शिक्षण क्षेत्रातही स्व.बापूसाहेब थिटे यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. अशा या ज्येष्ठ नेत्याच्या निधनाने राज्याच्या राजकारणामध्ये व समाजकारणामध्ये मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. अशा या ज्येष्ठ नेत्याच्या स्मृतींना मी सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द संपवितो.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ शिंदे ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचे माजी गृह राज्यमंत्री, माजी खासदार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते यांचे वयाच्या 79 व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झालेले आहे. राजकारण हे अंतिम साधन नसून विकासाचे महत्त्वाचे साधन आहे,या तत्त्वाने वाटचाल करणारे ते एक बुजूर्ग नेते होते. शिरूर तालुक्याच्या प्रत्येक भागात पाण्याची व्यवस्था करून ते भाग सुजलाम सुफलाम करण्यात बापुसाहेबांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांनी शेतीसोबतच उद्योगांना चालना दिली. शिरूरमध्ये रांजणगाव एमआयडीसीची मुहूर्तमेढ करून ते या एमआयडीसीचे प्रणेते ठरले. या परिसराच्या औद्योगिक विकासाला चालना आणि गती प्राप्त झाली. शिरूर तालुक्याच्या केंदूरगावचे असलेले स्व.बापूसाहेब थिटे यांनी स्व.इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षामधून राजकीय कारकिर्दीस सुरूवात केली. कायद्याची पदवी घेतलेले स्व.बापूसाहेब थिटे यांनी ग्रामपचांयत सदस्य, सरपंच, जिल्हापरिषद सदस्य, पुणे जिल्हापरिषद अध्यक्ष, बारामती खासदार अशी अनेक पदे भुषविली. या अनेक पदांसह राज्याचे गृहराज्यमंत्रीपद देखील भुषविले. राजकारणाबरोबर शिक्षण, सहकार, उद्योग क्षेत्रावही स्व.बापूसाहेब थिटे यांनी ठसा उमटविला. स्व.बापूसाहेब थिटे यांनी बाणेर येथे छत्रपती संभाजी शैक्षणिक संस्था, सातारा या नावाने व्यवसायिक शिक्षण संस्था सुरु केली. सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसीचे ते संस्थापक अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे घोडगंगा साखर कारखान्याच्या संस्थापक संचालक व तालुक्यातील अनेक संस्थेमध्ये विविध पदांवरही त्यांनी काम केलेले आहे. राज्याचेच नव्हे तर देशाच्या राजकारणात स्वतःचे महत्त्व असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघातून ते खासदार म्हणून लोकसभेवर निवडून गेले. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांच्या ते जवळचे स्नेही व सहकारी होते. स्व.बापूसाहेब थिटे यांच्या निधनाने दुरदृष्टी असलेला राजकारणी सहकारातून जनसेवा करणारा कार्यकर्ता राज्याने गमाविलेला आहे. मी माझ्या व पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाबुराव पाचर्णे ( शिरूर ) : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, स्व.बापूसाहेब थिटे हे माझ्या मतदारसंघातून दोन वेळा या सभागृहामध्ये निवडून आले होते. गृह राज्यमंत्री म्हणून त्यांनी चांगले काम केले होते. स्व.बापूसाहेब थिटे यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात ही पुणे शहरातून झालेली आहे. पुणे शहरामध्ये एम.ए.एलएल.बी शिक्षण घेतल्यानंतर गाव पुढा-यांनी त्यांना हाताला धरुन केंदूरला नेले. जिल्हापरिषदेच्या निवडणुकीला त्यांना उभे केले गेले. निवडून आल्यानंतर त्यांना पहिल्यांदाज सभापती म्हणून काम करण्याची संधी मिळाली. चांगले काम केल्यामुळे दुस-या टर्मला जिल्हापरिषदेचा अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आरोग्य समितीचे उपाध्यक्ष व नंतरच्या काळात अध्यक्षपदही मिळाले होते. त्यानंतरच्या काळामध्ये त्यांनी खासदार म्हणूनही काम केलेले आहे. राजकीय जीवनामध्ये सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी समरस होऊन 1972 मधील दुष्काळामध्ये त्यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे. शिरूर तालुक्याची दुष्काळी तालुका म्हणून नोंद असताना जलसंधारणांतर्गत त्यांनी मोठया प्रमाणात काम केलेले आहे. नाला बंडिंग, पाझर तलाव, गाव वस्तीला जाणारे रस्ते ही सर्व कामे दुष्काळी कामांमध्ये करण्याकरिता त्यांनी प्रयत्न केलेले आहे.

स्व.बापूसाहेब थिटे कामाचाी राजकीय व सामाजिक ओळख आहे. असे असताना मला पुढील बाबीचाही उल्लेख करणे आवश्यक आहे, असे मला वाटत आहे. छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज हे आपल्या राज्यात होऊन गेले. असे असताना त्यांचा कोणताही फोटो वा छायाचित्र राज्यात नव्हते. या राज्याचे शिल्पकार, तत्कालीन परराष्ट्र मंत्री स्व.यशवंतराव चव्हाण हे फ्रान्सला गेले होते. त्यावेळी तेथील म्युझियममध्ये त्यांनी छत्रपती धर्मवीर संभाजी राजे यांचे स्केचवर्क केलेले छायाचित्र पाहिले. फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांनी स्व.यशवंतराव चव्हाण यांना ते छायाचित्र भेट म्हणून दिले. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी माननीय श्री.शरदचंद्र पवार यांना या स्केचवर्कच्या सहाय्याने इतिहासतज्ज्ञांना हाताशी घेऊन छत्रपती संभाजी राजे यांचे छायचित्र व पूतळा बनविण्यास सांगितले. हा पूतळा व छायाचित्र आमच्या मतदारसंघामध्ये वडू हे गाव छत्रपती संभाजी राजे यांचे जन्मस्थान असल्यामुळे तेथे उभारला गेला.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाबुराव पाचर्णे...........

छत्रपती संभाजीराजे यांचे समाधीस्थानी आमच्या कार्यक्षेत्रातील वडू या गावामध्ये आहे. ते काम करण्याचे भाग्य स्व.बापूसाहेब थिटे यांना लाभले. त्यानंतर सर्व जगभरामध्ये याच पुतळयाचे छायाचित्र देशभरामध्ये आपण पाहतो. स्व.बापूसाहेब थिटे यांनी काम करीत असतांना राजकारणाच्या पलिकडे जाऊन अनेक लोकांना घडविले. स्व.बापूसाहेब थिटे यांच्याजवळ दुरदृष्टी असल्यामुळे माननीय श्री.शरदचंद्र पवार यांच्या अतिशय जवळचे असे ते स्नेही होते. स्व.बापूसाहेब थिटे यांनी दुष्काळी भागामध्ये एमआयडीसी आणण्याकरिता खूप प्रयत्न केलेले आहेत.

आय-1 / ----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाबुराव पाचर्णे.......

सुरुवातीच्या काळात डी-झोन अंतर्गत इंडस्ट्री आली होती. भविष्यकाळातील सोयी आणि सुविधा लक्षात घेता त्या ठिकाणी पंचतारांकित एमआयडीसी उभी राहिली होती. आमचा भाग दुष्काळी होता. आज 70 ते 80 टक्के भाग हा डिंबाचा उजवा कालवा आणि चासकमानच्या धरणामुळे ओलिताखाली आलेला आहे. डिंबाचा उजवा कालवा आणि चासकमानचे धरण बांधण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केलेला होता. त्यांचे शिक्षण क्षेत्रात आणि सामाजिक कार्यात मोलाचे योदान राहिलेले आहे. त्यांची तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातला राजकीय भीष्माचार्य म्हणून ओळख होती. त्यांच्या निधनामुळे जिल्ह्यावर दु:खाचे सावट उभे राहिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी आदरणीय बापूसाहेब थिटे यांना आदरांजली वाहून या ठिकाणी थांबतो. धन्यवाद.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ( आंबेगाव ) : अध्यक्ष महोदय, या सभागृहाचे दिवंगत सदस्य कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी शोक प्रस्ताव मांडलेला असून, त्यास पाठींबा देण्यासाठी मी या ठिकाणी ऊभा आहे.

अध्यक्ष महोदय, कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांच्या दु:खद निधनाबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, मला माझ्या महाविद्यालयीन जीवनापासून बापूसाहेब थिटे यांच्याशी जवळीक साधण्याची संधी मिळाली होती. ते एका सामान्य कुटुंबात जन्माला आले होते. त्यांनी एम.एल.एल.एम.चे शिक्षण पूर्ण केलेले आहे. अशा नेत्याने सार्वजनिक जीवनात काम करताना गावापासून पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधान सभा आणि राज्याचे गृह राज्यमंत्री, संसद सदस्य असा प्रवास केलेला आहे. शिरूर तालुक्यात 1972 मधील दुष्काळामध्ये लाख ते दीड लाख लोक रोजगार हमी योजनेच्या कामावर जात होते. हाच शिरूर तालुका आज जवळ जवळ 80 टक्के ओलिताखाली आलेला आहे. आज शिरूर तालुका हा ऊस, साखर कारखाने आणि दुग्ध व्यवसायासाठी प्रसिध्द आहे. यामध्ये बापूसाहेबांचे मोठे योगदान लाभलेले आहे. बापूसाहेबांच्या भागामध्ये रांजणगाव आणि कारेगाव अशा दोन एमआयडीसी आहेत. जगातील अनेक नामांकित कंपन्यांनी त्या ठिकाणी गुंतवणुक केलेली आहे. या माध्यमातून शिरूर तालुक्यातील बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळवून देण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, एखादा लोकप्रतिनिधी किती काम करु शकतो याचे मूर्तीमंत उदाहरण बापूसाहेबांच्या रुपाने पुणे, महाराष्ट्र आणि आपण सर्वांनी पाहिलेले आहे. माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांचे बापूसाहेब हे एक निष्ठावंत अनुयायी, विश्वासू सहकारी होते. बापूसाहेबांची महानुभव पंथावर विशेष श्रध्दा होती आणि त्याचा सातत्याने प्रचार, प्रसार करण्यामध्ये आघाडीवर होते. बापूसाहेब थिटे यांचे वाचन अफाट होते आणि त्यांचा व्यासंग खूप मोठा होता. तसेच त्यांनी अध्यात्माच्या क्षेत्रात प्राविण्य मिळविले होते. यासंदर्भात सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांना अतिशयोक्ती वाटू शकते. बापूसाहेब थिटे हे अध्यात्माच्या विषयावर जवळ जवळ 8 तास बोलू

......3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.......

शकतील एवढी क्षमता, बुध्दीमत्ता त्यांच्यामध्ये होती. त्यांनी सर्व क्षेत्रात काम केलेले आहे. त्यांचा केंदूर गावात जन्म झालेला होता. आता त्या मतदारसंघाचे दोन मतदारसंघ झालेले आहेत. निम्म्या मतदारसंघात सन्माननीय सदस्य श्री. बाबुराव पाचर्णे तर निम्म्या मतदारसंघाचे मी प्रतिनिधीत्व करीत आहे. बापूसाहेबानंतर त्या भागाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला मिळालेली आहे. मला माझ्या कामात त्यांचा नेहमीच पाठींबा, आशिर्वाद लाभलेला आहे. असा आमचा जीवाभावाचा सहकारी आमच्यातून निघून गेलेला आहे. बापूसाहेबांची काम करताना विनोद शैली कशी होती, याची त्यांच्यासमवेत काम करणाऱ्या अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती असणार आहे. कोणत्याही क्षणी कोणत्याही प्रश्नावर विनोद शैलीत उत्तर देऊन वातावरणात बदल करण्यासारखी क्षमता त्यांच्यामध्ये होती. अशा प्रकारे त्यांच्याकडे ज्वाली स्वभावाचे व्यक्तीमत्व होते. ते कुटुंबवत्सल होते. त्यांचे त्यांच्या आईवर अतिशय प्रेम होते. व्यवसाय, राजकारण, समाजकारणामध्ये प्रामाणिकपणे काम करुन नावलौकिक मिळविलेले नेतृत्व आज आपल्यातून निघून गेलेले आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंबाची, पुणे जिल्ह्याची आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची हानी झालेली आहे.

अशा या ज्येष्ठ नेत्याच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करतो आणि श्रध्दांजली अर्पण करुन थांबतो.

----

......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष** : सभागृहाचे नेते आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री. देवेंद्र फडणवीस यांनी श्री. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे, माजी विधानसभा सदस्य व माजी मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. सदर शोक प्रस्तावासंबंधी माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, माननीय गट नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांचा जन्म दिनांक 3 मार्च, 1937 रोजी पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील वढू येथे झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. एल. एल. बी. पर्यंत झाले होते.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांनी श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, शिरूर तालुका सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तसेच घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-संचालक म्हणूनही उत्तम कार्य केले होते. शिरूर तालुक्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे यांनी शिरूर पंचायत समितीचे सभापती तसेच पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून शिरूर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे आणि मी एकाच वेळी सभागृहामध्ये आलेलो होतो. आम्ही दोघांनी सभागृहात 10 वर्षे एकत्रिपणे काम केलेले आहे. आमची दोघांची घनिष्ठ मैत्री होती. त्यांच्या मतदारसंघात बाबुराव दौंडकर आमदार म्हणून काम करीत होते. पेठेवाले बाबुराव हे नेहमी आमच्यामध्ये हसत खेळत काम करीत होते. त्यांच्यामुळे माझा बापूसाहेबांबरोबर अधिक जवळचा संबंध प्रस्थापित झालेला होता. बापूसाहेब हे नेहमी हसतमुख काम करीत होते. ते सहजपणे कोणाच्याही खांद्यावर हात टाकून त्याला बोलते करणारे व्यक्तिमत्व होते.

कै. निवृत्ती नामदेवराव ऊर्फ बापूसाहेब थिटे सन 1985 व 1990 असे दोन वेळा पुणे जिल्ह्यातील शिरूर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी मंत्री म्हणून देखील काम केलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे 1994 ते 1996 या काळात त्यांनी खासदार म्हणून काम केलेले होते.

........5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष.......**

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 19 मार्च, 2016 रोजी दुःखद निधन झाल्यामुळे सर्वांनाचा दुःख झालेले आहे. त्यांच्या स्मृतीस मी भावपूर्ण अभिवादन करतो व भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. एक प्रत शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

---------

........6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. रणजित पाटील ( नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये विधी व न्याय विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012, सन 2012-2013, सन 2013-2014 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

**( सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेचा कालावधी वाढविण्यासंबंधी )**

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेवर सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा ( दुसरा व शेवटचा दिवस) दाखविण्यात आलेला आहे.

J-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आजच्या सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाचे नियम 293 चे दोन प्रस्ताव आहेत. काल सर्वच सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांच्या संदर्भात जी भूमिका घेतली त्यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब झाले. आजच्या कामकाजपत्रिकेवर सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) दाखविलेली आहे. आज एकाच दिवशी या अर्थसंकल्पावर चर्चा होऊ शकणार नाही म्हणून अर्थसंकल्पावरील चर्चेचा कालावधी वाढविला पाहिजे. विरोधी पक्षाच्या नियम 293 च्या प्रस्तावावरील चर्चा अजून अपूर्ण आहे. आज नियम 293 अन्वये दोन्ही प्रस्तावावर चर्चा असल्यामुळे अर्थसंकल्पावरील चर्चेचा कालावधी उद्यापर्यंत वाढविण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, साधारणपणे सर्वसाधारण अर्थसंकल्पावर आपण दोन दिवसाची चर्चा ठेवतो. यापूर्वीही पहिल्या दिवशी चर्चा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ती चर्चा समाप्त केलेली आहे. अध्यक्ष महाराज, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या विनंतीनुसार आपल्या दालनात विरोधी पक्षनेते आणि गटनेत्यांनी यासंदर्भात वेळेचे नियोजन करावे, अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**अध्यक्ष** : ठीक आहे.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

...... पुढे सुरु..

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये नगरविकास विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012, सन 2014-2015, या वित्तीय यवर्षातील योजनांतर्गत व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. प्रकाश महेता (गृहनिर्माण मंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये गृहनिर्माण विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. प्रकाश महेता ( गृहनिर्माण मंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत आणि सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बालविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये महिला व बालविकास विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवते.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बालविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत आणि सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवते.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.:** विनंती अर्ज सादर करणे

श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : अध्यक्ष महोदय, ***"ल.पा. योजना इच्छागव्हाण ता.तळोदा, जि.नंदुरबारचे उर्वरित काम लवकर सुरु करुन प्रकल्प पूर्ण करण्यासंबंधी"*** ***या विषयावरील*** विनंती अर्ज मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर करतो.

**अध्यक्ष :** विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

---------

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** स्थगन प्रस्तावाच्या सूचना

**अध्यक्ष** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी "विभागीय आयुक्त, अमरावती यांनी 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावांची शिफारस शासनाकडे केली असताना त्यापैकी केवळ एकाच जिल्ह्यातील गावांचा दुष्काळी गावांचा समावेश करणे" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. तो स्थगन प्रस्तावाचा विषय होत नसल्याने, मी सूचनेत दालनात अनुमती नाकारली आहे तरी विषयाचे गांभीर्य पाहता सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महाराज, अमरावती विभागातील पाच जिल्ह्यामधील 6147 गावांचा समावेश 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांमध्ये करण्यासंबंधी माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिला. विदर्भातील शेतकऱ्यांना आणेवारीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. शासन स्तरावर निर्णय झाल्यानंतरही आणेवारी कशी कमी करता येईल, अशा प्रकारच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या जातात. अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्तांनी दिनांक 7 नोव्हेंबर, 2015 रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविला, परंतु शासनाने सदरचा प्रस्ताव स्वीकारला नाही. श्री.दयानंद पवार, जिल्हापरिषदेचे सदस्य यांनी या प्रकरणी नागपूर खंडपिठाकडे केस दाखल केली व सदरहू प्रकरणावर नागपूर खंडपिठाच्या माननीय उच्च न्यायालयाने काय म्हटले आहे. "We fail to understand as to when the corrections as suggested by the Divisional Commissioner vide communication dated 07th November, 2015, are given effect to in one district within his jurisdiction, why the same is not given effect insofar as the other districts are concerned." अन्य जिल्ह्यांना काय न्याय दिलेला आहे, असे माननीय उच्च न्यायालयाने विचारलेले आहे. यात पुढे शासनावर जे ताशेरे ओढलेले आहेत ते महत्वाचे आहेत. "It is within everybody's knowledge that most of the suicides committed by the farmers on account of their precarious condition are in the Yavatmal District



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

and only two villages are declared as drought affected villages in the said District." त्यात पुढे काय म्हटलेले आहे ते महत्वाचे आहे. "We find that the approach of the authorities sitting in the air conditioned offices in Mantralaya is totally callous and casual, without taking into consideration the hardships that are suffered by the poor farmers." त्यात आणखी पुढे असे म्हटलेले आहे की, अनेकवेळा सूचना दिल्यानंतरही माननीय उच्च न्यायालयाने पुढे असे म्हटलेले आहे की, "...it appears that the State has refused to come out of deep slumber and failed to consider the plight of the poor farmers and their dependents residing in Amravati Division." माननीय उच्च न्यायालयाने अशा प्रकारचे ताशेरे राज्य सरकारवर ओढलेले आहेत. शुक्रवारचा हा माननीय न्यायालयाचा आदेश आहे. शेवटी असे म्हटलेले आहे. "We, therefore, by an interim mandatory order, direct the State Government to issue a corrigendum like the corrigendum dated 09th November, 2015 and include the number of villages in Amravati, Akola, Yavatmal and Washim districts as are communicated by the communication by the Divisional Commissioner to the State Government vide communication, dated 07th November, 2015, who would be entitled to the benefit to the the Government Resolution dated 20th October, 2015. The same shall be done by 23rd March, 2016."

शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्यामुळे आम्ही मागील आठवड्यात सभागृहात या विषयावर चर्चा करवी अशी मागणी केली होती. पिक आणेवारीसंबंधी जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शासन का स्वीकारत नाही? हे एक प्रकारे मदत व पुनर्वसन विभागाचे अपयश आहे. या राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री महोदय ज्या आविर्भावाने सभागृहात बोलतात की, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबधी कोठल्याही संवेदना नाहीत. या सभागृहात पुष्कळवेळा आकडेवारी देण्याचा प्रयत्न करुन कामकाज पुढे रेटण्याचा प्रयत्न मंत्री महोदय करीत असतात.

यानंतर K-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....
माननीय उच्च न्यायालयाने आज राज्य सरकारच्या निष्क्रियतेबद्दल ताशेरे ओढलेले आहेत. दुष्काळी भागातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या 50 पैशांच्या आणेवारी संदर्भात आता माननीय उच्च न्यायालयाला सांगावे लागले आहे आणि तुम्ही एअर कंडिशनमध्ये बसत आहात ? अशा निष्क्रियतेबद्दल या राज्याच्या मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांनी जबाबदारी स्वीकारुन तत्काळ राजीनामा दिला पाहिजे, अशी आमची या निमित्ताने मागणी आहे.

**अध्यक्ष :** मी ही स्थगन प्रस्तावाची सूचना नाकारलेली आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, राज्य सरकार दुष्काळाकडे कसे पाहते हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या मुद्यातून सिध्द झालेले आहे. न्यायालयाने असे सांगितलेले आहे की, मंत्रालयातील वातानुकूलित कार्यालयात बसणाऱ्या अधिकाऱ्यांचा, सरकारचा दृष्टिकोन अत्यंत निष्ठूर व निष्काळजीपणाचा असल्याने ते गरीब शेतकऱ्यांना सोसावे लागणारे दु:ख व कष्ट विचारात घेत नाहीत. न्यायालयाने आणखी एक स्ट्रीक्चर पास केलेले आहे की, राज्य शासन गाढ झोपेतून जागे होण्यास तयार नसल्याने राज्यातील गरीब शेतकऱ्यांच्या व्यथा व अडचणींकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे. मी जे सांगत आहे ते इंग्रजीत आहे परंतु, मी आता ते मराठीत सांगत आहे. याची इंग्रजी प्रत मी आपल्याला देतो.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे, त्याबाबत प्रश्न नाही. परंतु, रेकॉर्डवर चुकीचे येता कामा नये. न्यायालयाने असे म्हटलेले नाही. मी देखील याचा पूर्णपणे अभ्यास केलेला आहे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, न्यायालयाने असे म्हटले आहे की, "However, it appears that the State has refused to come out of deep slumber and failed to consider the plight of the poor farmers and their dependents residing in Amravati Division." याचा अर्थ काय ?

गेल्या काही महिन्यांपासून आमचे हेच मत आहे की, राज्य सरकार दुष्काळ दाबण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्यातील दुष्काळात होरपळलेल्या जनतेची अवस्था काय आहे, याची जाणीव न ठेवता केवळ घोषणा करणे, विदर्भातील केवळ 5-10 गावे वगळता अमरावती डिव्हिजन मधील

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ....

6 हजारपेक्षा जास्त गाव व नागपूर डिव्हिजन मधील काही गाव उघड न करता, त्यांना दुष्काळासंदर्भातील सुविधा न देता, त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण या सरकारने स्वीकारले असेल, तर लोकांना न्यायालयात जाण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय राहिलेला नाही.

अध्यक्ष महोदय, ही महाराष्ट्रातील अशी पहिली घटना असेल की, विदर्भातील सामान्य माणसे कोर्टात जातात आणि न्यायालय सरकारला सांगते की, तुम्ही झोपेतून जागे व्हा. अधिकाऱ्यांनी एअर कंडिशनमध्ये बसून नुसते निर्णय घेऊ नयेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे राज्याच्या मदत व पुनर्वसन कार्यमंत्री महोदयांची ही खरे तर जबाबदारी होती. त्यांनी याच्या तपशिलात गेले पाहिजे होते. एखाद्या आयुक्तांनी 50 पैशांपेक्षा कमी आणेवारीचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडे पाठविला असेल तर, तुमचा वकील कोर्टाला सांगतो की, 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी हा एकमेव क्रायटेरिया नाही. न्यायालय तुम्हाला विचारते की, 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी हा क्रायटेरिया नाही तर, आणखी कोणते क्रायटेरिया आहेत ? न्यायालयाला आपण जरा मार्गदर्शन करावे असे शेवटी न्यायालय सरकारला सांगू लागले आहे.

अध्यक्ष महोदय, मला एवढाच मुद्दा मांडावयाचा आहे की, महाराष्ट्रातील जनता दुष्काळात होरपळत आहे. या सरकारचे या दुष्काळाकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. आम्ही आमच्या बाजूने हे सांगण्याचा प्रयत्न करीतच आहोत परंतु, आता न्यायालय देखील तुम्हाला खडसावून सांगू लागले आहे. याची जबाबदारी कोणी तरी घेतली पाहिजे. जर ती संस्था, ती व्यक्ती कोर्टात गेली नसती तर, विदर्भातील साडेसहा ते सात हजार गावे दुष्काळामध्ये तुम्ही त्यांना करणार असलेल्या मदतीपासून वंचित राहिली असती. हे सर्व अधिवेशन त्यात गेले असते, परंतु, या सरकारने ते मान्य केले नसते. याकरिता याची जबाबदारी निश्चित करावी. जबाबदारी निश्चित करताना, ज्या आयुक्तांनी आपल्याला स्पष्टपणाने अहवाल दिला, त्या आयुक्तांचा अहवाल वर कोणी डावलला, मंत्री महोदयांपर्यंत तो पोहोचल्यावर मंत्री महोदयांनी त्याकडे किती दुर्लक्ष केले, मंत्री महोदयांनी दुर्लक्ष करताना विदर्भावर अन्याय करण्याची भूमिका या सरकारने का स्वीकारली, याचा खुलासा झाल्याशिवाय हा प्रश्न मिटणार नाही. याकरिता आपण हा स्थगन प्रस्ताव मान्य करुन चर्चेला सुरुवात करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, पश्चिम विदर्भातील एका कार्यकर्त्याने पीआयएल दाखल केल्यानंतर पश्चिम विदर्भाला माननीय उच्च न्यायालयाने न्याय दिला. मुख्यमंत्री महोदय पूर्व विदर्भातील आहेत व माननीय वित्त मंत्रीही विदर्भातील आहेत. माननीय श्री. एकनाथराव खडसे यांना मला हे सांगावयाचे आहे की, आणेवारी 50 टक्क्यांच्या आत आहे, हे पाण्यावर ठरवून चालत नाही तर शेतकऱ्यांच्या बांधावर काय पिकले त्यावर ही आणेवारी ठरते. पाऊस 1100 मि.मी. पडला की, 1200 मि.मी. पडला याला अर्थ नसतो तर त्याच्या शेतीमध्ये काय व किती पिकले यावर पीक आणेवारी काढली पाहिजे. मंत्री महोदयांनी काही तरी वेगळे करण्याचा प्रयत्न केला. पहिला जी.आर. 67 टक्क्यांच्या आतबाबत काढला होता. त्यानंतर मात्र तो जी.आर. बदलला. या 50 टक्क्यांच्या जी.आर. मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्तांना प्रस्ताव पाठविला, आयुक्तांनी सरकारकडे हा प्रस्ताव पाठविला. आमची विनंती आहे की, पुन्हा आमच्यावर पूर्व नागपूरातील 5 जिल्ह्यांच्या संदर्भात उच्च न्यायालयात जाण्याची वेळ आणू नका. कारण याबाबतीत उच्च न्यायालयाने जे निकष लावून जो निर्णय दिला, तसाच निर्णय 5 जिल्ह्यांसाठीसुध्दा माननीय उच्च न्यायालय देईल. न्याय व्यव्यस्थेवर आमचा विश्वास आहे. याकरिता आमची मुख्यमंत्री महोदयांकडून ही अपेक्षा आहे की, या पाचही जिल्ह्यांबाबतचा निर्णय आपण घोषित करावा. अध्यक्ष महोदय, हे सर्व जिल्हे दुष्काळग्रस्त घोषित करावेत, अशी आमची आपल्यामार्फत विनंती आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, या जजमेंटमध्ये माननीय न्यायाधिशांनी असे म्हटले आहे की, मी नागपूर बेंचचा प्रमुख आहे. दुसरे माननीय न्यायाधीश हे एका दुसऱ्या जिल्ह्याचे पालक जज आहेत. आम्ही सर्व या परिसरात फिरत आहोत. सिच्युएशन इज अर्लामिंग असे न्यायाधीश महोदय म्हणाले आहेत. ते काही विरोधी पक्ष नेते किंवा विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य नाहीत तर, न्यायाधीश महोदयांनी तसे सांगितलेले आहे. हे जजमेंट जरी अमरावती डिव्हिजन करिता असले तरी नागपूरमध्ये देखील अशाच प्रकारची गंभीर परिस्थिती असल्याचे सन्माननीय सदस्यांनी आता सांगितलेले आहे. अतिशय गंभीर असे ताशेरे न्यायाधिशांनी या राज्यावर ओढलेले आहेत. सरकार गाढ झोपलेले आहे, अशाप्रकारचे हे ताशेरे आहेत. न्यायाधिशांनी आपल्याला हे विचारलेले आहे की, 50 पैसेवारीचा निकष नसेल तर कोणता निकष आहे हे पुढच्या तारखेला सांगावे. शेवटी शेतकऱ्यांचे उत्पन्न गेलेले असल्याने हा एवढाच निकष

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महत्त्वाचा आहे. सरकारचा पैसे वाचविण्याचा प्रयत्न चाललेला आहे काय ? अध्यक्ष महोदय, याबाबत ताबडतोब लक्ष देण्याबाबत आपण सरकारला निर्देश द्यावेत.

...4/-



श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष माननीय विरोधी पक्ष नेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, ही वस्तुस्थिती आहे की, अशाप्रकारे माननीय उच्च न्यायालयाने एक निर्णय दिलेला आहे. त्यांनी हे देखील म्हटलेले आहे की, यातले कोणते निकष आहेत ते आम्हाला सांगावेत. एखाद्या ठिकाणी दुष्काळ घोषित करण्याचे निकष काही राज्य सरकारने तयार केलेले नाहीत किंवा ते आज तयार झालेले नाहीत. आपल्याला हे माहीत असेल की, हे निकष 1970 सालापासून आहेत व त्यात दोनदा अमेंडमेंट झालेली आहे. केंद्र सरकारच्या एनडीआरएफ प्रमाणे हे निकष तयार झाले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण मागच्या वेळेस विचारणा केली होती, तेव्हा एनडीआरएफने सांगितलेले 4 निकष काय आहेत हे माननीय कृषी मंत्र्यांनी या सभागृहात अतिशय स्पष्टपणे सांगितले होते. त्यामध्ये आणेवारी हा एक निकष आहेच. परंतु, आपण ज्यावेळेस दुष्काळ जाहीर करतो, त्यावेळेस हायड्रॉलॉजिकल ड्राऊट आणि ॲग्रिकल्चरल ड्राऊट अशा दोन्ही गोष्टी व्हाव्या लागतात. याचा अर्थ असा आहे की, त्या ठिकाणी जशी आणेवारी कमी पाहिजे तसेच पडलेले पर्जन्यमानही कमी पाहिजे, असा एनडीआरएफने तयार केलेला निकष आहे. त्या निकषानुसार दुर्दैवाने या ठिकाणी आपल्याला काही प्रमाणात ॲग्रिकल्चरल ड्राऊट दिसत आहे परंतु, हायड्रॉलॉजिकल ड्राऊट नव्हता.

L-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. देवेंद्र फडणवीस.....*

*अध्यक्ष महोदय, आपण एखादा प्रस्ताव तयार करतो, त्यावेळी तो प्रस्ताव एनडीआरएफच्या नियमाप्रमाणेच तयार करावा लागतो. आपणही मुख्यमंत्री होते, आपणही मंत्री होते. एनडीआरएफच्या बाहेर जावून प्रस्ताव तयार करता येत नाही. हा प्रस्ताव एनडीआरएफ प्रमाणेच तयार झाला आहे. तरीही आपण अग्रीकल्चर ड्राऊट आहे हे लक्षात घेऊन केंद्र सरकारला एक पुरवणी निवेदन दिले व त्यामध्ये असा उल्लेख केला की, विशेषत: धान, कापूस आणि सोयाबीनच्या पट्टयामध्ये उत्पादन कमी झाले. त्यानंतर आपण केंद्र सरकारला सांगितले की, विशेष बाब म्हणून आपण आम्हाला मदत द्यावी. त्यावर केंद्र सरकारने असे सांगितले की, तुमच्याकडे एकूण कापसाची खरेदी ही एक कोटी क्विंटलपेक्षा जास्त झालेली आहे. तुम्ही ॲग्रीकल्चर ड्राऊट सांगत आहात. परंतु ही खरेदी किंवा मार्केटमध्ये आलेला कापूस, सोयाबीन किंवा धान हे ॲग्रीकल्चर ड्राऊटला त्या आकड्याशी कोलॅबरेट होत नाही. त्यामुळे हे कुठल्याही नियमात बसत नाही, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर देखील राज्य सरकारने स्पेशल पॅकेज तयार केले. हे कुठल्याही नियमात बसत नव्हते, तरीही आपण स्पेशल पॅकेज तयार केले आणि आपण यामध्ये सांगितले की, यामध्ये आलेल्या घटीचे (घट) पैसे त्यांनी इंश्युरन्स केला असे समजून राज्य सरकार देईल. आपण यासंदर्भात घोषणा देखील केली. त्यानंतर परवा देखील म्हणजेच हा निर्णय येण्यापूर्वी सभागृहात चर्चा होत असताना, सभागृहातील सदस्यांनी पुन्हा हा मुद्दा मांडला त्याहीवेळी मी सांगितले की, हे टेक्नीकली करता येत नाही. परंतु टेक्नीकली नसले तरी आम्ही शेतकऱ्यांना टेक्नीकल बाबींमध्ये अडकवून ठेवू इच्छित नाही. त्यामुळे मी याच सभागृहात घोषित केले की, ज्या दुष्काळी सवलती आहेत, त्या टेक्निकली बसत नसल्या तरी देखील आम्ही शेतकऱ्यांना देऊ. तसेच आपण सर्वांनी देखील हे सभागृहात ऐकले आहे. आता एवढाच मुद्दा आहे की, शेतकऱ्यांना दुष्काळाच्या सर्व सवलती देण्याचे घोषित केलेले आहे. ओव्हर ॲन अबोव्ह पॅकेजही घोषित केलेले आहे. तथापि आम्ही या सर्व बाबी माननीय उच्च न्यायालयाच्या नजरेस आणून देऊ. कारण शेतकऱ्यांची अवस्था वाईट आहे, म्हणूनच राज्य सरकारने ही बाब स्वत:हून केलेली आहे. आम्ही हे उच्च न्यायालयाने सांगितल्यानंतर नव्हे तर उच्च न्यायालयाने सांगण्याच्या आधी केलेले आहे. हे आम्ही उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊ आणि उच्च न्यायालयाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करु.*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी केलेल्या निवेदनामध्ये एक भाग झाला. परंतु त्यातून अत्यंत महत्वाची विसंगती पुढे आलेली आहे. एका बाजूला आपण सांगता की, कापसाची खरेदी भरपूर झालेली आहे आणि केंद्र सरकारचे आकडे देख्रील आपण सांगितले. तसेच आपल्या विभागाने ५० पैशापेक्षा कमी आणेवारी असल्याचे सांगितले. यामध्ये कोणीतरी चुकीची माहिती देत आहे. ५० पैशापेक्षा कमी आणेवारी असल्याचे सरकार सांगत असेल, आपले अधिकारी सांगत असेल आणि कापसाची खरेदी वाढलेली असल्यामुळे यावर आमचा विश्वास नाही, असे केंद्र सरकार म्हणत आहे. यामध्ये विसंगती दिसून येते. या दोघांमधील विसंगती कशी दूर करणार आहात. यातील कोणती बाब खरी समजायची, ही माहिती चुकीची आहे काय?*

*श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी पुन्हा सांगतो की, यामध्ये त्याचे परसेन्टेजेस ठरलेले आहे. याची आपल्याला कल्पना आहे. मागील वर्षीची कापसाची एकूण आवक दीड लाख कोटी क्विंटल आहे आणि आताची आवक एक लाख कोटी क्विंटल आहे. म्हणजेच यामध्ये घट झाली आहे. परंतु ही घट नियमात बसणारी नाही. त्यामुळे आपल्या शेतकऱ्यांना या टेक्निकल गोष्टीमध्ये अडकवून ठेवायचे काय? केंद्र सरकार नियमाने चालते, त्यांनी नियमाने चालावे. परंतु त्यामध्ये जी भर घालावयाचे आहे, ती राज्य सरकारने घातली आहे. आपल्या शेतकऱ्यांना टेक्निकल बाबीमध्ये अडकवून ठेवायचे नाही, अशी राज्य सरकारने भूमिका घेतलेली आहे. त्यामध्ये राज्य सरकारने पैसे द्यायचे ठरविले. त्यामुळे मी सन्माननीय माजी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण विशेष बाब म्हणून पहिल्यांदा हे पैसे दिलेले आहे. असे पैसे यापूर्वी कधीही देण्यात आलेले नाहीत. मी स्पष्ट सांगतो की, यासंदर्भात शेतकऱ्यांना पैसे देण्याकरिता राज्य सरकार मागे हटणार नाही. तसेच मी यापलीकडे जाऊन सांगतो की, उच्च न्यायालयाने तर पश्चिम विदर्भासंदर्भासंदर्भात सांगितले आहे. मी परवा घोषणा करताना पूर्व विदर्भाची घोषणा केलेली आहे. त्यामुळे यामध्ये राज्य सरकार मागे जाणार नाही.*

*श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय उच्च न्यायालयाने आणेवारी संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. माननीय मुख्यमंत्री म्हणतात त्या प्रमाणे राज्य सरकारने मदत जाहीर केली. हायड्रोलॉजीकल ड्राऊट आणि अग्रीकल्चर ड्राऊट संदर्भात मुद्दा उपस्थित करताना कोणत्याही तांत्रिक बाबीचा संदर्भ न देता, अडचण न येऊ देता त्यांनी पॅकेज जाहीर केले.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....*

*माननीय उच्च न्यायालयाने ५० पैसे आणेवारी संदर्भातील मुद्दा उपस्थित करताना राज्य सरकारने २३ तारखेच्या पूर्वी असे आदेश काढावे, असे म्हटलेले आहे. राज्य सरकारने त्याबद्दल भूमिका स्पष्ट केलेली नाही. ५० पैसे आणेवारीपासून अनेक गावे वंचित ठेवली आहेत. यामध्ये बुलडाणा जिल्ह्यातील काही ठराविक गावे घेतली जातात आणि इतर चार जिल्ह्यातील गावे घेतली जात नाही. अशीच परिस्थिती नागपूर जिल्ह्यातील आहे. ५० पैशापेक्षा कमी आणेवारी संदर्भात राज्य सरकार पॅकेजच्या नावाखाली चालढकलपणा करीत असल्याची बाब योग्य नाही. त्यामुळे या ६ हजार गावांची आणेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे, हे आपण घोषित करावे, अशी आमची मागणी आहे.*

*श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात आदेश निर्गमित करावे, असे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटले आहे. ज्या ठिकाणी दुष्काळ जाहीर करण्याची स्थिती नाही, त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आपण तेथे टेक्निकली ते करु शकत नाही. परंतु तेथे नुकसान झाल्याचे, तसेच कमी उत्पन्न आल्याची बाब खरी आहे. त्यामुळे अशी वस्तुस्थिती लक्षात आलेल्या ठिकाणी राज्य सरकारने कोर्टाचा निर्णय येण्यापूर्वीच कॅबिनेट पुढे जाऊन १ हजार ५० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिलेली आहे. ही मंजुरी केवळ कापूस आणि सोयाबीनसाठी असून धानासाठी केलेली मदत वेगळी आहे. म्हणजेच धानाच्या प्रत्येक क्विंटल मागे २०० रुपये अनुदान देण्याचा वेगळा निर्णय घेतलेला आहे...(अडथळा)...यासंदर्भातील निर्णय परवा घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांना मंत्रिमंडळामध्ये येण्यास खूप वेळ आहे. यासंदर्भात मागील १५ दिवसापूर्वी कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात धानाला २०० रुपये, तसेच कापूस आणि सोयाबीनच्या शेतकऱ्यांचा विमा नसला तरी त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यासंदर्भातील आदेश निघत आहेत. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला याचा अर्थ हे आदेश निघणार आहे. अधिवेशन संपण्याच्या आत यासंदर्भातील प्रक्रियेला व वाटपाच्या प्रक्रियेला सुरुवात होईल. त्यामुळे दुष्काळाच्या संदर्भात सरकार गंभीर नाही, अशी बाब नाही. आम्ही त्यापूर्वीच निर्णय घेतलेले आहेत. यापूर्वी असा निर्णय कधीही घेतलेला नाही. हजार कोटी रुपयांचे नुकसान झालेले असताना व दुष्काळ जाहीर केलेला नसताना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई सरकारने दिली असल्याचा पूर्वीचा निर्णय आपण दाखवून द्यावा. आपण टेक्निकली जाहीर करु*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. एकनाथराव खडसे.....*

*शकत नाही. तरीही १ हजार ५० कोटी रुपये अधिक धानाचे पैसे देण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे आणि आम्ही ही बाब माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणणार आहोत...(अडथळा)...*

*अध्यक्ष : माननीय विरोधी पक्षनेते, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या अध्यक्षांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठीच्या कृषी कर्जाच्या वाटपात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये निदर्शनास येणे, याबाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.*

*सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभिर्य लक्षात घेता शासनाने वस्तुस्थिती दर्शक निवेदन करावे, असे निदेश देऊन मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे.*

*यानंतर माननीय विरोधी पक्षनेते, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी कोळेगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथील शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून दिनांक १८ मार्च २०१६ रोजी केलेली आत्महत्त्या याबाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.*

*सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. अत: या सूचनेस मी दालनात अनुमती नाकारीत आहे.*

*...M/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्य सरकार या विषयामध्ये गंभीर नाही. मोठ मोठी आकडेवारी जाहीर करुन पॅकेज संदर्भात शेतकऱ्यांवर सतत अन्याय करण्याची भूमिका सरकार घेत आहे. माननीय उच्च न्यायालयाने शेतकऱ्यांच्या संदर्भात राज्य सरकारला अनेक वेळा सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांसंदर्भात सरकारच्या भूमिकेचा आम्ही निषेध करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य सदनाच्या बाहेर जातात.)

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्ष नेते व विरोधी पक्षाने सभागत्याग केला आहे. खरे तर शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकारने अतिशय स्पष्टपणे भूमिका मांडली असून हे सरकार शेतकऱ्यांच्या बाजूचे आहे. विरोधी पक्षाच्या सत्ता कालावधीमध्ये त्यांनी कधीही अशा प्रकारचे पॅकेज दिले नाही. दुष्काळ नसताना त्यांनी एक नवीन पैसा शेतकऱ्यांना दिला नाही, दिला असेल तर त्यांनी रेकॉर्ड दाखवावे. विरोधी पक्षास राजकारण करावयाचे आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. अमरावती व नागपूर विभगातील शेतकऱ्यांना सरकारच्यावतीने पूर्णपणे मदत केली जाईल. आम्ही पुन्हा न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊ की, काही नियमामुळे आम्ही मदत करु शकलो नसलो तरी दुष्काळ आहे असे समजून सर्व उपाययोजना राज्य सरकारने केलेल्या आहेत. त्यामुळे टेक्निकली दुष्काळ म्हटले किंवा नाही म्हटले तरी सर्व उपाययोजना त्या ठिकाणी राज्य सरकार करणार असून सर्व सोयी राज्य सरकारने दिल्या आहेत.

--------------------

....2

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, मी स्थगन प्रस्ताव सादर केला होता तो दालनामध्ये नाकारला, असे आपण आता सांगितले. मागील दोन दिवसांपासून डम्पींग ग्राऊंडला लागलेल्या आगीमुळे प्रदूषण होऊन मुंबईची परिस्थिती बिकट झालेली आहे. मुंबईतील प्रदूषणाची पातळी वाढल्यामुळे अनेक लोक आजारी पडले आहेत. त्यामुळे सर्व खाजगी, शासकीय व महानगरपालिकेचे हॉस्पिटल भरलेले आहेत. मी मुख्यमंत्री महोदयांचे कौतुक करतो, कारण त्यांनी मागील 6 महिन्यापासून महानगरपालिकेमध्ये ज्या ज्या कंत्राटामध्ये घोळ झाला आहे त्याप्रकरणी चौकशी लावलेली आहे. 31 जानेवारी रोजी डम्पींग ग्राऊंड टेंडर प्रक्रियेशी संबंधीत लोकांना निलंबीत केल्यानंतर मागील 2 महिन्यापासून डम्पींग ग्राऊंडला आग लावण्याचे प्रकार सुरु झाले आहेत. डम्पींग ग्राऊंडच्या टेंडरनुसार काम करण्यात आलेले नसून महानगरपालिकेचे कोट्यावधी रुपये लुटण्याचे काम कंत्राटदारांनी केलेले आहे. सदरहू प्रकरणी एस.आर.डी नेमून चौकशी करावी, अशी माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री अबु आजमी : अध्यक्ष महोदय, मैं माननीय मुख्यमंत्री जी का ध्यान इस ओर दिलाना चाहता हूं कि मेरे मानखुर्द-शिवाजीनगर इलाके में लोगों की जिंदगी दुभर हो गई है. मुसल्सर डम्पिंग ग्राऊण्ड में आग लग रही है. माननीय मुख्यमंत्री ने इसी सदन में कहा था कि वहां पर माफिया लोगों के द्वारा आग लगायी जा रही है. वहाँ पर ॲडिशनल पुलिस कमिश्नर की इन्क्वायरी हूई. आज तक एक भी माफिया पकड़ा नहीं गया. माननीय मुख्यमंत्री ने कहा था कि वहां पर सीसीटीवी कॅमेरे लगाए जाएंगे, बाऊण्ड्री बनायी जाएगी. लेकिन आज तक वहाँ पर सीसीटीवी नहीं लगाए गए है. केवल 6 सीसीटीवी लगे हुए है. एक महीने से हम सीसीटीवी के फूटेज मांग रहे है लेकिन फूटेज भी उपलब्ध नहीं है. आईआईटी ने सात लाख रूपये फीस लेकर, एक्सपर्ट लोगों ने कहा था कि इसका हल निकलेगा. लेकिन आज तक आईआईटी से बात करके वहां पर कोई कार्यवाही शुरु नहीं है. एक्सपर्ट लोगों ने कहा है कि वहाँ जो पहाड़ बन गया है उसके स्लाईड होने से बस्ती में रहने वाले लोगों की जान जा सकती है. इस बारे में कमिश्नर साहब को तुरंत आदेश दिया जाए कि उसको पिरामीड की तरह बनाया जाए. आज वहाँ पर

....3.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी.....

सिक्युरिटी के 150 लोग है. ये कोई भी जानकारी नहीं देते है. जनता कहती है कि वहाँ रोज आग लग रही है. इस विषय को लेकर आज चारों तरफ आंदोलन हो रहे है. आज समाजवादी पार्टी का आंदोलन है. कई संगठनों का आंदोलन चल रहा है. सरकार ने इस ओर ध्यान देना चाहिए.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला असून त्याबाबत शासनाने लक्ष द्यावे.

------------

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचा मुद्दा.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, कोल्हापूर जिल्ह्यातील सुळेवाडी तालुका म्हाळशिरज हे गाव 40 वर्ष सांगोला विधानसभा मतदार संघामध्ये होते. सन 2002 मध्ये यागावामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत पाझर तलावाचे काम घेण्यात आले होते. त्याकरिता ज्या लोकांच्या जमिनी संपादित केल्या होत्या त्यांच्या भूसंपादनाचे पैसे अद्यापर्यंत देण्यात आले नाहीत.

अध्यक्ष महोदय, श्री.रामा शंकर खुळे व इतर 12 लोकांच्या जमिनी शासनाने पाझर तलावासाठी ताब्यामध्ये घेतल्या आहेत. या शेतकऱ्यांनी वारंवार संबंधित अधिकारी व सरकारकडे जमिनीचा मोबदला मिळण्याची मागणी केली परंतु तो त्यांना मिळाला नाही. लोकशाही दिनाच्या दिवशी या शेतकऱ्यांनी सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचेकडे जाऊन जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी मागणी करुनही त्यांना मोबदला मिळाला नाही.

अध्यक्ष महोदय, सदर विषयाबाबत दिनांक 7 ऑगस्ट, 2003 रोजी सदनामध्ये अतारांकित प्रश्न क्रमांक 1,15,243 ला लेखी उत्तर देताना तत्कालीन मंत्री यांनी मोबदला देण्यात येईल असे उत्तर दिले. त्यानुसार जमिनीचा मोबदला देण्याकरिता भूसंपादन कायद्याचे कलम 4 खाली नोटीसा काढण्यात आल्या होत्या. परंतु संबंधित भूसंपादन अधिकारी यांचेकडे सदरहू मोबदला प्रकरणी शासनाने पैसे न दिल्यामुळे काढण्यात आलेल्या नोटिसा लॅप्स झाल्या आहेत. सदरहू शेतकऱ्यांना लवकरात लवकर जमिनीचा मोबदला देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

**अध्यक्ष :** सदरहू प्रकरण मागील 14 वर्षापासून प्रलंबित आहे, यासंदर्भात जलसंपदा मंत्री महोदयांनी लक्ष घालून तातडीने निर्णय घ्यावा. सदरहू प्रकरणी नवीन कायद्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना मोबदला द्यावा लागणार असल्याने ज्यांच्यामुळे सदरहू प्रकरणी विलंब झाला आहे त्यांच्यावर काय केले पाहिजे....

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.मल्लिकार्जून रेड्डी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.डी.मल्लीकार्जून रेड्डी : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, रामटेक विधानसभा क्षेत्रातील रामटेक व पारशिवनी भागातील कोरडवाहू शेती असलेली 111 गावे शासनाने दुष्काळग्रस्त घोषित केली आहेत. कृषी विभागामार्फत या गावांना शेतीसाठी ठिबक व तुषार सिंचन योजनांचा लाभ देऊन सोयाबीन, कापूस, संत्रा, भाजीपाला, फलोत्पादन शेतकऱ्यांना मदत करावी.

अध्यक्ष महोदय, पूर्व विदर्भातील 111 गावे दुष्काळग्रस्त असल्याने तेथे कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी या वित्तीय अर्थसंकल्पामध्ये तरतूद करुन सदरहू गावातील कोरडवाहू शेती असलेल्या शेतकऱ्यांना तुषार व ठिबक सिंचन योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर N-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. मल्लिकार्जून रेड्डी .....

सिंचनाच्या माध्यमातून जी ठिबक आणि तुषार सिंचन पध्दती आहे, त्या बाबतीत जास्तीत जास्त कोरडवाहू शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे, असा मी औचित्याचा मुद्दा सभागृहाच्या माध्यमातून सरकारकडे मांडत आहे. आपल्या कृषी विभागाच्या माध्यमातून सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या ज्या योजना आहेत त्याची माहिती जनप्रतिनिधी असूनही आम्हाला मिळत नाही. या सभागृहाच्या माध्यमातून मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो की, आपण कृषी विभागाच्या माध्यमातून ज्या काही योजना राबविल्या जातात त्यांची माहिती जनप्रतिनिधींना असणे आवश्यक आहे. दुष्काळग्रस्त गावांना सरकारकडून कोणती मदत होणार आहे त्याची माहिती आम्हाला मिळणे आवश्यक आहे. ही आमची प्रमुख मागणी असून यासंबंधी आपण कृषी विभागाला उचित निर्देश द्यावेत, अशी आपणास विनंती आहे. धन्यवाद.

------

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनिल प्रभू : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत यासंबंधीची सुमारे 62 हजार प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट तात्काळ सुरू करण्याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावा. याचे कारण असे की, अलिकडेच महिला दिन साजरा करण्यात आला आणि त्या महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सुरक्षिततेबाबत राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करील असे राज्य सरकारच्या वतीने महिलांसाठी सांगण्यात आलेले असून देखील गेली काही वर्षे राज्यात महिला, अल्पवयीन मुलींच्या बलात्कारांच्या घटनांमध्ये झालेली चिंताजनक वाढ रोखण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या वतीने महिलांना संरक्षण देणे तसेच संकटात सापडलेल्या महिलांना पोलीस सहाय्य मिळावे याकरिता मुंबईसह विविध भागात हेल्पलाईन देखील सुरू करण्यात आली आहे. परंतु माननीय उच्च न्यायालय मुंबई, नागपूर, औरंगाबाद, गोवा अशा चारही खंडपीठांतर्गत गेल्या 10 वर्षात महिलांवरील अत्याचाराचे अडीच लाखाहून अधिक खटले या न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. त्यामुळे माननीय उच्च न्यायालयाने मुंबईसह राज्यातील विविध न्यायालयात महिला व अल्पवयीन मुली, शालेय महिला व विद्यार्थीनी यांच्या संदर्भात असलेले 62 हजार प्रलंबित खटल्यांच्या बाबतीत तात्काळ निर्णय व्हावा अशा पध्दतीच्या सूचना देखील दिलेल्या होत्या. परंतु याबाबत अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय झालेला नाही. राज्यातील महिला व अल्पवयीन मुलींवर होत असलेले अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकारने 2012 मध्ये प्रोटेक्शन ऑफ चार्टर्ड फॉर्म सेक्युलर ऑफेन्स ॲक्ट आणि बाल गुन्हेगारीचे वय 18 वरुन 16 वर्षे करण्याबाबतचा जो निर्णय घेतला आहे. यासंबंधी 22-12-2015 रोजी जो अधिनियम मंजूर करुन घेतला तरीही अद्याप महिलांना संरक्षण देणाऱ्या कोणत्याही बाबींची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली नाही. त्यामुळे मला असे वाटते की, सद्य:स्थितीत महिलांच्या अत्याचारासंबंधात 62 हजार जे खटले प्रलंबित आहेत. त्यावर निर्णय घेण्यासाठी सरकारने फास्ट ट्रॅक न्यायालये महिलांसाठी सुरू केले तर प्रलंबित असलेले हे खटल्यांवर निर्णय होईल आणि जे आरोपी असतील त्यांना कडक सजा होईल. म्हणून माझी सरकारकडे मागणी आहे की, आपण ही फास्ट ट्रॅक न्यायालये तात्काळ सुरू करण्यासाठी निर्णय घेण्यात यावा.

------

3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. मंगल प्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मैं औचित्य के माध्यम से सरकार का ध्यान आकृष्ट करना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, एसएससी बोर्ड की दिनांक 9 मार्च, 2016 को हुई परीक्षा में बिजगणित के पेपर में 40 अंक में से 10 अंक का जो प्रश्न था वह सिलॅबस के बाहर का था. 6 साल पुराने कोर्स में से प्रश्न पूछा गया. कोई भी विद्यार्थी उस प्रश्न का जवाब नहीं दे सका. इसका परिणाम यह निकलेगा कि आईसीएससी बोर्ड, आईबी बोर्ड के विद्यार्थियों को ज्यादा मार्क्स मिलेंगे और अपने विद्यार्थियों को कम मार्क्स मिलेंगे. मेरी सरकार से विनती है कि औचित्य के प्रश्न का जवाब दो-तीन महीने के बाद आता है. तब तक इसका रिजल्ट आ जाएगा. आप सरकार को निर्देश दीजिए कि इस महत्व के प्रश्न को समझते हुए, लाखों बच्चों के भविष्य को समझते हुए, सरकार 10 मार्क्स के संबंध में आवरेज मार्क्स का निर्णय लें या बच्चों को मार्क्स बढ़ाकर दें. इस प्रश्न का महत्व इसलिए है कि 11वीं में विद्यार्थी को कितने मार्क्स मिले इस आधार पर बच्चों को अ‍ॅडमिशन मिलती है. एसएससी बोर्ड के विद्यार्थियों को बिजगणित के पेपर में मार्क्स कम मिलेंगे. मेरा निवेदन है कि आप सरकार को निर्देश दीजिए कि इस बारे में सरकार दो दिन में अपना मंतव्य सदन के पटल पर रखें. ऐसा मेरा औचित्य का मुद्दा है.

**अध्यक्ष :** या संदर्भात संबंधित मंत्र्यांनी लक्ष घालावे.

--------

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती निर्मला गावित : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यात आदिवासी समाजाची बोगस प्रमाणपत्रे घेऊन शासनाच्या विविध सुविधांचा फायदा घेण्यात येत आहे. तसेच शासकीय नोकरीमध्ये व पदोन्नतीमध्ये राखीव जागांचा फायदा घेतला जात असल्याचे ऑर्गनायझेशन फार राईट्स ऑफ ट्रायबल शाखा औरंगाबाद यांनी आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात घुसखोरी सुरू असून ते शासनाच्या सर्व सुविधांचा फायदा घेत आहे. त्यामुळे आदिवासी शासनाच्या सुविधांपासून वंचित राहत आहेत. या आदिवासी समाजावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहे. यासाठी बोगस प्रमाणपत्रे देणाऱ्या रॅकेट्सचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. अशा या अतिशय महत्वाच्या मुद्यावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावा, ही विनंती. धन्यवाद.

-----

5........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश गोरे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या भटक्या व मोकाट कुत्र्यांना पकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग्रामीण भागात म्हणजे खेड तालुक्याच्या हद्दीत आणून सोडतात. हे भटके कुत्रे इतके हिंसक झालेले आहेत की, आतापर्यंत नागरिक, शाळकरी मुले, जनावरे यांच्यावर हल्ला करुन त्यांना ते गंभीर जखमी करतात. या हल्ल्यामध्ये काही जणांना जीवही गमवावा लागलेला आहे. हे भटके कुत्रे 15-20 संख्येच्या घोळक्याने येऊन अचानकपणे येऊन नागरिकांचे लचके तोडून त्यांना गंभीर जखमी करतात. गेल्या तीन वर्षामध्ये कुत्र्यांनी लचके तोडल्याच्या घटना किंवा नागरिकांना गंभीर जखमी केलेल्या प्रकरणांची संख्या फार मोठी असून ती 3700 इतकी आहे. या भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करुनही काहीच उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे यावर आज ठोस उपाययोजना करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी सर्वसामान्य जनतेमध्ये असंतोषाचे व संतापाचे वातावरण वाढलेले आहे. याकरिता शासनाने खेड तालुक्याच्या हद्दीमधील या भटक्या कुत्र्यांचे हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना आखून त्याची ठोस अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. धन्यवाद.

--------

6.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील संजय गांधी योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना 600 रुपये देण्यात येतात. या 600 रुपयांचा विचार केला तर प्रत्येक दिवशी त्यांना 20 रुपये मिळतात. या वीस रुपयांमध्ये चहा किंवा वडापाव सुध्दा आता महाग झालेला असल्यामुळे मिळत नाही. अशा परिस्थितीत या वृध्दापकाळात निराधार व्यक्तींनी कसे जगायचे हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. म्हणून या 600 रुपयांच्या योजनेमध्ये किमान 1000 रुपये अशी वाढ करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, हे जे 600 रुपये मिळतात, त्यामध्ये गेल्या 5 महिन्यापासून माझ्या मतदार संघामध्ये अनेक लाभार्थ्यांच्या ऑनलाईन बँक अकाऊन्टवर पैसे जमा करण्याचे धोरण स्वीकारले आहे. पण या लाभार्थ्यांना पैसे प्राप्त झाले नाहीत. यासंबंधी मी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर तहसिलदारांनी दोन दिवसांपूर्वी 4-4, 5-5 महिन्यांपूर्वी थकलेले अनुदान संबंधित लाभार्थ्यांना मिळालेले नव्हते. सरकारचे पैसे पोहोचलेत, परंतु ते संबंधित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले नाहीत. त्यामुळे यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मी या औचित्याच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधतो. सन्माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार या ठिकाणी आहेत. त्यांनी या गरीब लोकांच्या अनुदानात 600 रुपयांवरुन 1000 अशी वाढ करावी, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

------

यानंतर O-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल कुल : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "राज्यामध्ये 1 जून, 2015 पासून नव्या टोलधोरणाची अंमलबजावणी सुरु झाली. यामध्ये 12 टोलनाके कायमचे बंद करण्यात आले असून 53 टोलनाक्यांवर छोट्या वाहनांना देण्यात आलेली आहे. दौड तालुक्यील केडगाव येथील दोन टोलनाके बंद करण्यात आलेले नाही. तो यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होते तो समाविष्ट करण्यात आलेला नाही. तो त्वरित समाविष्ट करण्यात यावा. त्याठिकाणचा टोल माफ करावा अशी मी औचित्याच्या मुद्दयाद्वारे विनंती करीत आहे."

अध्यक्ष महोदय, मागच्या वर्षभरातील सर्व सन्माननीय सदस्यांचे तारांकित प्रश्न जे अतारांकित झालेले आहेत त्याची उत्तरे मिळालेली नाहीत. सभागृहात वारंवार चर्चा होऊनही औचित्याच्या मुद्दयांची उत्तरे मिळालेली नाहीत. सर्व सन्माननीय सदस्य माझ्याशी सहमत असतील की, सर्वसामान्य माणसाला एक महिन्याच्या आत माहिती द्यावी असा कायदा केलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना मागच्या वर्षभरातून उत्तरे देण्यात आलेली नाहीत. सातत्याने पाठपुरावा करुनही विधिमंडळ प्रशासनाकडून उत्तर मिळत नाही, तेही हतबल झालेले आहेत. संबंधित विभागाकडून कोणतेही उत्तर मिळत नाही. याबाबत संबंधित विभागासोबत एक बैठक घेऊन त्वरित निर्णय घ्यावा. अडचण अशी झालेली आहे की, अतारांकित प्रश्नांची उत्तरे मिळालेली नसल्यामुळे पुढे त्यावर प्रश्नही विचारता येत नाही. त्यामुळे सर्व सभासदांच्या भावना लक्षात घेऊन त्वरित निर्णय घेण्यात यावा अशी मी विनंती करतो.

----------

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरीभाऊ जावळे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "कृषी विकास दर वाढविण्याच्या दृष्टीने संपूर्ण जळगाव जिल्ह्यामध्ये 60 हजार हेक्टरवर आणि महाराष्ट्रामध्ये एक लाख हेक्टरवर केळीचे उत्पादन घेतले जाते. दोन वर्षापासून केळीचे भाव कमी होत आहेत. जळगाव जिल्ह्यातील सावदा आणि पाडळसे येथे केळी निर्यात सुविधा केंद्र उभारुनही पाहिजे तेवढी केळी निर्यात होऊ शकलेली नाही. शेतकऱ्यांना उत्पादनाच्या खर्चावर आधारित उत्पन्न मिळणे गरजेचे आहे. केंद्र सरकार त्यादृष्टीने फ्रुट प्रोसेसिंगच्या माध्यामातून देशभर मेगा फ्रुट प्रोजेक्ट उभे करीत आहे. महाराष्ट्र सरकारनेही राज्यामध्ये स्वतंत्र फ्रुट प्रोसेसिंग प्रोजेक्ट उभा केला तर जिथे पिकते तिथे उत्पादन प्रक्रिया केंद्र सुरु करता येईल आणि ग्रामीण भागामध्ये रोजगार उपलब्ध करता येईल. कृषी विकास दर कमी झालेला आहे. कृषी विकास दर वाढवायचा असेल तर केंद्रामध्य ज्याप्रमाणे फ्रुट प्रोसेसिंग मंत्रालय आहे त्याप्रमाणे सरकारनेही ॲग्रोबेस इंडस्ट्रीज आणि फ्रुड प्रोसेसिंगसाठी स्वतंत्र विभाग उभा करणे गरजेचे आहे जेणेकरुन या प्रकल्पाला चालना मिळेल. यातून शेतकऱ्यांनाही दोन पैसे जास्त मिळतील. रोजगार उपलब्ध होईल. म्हणून याबाबत जातीने लक्ष घातले तर निश्चितपणे न्याय मिळू शकेल."

-------------

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शिवाजीराव नाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "सांगली जिल्ह्यातील सुमारे 5 हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला मौजे तांबवे, ता.वाळवा येथे कृष्णा नदीकाठी ठेकेदाराला वाळू उपसा करण्यासाठी गट नं.367 ते 396 या क्षेत्रामध्ये परवानगी देण्यात आली होती. सदर ठेकेदाराने गावाच्या नजीक गट नं 1 ते 40 च्या क्षेत्रामध्ये बेकायदेशीर वाळू उपसा चालू केलेला आहे. या गट नं 1 ते 40 च्या हद्दीमध्ये सार्वजनिक घाट, स्मशानभूमी आहे. याचबरोबर त्याठिकाणी पूर संरक्षण भिंत बांधलेली आहे. या सर्वांना धोका निर्माण झालेला आहे. नदीकाठच्या घरांना तडे जाऊ लागलेले आहेत. तसेच संपूर्ण रात्रभर 10 ते 12 यांत्रिकी बोटीधारक राजरोसपणे वाळू उपसा करीत आहेत. नागरिकांनी लेखी निवेदन देऊन सुध्दा शासनाचा अधिकारी त्याठिकाणी येत नाही. पिण्याचे पाणी प्रदूषित झालेले आहे. महिलांचा कपडे धुण्याचा घाट उध्वस्त झालेला आहे. वारंवार अर्ज देऊन सुध्दा शासन लक्ष देत नाही. याबाबत औचित्याच्या मुद्दयाद्वारे संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी करीत आहे."

------------

........4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय पोतनीस : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "मुंबई शहरास पाणी पुरविणाऱ्या जलवाहिनीच्या दोन्ही बाजूस 10 मीटर लगतची अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नुकत्याच माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये नोटीसी पाठविण्यात आल्या आहेत. उक्त नोटीसीमुळे निष्कासित होणाऱ्या बाधित झोपडीधारकांना माहुल गांव, मुंबई येथे स्थलांतरीत करण्यात येणार आहे. माहुल गांव, मुंबई येथे असलेल्या वसाहतीमध्ये अनेक सोयीसुविधांचा अभाव, तसेच घुसखोरीमुळे सदर जागा राहण्यायोग्य नसणे, स्थलांतरित होणाऱ्या आधित झोपडीधारकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागणार आहे तसेच शासनाच्या नवीन शासन निर्णयानुसार झ ोपडीधारकांना 270 चौ.फुटाची घरे देण्यात येत आहेत. परंतु उपरोक्त आदेशामुळे निष्कासित झ ालेल्या बाधित झोपडीधारकांना पूर्वीच बांधलेल्या 225 चौ.फुटाच्या घरांमध्येच स्थलांतरित करण्यात आहे. यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महापालिका उपायुक्त/परिमंडळ-3, के-पूर्व विभाग कार्यालय येथे दिनांक 10/2/2016 रोजी झोपडीधारकांच्या स्थलांतराबाबत पुर्नविचार करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. यासंदर्भात अद्यापी कोणतीच काग्रवाही झाली नसल्यामुळे परिसरात प्रचंड नाराजीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्याकरिता यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याकरिता मी या औचित्याच्या मुद्दयाद्वारे मंत्री महोदयांना विनंती करीत आहे."

----------

.........5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहूल बोंद्रे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "बुलढाणा जिल्ह्यातील चिखली हे जिल्ह्यातील मध्यवर्ती शहर असून शैक्षणिक व आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाते. 75 हजार लोकसंख्या असलेल्या शहराला 12 ते 25 दिवसानंतर पाणी पुरवठा होत आहे. जुनी पाणी पुरवठा योजना तातडीने बदलून नवीन पाणी पुरवठा योजना करण्याची आवश्यकता आहे. अशी पाणी पुरवठा योजना तत्कालीन नगरपालिकेने सादर केली होती. या योजनेला सन 2014 मध्ये तत्कालीन शासनाने तत्वतः मंजूरी दिलेली होती. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत तत्वतः मान्यता मिळालेल्या प्रकल्पाला नवीन आलेल्या नगरपालिकेने गुंडाळून ठेवले आणि नवीन पाणी पुरवठा योजना करण्याचा घाट घातला. त्यांच्या कृतीमुळे शहरवासियांना पाणी मिळण्यासाठी अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे नगरपालिकेला आणि शासनाला तातडीने निर्देश देणे आवश्यक आहे. या अत्यंत महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे."

----------

.......6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल बाबर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "केंद्र शासनाने सोन्या-चांदीचे व्यापाऱ्यांवर अबकारी कर लावल्याने राज्यात अनेक दिवसांपासून सर्व सराफ दुकाने बंद होती. पण कालपासून काही दुकाने सुरु झालेली आहेत. हा अबकारी कर केंद्र शासनाचा असला तरी सोन्या-चांदीच्या व्यवसायामध्ये महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल याठिकाणी अनेक कारागीर या धंद्यावर अवलंबून आहेत. माझ्या मतदारसंधातील 10 हजार कुटूंबे या व्यवसायावर अवलंबून आहेत. याबाबत केंद्र शासनाच्या अर्थमंत्री महोदयांना विनंती करुन यामध्ये तडजोड करावी आणि या व्यवसायावरील गंडांतर कमी करावे अशी मी औचित्याच्या मुद्दयाद्वारे विनंती करीत आहे."

-------

.......7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "मी अमरावती जिल्हा सन 2015-2016 या अंतर्गत माननीय जिल्हाधिकारी यांनी गेल्या वर्षभर जे नियमबाह्य कामकाज केलेले आहे. त्यासंदर्भात अमरावती जिल्हा वार्षिक योजना सन 2015-2016 यामध्ये आदिवासी उप योजना, सर्वसाधारण योजना, विशेष घटक योजना या योजनांतर्गत जवळपास 300 कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अंतिम अधिकार जिल्हा नियोजन समितीला असतात. असे असताना जिल्हा नियोजन समितीची मान्यता न घेता व नियोजन विभागाच्या दिनांक 17/12/2014 रोजीच्या शासन आदेशाचे उल्लंघन करुन माननीय जिल्हाधिकारी यांनी अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन या प्रशासकीय कामांना मंजूरी दिलेली आहे. तसेच या कामांना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तेव्हा या अत्यंत गंभीर व अन्याय बाबीसंबंधी बहुसंख्या सदस्यांनी बहुमतांनी याचा विरोध केलेला असताना त्याची दखल घेण्यात न आल्याने अमरावती जिल्हा विकासापासून वंचित राहत आहे. म्हणून अमरावती जिल्हा नियोजन समितीच्या सन 2015-2016 आराखड्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी परस्पर मान्यता दिलेली कामे रद्द करुन शासन निर्णयानुसार कायद्यानुसार व उच्च न्यायायच्या सन्माननीय सदस्य श्री.चरण वाघमारे यांनी जो निर्णय दिला होता त्याच्या अधीन राहून या कामांची प्रशासकीय मान्यता रद्द करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्दयाद्वारे करीत आहे."

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

P-1.......

श्रीमती भारती लव्हेकर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्या आहे. "पुरोगामी महाराष्ट्रामध्ये महिलांना बरोबरीने आणि सन्मानाने वागवण्यात येत असताना प्रशासनात सुध्दा महिलांना योग्य स्थान मिळावे. याकरिता दिनांक 25.1.2001 रोजी निर्णय घेतला होता की, शासकीय, निमशासकीय आणि शासन अनुदानित संस्थानमध्ये शासकीय सेवांमध्ये भरतीच्या वेळी महिलांकरिता 30 टक्के जागा आरक्षित केल्या होत्या. परंतु या जी.आर.मध्ये अत्यंत गंभीर अशा त्रुटी राहिलेल्या आहेत. हा जी.आर. माझ्या हातामध्ये आहे. त्यामध्ये महिलांना भरतीच्या वर्षात त्या-त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे ही अतिशय गंभीर बाब आहे. महिला उमेदवारांना त्या ठिकाणी घेण्यात यावे. दुसरे महिलांच्या आरक्षणाचा अनुषेश पुढे ओढण्यात येऊ नये.

अध्यक्ष महोदय, मी एका महिलांच्या गंभीर प्रश्नावर बोलत असताना आपण इतरत्र बघता आहात मला वाटते महिलांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे. या तिन्ही बाबतीत गंभीरपणाने दखल घेऊन त्रुटी दूर कराव्यात या जी.आर.मध्ये चेंज आणणे गरजेचे आहे." धन्यवाद.

.............

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.डी.पी. सावंत : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्या आहे. "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान योजनेअंतर्गत नांदेड शहरामध्ये तरोडा आणि सिडको या वाढीव भागाकरिता पाणीपुरवठा व मलनि:सारणाचे एकूण 150 कोटीच्या कामांच्या चार प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. सदर योजनेच्या निकषानुसार केंद्राचा हिस्सा 80 टक्के राज्याचा 10 टक्के आणि मनपाचा 10 टक्के अशा त-हेने निधी वितरीत करण्यात आला. 50 टक्के कामे पूर्ण झाली. परंतु मध्येच अमृत योजना केंद्र शासनाने सुरु केल्यामुळे 30 टक्क्यांचा फरक आज महानगरपालिकेला होतो. तो 25 कोटी रुपयांचा बोजा आहे. म्हणून माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, जी कामे जे.एन.यू.आर.एम. मध्ये सुरुवात केली होती ती अर्धवट राहिलेली आहेत. ती अर्धवट न राहण्यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करावी की, हे जे.एन.यू.आर.एम. मध्ये ही कामे व्हावीत. अमृतमध्ये न होता ही कामे जे.एन.यू.आर.एम.मध्ये व्हावीत. जेणेकरुन योजनेवरील खर्च वाया जाऊ नये व नागरिकांना मुलभूत सोयीसुविधांपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे ती होऊ नये याकरिता शासनाने खबरदारी घ्यावी."

................

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सरदार तारासिंग : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्या आहे. "अध्यक्ष महोदय, मुंबई महानगरपालिका के कई गार्डन्स है. पहले गार्डन्स में सुबह और शाम को जनता आती थी. अब कमिश्नर महोदय ने एक नया आदेश निकाला है कि सुबह से लेकर रात 9.00 बजे तक गार्डन खुले रहेंगे. गार्डन की देखभाल करने के लिए कोई माली नहीं है, कोई वॉचमेन नहीं है. कॉलेज के लड़का-लड़की सारा दिन गार्डन में आकर बैठते है. कॉलेज में कोई नहीं जाते. जितनी उपस्थिति कॉलेज में होनी चाहिए उतनी उपस्थिति गार्डन में होती है. मेरा निवेदन है कि महानगरपालिका ने जो आदेश निकाला है उसे वापस लिया जाए और सुबह और शाम के समय गार्डन जनता के लिए खुले रहना चाहिए, ऐसा मेरा औचित्य का मुद्दा है.

----------

.......4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयदत्त क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "या सभागृहामध्ये काही महत्वाचे प्रश्न उपस्थित करण्यासाठी वेगवेगळी आयुधे देण्यात आलेली आहेत. त्यात औचित्याचा मुद्दा हे महत्वाचे आयुध आहे. त्या माध्यमातून सर्व सत्रांमध्ये दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य काही मुद्दे या ठिकाणी उपस्थित करतात. उपस्थित केलेल्या मुद्याचे महत्व लक्षात घेता शासनाकडून लेखी किंवा अन्य स्वरुपात उत्तर अपेक्षित आहे. आज पर्यंत या सरकारने कुठलाही औचित्याचा मुद्दा गांभीर्याने घेतला नाही. त्याला उत्तर दिले नाही. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्य माझ्याशी सहमत असतील. आपण तेथून आदेशित करावे की, ठराविक मुदतीमध्ये उत्तर दिले जावे."

.........

**तालिका सभाध्यक्ष** : औचित्याच्या मुद्याला तिस दिवसांच्या आत उत्तर दिले जाईल. शासन तिस दिवसांच्या आत औचित्याच्या मुद्याला उत्तर देण्यासंदर्भात दखल घेईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, औचित्याच्या मुद्याला उत्तर दिले पाहिजे. अशा संदर्भातील सूचना माननीय अध्यक्षांनी दोन, तिन वेळा केलेल्या आहेत. एखाद्या विभागाच्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात उत्तर येत नाही असा आपला आक्षेप असेल तर शासन संबंधित विभागांनाही सांगेल. मी, सन्माननीय सदस्यांना विनंती करेन की, एखाद्या औचित्याच्या मुद्याला तिस दिवसांच्या आत उत्तर आले नाही असे आमच्या निदर्शनास आणून दिले तर चांगल्या पध्दतीने विभागाला सांगता येईल.

................

.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "सिंधुदुर्गामध्ये जे डंपरचे 5 मार्चला आंदोलन झाले. त्यावर निवेदनकरित असताना मुख्यमंत्री महोदयांनी तेव्हा सांगितले होते की, त्या सोमवारी एक सदस्य समिती स्थापन झाली होती. त्या समितीला रिपोर्ट गेल्या सोमवारी येणार होता. नेमके त्या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर ते निर्णय घेणार होते. त्या समितीच्या रिपोर्टमध्ये नेमके काय आले ? या गोष्टीला एक आठवडा होऊन गेला. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार हे ज्येष्ठ मंत्री सभागृहामध्ये आहेत. माननीय श्री.चंद्रकांतदादा पाटील हे सुध्दा सभागृहामध्ये आहेत. त्यांनी याबाबतची भूमिका आम्हाला सांगावी की, नेमके त्या रिपोर्टमध्ये काय आले आहे ? त्या आम्हाला अनुषंगाने पुढची रुपरेषा कळेल."

........

.....6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष** : शासनाने निवेदन करावे. मी आता एक निर्णय वाचित आहे.

माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या व अर्थसंकल्पाच्या बाबींवर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर माननीय अध्यक्षांचा निर्णय :-

दिनांक 18 मार्च, 2016 रोजी श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स. व श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांनी विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 2011 च्या यिम 7 अन्वये वार्षिक योजना सन 2016-2017 मधील प्रदेशनिहाय नियत वाटपाबाबतचे मा.राज्यपाल यांचे दिनांक 11 मार्च, 2016 रोजीचे निदेश हे सन 2016-2017 चा अर्थसंकल्प सभागृहापुढे सादर करण्यापूर्वीच दिनांक 17 मार्च, 2016 रोजी वितरीत केला गेल्याने अर्थसंकल्पातील नियतव्ययाबाबतची काही माहिती आधीच उघड झाल्याबाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात मला विभागाकडून प्राप्त झालेली स्पष्टीकरणात्मक माहिती तसेच या सचिवालयीन स्तरावर केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे :-

भारताच्या राष्ट्रपतींनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) अन्वये महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता राज्यपालांची विशेष जबाबदारी), आदेश, 1994 या दिनांक 9 मार्च, 1994 रोजी पारित केलेल्या आदेशान्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करणे, संपूर्ण राज्याच्या गरजा साकल्याने विचारात घेऊन तीनही क्षेत्रात विकास खर्चाकरीता निधीचे समन्यायी वाटप करणे व तीनही क्षेत्रातील तंत्रशिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोई व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था करणे, ही जबाबदारी सोपविलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी दिनांक 30 एप्रिल, 1994 रोजी "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 1994," पारित करून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन केली आहेत. माननीय राज्यपाल यांच्याकडून या आदेशातील नियम 7 अन्वये तीनही प्रदेशात विकास खर्चाकरीता निधीच्या समन्याय वाटपाकरीता सन 2002-2003 पासून सन 2010-2011 पर्यंतच्या वार्षिक योजनेतील प्रदेश निहाय संवितरणाकरीता निदेश देण्यात आले. तद्नंतर माननीय राज्यपाल यांनी विदर्भ,

.....7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष ........**

मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 1994 हे आदेश अधिक्रमित करुन, विकास मंडळांची रचना व कार्ये यात सुधारणा/बदल करुन दिनांक 5 सप्टेंबर, 2011 रोजी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, 2011 पारित केले आहेत. माननीय राज्यपाल यांच्याकडून या आदेशातील नियम 7 अन्वये तीनही प्रदेशात विकास खर्चाकरिता निधीच्या समन्याय वाटपाकरीता सन 2002-2013 पासून वार्षिक योजनेतील प्रदेश निहाय संवितरणाकरीता निदेश देण्यात येत आहेत.

Q-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष .....**

यापूर्वीच्या काळात माननीय राज्यपालांचे प्रस्तुतचे निदेश हे वर्षनिहाय केव्हा केव्हा सभागृहास सादरकरण्यात आले याची माहिती घेतली असता, सन 2007-2008 या वर्षी दिनांक 22 मार्च, 2007 रोजी अर्थसंकल्प सभागृहास सादर झाल्यानंतर दिनांक 26 मार्च, 2007 रोजी प्रस्तुत आदेश सदस्यांना वितरीत करण्यात आलेले आहेत. सन 2008-09 ते सन 2010-11 या कालावधीत माननीय राज्यपालांचे प्रस्तुतचे आदेश हे अर्थसंकल्प सादर होण्याकरिता निश्चित केलेल्या दिवशी मात्र अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात आलेले आहेत. सन 2011-12 या वर्षी मात्र अर्थसंकल्प दिनांक 23 मार्च, 2011 रोजी सभागृहास सादर झाल्यानंतर विलंबाने म्हणजेच दिनांक 5 एप्रिल, 2011 रोजी माननीय राज्यपालांचे सदरहू आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. मात्र या विलंबाबाबत विधान परिषदेतही काही सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेऊन राज्यपालांचे प्रस्तुतचे आदेश हे अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वीच सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत होणे आवश्यक असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. तद्‌नंतर सन 2012-13 ते सन 2015-16 पर्यंत अर्थसंकल्प सादर करण्यासाठी निश्चित केलेल्या दिवशी मात्र अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी माननीय राज्यपालांचे सदरहू आदेश सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त माहितीचे अवलोकन केले असता माननीय राज्यपालांच्या प्रस्तुत आदेशांचे वितरण हे काही वर्षी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सदस्यांना करण्यात आलेले आहेत. तर काही वर्षी अर्थसंकल्प सादर करण्यासाठी निश्चित केलेल्या दिवशी मात्र अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी सदस्यांना या आदेशांचे वितरण झालेले आहे.

माननीय राज्यपाल महोदयांच्या "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळे आदेश, 2011" या आदेशातील परिच्छेद 7 मध्ये "विकास खर्चासाठी निधीचे वाटप" या सदराखाली राज्याची एकूण गरज साकल्याने विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रांवरील विकास खर्चासाठी, महाराष्ट्राचे राज्यपाल निधीचे समन्यायाने वाटप व्हावे याची खातरजमा करतील. तर परिच्छेद 8 मध्ये "वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीच्या वाटपाचा निर्देश करणे" या सदराखाली

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष .....**

निधी किंवा नियतव्यय यांच्या माननीय राज्यपालांनी ठरवून दिलेल्या वाटपाचे निर्देश, राज्य विधानमंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये (पुरवणी अर्थसंकल्पासह) करण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

या तरतुदीनुरूप अर्थसंकल्पाच्या वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक) या प्रकाशनात माननीय राज्यपालांनी वार्षिक योजनेतील केलेल्या नियतव्ययाच्या वाटपाबाबतच्या विवरणपत्राचा अंतर्भाव करण्यात येतो. माननीय राज्यपालांच्या प्रस्तुत निदेशांच्या वितरणाच्या कार्यपद्धतीत एक वाक्यता राहण्यासाठी यापुढे माननीय राज्यपालांचे सदरहू निदेश हे ज्या दिवशी अर्थसंकल्प सभागृहास सादर होईल त्या दिवशी अर्थसंकल्पीय प्रकाशनांसोबतच सर्व सन्माननीय सदस्यांना वितरीत करण्यात यावेत, असे मी निदेश देत आहे.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, अगदी बरोबर व योग्य बाब आहे. परंतु येथे आम्ही जो मुद्दा उपस्थित केला होता. माननीय राज्यपालांनी आदेश दिलेले असले तरीही त्या आदेशामध्ये जे आकडे आहेत, ते वाटप केलेले आहेत. तेच वाटपाचे आकडे अंदाजपत्रकात येत असल्यामुळे अंदाजपत्रकाच्या संकेताचा भंग माननीय अर्थमंत्री यांच्याकडून झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपण दिलेला निर्णय सुसंगत करण्यासाठी माननीय वित्त मंत्री यांनी याबाबत खुलासा करावा. त्यांनी किमान दिलगिरी व्यक्त करणे योग्य होईल. असे केले तर ती बाब आपल्या आदेशाशी सुसंगत होईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, 2011 मध्ये विधान परिषदेमध्ये या संदर्भात सन्मानीय सदस्यांनी आक्षेप घेतला होता तेव्हा असे निदेश विधानपरिषदेमध्ये देण्यात आले होते. 2012-2013 पासून ही परंपरा माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशामुळे वित्त विभागाने सुरु केलेली आहे.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, विधान परिषदेच्या माननीय सभापतींनी काय निदेश दिले आहेत त्याचा या सभागृहाशी काहीही संबंध नाही. त्यांनी दिलेले निदेश हे अर्थसंकल्पाशी सुसंगत आहेत की नाहीत याची आम्ही चर्चा करु शकत नाही. विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ.देशमुख .....

सभागृहात दिलेल्या निर्णयाची आम्ही कदाचित चर्चा करु शकतो. त्यामुळे माननीय सभापती यांनी विधान परिषद सभागृहात दिलेल्या निदेशाचा आधार माननीय अर्थमंत्री महोदयांना घेता येणार नाही.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय अर्थ व ग्रामविकास राज्यमंत्री यांना विधान परिषद सभागृहात अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी जायचे आहे त्यामुळे आपण प्रथम लक्षवेधी सूचना क्रमांक 3 घेऊ.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यात जिल्हा परिषदांमार्फत राबविलेल्या शासनाच्या अनेक योजनांमधील कोट्यावधी रुपये अडकून असणे

**मु.शी.** राज्यात जिल्हा परिषदांमार्फत राबविलेल्या शासनाच्या अनेक योजनांमधील कोट्यावधी रुपये अडकून असणे यासंबंधी प्रा. विरेंद्र जगताप यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"राज्यात जिल्हा परिषदांमार्फत राबविलेल्या शासन योजनांमध्ये तब्बल १ लाख २६ हजार ५२९ कोटी ७२ लाख रुपये अडकून पडल्याचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरिक्षण करणाऱ्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या नव्या अहवालानुसार नुकतेच उघडकीस येणे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दरवर्षी स्थानिक निधी लेखा विभागामार्फत लेखा परिक्षण अहवाल सादर केला जात असणे, सदर अहवाल मिळाल्यापासून चार महिन्यांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लेखापरिक्षकांनी नोंदविलेल्या उणिवा दूर करणे, त्या आक्षेपावर स्पष्टीकरण देणे बंधनकारक असणे, परंतु कोणतीही कार्यवाही विहीत मुदतीत न केल्याने ३१ हजार २१८ लेखा आक्षेप प्रलंबित असणे, खर्चाचे सक्षम पुरावे मिळत नसल्याने या रकमेचा अपहार झाला असावा अशी शंका लेखापरिक्षकांना असणे, परंतु याबाबत वित्त विभागाकडून अद्याप कोणत्याही हालचाली*** होत ***नसणे, यामुळे राज्यातील जनतेत पसरलेले तीव्र संशयाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."***

श्री.दिपक केसरकर (ग्रामविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण काही सुधारीत उत्तर सादर करणार आहात का ? नसेल तर मी पुढील प्रश्न विचारतो.

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, छापलेल्या रिपोर्टमध्ये काही प्रिंटींग मिस्टेक झाल्याबाबत आम्ही लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात लिहिलेले आहे.

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, दिनांक 19.3.2016 च्या पत्रामध्ये तब्बल 1 लाख 26 हजार 529 कोटी 72 लाख रूपये अडकून पडल्याचे स्थानिक निधी लेखा विभागाने पहिल्या परिच्छेदामध्ये कळविले आहे. दुसऱ्या परिच्छेदात 1 लाख 26 हजार 529 कोटी 72 लाख रूपये अडकल्याचे दिनांक 19.3.2016 च्या पत्रामध्ये नमूद आहे. तथापि दोन दिवसानंतर म्हणजे दिनांक 21.3.2016 रोजी पुन्हा पत्र दिले आहे की, ती रक्कम 3054 कोटी 98 लाख असल्याचे कळविण्यात आलेले आहे. म्हणजे 1 लाख 26 हजार 529 कोटी 72 लाख रूपयांवरून ही रक्कम फक्त 3054 कोटी 98 लाखावर येते. पुन्हा वरील परिच्छेदामध्ये 1962-1963 ते 2012-2013 अखेर 12 हजार 254 कोटी 37 लाख इतकेच गुंतल्याचे नमूद केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाच्या एकाच प्रश्नाच्या उत्तरात तीन परिच्छेदातून वेगळी विसंगती दिसून येत आहे. या लेखा आक्षेपामध्ये जिल्हा परिषदांची एकूण 1962 पासून 2012-2013 पर्यंत नेमकी किती रक्कम अडकून पडलेली आहे ?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, यामध्ये दोन प्रकारचे निधी असतात. एक म्हणजे शासनाचा निधी जो जिल्हा परिषदेला गेलेला असतो व दुसरा जिल्हा परिषदेचा स्वनिधी असतो. आक्षेपाची संख्या ही शासनाच्या निधीच्या संदर्भात 1 लाख 28 हजार 218 ही आहे. ही आक्षेपाधीन रक्कम आहे, ही रक्कम अडकलेली नाही. शासनाच्या निधीची रक्कम 12254 कोटी रूपये आहे. जिल्हा परिषदेच्या आक्षेपाची संख्या 31218 आहे. आक्षेपाधीन निधी 3054 कोटी 98 लाख आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....6

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, शासनाचा 12254 आक्षेपाधीन निधी असल्याचे म्हटले आहे. जिल्हा परिषदेचा स्वनिधी हा 3054 कोटी 94 लाख असल्याचे म्हटले आहे. एवढा प्रदीर्घ काळ आक्षेपाधीन निधी अडकून राहात असेल तर, याबाबत आमची निश्चित अशी खात्री आहे की, यातील बऱ्याच रकमांचा अपहार झालेला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, 12254 कोटी शासनाचा निधी, 3054 कोटी जिल्हा परिषदेचा स्वनिधी यांच्या आक्षेपाची पुर्तता शासन नेमके किती दिवसात पूर्ण करणार आहे ? कारण हा निधी जनतेच्या कष्टातून उभा राहिलेला आहे. आक्षेपाची पुर्तता न करणाऱ्या जिल्हा परिषदांवर आपण कोणती कारवाई करणार ?

श्री.दिपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. 12354 कोटीच्या आक्षेपाधीन रकमेपैकी 1/3 रकमेच्या आक्षेपाची पुर्तता केलेली आहे.

यानंतर आर-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर.....

त्यामुळे आता ते कमी झालेले आहे. याबाबत शासन अधिक माहिती प्राप्त करुन घेत आहे. सदरहू काम करण्याकरिता आता खात्याने एक नवीन पध्दत सुरु केलेली आहे. कि रिझल्ट एरिया मॉनिटरींग सिस्टम आता सचिव यांच्या कार्यालयातून मॉनिटर केले जातात. लवकरात लवकर आक्षेपाधिन प्रकरणे कमी करण्याकरिता शासन प्रयत्न करीत आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, राज्याच्या जिल्हापरिषदांकडून येणारी रक्कम किंवा त्यापैकी बराचसा निधी आक्षेपाधीन झालेला आहे. ही संख्या मोठी आहे. शासन आक्षेपाधीन असलेल्या रकमांसंदर्भात आवश्यक असणारे परिच्छेद डिसेंबर अखेर निकाली काढणार आहे का? तसेच, डिसेंबर अखेर सभागृहाच्या समोर आक्षेपाधीन नसणा-या रकमासंदर्भात माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहे का ?

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ही एक निरंतर प्रक्रिया आहे. ज्यावेळी ऑडिट होईल, त्यावेळी पुन्हा यामध्ये नवीन आक्षेपाधीन रकमेसंदर्भातील मुद्दे ॲड होतील. ही बाब सन्माननीय सदस्यांनाही माहिती आहे, कारण त्यांनी या खात्यामध्ये मंत्री महोदय म्हणून काम केलेले आहे. ग्रामपंचायतीची थकबाकी शंभर रुपयांची असली तरीही ती आक्षेपाधीन रकमेमध्ये येते. यातून छोटया रकमा वगळण्यासंदर्भातील कार्यवाही व निर्णय प्रक्रिया विचाराधीन आहे. जेणेकरुन मुद्दे प्रलंबित भासणार नाहीत. या संदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला पाहिजे. खात्याच्या मार्फत हे आक्षेप जास्तीत जास्त कमी करता येतील तेवढे कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. डिसेंबर अखेर अधिवेशनामध्ये निकाली काढलेल्या व निकाली न निघू शकलेल्या सर्व आक्षेपाधीन प्रलंबित मुद्दयासंदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, सन्माननीय राज्यमंत्री म्हणत आहेत की, या संदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला पाहिजे. राज्यमंत्री महोदय हे सभागृहात शासन म्हणून उत्तर देत असतांना धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला पाहिजे असे म्हणणे योग्य नाही. या संदर्भातील निर्णय शासन म्हणून राज्यमंत्री महोदयांनीच घेतला पाहिजे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर : या संदर्भात धोरणात्मक निर्णय झालेला नाही. या संदर्भातील धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर त्याबाबत शासनाला कार्यवाहीसह माहिती देण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.योगेश सागर ) :** माननीय मंत्री महोदय म्हणत आहेत की, ही एक निरंतर प्रक्रिया आहे. ही कार्यवाही याच प्रक्रियेमधील भाग आहे.

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यायचे सोडून माननीय राज्यमंत्री यांना संरक्षण देत आहात.

**तालिका सभाध्यक्ष :** मी माननीय राज्यमंत्री यांना संरक्षण देत नसून आपल्या प्रश्नाकरिता आपल्यालाच संरक्षण देत आहे. त्याकरिता मी आपल्याला प्रश्न विचारण्याकरिता जास्त संधी देत आहे.

श्री.विजयराव औटी : अध्यक्ष महोदय, सन 1962-1963 ते सन 2012-2013 अखेरपर्यंतच्या आक्षेपाधीन रकमांचे निर्लेखन करण्याची विशिष्ट पध्दत असल्यासंबंधीचा हा मुद्दा आहे. या रकमांचे निर्लेखन लेखापरीक्षणाच्या माध्यमातून करण्यात येते. लेखापरीक्षणांतर्गत घेतलेल्या आक्षेपांना मुख्य कार्यकारी अधिकारी उत्तर देत असतात. जे आक्षेप मान्य केले जातात, त्या आक्षेपार्ह रकमा वजावट करुन केलेल्या या रकमा आहेत की नोंदविलेल्या आक्षेपाधीन प्रकरणाच्या रकमासह आलेली ही रक्कम आहे ?

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ज्याच्यामध्ये आक्षेप घेतलेला आहे. अशी ही रक्कम आहे. पुर्तता झालेल्या आक्षेपांबाबत मी सांगितले की, ही वेगवेगळया जिल्हापरिषदांकडून हे आकडे मागविलेले आहेत. जे आकडे प्राप्त झालेले आहेत, त्याप्रमाणे 1/3 रकमेचा आक्षेप कमी झालेले आहेत. या आक्षेपांची पुर्तता ही एक निरंतर प्रक्रिया आहे. डिसेंबर महिन्यामध्ये आक्षेपाधीन रकमा व आक्षेपाधीन नसलेल्या रकमांची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.विजयराव औटी : अध्यक्ष महोदय, सन 1962-1963 ते सन 2012-2013 अखेरपर्यंतच्या आक्षेपाधीन रकमांचे निर्लेखन करण्याची विशिष्ट पध्दत आहे, असे म्हटले जात आहे. परंतु 1962पासूनच्या आक्षेपाधीन रकमांचे निर्लेखन अद्यापही झालेले नाही. असे असेल तर त्या विशिष्ट पध्दतीमध्ये मुलभूत बदल करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, अशा पध्दतीमध्ये बदल करण्याचा प्रयत्न शासन करेल. ज्यावेळी सदर निर्णय घेतला जाईल, त्यावेळी आम्ही आपल्या निदर्शनास आणून दिले जाईल.

श्री.सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत, त्या म्हणजे जिल्हापरिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायत आहेत. या स्वराज्य संस्थांकडे कोटयवधी रुपयांच्या अखर्चित रकमा पडून आहेत. त्यापैकी काही रकमा या राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्याही आहेत. या संदर्भात मी माननीय अर्थमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती व पंचायत समित्या यांच्या अखर्चित रकमा शासन जमा करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केलेली आहे ?

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, सदरहू लक्षवेधी ऑडिटमधील आक्षेपाधीन परिच्छेदांतर्गत असलेल्या रकमेसंबंधी आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या अखर्चित रकमेसंबंधीचा प्रश्न वेगळा आहे. यासंबंधी सभागृहाच्या पटलावर माहिती ठेवण्यासंबंधीची व्यवस्था केली जाईल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री म्हणत आहेत, तेही काही चुकीचे नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.विजयराव औटी यांनी विचारलेल्या प्रश्नाला मी थोडे मॉडिफाय करुन प्रश्न विचारत आहे. सन 1962-1963 ते 2010पर्यंतच्या आक्षेपाधीन रकमासंदर्भातील माहिती जास्तीत जास्त आक्षेप परिच्छेद "निल" करुन डिसेंबर अखेर अधिवेशनामध्ये पटलावर ठेवण्यात येणार आहे का ?

श्री.दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, ही एक निरंतर प्रक्रिया आहे. नवीन ऑडिट होणार आहे, त्यावेळी नवीन आक्षेप परिच्छेद यामध्ये ॲड होणार आहेत. 1962 पासून प्रलंबित आक्षेपांसंदर्भात हा प्रश्न उपस्थित केला गेलेला आहे. या परिच्छेदांचे व रकमांचे निर्लेखन करण्यासंबंधी शासन विचार करीत आहे. जेवढया जास्तीत जास्त आक्षेपाधीन रकमांची पुर्तता करता येईल, तेवढी करण्याचा खात्याच्या मार्फत प्रयत्न निश्चितपणे करण्यात येईल. यासंबंधीची माहिती डिसेंबर अखेर अधिवेशनामध्ये पटलावर ठेवण्यात येईल.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर......

100 टक्के आक्षेपांची पुर्तता होणे तांत्रिकदृष्टया शक्य नाही. ऑडिटमधील जास्तीत जास्त आक्षेपाधीन परिच्छेद व रकमांची पुर्तता करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांना यामध्ये काही अडचण असेल तर आपल्या मागील दहा वर्षे आम्ही सोडून देतो. आता सन 2016 चालू आहे. सन 2006 पर्यंतच्या आक्षेपाधीन परिच्छेद व संबंधित रकमांच्या पुर्ततेसंबंधीची माहिती व परिच्छेद निकाली काढण्यात येतील का ? तसे असेल तर त्यासंबंधीची माहिती डिसेंबर अखेर अधिवेशनामध्ये पटलावर ठेवण्यात येईल का ? काही आक्षेपार्ह परिच्छेदांवर समर्पक उत्तरे, आवश्यक ती कार्यवाही करुन ते निल करण्याकरिता शासन प्रयत्न करणार आहे का ? यापैकी ज्या आक्षेपाधीन परिच्छेदांचे उत्तर कारवाई व कार्यवाही समर्पक व समाधानकारक रितीने करणे आवश्यक आहे. ती योग्य त्या लोकांवर कारवाई व योग्य उत्तरासह समर्पक रितीने करण्यात येणार आहे का ? तसेच, या संदर्भातील माहिती डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये पटलावर ठेवण्यात येणार आहे का ?

श्री.दीपक केसरकर : होय.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, 1962 मध्ये जिल्हापरिषद व पंचायत समिती संदर्भातील कायदा करण्यात आला होता. सदरहू आक्षेपाधीन परिच्छेद व रकमा स्थापनेपासूनच्या कालावधीपासून आहेत. हे आक्षेप केव्हा ना केव्हा तरी कमी केले पाहिजेत. या आक्षेपांच्या पुर्ततेसंबंधी विशिष्ट दहा-पंधरा वर्षांची मुदत निश्चित करणे आवश्यक आहे. विशिष्ट मुदतीची अट ठेवून खाते या संदर्भात कारवाई करण्याचा निर्णय घेणार आहे का ? या वर्षानुवर्षे प्रलंबित राहणा-या आक्षेपांकरिता पत्रत्र्यवहार करुन वेळ वाया जातो. ज्या व्यक्ती आक्षेपांशी निगडित आहेत, त्यांचा निकाल लागेपर्यंत संबंधित व्यक्ती या जगातही नसतील त्यावेळी या आक्षेप व त्यावरील कार्यवाहीला काही अर्थ राहणार नाही. वर्षानुवर्षे प्रलंबित असणा-या आक्षेपांच्या निकालांविषयी शासन ठोस व काटेकोर अशा प्रकारचा निर्णय शासन घेईल का ?

एस-1/----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, याबाबत शासनाची भूमिका सकारात्मक आहे. मी यापूर्वीच "होय" असे उत्तर दिलेले आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्यांची एक कमिटी नेमून त्यांच्या सूचना विचारात घेतल्यानंतर सदरहू प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी योग्य तो प्रयत्न केला जाणार आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर )** : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 2 चर्चेला घेण्यात येईल.

----

......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध शाखांमध्ये सर्वसामान्य नागरिकांची, शेतकऱ्यांची बचत खाते व मुदत ठेवींवरील पैसे संचालकांच्या गैरकारभारामुळे बुडीत जाणे

**मु.शी.** वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध शाखांमध्ये सर्वसामान्य नागरिकांची, शेतकऱ्यांची बचत खाते व मुदत ठेवींवरील पैसे संचालकांच्या गैरकारभारामुळे बुडीत जाणे यासंबंधी डॉ.पंकज भोयर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.पंकज भोयर ( वर्धा ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"वर्धा जिल्हा हा शेतकरी आत्महत्याग्रस्त असणे, दि वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, वर्धा या बँकेच्या जिल्ह्यातील विविध शाखांमध्ये सर्वसामान्य नागरिकांनी व शेतकऱ्यांनी बचत खात्यामध्ये व मुदत ठेवीमध्ये विश्वासाने ठेवलेले पैसे बँकेच्या संचालकांच्या गैरकारभारामुळे बुडीत गेल्याचे निदर्शनास येणे, थकबाकीदारांकडील कर्ज वसुली वेळेवर न झाल्याने बँकेचे*** निघालेले ***दिवाळे, ठेवीदारांचे पैसे तातडीने परत करणे आवश्यक असल्याने सदर बाब जनतेने, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणल्यानंतर*** शासनाने ***जिल्हाधिकारी, वर्धा व बँकेचे प्रशासकीय अधिकारी यांना दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये थकबाकीदारांकडील थकीत कर्जाची वसुली तातडीने करुन कार्यवाहीचा अहवाल शासनास त्वरीत सादर करण्याचे*** दिलेले ***निर्देश, तथापि, त्यानंतरही स्थानिक प्रशासनाद्वारे अद्यापही कर्जवसुलीबाबत*** गांभीर्याने ***कुठलीही कार्यवाही*** झालेली नसणे, ***बँकेचे दिवाळे निघाल्याने बँकेच्या विविध शाखांतील सुमारे २५० कर्मचाऱ्यांना गत ८ महिन्यांपासून त्यांचे मासिक वेतन मिळणे दुरापास्त होणे, शेतकऱ्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहणे, गरीब जनतेच्या मुलांची लग्न व कौटुंबिक सोहळ्यांवर याचा*** होत असलेला ***गंभीर परिणाम, याबाबतीत शासनाने तात्काळ लक्ष घालून ठेवीदारांना व बँकेतील कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही."***

श्री. दादाजी भुसे ( सहकार राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

......3....

डॉ. पंकज भोयर : अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना 1912 मध्ये झालेली आहे. वर्धा जिल्ह्यातील 8 तालुक्यातील 33 शाखेच्यामार्फत जिल्हा मध्यवर्ती बँकेचे काम सुरु असते. परंतु, मागिल काही वर्षापासून तेथील संबंधित दोषी संचालकांच्या अनियंत्रित आणि अनियोजित कारभारामुळे सदर बँकेच्या व्यवहारावर आरबीआयने मे, 2014 मध्ये बंदी आणली होती. या बँकेत 2 लाख 30 हजार ठेवीदारांच्या 340 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. यापैकी 328 कोटी रुपयांची कर्जवसुली अद्यापपर्यंत झालेली नाही. संबंधित संचालकांच्या सूतगिरण्या, कारखाने आणि सहकारी पतसंस्थांमध्ये लाखो शेतकऱ्यांचे पैसे अडकलेले आहेत. यामध्ये साखर कारखान्यांचे 28.30 कोटी रुपये आणि सूतगिरणीचे 16.91 कोटी रुपये असे जवळ जवळ 328 कोटी रुपये बँकेला वसूल करणे शक्य झाले नाही. याच कारणास्तव शासनाने सन 2002 मध्ये 88 अंतर्गत संबधित दोषी संचालकांच्या विरोधातील कारवाई प्रस्तावित केली होती. त्यानंतर सन 2004 मध्ये सबंधित तत्कालीन मंत्र्यांनी स्थगिती दिली होती. सन 2008 मध्ये अनेक शेतकऱ्यांचे पैसे अडकलेले असताना कोणत्या कारणास्तव तत्कालीन मंत्र्यांनी स्थगित दिली होती, असा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्य राज्यातील शेतकऱ्यांना अडचणीमधून बाहेर कसे काढावे या दृष्टीकोनातून चिंतन करु लागला आहे. माझ्या भागात अनेक शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे बँकेत अडकलेले असताना ते त्यांना मिळत नाही. शासनाने या प्रकरणी आतापर्यंत टॉपचे जे 50 थकबाकीदार निश्चित केलेले आहेत, अशा थकबाकीदारांकून तत्काळ वसुली केव्हापर्यंत करणार असा माझा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, संबंधित दोषी संचालकांच्या विरोधात 88 अंतर्गत कारवाई केली जाणार आहे काय ? याच अर्थसंकल्पीय अधिवेशनात माननीय सहकार मंत्री एखादी बैठक आयोजित करुन सदर प्रकरणी पुढील कारवाई सुरु करतील काय ?

......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भात टॉपचे जे 50 थकबाकीदार निश्चित केलेले आहेत, अशा थकबाकीदाराकून तत्काळ वसुली केव्हापर्यंत करणार असा प्रश्न विचारलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कायद्याच्या चौकटीत राहून संबंधितांना नोटीसेस दिलेल्या आहेत. तसेच अधिकाराच्या अधीन राहून कर्ज वसुलीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी संबंधित दोषी संचालकांच्या विरोधात 88 अंतर्गत कारवाई केली जाणार आहे काय असा दुसरा प्रश्न विचारलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर त्यांनी पॉईंटवाईज प्रश्न उपस्थित केले आणि मुद्यावाईज चौकशीची मागणी केली तर निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री. सुधाकर कोहळे : अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्ह्यातील हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. वर्धा जिल्हा हा आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. संबंधित संचालकांनी आणि कारखानादारांनी बँक बुडविलेली आहे. 88 अंतर्गत कारवाई करण्यासाठी पॉईंटेड इन्फर्मेशन देण्याची आवश्यकता आहे असे मला तरी वाटत नाही. कर्जवसुली केली नाही तर वाईट परिणाम होणार आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांना गेल्या 2 वर्षापासून पगार मिळालेला नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली आहे. माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी 88 अंतर्गत दोषी संचालकांवर कारवाई करण्याची गरज आहे. तसेच टॉपचे जे 50 थकबाकीदार निश्चित केलेले आहेत, अशा थकबाकीदाराकडून तत्काळ वसुली केली जाणार काय ?

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, यापूर्वी तत्कालीन मंत्री महोदयांनी 88 अंतर्गत कारवाई करण्यासंदर्भात सेट-असाईड केलेले आहे. त्यामुळे आता नव्याने 88 अंतर्गत कारवाई करावी लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर त्यांनी पॉईंटवाईज प्रश्न उपस्थित केले आणि मुद्यावाईज चौकशीची मागणी केली तर निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

प्रा. विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. पंकज भोयर यांनी वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भातील महत्वपूर्ण लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केलेली आहे.

.....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप........

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. वर्धा जिल्ह्यातील 2 लाख 30 हजार शेतकरी, छोटे ठेवीदार आणि किरकोळ व्यापारी वर्गाचे पैसे त्या बँकेत आहेत. वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखा ग्रामीण भागात अधिक प्रमाणावर आहेत. शहरी भागातील लोकांच्या ठेवी या बँकेत नाहीत. शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये म्हणून शासनाकडून पॅकेज दिले जाते. प्रती कुटुबीयांना 1 लाख रुपयांची मदत दिली जाते. अनेक शेतकऱ्यांचे 340 कोटी रुपये या बँकेत अडकलेले आहेत. असे असताना शासनाकडून थकित रक्कमेची वसुली करुन कर्मचाऱ्यांना पगार देण्याचा प्रयत्न करीत आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, प्रशासकीय मंडळाने कारवाई सुरु केलेली असून बँकेच्या कर्मचाऱ्यांचे मागिल 8 महिन्यांपासून थकित असेलेले पगार थकबाकीदार कर्जाची वसुली करुन नियमित करण्याचे नियोजन आहे. पण ठेवीदारांचे पैसे वसुल करण्याबाबत उत्तरात कोणताही उल्लेख केलेला नाही. म्हणून ही अतिशय गंभीर बाब आहे. याबाबत माननीय श्री. चंद्रकांत पाटील यांना प्रत्यक्षात भेटून मी अधिक माहिती दिलेली आहे. मी त्या बँकेतील एक ग्राहक आहे. माझा जन्म वर्धा जिल्ह्यात झालेला आहे. वर्धा जिल्ह्यातील 2 लाख 30 हजार शेतकरी, छोटे ठेवीदार आणि किरकोळ व्यापारी वर्गाचे पैसे त्या बँकेत आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. पंकज भोयर यांनी मला पत्राद्वारे मुलीचे लग्न जुळलेले आहे, खर्चासाठी पैस मिळत नसल्यामुळे लग्न मोडले जात असल्याची माहिती दिलेली आहे. म्हणून ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देण्यासाठी शासनाकडून तातडीने पावले उचलली जातील काय ?

अध्यक्ष महोदय, यामध्ये 50 मोठे थकबाकीदार आहेत. सूतगिरण्या, बँका, साखर कारखाने आणि चुकीच्या कामासाठी कर्ज दिलेली आहेत. यामध्ये वसुली अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार केला जात आहे. ते वसुली करीत नाही. सूतगिरण्या, बँका, साखर कारखाने आणि चुकीच्या कामासाठी ज्यांनी कर्ज दिलेली आहेत, अशा संबंधित दोषी लोकांवर फौजदारी कारवाई केल्यानंतर त्यांच्याकडील मालमत्ता जप्त करुन पुढील वसुलीची कारवाई केली जाईल काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी कर्जाची वसुली करुन कर्मचाऱ्यांना पगार दिले जात असल्याची माहिती आताच दिलेली आहे. कर्जाची वसुली केल्यानंतरच कर्मचाऱ्यांना पगार करावे लागणार आहेत. कर्जदारांकडून पैसे वसूल केल्यानंतरच ठेवीदारांचे पैसे दिले जाणार आहेत.

अध्यक्ष महोदय, वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेला बँकिंग परवाना मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाच्या माध्यमातून 161.21 कोटी रुपयांचे भाग भांडवल अनुदानापोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. अशा प्रकारचा अहवाल नाबार्डकडून आरबीआयकडे गेलेला आहे. सदर बँकेचा कारभार सुरळीतपणे सुरु व्हावा या दृष्टीकोनातून राज्य शासनाकडून योग्य ते प्रयत्न केले जात आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी फौजदारी गुन्हे दाखल करण्यासंदर्भातील प्रश्न विचारलेला असून, त्याबाबत माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सद्य:स्थितीत प्रशासकीय मंडळ हे वर्धा जिल्हा मध्यवर्ती बँकेवर आहे. यामध्ये जिल्हाधिकारी, डीडीआर आणि जिल्हा विशेष लेखापरीक्षक अशा तीन लोकांचे मंडळ कार्यरत आहे. कर्जदारांकडून कर्जवसुली करण्यासंदर्भातील निर्देश ऑलरेडी देण्यात आलेले आहेत. यानुसार कर्जाची वसुली सुरु आहे.

T-1........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पंकज भोईर : अध्यक्ष महाराज, अजूनही कोठल्याही पध्दतीची कारवाई झालेली नाही. माझ्या हातात पत्र आहे. राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले. जिल्हाधिकारी तेथील प्रशासक आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी डी.डी.आर. यांना पत्र दिले आणि डीडीआरने बँकेच्या मॅनेजरला पैशांची वसुली करण्यासंबधी पत्र दिले. वर्धा जिल्हा हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या पैशांची थट्टा करणे हे बरोबर नाही. एका शेतकरी आईने मला पत्र दिले आहे. अध्यक्ष महाराज, मी आपला फक्त अर्धा मिनिट वेळ घेतो. मी सदरचे पत्र आपल्याला वाचून दाखवितो. "प्रति, माननीय आमदार महोदय, वर्धा, अर्जदार - श्रीमती दुर्गाबाई राजेंद्र कहाते, मु.पो. आंजी, हल्ली मुक्काम वर्धा, विषय- मुलीच्या लग्नाकरिता वर्धा डिस्ट्रीक्ट को.ऑपरेटिव्ह बँकेत अडकलेले पैसे मिळण्याबाबत. महोदय, मी सविनय अर्ज करते की, मी किलबील होस्टेलमध्ये स्वयंपाक करण्याचे काम करते. माझ्या मुलीच्या लग्नाकरिता डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटिव्ह बँकेत ठेवलेल्या रकमेपैकी केवळ एक लाख रुपये मला उपलब्ध करुन द्यावे. जर मला पैसे प्राप्त झाले नाही तर माझी मान खाली पडेल व मी आत्महत्येस प्रवृत्त होईल." उदाहरण म्हणून मी हे पत्र सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. असे 2 लाख 30 हजार लोकांचे पैसे अडकलेले आहेत. या गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना न्याय देण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिलेले आहेत की, जे टॉपचे 50 थकबाकीदार आहेत, त्यांच्याकडून तत्काळ कर्जाची वसुली करण्यात यावी, परंतु प्रशासन मात्र अजूनही गंभीर नाही. किती कालावधीत प्रशासन कर्जदारांकडून कर्जाची वसुली करणार आहे, याबाबत मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महाराज, 50 टॉपचे जे कर्जदार आहेत, त्यांची रिकव्हरीची प्रक्रिया सुरु करीत असताना त्यातील तीन प्रकरण निल झालेली आहेत. 19 केसेसमध्ये पार्श्वल रिकव्हरीची सुरुवात झालेली आहे. म्हणून लवकरात लवकर संबंधित कर्जदारांना नोटीसेस देणे, कायद्याच्या चौकटीत ज्या ज्या प्रक्रिया कावयाच्या आहेत, त्यामध्ये 101 चा दाखला मिळविणे इत्यादी पध्दतीचा अवलंब करुन लवकरात लवकर कर्जाची वुसली केली जाईल. ठेवीदारांचे पैसे परत करण्याच्या दृष्टीने ही बँक जेव्हा कार्यरत होईल, तेव्हा हे सर्व प्रश्न निकाली निघू शकतील.

श्री.पंकज भोईर : अध्यक्ष महाराज, निश्चित किती कालावधीत पूर्ण कर्ज वसुलीची कार्यवाही केली जाईल, याबाबत कृपया मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महाराज, बँकिंग लायसन्स मिळविणे हा शासनाचा प्राधान्यक्रम आहे. म्हणून राज्य शासनाने स्वत: पुढाकार घेऊन 161.21 कोटी रुपयांचे भाग भांडवल अनुदानापोटी उपलब्ध करुन दिलेले आहेत. नाबार्डच्या माध्यमातून रिझर्व्ह बँकेला अहवाल सादर करण्यात आलेला आहे. एकदा बँकिंग लायसन्स त्या बँकेला प्राप्त झाल्यानंतर ठेवीदारांचे पैसे परत मिळण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महाराज, सर्वप्रथम मी शासनाचे आणि माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन करतो. वर्धा, बुलढाणा आणि नागपूर या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका गेल्या पाच वर्षापासून बंद होत्या. काही लुटारुंच्या माध्यमातून या बँका लुटल्या गेल्या आहेत. तिला लायसन्स आणून मदत करण्याचा माननीय मंत्री महोदयांनी निर्णय घेतला म्हणून मी माननीय सहकार मंत्री महोदयांचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो. मागील कालावधीत वर्धा, बुलढाणा आणि नागपूर या तिनही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतून मोठ्या प्रमाणावर काही नेत्यांनी कर्ज घेतले आणि मोठमोठ्या संस्था काढल्या. त्यामध्ये कोट्यवधी रुपये शासनाचे बुडविले. ज्या लुटारु मंडळींनी या बँका बुडविल्या आहेत, त्या लोकांविरुध्द कारवाई करण्यास सुरुवात झाली. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून काही ठराविक चार पाच लोकांनी 150 कोटी रुपयांच्या वर कर्ज घेतले आहे. ते पैसे वसुली केल्याशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही आणि शेतकऱ्यांना कर्ज सुध्दा मिळणार नाही. ज्या ज्या लोकांनी या बँका बुडविल्या त्या युनिटची मालमत्ता जप्त करुन, त्या मालमत्तेचा लिलाव करुन त्यातून पैसे वसुल केले पाहिजेत. एका युनिटने बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून 30 कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, परंतु त्यांच्या मालमत्तेचा लिलाव केला असता केवळ 13 कोटी रुपयांची वसुली झाली. उर्वरित 17 कोटी रुपये त्या युनिटच्या संचालकांच्या मालमत्तेतून शासनाने पैसे वसुल केले पाहिजेत. ज्या युनिटनी कर्ज घेतले असेल, त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन, त्या युनिटच्या संचालकांच्या मालमत्ता जप्त करुन, त्यातून पैसे वसुल करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय, याबाबत कृपया मंत्री महोदय खुलासा करतील काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महाराज, या बँका बंद आहेत त्या सुरु करण्यासाठी शासनाने अनुदान दिले आहे. त्यातून एप्रिल महिन्याच्या अखेरीस बँका सुरु करण्यासाठी आरबीआयकडून परवाना मिळेल. परवाना मिळाल्यावर बँका सुरु होतील आणि या सर्व गोष्टींना वेग येईल. तोपर्यंत जी मोठी कर्जे आहेत, त्यांना नोटिसेस देणे, त्यांचेविरुध्द कारवाई करणे, अशा प्रकारची कारवाई सुरु आहे. काही प्रमाणात वसुली झाली. सात टक्के सीआरआर झाला त्यामुळे वसुली झालीच नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही, परंतु त्याला गती द्यावी लागेल. एखाद्या वेळेस एप्रिल महिन्याच्या अखेरीस आरबीआयने परवाना दिल्यावर बोर्ड बदलून आणखी कार्यक्षम बोर्ड आणता येईल काय, असा प्रयत्न करु. जी मोठी कर्जे बाकी आहेत, ती वसूल करण्याचा सरकार पूर्णपणे प्रयत्न करेल. आता वसुली झाली तरी शेतकऱ्यांचे डिपॉझिट परत करता येणार नाही, कारण बँक बंद आहेत. ट्रॅन्झॅक्शनच बंद आहे. बुलडाणा आणि वर्धा येथील दोन्ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे लायसन एप्रिल अखेर मिळेल, असा अंदाज आहे.

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महाराज, काही युनिटसनी 30 कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्या युनिटच्या मालमत्तेचा लिलाव करुन केवळ 13 कोटी रुपये मिळाले आणि उर्वरित 17 कोटी रुपये युनिटचे शिल्लक आहेत. म्हणून युनिटच्या संचालकांवर जबाबदारी निश्चित करुन, त्यांच्या मालमत्ता जप्त करुन, त्यातून कर्जाची रक्कम वसूल केली पाहिजे. हे पैसे ज्या संचालकांनी बुडविले, ज्यांनी शेतकऱ्यांना मरणाच्या अवस्थेत पाठविले, अशा दोषी लोकांवर फौजदारी कारवाई शासन करणार आहे काय?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महाराज, कोठल्याही थकबाकीच्या कर्जामध्ये शेवटचा रुपया वसूल होईपर्यंत कारवाई केली जाते, याप्रमाणे मुख्य कर्ज घेणार यांचेकडील मालमत्ता विकून रकमेची वसुली झाली नाही तर, कर्जाचे गॅरण्टर यांची मालमत्ता विकली जाते. सन्माननीय सदस्य म्हणाले की, 30 कोटी रुपयांचे कर्ज असताना लिलावापोटी 13 कोटी रुपये मिळाले आणि 17 कोटी रुपये वसूल व्हायचे आहेत. 17 कोटी जामिनदारांकडून वसुल केले जातील. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची तत्कालीन मंत्री महोदयांनी नियम 88 अंतर्गत सेट ॲसेटची चौकशी सुरु केली

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील.....

होती. सेट ॲसेटस केल्यानंतर पुन्हा नवीन मुद्दे घेऊन चौकशी करता येते. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नियम 88 ची चौकशी सुरु आहे. त्यांचा अहवाल तयार व्हावयाचा आहे. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सेट ॲसेटसची कारवाई पुन्हा सुरु करवी लागेल आणि बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चौकशी सुरु आहे. या सर्व चौकशा स्पिडअप करुन, त्यांचा अहवाल तयार करुन दोषींवर कारवाई केली जाईल.

----------

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : अंबरनाथ, जि.ठाणे येथील सूर्योदय गृहनिर्माण सोसायटीत खरेदी,विक्री आणि हस्तांतरण व्यवहार बंद असणे

**मु.शी.** : अंबरनाथ, जि.ठाणे येथील सूर्योदय गृहनिर्माण सोसायटीत खरेदी, विक्री आणि हस्तांतरण व्यवहार बंद असणे यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. रुपेश म्हात्रे, श्री.राजन साळवी, डॉ.सुजित मिणचेकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.बालाजी किणीकर ( अंबरनाथ ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"अंबरनाथ** (जि.**ठाणे) येथील सूर्योदय गृहनिर्माण सोसायटी** ही **आशिया खंडातील सर्वात मोठी गृहनिर्माण सोसायटी असणे, सदरहू सोसायटीत खरेदी, विक्री आणि हस्तांतरण व्यवहार गत** १२ **वर्षांपासून बंद असणे, अनेक वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधींनी** शासनास वेळोवेळी केलेला **पत्रव्यवहार, तरीही शासनाकडून कोणतीच** कार्यवाही **न होणे, त्यामुळे या सोसायटीमधील** ६२५ **भूखंडधारक आणि त्यातील सदनिकाधारक, रहिवाशी यांची** झालेली **अडचण, या प्रकरणी शासनाकडून गांभीर्याने विचार न करता हजारो कुटूंबियांना वेठीस ठेवण्याचा** सुरू असलेला **प्रयत्न, खरेदी-विक्री प्रक्रियेमधील बाधा दूर करण्याकरीता आणि हस्तांतरणासाठी चालू बाजार मूल्यदर तत्वानुसार** २५ **टक्के** रक्कम **अनर्जित रक्कम म्हणून शासनाला जमा करण्यास स्थानिक रहिवाशी तयार असून सुध्दा खरेदी-विक्रीवरील बंदी शासनाकडून न उठविणे, परिणामी रहिवाशांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भूमिका."***

श्री. एकनाथराव खडसे ( महसूल मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

....6

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बालाजी किणीकर : अध्यक्ष महाराज, अंबरनाथ येथे सन 1947 मध्ये डी.डी. स्किम योजनेतंर्गत 15 पैकी 200 एकर जमिनीवर 630 भूखंड पाडून सूर्योदय संस्था स्थापन झाली. या गृहनिर्माण संस्थेला शासनाने तत्कालीन बाजार भावाने जमीन दिलेली आहे. या गृहनिर्माण संस्थेतील भूखंड क्रमांक 1 ते 162 पर्यंतच्या सदस्यांनी जिल्हाधिकारी ठाणे यांची पूर्व परवानगी न घेता, भूखंडावर बहुमजली इमारतींचे बांधकाम केले व वाणिज्यिक वापर करण्यात आला. त्यामुळे सन 2005 मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी ठाणे, यांनी या गृहनिर्माण संस्थेतील भूखंडधारकांना अटी व शर्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवून हस्तांतरण, खरेदी विक्री आणि पुनर्विकास यावर बंदी घातलेली आहे. सदर गृहनिर्माण संस्थेमधील सदनिकाधारकांनी शासनाची रितसर स्टॅम्प डयुटी भरलेली आहे. तसेच अंबरनाथ नगरपालिकेची वेळेवर मालमत्ता कर, पाणी पट्टी, वीज बिलही भरत आहेत. मी गेल्या सहा वर्षापासून औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून तसेच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय या सभागृहात मांडत आहे. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे वेळोवेळी यासंदर्भात निवेदनही दिलेले आहे. तत्कालीन महसूल मंत्री आणि विधान परिषदेचे माननीय उप सभापती यांचेकडे बैठका घेऊन देखील हा प्रश्न सुटलेला नाही. या सोसायटीमध्ये जवळपास 30 ते 40 हजार सर्वसामान्य नागरीक रहात आहेत. शासनाने सन 2015 पर्यंतचे अनधिकृत बांधकामे दंड भरुन नियमित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. असे असताना सूर्यादय संस्थेच्या बाबतीत मात्र दुजाभाव का करण्यात आला?

यानंतर U-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. बालाजी किणीकर ...

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, शासनाने ज्याप्रमाणे राज्यातील सन 2015 पर्यंतची अनधिकृत बांधकामे दंडात्मक कारवाई करुन नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्या प्रमाणे या गृहनिर्माण संस्थेला नियमित करणार काय ? सदरहू गृहनिर्माण संस्थेतील भूखंडधारक, सदनिकाधारक व गाळेधारकांना शासनाच्या त्या त्या वेळेचा जो दर आहे की, 25 टक्के रक्कम भरुन ती नियमित करणार काय, हे किती वेळात करणार किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेऊन हे करणार आहात काय ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, या हाऊसिंग सोसायटीला सन 1947 मध्ये शासनाच्या माध्यमातून व्यक्तिगत बंगला बांधण्यासाठी ही जमीन देण्यात आली होती. नंतरच्या कालखंडात तेथे काही लोकांनी बंगल्याऐवजी मोठ्या प्रमाणावर 4 मजली किंवा त्याच्याही वर बांधकामे केली परंतु, त्याकरिता सरकारची परवानगी घेतलेली नाही. काही ठिकाणी कर्मशिअल, व्यापारी प्रयोजनासाठीही ही जमीन वापरली. त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी बांधलेल्या सदनिकांचे हस्तांतरण सरकारच्या मान्यतेविना केले. असे हस्तांतरण करीत असताना काही ठिकाणी जी बांधकामे झालेली आहेत ती, ज्या रिझर्व्हेशनच्या जागा होत्या त्यावरही करण्यात आली. काही बांधकामे रस्त्याच्या पलीकडे म्हणजे रस्त्याला अडथळा आणतील अशा ठिकाणी झाली. काही गार्डनच्या जागेवर, काही खुल्या जागांवर झाली, काही नागरी सुविधांसाठी राखून ठेवलेल्या भूखंडावरही झाली.

अध्यक्ष महोदय, इतक्या वर्षाच्या कालखंडामध्ये काही सदनिकांचे हस्तांतरण खूप वेळा झालेले असल्याने तेथे मूळ मालक नाहीत. अशाप्रकारे सात ते आठ वेळा या सदनिकांचे हस्तांतरण करण्यात आलेले आहे. काही ठिकाणी असे लक्षात आलेले आहे की, हस्तांतरण करीत असताना त्या सदनिका नावावरच नाहीत. याचा अर्थ सदनिका नावावर नसताना काही व्यक्ती तेथे राहत असल्याचेही आढळून आलेले आहे. या संदर्भात सरकारच्या आताच्या प्रचलित नियमानुसार मूळ मालकाने परवानगीविना घर बांधले असेल, फेरबदल केला असेल तर, रेडिरेकनरच्या 62 ते 75 टक्क्यांपर्यंतची रक्कम भरुन ती नियमानुकुल करता येतात. परंतु, या ठिकाणी मालकच नाहीत किंवा ज्या प्रयोजनासाठी जमीन दिलेली आहे त्या प्रयोजनासाठी ती वापरण्यातच आलेली नाही.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ...

वारंवार अशाप्रकारचा नियमांचा भंग केलेला आहे. सरकारने या संदर्भात बऱ्याचशा बैठका घेतलेल्या आहेत. मी स्वत: 3 वेळा या संदर्भात बैठका घेतलेल्या आहेत व त्या माध्यमातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण त्या सर्व क्षेत्रात राहणारी लोकसंख्या फार मोठी आहे. हजारो लोक तेथे राहत आहेत. निव्वळ अंबरनाथ मध्येच नाही तर ठाणे जिल्ह्यामध्ये अशा 9-10 सोसायट्या आहेत. काही डोंबिवलीला तर काही ठाणे शहरात आहेत. अशा सोसायट्यांच्या संदर्भात एकत्रित निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यासाठी राज्य सरकारला वेगळे धोरण तयार करावे लागणार आहे. याची तपासणी, छाननी आपण केलेली आहे. त्या माध्यमातून लवकरात लवकर या संदर्भातील त्रुटी दूर करता येतील. परंतु, ज्या ठिकाणी रिझर्व्हेशन्स आहेत तेथे किंवा डी.सी. रूल्सचे उल्लंघन करून एखाद्याने बांधकाम केले असेल तर त्याला कोणत्याही परिस्थितीत नियमानुकुल करण्याबाबत राज्य शासन विचार करणार नाही.

अध्यक्ष महोदय, याबाबत प्रत्येक केस टू केस जावे लागणार आहे. कारण अशा 1-2 नाही तर शेकड्यांनी वेगवेगळ्या केसेस आहेत की, ज्यांनी वेगवेगळ्या माध्यमांतून उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे या संदर्भात केस टू केस चर्चा करून सरकार निश्चित पॉझिटिव्हली त्यांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून निव्वळ अंबरनाथ पुरते नाही तर ठाणे जिल्ह्याच्या संदर्भात विशेष बाब म्हणून एक पायलट निर्णय घेईल. या संदर्भात आवश्यक ते नियम शिथिल करण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन दिलासा देण्याचा प्रयत्न करील. मी स्वत: जाऊन आमच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून खात्री करणार आहे. मी या आधीही तेथे जाऊन पाहणी केलेली आहे. मी सन 1970 पासून तेथे ये-जा करीत आहे. हे नियमानुकुल करण्याच्या संदर्भात शासन नक्कीच पॉझिटिव्ह विचार करील.

डॉ. बालाजी किणीकर : मंत्री महोदय किती दिवसांत किंवा 1-2 महिन्यांत हे करणार आहात, ते सांगावे. याबाबत आपण 1-2 बैठकाही घेतलेल्या आहेत. हे सर्व अंतिम टप्प्यात आलेले आहे. आपणांस विनंती आहे की, आपण हा निर्णय किती महिन्यांत देणार, ते सांगावे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, याला निश्चित अशी कालमर्यादा देता येणार नाही. कारण हा खूप किचकट व क्लिष्ट प्रश्न असल्याने यात वेगवेगळे विभाग अडकलेले आहेत. आम्ही या आधी सुध्दा विधी व न्याय विभाग, वित्त विभागाकडे हे प्रकरण पाठविले होते. नगर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

विकास विभागाचे या संदर्भात अभिप्राय घेतलेले आहेत. प्रत्येक विभागाचे अभिप्राय वेगवेगळे आलेले आहेत. त्यांचे ओव्हररूल करावयाचे असेल तर, मंत्रिमंडळाकडे जावे लागेल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे हे फार मोठे प्रकरण आहे. एखाद दुसरी केस असती तर ताबडतोब कालमर्यादेत आपल्याला ती सोडविता आली असती. परंतु, हे शेकड्याने आहे.

तसेच, पहिली गोष्ट अशी आहे की, तेथील स्थानिकांचा या गोष्टीला विरोध दिसला. ते अशी 62 आणि 75 टक्के रक्कम भरायला तयार नाहीत. आजच्या रेडीरेकनरप्रमाणे जर तसे पैसे भरावयाचे असतील तर, ते भरणे त्यांना शक्य नाही, अशी त्यांची परिस्थिती आहे. आताच्या अस्तित्वातील कायद्यानुसार कमीत कमी 62 टक्के आणि कमर्शिअलसाठी जास्तीत जास्त 75 टक्के रक्कम भरावी लागणार आहे. त्यामुळे आधी हा नियम शिथिल करावा लागेल. याकरिता प्रथम मंत्रिमंडळाकडे जाऊन हे दर किती कमी करता येतील याचा अंदाज घ्यावा लागेल. त्यासाठी वित्त, विधी व न्याय विभग किंवा नगर विकास विभागाचे अभिप्राय घ्यावे लागतील. ते सर्व अभिप्राय घेऊन या संदर्भातील निर्णय घ्यावा लागेल. याकरिता मी मघाशी सांगितले की, जेवढे लवकर करता येईल तेवढ्या लवकर या संदर्भातील निर्णय तोही निव्वळ अंबरनाथ पुरता नाही तर ठाणे जिल्ह्यातील अशा स्वरूपाच्या जेवढ्या सहकारी संस्था त्या कालखंडात देण्यात आलेल्या आहेत, त्या संदर्भात राज्य सरकार निर्णय घेईल.

श्री. रविंद्र चव्हाण : अध्यक्ष महोदय, प्रथमतः मी माननीय महसूल मंत्र्याचे मनापासून अभिनंदन करतो. हा विषय फक्त सूर्योदय सोसायटी पुरता मर्यादित नव्हता, तर ठाणे जिल्हा, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका या भागातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या संदर्भातील हा निर्णय होता. गेली अनेक वर्षे हा निर्णय प्रलंबित आहे. गेली अनेक वर्षे हा निर्णय होणार आहे, असे आम्ही जेव्हा वेळोवेळी पत्र देतो तेव्हा सांगितले जाते. सुर्योदय सोसायटीच्या ठिकाणी थोडी वेगळी पद्धत आहे. परंतु, सन 2005 च्या अगोदर अशाप्रकारे शर्थभंग झालेल्या ज्या गृहनिर्माण सोसायट्या आहेत, त्यांना शर्थभंग झाल्याबद्दल फाईन लावून परवानग्या दिल्या होत्या. त्याच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

धर्तीवर पुन्हा एकदा या ज्या शर्थभंग झालेल्या इतर गृहनिर्माण सोसायट्या आहेत, ज्यांच्या बाबतीत सहजपणे शर्थभंग झालेला आहे त्यांच्या बाबतीत शासन पॉझिटिव्ह आहे, असे वारंवार सांगितले

...4/-



श्री. रविंद्र चव्हाण ....

जात आहे. परंतु, त्याही बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी जो उशीर होत आहे, त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये शासनाबाबत अतिशय वाईट मत होत आहे. मी महसूल मंत्री महोदयांना या संदर्भात केवळ एक प्रश्न विचारणार आहे की, शासन या संदर्भात स्पेसिफिकली किती महिन्यांत निर्णय घेणार आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, हा वर्षानुवर्षांपासूनचा म्हणजे सन 1947 पासूनचा विषय आहे. त्यामुळे आताच काही झाले आणि अगदीच वर्षभरात लोकांचे शासनाबद्दल वाईट मत झाले असे नाही. झालेच असेल तर मागच्या कालखंडापासून जे असेल ते मजबूत झाले असेल एवढेच आपण सांगू शकतो. या सरकारची भूमिका स्पष्ट आहे. ज्या ज्या ठिकाणी शर्थभंग झालेला असेल, अशा ठिकाणी मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ज्या ठिकाणी डि.सी. रूलचे उल्लंघन झालेले नाही, सार्वजनिक हिताला ज्या ठिकाणी अडथळा येणार नाही, अशा संदर्भातील सर्व अनऑथॉराईज बांधकामे रेग्युलराईज करण्याच्या संदर्भात शासन विचार करीत आहे, हा पहिला भाग झाला.

सन्माननीय सदस्यांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्याबाबतचा प्रश्न विचारलेला आहे. त्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, राज्यभरात व प्रामुख्याने मुंबई, पुणे वगैरेसारख्या शहरांमध्ये ज्या काही सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत, त्यांना आज सदनिका हस्तांतर करायची तर सरकारकडे यावे लागते, काही नवीन बांधकाम, सुधारणा करावयाची असेल, तरीही सरकारकडे यावे लागते. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय गृहनिर्माण संस्थांमध्ये हस्तांतर, दुरूस्ती, त्याचा उपयोग बदलणे किंवा अन्य करता येत नाही. या संदर्भात वारंवार अशी मागणी करण्यात येते की, काही किरकोळ कारणांसाठी जसे की, कोणी गॅलरी बांधली, कोणी मध्ये दुरूस्ती केली आहे किंवा कोणी हस्तांतर केलेले आहे, कोणी खरेदी केली आहे परंतु, परवानगी घेतलेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

V-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. एकनाथराव खडसे.....*

*राज्यामध्ये अशी शेकडो प्रकरणे आहेत. परस्पर खरेदी करुन रहात असलेली, परंतु सरकारची परवानगी घेतलेली नाही. अशा सर्व प्रकरणांसंदर्भात केस टू केस जिल्हाधिकारी यांना सूचना केलेल्या आहेत. त्यांनी यासंदर्भातील अनियमितता तपासून आवश्यक असल्यास दंड करुन, नियमानुसार शर्तभंग केलेल्या ठिकाणी दंड किंवा काही ठिकाणी अनर्जित रक्कम घेऊन शर्तभंगाचे प्रकरणे नियमानुकूल करण्याच्या संदर्भात जिल्हाधिकारी यांना सूचना केलेल्या आहेत.*

*अध्यक्ष महोदय, या पुढे राज्य सरकारचे हे धोरण आहे की, अशा स्वरुपाच्या 'ब' क्लास, म्हणजेच बी टेन्युअर जमिनी, अशा अविभाज्य शर्तीच्या जमिनी 'ए' क्लास करण्याच्या संदर्भात देखील राज्य सरकार विचार करीत आहे. या जमिनीच्या संदर्भात त्यामध्ये असलेली अनर्जित रक्कम किती घ्यायची, रेडीरेकनरच्या माध्यमातून कशी घ्यायची, त्याची विहित पद्धती काय राहील, यासंदर्भात देखील राज्य सरकार आता पावले उचलित आहे. त्यामुळे राज्यभरातील अशा सर्व प्रकरणांच्या संदर्भात राज्य सरकार नियमानुकूल करण्याच्यासंदर्भात निर्णय घेण्याबाबत विचार करीत आहे. लवकरात लवकर यासंदर्भात आपल्या सभागृहामध्ये अशा स्वरुपाचे बील सरकारच्या माध्यमातून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे.*

*डॉ. सुजित मिणचेकर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रातील असून त्याबद्दल सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. सुर्योदय गृहनिर्माण संस्थेसंदर्भात माझा एक प्रश्न आहे. २०१५ पर्यंतची अनेक अनधिकृत बांधकामे दंडात्मक कार्यवाही करुन नियमित करण्याचे आपण सांगितले आहे. परंतु या भागातील अनेक लोकांनी महापालिकेकडे प्लॅन टाकून ते सॅक्शन करुन घेतले. त्याच्यावर स्टॅम्पड्युटी रेग्युलर भरलेली आहे. त्यांना रेग्युलर फाळा येतो, त्यांना पाण्याची व्यवस्था आहे, वीज बील त्यांच्या नावावर येते. त्यामुळे या लोकांना त्यांच्या सदनीका नियमित करुन देणार आहात काय, तसेच किती दिवसात करणार, असा माझा पहिला स्पेसिफिक प्रश्न आहे. अशाच प्रकारच्या अनेक गृहनिर्माण संस्था महाराष्ट्रामध्ये आहेत. माझ्या मतदार संघातील खुपरी रेंदाळ गावामध्ये अशीच संस्था आहे. तेथे खरेदी-विक्रीसाठी जिल्हाधिकारी यांची मान्यता नाही. गोरगरीब जनतेला काही अडचणींमुळे प्लॉट विकायचा असेल तर तो विकता येत नाही. तेथील नियमावली शिथील करुन खरेदी-विक्री करिता परवानगी द्याल काय, हा माझा दुसरा प्रश्न आहे.*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, अशा स्वरुपाच्या खरेदी विक्रीची परवानगी देण्याचा नियम आहेच. अशा संस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करावा. अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठरवेल ती रक्कम भरुन अशा स्वरुपाची म्हणजेच सदनिका ट्रान्सफर करणे व विक्री करण्याची परवानगी देण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना आहेत. विशिष्ट स्वरुपाच्या काही प्रकरणांमध्ये अडचण आली तर विक्री किंवा हस्तांतरण करण्याची परवानगी देण्याचे अधिकार राज्य सरकारला आहेत. मुंबई सारख्या शहरामध्ये हा प्रश्न गंभीर होत चालला आहे. बऱ्याच ठिकाणी सदनिका घेत असताना किंवा विकत असताना मोठ्या प्रमाणावर विलंब लागतो. वरळीच्या आमदार सोसायटीमधील काही विषय माझ्या समोर आहेत. तेथे एका ठिकाणाहून दुसरीकडे हस्तांतरीत करताना वर्षानुवर्षे परवानगी दिली जात नाही. अशा स्वरुपातील प्रकरणे मंत्री पातळीवर सुनावणी घेऊन परवानगी देण्यास विलंब लागतो. त्यामुळे यापुढे अशा स्वरुपाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनीच मंजूर करावे, अशा स्वरुपाच्या सूचना शासन निर्गमित करणार आहे. त्यामुळे काही मोठ्या अडचणी, अडथळे असल्यास, जमिनीची मालकी यानंतरच्या अडचणी असल्यावरच मंत्रालयात यावे, अशी सरकारची अपेक्षा आहे.*

*अध्यक्ष महोदय, आपण कोल्हापूर, इचलकरंजी, संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासंदर्भात सांगितले. तसेच या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे या उपस्थित नाही. परंतु अशा स्वरुपाच्या शासनाच्या जागेवर उभ्या राहिलेल्या सहकारी संस्था, महसूलाच्या जागेवर उभ्या असलेल्या सहकारी संस्थांना नियमित परवानगी देण्याच्या संदर्भात नियम आहे, कायदाही आहे. परंतु यापुढेही पाऊल टाकून ज्या सहकारी संस्थांना शासनाच्या जमिनी दिलेल्या आहेत, त्या शासकीय मालकीच्या आहेत, महसुलाच्या आहेत, त्या गृहनिर्माण संस्थांना बांधकामासाठी, त्यांच्या उपयोगासाठी, लिजवर दिलेल्या आहेत. अशा जमिनींची लीज संपल्यावर पुन्हा लीज वाढविण्यासाठी यावे लागते, किंवा त्या जमिनीवर काहीही करायचे असल्यास प्रत्येक वेळी राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे प्रत्येक सहकारी संस्थेला सरकारकडे यावे लागते. या जमिनी त्यांच्याच नावावर केल्या तर त्या, त्या स्थरावर सहकारी संस्था निर्णय घेऊ शकेल. अशा हजारो संस्था आपल्याकडे रजिस्टर्ड आहेत. त्यामुळे त्या, त्या संस्थांच्या कायमची नावावर जमीन असली तर त्यांना स्वतंत्र अधिकार प्राप्त होतील. परंतु अशा जमिनी आज सरकारच्या नावावर आहेत. मूळ*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. एकनाथराव खडसे.....*

*मालक सरकार आहे. यामध्ये विशिष्ट रक्कम भरुन त्या जमिनी सरकारच्या नावावर करण्याचा सरकार विचार करीत आहे. या जमिनींना रेडीरेकनरचे दर रहातील किंवा सरकार ठरवेल ते दर असतील. याचे अधिकारी आपल्याकडे रहाणार आहे. परंतु यामध्ये सुलभता आली पाहिजे. एरवी अशी जमीन परत घेऊ शकत नाही, त्यावर असलेली इमारत पाडू शकत नाही, लीज वाढवून द्यायची नसल्यास अनेक प्रश्न सरकारपुढे निर्माण होतात. त्यामुळे अशाही स्वरुपाचा निर्णय सरकार घेणार आहे. यासंदर्भातील कायदा राज्य सरकार करण्याच्या विचारात आहे. याच कालखंडात असा कायदा यावा, या दृष्टीने सरकारचे प्रयत्न सुरु आहे.*

*श्री. डी.एस. अहिरे : नागरी विभागामध्ये अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे शासनाचे धोरण असून असे शासनाने जाहीरही केलेले आहे. माझी आपल्या माध्यमातून आदरणीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांना विनंती आहे की, ग्रामीण भागामध्ये विशेत: चौफुली किंवा फाटा अशा ठिकाणी असलेल्या जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. विशेषत: धुळे जिल्ह्यामध्ये अशा चौफुलींवर तसेच आदिवासींच्या जमिनींवर अनधिकृत बांधकामे झालेले असून त्याचा कमर्शिअल वापर होत आहे. काही ठिकाणी छोट्या, मोठ्या प्रमाणात इंडस्ट्रीअल वापर होत आहे. अशा जमिनी देखील रेग्युलराईज करुन द्याव्यात. याबाबत शासनाचे धोरण स्पष्ट करावे, अशी माझी विनंती आहे.*

*श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे शहरी भागातील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्याच आठवड्यात धोरण स्पष्ट केलेले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये ग्रामीण क्षेत्रामध्ये गाव पातळीवर महसुलाच्या जागेवर अनेक ठिकाणी अतिक्रमण आहे. असे अतिक्रमण झोपडपट्टीच्या रुपाने आहे, तर काही ठिकाणी लोकांनी स्वत:च पक्के बांधकामे केलेली आहेत. काही ठिकाणी अशा स्वरुपाची बांधकामे गावालगत किंवा गावा बाहेर आहेत. काही ठिकाणी प्लॉट एनए केलेले नाहीत, परंतु त्या ठिकाणी बांधकामे केलेली आहेत. त्याला राज्य सरकारची परवानगी घेतलेली नाही. काही ठिकाणी गुंठेवारी पद्धतीने घेण्यात आलेले जागेवर बांधकामे केलेली आहेत. काही लोक ठिकाणी वस्तीवर रहात असून त्या वस्तीवर एनए नाही इत्यादी सर्व प्रकरणे नियमानुकूल करावे, अशी राज्य सरकारकडे वारंवार मागणी येत*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. एकनाथराव खडसे.....*

*असते. यामध्ये आदिवासी व बिगर आदिवासी असे दोन भाग आहेत. ग्रामीण भागामधील महसुली जागेवर अतिक्रमण केलेली घरे, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सार्वजनिक हिताला अडथळा आणणारे नसतील अशी घरे. म्हणजेच मैदाने, दवाखाने इत्यादीसांठी गावपातळीवर नेमून दिलेली जागा इत्यादी आवश्यक जागा वगळून अशा स्वरुपाचे बांधकामे असतील.*

*...W/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.............

अशा स्वरुपाची बांधकामे त्यामध्ये झोपडपट्टी असतील किंवा स्वतःच्या कॉंक्रीटच्या बांाकामांचा समावेश असेल. त्यांचे व्हॅल्यूएशन करुन रेडीरेकनरच्या दरानुसार किती टक्के रक्कम आकारावयाची हे ठरवून ग्रामीण भागातील अशी अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यासंदर्भातील निर्णय लवकरच सरकार घेणार आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासींच्या स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर जर अशा स्वरुपाची अतिक्रमणे असतील तर त्यांच्या संदर्भात राज्य सरकार निर्णय घेऊ शकत नाही. परंतु आदिवासी क्षेत्रातील सरकारी जमिनीवर अनधिकृत बांधकाम असेल तर ते नियमानुकूल करण्याच्या संदर्भात आजही आपल्याकडे कायदा अस्तित्वात आहे. त्यानुसार पैसे भरुन ग्रामीण भागातील अतिक्रमणे आपण नियमानुकूल करु शकतो. यासंदर्भात अधिकृतपणे आणखीही त्यामध्ये विस्तार करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करीत आहे. आदिवासींच्या संदर्भात त्यांच्या जागेवर अतिक्रमण असेल तर त्या संदर्भात निर्णय करण्याचा सरकारला अधिकार नाही. कारण त्यावर त्यांची स्वतःची मालकी असते.

-----------

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**हरकतीचा मुद्दा**

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, आज सदनामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा घेण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्प सादर केल्यानंतर एका बॅगमध्ये अर्थसंकल्पावरील भाषणाच्या प्रतीसह काही पुस्तके अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी देण्यात येतात. मी अतिशय जबाबदारीने सांगतो की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांना वितरीत केलेल्या बॅगमध्ये अर्थसंकल्पाशी संबंधित पुस्तके देण्यात आली नाही. अनेक बॅगमध्ये हेड कम डिपार्टमेंटच्या समरीची, जमा-खर्चाची पुस्तके देण्यात आली नाही. आम्ही मागील दोन दिवसामध्ये काही पुस्तके मंत्रालयातून मागवून घेतली आहेत. सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील भाषण व त्यासोबतच्या पुस्तकांचे वितरण न केल्यामुळे त्यांच्या विशेष अधिकाराचा भंग झाला आहे. काही वेळापूर्वी 4 पुस्तके देण्यात आली आहेत. अशा परिस्थिती अर्थसंकल्पावर चर्चा होऊ शकते का, याबाबतचा निर्णय आपण करावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी असे कधी घडले नाही. हे सरकार शेतकऱ्यांना काही देऊ शकत नाही, कर्जमाफी देऊ शकत नाही परंतु सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पाशी संबंधित पुस्तके तरी वितरीत करावीत, एवढीच आमची सरकारकडून अपेक्षा आहे. अर्थसंकल्पाशी संबंधित सर्व दस्तऐवज सन्माननीय सदस्यांना न मिळणे, ही बाब अतिशय गंभीर आहे, हा आमच्या अधिकाराचा भंग आहे. यासंदर्भात आपण निर्णय करावा, असा आमचा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम 245 मध्ये "वार्षिक वित्तीय विवरण किंवा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या संबंधात राज्याच्या अंदाजिलेल्या उत्पन्नाचे खर्चाचे पत्र" अशी अर्थसंकल्पाची व्याख्या दिलेली आहे. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार हे या सदनाचे वरिष्ठ सन्माननीय सदस्य असून ते राज्याचे वित्त मंत्री आहेत. यावर्षी कशा प्रकारे वित्तीय अंदाजपत्रक प्रस्तूत केले गेले आहे ? वित्त मंत्री महोदयांच्या भाषणाची प्रत बॅगेत होती का, त्याची छपाई किती उशीराने झाली ? याप्रकरणी वित्त मंत्री महोदयांचा काही दोष नाही.

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पृथ्वीराज चव्हाण.......

अध्यक्ष महोदय, यासंदर्भात मला वाटते की, आज मुख्यमंत्री म्हणाले की अधिकारी सहकार्य करीत नाहीत, त्याचाच हा प्रत्यय आहे. वित्त मंत्री महोदयांनी छापखान्यामध्ये जाऊन उभे राहण्याची आवश्यकता नाही, त्यांनी दिलेले भाषण वेळेवर छापून येत नाही. अर्थसंकल्पावरील वित्त मंत्री महोदयांचे भाषण झाल्यानंतर पहिला भाग प्रथम छापून आला व दोन तासानंतर दुसरा भाग छापून आला. सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पाशी संबंधित 4-5 पुस्तके आज दुपारी 12 वाजता वितरीत केली आहेत. अंदाजपत्रक 18 तारखेला सादर झालेली असले तरी सर्व सन्माननीय सदस्य अर्थसंकल्पाशी संबंधीत सर्व दस्तऐवज आज मिळालेला आहे. याचा अर्थ तांत्रिकदृष्ट्या आज अंदाजपत्रक सादर झाले. हा अत्यंत गलथान कारभाराचा नमूना असून महाराष्ट्रासारख्या राज्याला तो शोभत नाही. याप्रकरणी कोणाची चूक आहे त्यांची आपण अवश्य चौकशी करावी. अंदाजपत्रक आज टेक्निकली सादर झाले, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्यामुळे म.वि.स.नियम 245 (2) अर्थसंकल्पावर आज चर्चा होऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, अंदाजपत्रक आज सादर झाले हे योग्य आहे की नाही, यासंदर्भात आपण रुलींग द्यावे. महसूली जमा विषयक 4-5 पुस्तके आज दुपारी 12 ते 1 च्या दरम्यान आम्हाला प्राप्त झाली असून त्यांचा अभ्यास आम्ही कधी करावयाचा, यासंदर्भातील नियम कशासाठी केला आहे ? आम्हाला अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी थोडा वेळ मिळणे आवश्यक आहे. हा सभागृहाला गृहीत धरण्याचा प्रकार आहे, वित्त मंत्री महोदयांना गृहीत धरण्याचा प्रकार आहे. अध्यक्ष महोदयांना ज्यावेळी वित्त मंत्री महोदय अंदाजपत्रकीय भाषण वाचण्यासाठी सुरुवात करतात त्यावेळी त्या भाषणाची प्रत दिली जाते. यावेळी त्यानुसार ती दिली की नाही, हे मला माहीत नाही. अर्थसंकल्पाच्या संदर्भातील पुस्तके उशीराने उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील गलथान कारभारास जबाबदार कोण ? याप्रकरणी अधिकाऱ्यांची चूक असेल तर त्यांच्यावर ॲक्शन घेण्यात यावी. परंतु सन्माननीय सदस्यांना गृहीत धरु नये. हा राज्याचा अर्थसंकल्प आहे, राज्यात गंभीर दुष्काळ आहे त्यावर आम्ही सविस्तर बोलणार आहोत.

अध्यक्ष महोदय, आज अर्थसंकल्पावर चर्चा होऊ शकत नाही, या प्रकरणी आपण रुलींग द्यावे, अशी माझी विनंती आहे.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर वित्त मंत्र्यांचे भाषण झाल्यानंतर त्याच क्षणी सन्माननीय सदस्यांना पुस्तके बॅगमधून देण्याची पध्दत आहे, ही गोष्ट खरी आहे. विरोधी पक्ष सत्तेत असताना त्यांच्या सरकारमध्येही यापूर्वी अशा घटना घडल्या आहेत, ही गलथानपणाची पहिलीच वेळ आहे, असे नाही. परंतु विरोधी पक्ष अशा प्रकारे भासवत आहे की, हे सरकार आल्यानंतरच असा गलथानपणा झाला व त्यांच्या नेतृत्वात असणाऱ्या सरकारकडून काहीही गलथानपणा झाला नाही. मी यासंदर्भातील लेखी फाईल देतो, या विषयावर सभागृह स्थगित करुन आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी, मी त्यासाठी तयार आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील भाषण संपले त्यावेळी गुप्ततेच्या कारणास्तव पुस्तके छापून आली होती व ते बॅगमध्ये टाकण्याचे काम सुरु होते. ज्यावेळी सदरहू बॅग घेण्यासाठी लोक गेले होते त्यावेळी गर्दी असल्याने व ते बॅग घेण्याच्या घाईत असल्याने त्यांनी छापून आलेली पुस्तके घेतली नाही, ही सत्य स्थिती आहे. ही बाब माझ्या लक्षात आली त्यावेळी मी ही बाब लेखी स्वरुपात विधानसभा अध्यक्षांच्या लक्षात आणून दिली.

अध्यक्ष महोदय, मागील वेळी सन्माननीय सदस्य श्री.अजित दादा पवार अर्थमंत्री असताना त्यांनी या संदर्भात विशेष परवानगी मागितली होती, जर त्यांनी त्यावेळी परवानगी मागितली नसेल तर मी दिलगिरी व्यक्त करीन. यावेळी अर्थसंकल्पाशी संबंधित पुस्तके छापून आली होती परंतु गर्दी असल्याच्या कारणास्तव व बॅग घेऊन जाण्याच्या घाईमुळे अनेक जण पुस्तके घेऊन गेले नाही. परंतु विशेष बाब म्हणून विधानसभा अध्यक्ष महोदयांकडे परवानगी मागून सन्माननीय सदस्यांना पुस्तके देण्यात आली आहेत.

अध्यक्ष महोदय, मी या संदर्भात भविष्यात अशा घटना होऊ नये म्हणून सन्माननीय सदस्य व माजी अर्थ मंत्री श्री.जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्यांची समिती नेमण्याकरिता तयार आहे. अर्थसंकल्पाच्या संदर्भात मुलभूत धोरण तयार करता येईल का, पुढील अर्थसंकल्पामध्ये बॅग न घेता अर्थसंकल्प डायरेक्ट आयपॉड मध्ये उपलब्ध करुन देऊ शकू का, त्यामध्ये तो ऑन लाईन उपलब्ध करुन देऊ शकू का, या व्यतिरिक्त अजून काही सुधारणा चांगल्या

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार.......

पध्दतीने करता येणे शक्य आहे काय ? याबाबत समितीने अहवाल द्यावा. हे सरकार योग्य सूचनांचे स्वागत करण्यासाठी तयार आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात दीर्घकालीन अनुभव आहे. देवाने दिलेली सर्वात चांगली दिलेली देणगी कोणती असेल तर ती विस्मरणाची आहे.

यानंतर X-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधीर मुनगंटीवार.....

देवाने दिलेली सर्वात चांगली संधी म्हणजे विस्मरणाची आहे. आपण विसरुन जाता की, मागच्या वेळी हेच आपण केले आहे. आपल्या फाईल्स पाहूनच, त्यातील ज्या उत्तम फाईल्स आहेत त्यांचे मार्गदर्शन आम्ही घेत आहोत आणि ज्या उत्तम नाहीत त्यांचे मार्गदर्शन आम्ही घेत नाही. पण आपल्याकडूनच, तुमच्या सरकारमध्ये असलेले मी दाखवून देतो. पण आता जे झाले त्या घाईगर्दीमध्ये झाले. आपले जे स्वीय सहायक गेले त्यावेळी ती पुस्तके बॅगेमध्ये टाकायची होती. आम्ही माननीय विधानसभा अध्यक्षांची परवानगी घेतली होती. त्यानंतर शनिवार, रविवार हे दोन दिवस सुट्टीचे आले. सुट्टीच्या दिवशी हे देणे योग्य नव्हते. माननीय अध्यक्षांची परवानगी दिली आणि आज ते ताबडतोब टाकण्यात आली आहेत. या अगोदरही असे घडले होते. तेव्हा बॅगच्या ठिकाणी इतकी गर्दी होते की अनेकजण ते ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतात. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी आमची सूचना मान्य करावी की, एक समिती आपल्या अध्यक्षतेखाली अर्थसंकल्पाच्या संदर्भातील त्रुटीसंबंधी ज्यामध्ये अर्थसंकल्प मांडणे, अर्थसंकल्पीय प्रकाशनाची बॅग देणे, आणि अन्य सुधारणात्मक सूचना यांचा अभ्यास या समितीमध्ये करण्यात येईल. यासाठी आपण सर्वपक्षीय समिती नेमू पण बॅग घेण्याच्या घाईमध्ये पुस्तके राहतात आणि म्हणून मी आपल्याकडे अनुमती मागूनच सदरची प्रकरणे पिजनहोलमध्ये टाकली आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय अर्थमंत्री यांची नियम 57 अन्वये सूचना आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण ज्यावेळी यावर विभागनिहाय चर्चा घेऊ त्यावेळी आपण बोलावे.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एखादी चूक झाली आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील आणि माजी मुख्यमंत्री सन्माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाणसाहेब यांनी ती निदर्शनास आणून देतांना सांगितले की, कदाचित प्रशासकीय कामकाजात प्रशासनाकडून ते राहून गेले असेल. त्यामुळे चूक झाली की, आपण सभागृहात दिलगिरी व्यक्त करुन पुढे कामकाज घेतो. यामध्ये काही मान-अपमानाचा फारसा प्रश्न येत नाही. पण अर्थमंत्री सन्माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणतात की, सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार अर्थमंत्री असताना त्यांनी काही चूक केली होती आणि त्यांनी तशी केलेली असेल तसेच आम्ही केलेले आहे, तर मला एवढेच निदर्शनास आणावयाचे आहे की, एक तर अशी चूक झाली नाही.

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

दुसरे म्हणजे बजेटच्या संदर्भातील पाच पुस्तके आम्हाला आज वाटण्यात आली आहेत. आमचा मुद्दा असा आहे की, आम्हाला या सर्वांचा अभ्यास करुन आपल्यासमोर येऊन आमचे मनोगत व्यक्त केल्यानंतर आपण त्यास अधिक न्याय द्याल, अशा अपेक्षेने आम्ही सर्व याठिकाणी येतो. अध्यक्ष महोदय, आता 7 दिवसांची मुदत आपण 2 दिवसांवर आणली आहे. त्यावेळी आम्ही आपल्याला अभ्यास करण्यासाठी पूर्ण वेळ दिलेला होता. त्यावेळी आपण असे ऑब्जेक्शन घेतले नव्हते. पण आता ऑब्जेक्शन काय आहे की, आज 5 पुस्तके मिळाली आहेत आणि ज्यावेळी सन्माननीय सदस्य बॅग घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी बॅग उपलब्ध नव्हती. आम्ही चॅनेल्सच्या प्रसार माध्यमांसमोर गेलो त्यावेळी मी येथे हाताने मुद्दे लिहून घेतले होते म्हणून आम्ही प्रतिक्रिया व्यक्त केली. पण अर्थमंत्र्यांचे भाषणाचे पुस्तक आमच्या हातात मिळण्यासाठी जवळपास दोन ते अडीच तास लागले होते. याचा अर्थ जाणीवपूर्वक अर्थसंकल्पीय प्रकाशने आणि अर्थमंत्र्यांचे अतिशय उत्तर अर्थसंकल्पीय भाषण हे आम्हाला अडीच तासानंतर दिले, याचे कारण काय तर या शासनामध्ये कोणतीही गोष्ट आपोआप होत नाही किंवा सहजगत्या होत नाही तर ती मुद्दाम केली जाते. मुद्दाम करण्याचे कारण की, विरोधी पक्षाच्या सदस्यांना बाहेर जाऊन प्रसार माध्यमांना आपल्या अर्थसंकल्पातील चुका, दोष किंवा त्रुटी सांगता येऊ नयेत आणि आम्हाला बाहेरच्या समाजातल्या चर्चेमध्ये भाग घेता येऊ नये म्हणून अडीच तास यांनी पुस्तके आणि बॅगा उशिरा वाटल्या आहेत. बॅगांच्या ठिकाणी गर्दी होती म्हणून आता आपण माझ्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन केली आहे. त्यामुळे असा प्रकार पुढच्या वेळी होणार नाही अशी व्यवस्था आपण करु, त्याबद्दल आपण चिंता करु नका. परंतु मंत्री महोदयांकडून साधी औपचारिकता म्हणजे चूकले आहे, दिलगिरी व्यक्त करतो असे यायला पाहिजे. कारण अर्थमंत्री कसा तर गोड बोलाणारा पाहिजे. आम्हालाच आपण आमची विद्या द्यायला लागलात तर आम्ही कसे येथे बसून ऐकून घेऊ. त्यामुळे आपली चूक झाली आहे. हे मंत्री महोदयांनी कबूल करावे, सभागृहाची दिलगिरी व्यक्त करावी. या संबंधी याच बाजूच्या सदस्यांना त्रास झाला असे नाही तर त्या बाजूच्या सदस्यांनाही अर्थसंकल्पीय प्रकाशने उपलब्ध झाली नाहीत. आपण अजून अर्थसंकल्पाचे प्रकाशन उघडलेले नाही. अर्थसंकल्पात त्यांच्या मतदार संघासाठी

3.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

किती निधी मिळेल ते त्यांना माहिती नाही. त्यामुळे ते अद्याप आपली बाजू घेत आहेत. एकदा माझे भाषण होऊन जाऊ द्या, मग ते आपल्याला येऊन विचारतील की, आमच्या मतदार संघातील निधीचे काय,

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय आपण नियम 57 अन्वये प्रस्ताव मांडावा.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, आपण रुलींग दिले पाहिजे. आमचे म्हणणे असे आहे की, अर्थसंकल्प आज सादर झालेला आहे. आपण विधानसभा नियम 245 वाचावा की, तो काय म्हणतो. आपण ही जी कागदपत्रे दिली आहेत, म्हणजे अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पीय प्रकाशनांपैकी 5 अतिशय महत्वाची पुस्तके आम्हाला आज 12 वाजता मिळाली आहेत. प्रथम आपण यासंबंधी चौकशी करा, की ही पुस्तके आज दिली की, नाही.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय प्रकाशने एखाद्या सदस्याने न नेणे म्हणजे अर्थसंकल्प सादर न करणे असे होऊ शकते काय, अर्थसंकल्पीय प्रकाशनाची बॅग काही सदस्यांनी नेली नसेल तर आणि बॅगेजवळील वितरणाची पुस्तके नेली नसतील तर याचा अर्थ आपण अर्थसंकल्प न मांडला जाणे असा काढत असाल तर मला वाटते की, हा शब्दाचा किस होईल. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, अर्थसंकल्पासारख्या विषयावर तांत्रिक बाबींची सोडवणूक करण्यासाठी आपण सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचा निर्णय केला आहे. त्यांनी या संबंधी सुधारणा सूचवाव्यात आणि पुढच्या वर्षी विधीमंडळात अर्थसंकल्प मांडताना छोटीशीही चूक जी परंपरेने अनेक वर्षे होत आहे, ती होऊ नये याचा विचार केला जाईल.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय आपण नियम 57 अन्वये प्रस्ताव मांडावा. सन्माननीय सदस्यांचा हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना मागच्या कोणत्या वर्षी झालेल्या चूका आहेत ते लेखी स्वरुपात देतो.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय आपण नियम 57 अन्वये प्रस्ताव मांडावा. मी रुलींग दिले आहे. आपले म्हणणे मांडल्यानंतर मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी

4........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष.....

शांतपणे ऐकून घ्यावे. मी रुलींग देतो आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रथम आपापल्या जागेवर बसावे. आपण जागेवर बसल्यानंतर मी रुलींग देणार. अध्यक्षांशी आपण अशा पध्दतीने वागू नये. सन्माननीय सदस्य श्री. अब्दुल सत्तार आपण ज्येष्ठ सदस्य आहात, कृपया खाली बसावे. मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. आपले म्हणणे आहे की, अर्थसंकल्पीय पुस्तके आज दिली आहेत, मंत्री महोदय म्हणतात की, त्या दिवशी पुस्तके दिली आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ज्या दिवशी अर्थसंकल्प मांडावयाचा होता, त्या दिवशी माननीय राज्यपालांनी केलेल्या नियतव्ययाच्या वाटपाच्या संदर्भात...

**तालिका सभाध्यक्ष** : या संदर्भातील निर्णय जाहीर केला आहे.

**(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)**

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, त्या दिवशी आम्ही तो मुद्दा उपस्थित केला होता आणि तो मुद्दा आपण मान्य केला. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आता आज या बजेटच्या संदर्भात सन्माननीय माजी मुख्यमंत्री, माजी अर्थमंत्री यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. अर्थमंत्री माझे चांगले मित्र आहेत. माझा त्यांना एकच प्रेमाचा सल्ला आहे की, एखादी गोष्ट चुकली असेल तर ती चुकली म्हणून त्यावर मार्ग काढून पुढे चालण्याचा प्रयत्न करावा. आर्ग्युमेंट करुन त्याच्यामध्ये आणखी चुका होतात. आमच्या चुका असतील तर त्यामध्ये काय पनिशमेंट करायची ती करावी. सन्माननीय मंत्री महोदय श्री. सुधीर मुनगंटीवारसाहेब आपण सहज बोलता बोलता असे म्हणालात की, या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी बॅगा घेण्याच्या नादात ती पुस्तके नेलीच नाहीत. या सभागृहाचे सदस्य या सभागृहामध्ये एखाद्या बॅगेसाठी येतात असे या सभागृहाच्या कृपया रेकॉर्डवर राहू देऊ नका.

यानंतर Y-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.......

माझे म्हणणे एवढेच आहे की, मी आधीच सांगितले की, यामध्ये शब्दछल करायचा नाही आणि तुमच्यावर दोष पण लावायचा नाही. सन्माननीय मंत्री महोदयांच्या तोंडून हे रेकॉर्डवर आलेले आहे. ते रेकॉर्डवरुन काढून टाका किंवा माघार घ्या. म्हणजे असा चुकीचा समज सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत रेकॉर्डवर राहणार नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, असे भाष्य मी कुठेही केलेले नाही. पण भाष्य रेकॉर्डवर आलेले असेल तर ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे. मी तर असे म्हणालो की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील माजी अर्थमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय समिती नियुक्त करण्याची अनुमती द्यावी. मलाही अर्थमंत्री म्हणून भविष्यात अनेक सुधारणा व्हाव्यात असे वाटते. यामधून सुधारणा आणि दुरूस्त्या ह्या केल्या पाहिजेत. परंतु सन्माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री यांनी भाष्य केले की, असे पहिल्यांदा घडले. असे पहिल्यांदा घडले नाही. मी फक्त जास्तीची माहिती दिली. यासंदर्भात लेखी माहिती हवी असेल तर माननीय अध्यक्षांना ती द्यायला तयार आहे. माननीय अध्यक्षांची अनुमती घेऊनच ही पुस्तके देण्यात आलेली आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ज्यावेळेला अर्थसंकल्पाची प्रकाशने उपलब्ध करुन दिली त्यावेळेला ही पुस्तके उपलब्ध होती आणि सन्माननीय सदस्यांनी ती नेली नाहीत हा सदस्यांवर हेत्वारोप होतो.

**अध्यक्ष** : तो शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात आलेला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आधीचा मुद्दा वेगळा होता. हा मुद्दा आता नवीन काढलेला आहे. मी सुध्दा 5 वर्षे विधानसभेचा अध्यक्ष राहिल्यामुळे या विधानमंडळात थोडीफार ओळख माझीपण आहे. सन्माननीय श्री.चंद्रकांत पाटील, मंत्री महोदयांचे भाषण सभागृहामध्ये झ ाल्यानंतर आम्ही प्रयत्न करुन देखील दोन तास भाषण उपलब्ध झाले नाही. चॅनेलवर बोलायचे होते, बाहेर प्रेस कॉन्फरन्स घ्यायची होती. आम्ही दोष देत नाही. वर्तमानपत्रामध्ये छापून आले. छापायला उशीर झाला म्हणून ते आले नाही. आम्ही सर्व म्हणणे मान्य करतो. कारण आपण आमचे मित्र आहात. माझे एवढेच म्हणणे आहे की, आता जी प्रकाशने देण्यात आली. ती आज माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पीजन होलमध्ये टाकलेली आहेत. त्यामुळे आपणाला असे म्हणता येणार

........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

नाही की त्या दिवशी उपलब्ध होती सदस्यांनी नेली नाहीत. आमच्यावर हेत्वारोप होत आहे. आपण सभागृहाचे अध्यक्ष असल्याने आमची काळजी घ्यावी.

**अध्यक्ष :** पुस्तके वेळेवर मिळायला पाहिजे हे म्हणणे बरोबर आहे. जर मिळाली नसतील तर यापुढे विभागाने काळजी घेतली पाहिजे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय वित्त मंत्री महोदयांनी कबूल केलेले आहे की, काही पुस्तके आज देण्यात आलेली आहेत. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आज दिलेली आहेत. नियम 245 अंतर्गत बजेट कधी प्रस्तुत झाले. सदर कागदपत्रे आज प्रस्तुत झालेली आहेत. त्यावर आपण रुलिंग केले पाहिजे. जर आज कागदपत्रे प्रस्तुत करण्यात आली तर आम्ही कागदपत्रे वाचायची कधी आणि त्यावर बोलायचे कधी. अंदाजपत्रक तांत्रिकदृष्ट्या आज प्रस्तुत झाले. त्यावर आपण रुलिंग द्यावे.

**अध्यक्ष** : हे बरोबर आहे की, बजेट प्रस्तुत झाला त्यादिवशीच सर्व पुस्तके द्यायला हवी होती. ती कागदपत्रे आज मिळालेली आहेत.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे. मी सुरुवातीलाच या मुद्दयावर हरकत घेतली होती. बजेटच्या दिवशी पुस्तके मिळायला पाहिजे होती. त्याला उशिर का झाला. लोकांनी बॅगाच घेतल्या, पुस्तके घेतली नाहीत याचा खुलासा झाला पाहिजे.

**अध्यक्ष** : वित्त मंत्र्यांनी माघार घेतलेली आहे, उशिर झाला हे मान्य केले. आता आपण पुढे जाऊ या.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आम्ही हरकतीचा मुद्दा का उपस्थित केला. आमचे म्हणणे एवढेच आहे की, आपल्या परवानगीने चार पुस्तके आज मिळाली. खऱ्याअर्थाने संपूर्ण अर्थसंकल्प आज मिळाला. सदर पुस्तके दुपारी मिळाल्यानंतर त्यावर वाचन कधी करायचे आणि चर्चा कधी करायची. तांत्रिकद्ष्ट्या अर्थसंकल्पावरील पुस्तके आज पीजन होलमध्ये उपलब्ध झाली. अर्थसंकल्पावरील पुस्तके आज मिळाल्यामुळे अर्थसंकल्पावर आज चर्चा होऊ शकत नाही. ही चर्चा दोन दिवस पुढे ढकलण्यात यावी. यावर वाचन करावे लागेल.

**अध्यक्ष** : आता आपण चर्चा सुरु करु या. .........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आमचे काहीही म्हणणे नाही. पाच अर्थसंकल्पीय प्रकाशने आज मिळाली. राज्य सरकारकडून आलेली कागदपत्रे आम्हाला आज मिळाली. चर्चा दोन दिवसानंतर चर्चा घ्यावी. आपण यावर रुलिंग द्यावे. सभागृहाचे कामकाज गडबडीत करणे आणि लवकर पुढे जाणे एवढाच उद्देश सभागृहाचा कधीच नसला पाहिजे. सभागृहाचे कामकाज नियमाने चालले पाहिजे. नियमांचे उल्लंघन करुन जर आपण सभागृहाचे कामकाज पुढे न्यायला लागलो तर सभागृहामध्ये अधिक गोंधळ निर्माण होईल. त्यामुळे आपण रुलिंग द्या.

**अध्यक्ष** : नियम 245 वाचून दाखवितो. वार्षिक विवरण किंवा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या संबंधात राज्याच्या अंदाजलेल्या उत्पन्नाचे व खर्चाचे पत्र (ज्यास यापुढे "अर्थसंकल्प" असे म्हटले आहे) राज्यपाल नेमून दतील अशा दिवशी विधानसभेत सादर केले जाईल.

ज्या दिवशी अर्थसंकल्प सादर करण्यात येईल त्या दिवशी त्यावर चर्चा करण्यात येणार नाही. हे थोडे पुस्तके असतील, मेजर पुस्तके त्यादिवशीच दिलेली आहेत. एखादे सप्लीमेंटरी पुस्तक राहिलेले असेल ते आज दिलेले आहे.

------------

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.** : नियम स्थगित ठेवण्याबाबत माननीय वित्तमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. सुधीर मुनगंटीवार ( वित्तमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम 57 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम 246 (1) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

**अध्यक्ष** : "महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम 246 (1) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या संदर्भात नियम 57 अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

आता सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात होईल.

Z-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, गट नेत्याची आणि विरोधी पक्ष नेत्याची बैठक घेऊन हया चर्चेला किती वेळ द्यायचा हे आपल्याला ठरवावे लागेल. मुख्यमंत्री महोदयांनी तसे आश्वासन दिलेले आहे.

**अध्यक्ष :** या चर्चेला 3 तासांची वेळ देण्यात येत आहे.

श्री.ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेला केवळ 3 तासांची वेळ देण्यात आली. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये आश्वासन दिलेले होते.

**अध्यक्ष :** या चर्चेला आज व उद्या वेळ मिळेल. माननीय तालिका सभाध्यक्ष व माननीय विरोधी पक्ष नेते त्यांच्याशी चर्चा करुन चर्चेसाठी दोन दिवस घोषित केले आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज चर्चेला 3 तासांचा वेळ दिला व उद्या चर्चा करणार याचा अर्थ आपण चर्चेला किती वेळ दिला. एवढया मोठया अर्थसंकल्पावरील चर्चेला जास्त वेळ लागणार आहे.

**अध्यक्ष :** माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आपण बोलाल तेवढा वेळ आपल्याला देतो. कृपया चर्चेला सुरुवात करावी.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ( विरोधी पक्ष नेता ) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा सुरु करताना सर्व प्रथम मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. माझे शब्दही त्यांच्या कौतुकासाठी अपुरे आहेत. माननीय अर्थमंत्र्यांकडून आतापर्यंत आम्ही काय शिकलो ? आपल्या अपयशाचे ढोल कसे बडवायचे, हा उत्तम भाषणाचा नमूना माननीय अर्थमंत्र्यांकडून शिकलो आहोत. ढोल एवढे बडवायचे की, त्याच्या आवाजाने कानटाळया बसाव्यात, त्यामध्ये शेतकरी, वंचित, सर्व सामान्य माणसाचा आवाज दाबून टाकावा अशा पध्दतीने मंत्री महोदय आपण भाषण सादर केले. अर्थसंकल्पाविषयी असे म्हणता येईल "खिशात नाही पैका म्हणणच माझं ऐका" अशी आपली अवस्था आहे. मला मुख्यमंत्री महोदयांचे कौतुक वाटते. त्यांनी ही घंटा बांधण्यासाठी आपली निवड केली आहे. तुमच्या घोषणेतील हरवलेला सुर बिगुल वाजविण्याचा प्रयत्न केला. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार हे मुख्यमंत्री व्हायला पाहिजे होते अशी आमची नेहमी भावना होती. इतके जोखमीचे आणि शिव्या शाप घेण्याचे दु:ख तुमच्या पदरी आले त्याचे दु:ख आम्हाला वाटते.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी बसल्या बसल्या बोलू नये. त्यांचे बोलणे मनावर घेऊ नये

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : आपण पहिल्यांदाच निवडून आला आहात. तुमचा आम्ही सन्मान ठेवतो. ज्यांच्या घामाने भूमाता प्रसन्न होते आणि हिरवाईचे ताटे फुलून येतात. तो शेतकरी अर्थसंकल्पाचा केंद्र बिंदू आहे असे म्हटले जाते. ही भूमाता गेल्या वर्ष भरात 3600 शेतक-यांच्या आत्महत्येने दु:खी झालेली आहे. हा अर्थसंकल्प केवळ शेतक-यांना सुख दाखविणारा आणि त्यांच्या जगण्याला कोणताही आधार न देणारा अर्थसंकल्प आहे असे वर्णन करता येईल. माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार उत्तम भाषण करतात, घोषणा करतात. कोणताही अर्थसंकल्प हा सरकारचा मुखवटा असतो. आपण कितीही घोषणा केल्या कितीही बोललो, खोटे बोललो तरी वास्तव्य आपल्याला लपविता येणार नाही. मांडलेल्या अर्थसंकल्पाचे निकष लावले तर त्याचा खरा मुखवटा स्मार्ट सिटी, बांद्रा कुर्ला मेट्रो, सी.सी. टि.व्ही. याच्या भोवती हा अर्थसंकल्प केंद्रीत झालेला आहे. अर्थसंकल्पाची स्थिती पाहिली तर त्यामधून गोंधळलेल्या सरकारची प्रतिमा बाहेर येते. कृषि आणि

......3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.......

उद्योगामध्ये बॅलंन्स साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुर्देवाने कृषी क्षेत्रासाठी कोणतेही दिर्धकालीन धोरण या अर्थसंकल्पात मांडू शकला नाहीत. वरवरची मलमपट्टी केली म्हणजे कृषि क्षेत्राला न्याय दिला अशी भावना असेल तर ती चूकीची आहे. या अर्थसंकल्पामध्ये धड कृषीला न्याय देऊ शकला नाहीत. नेमकी कोणत्या दिशेला या सरकारची अर्थिक निती घेऊन जाणार आहात. गोंधळलेल्या शासनाचे चित्र पूर्ण अर्थसंकल्पामध्ये अधोरेखीत होत आहे. महसूली जमेच्या उद्दीष्टापेक्षा व्यापारी आणि उद्योजकांना खुष करण्यासाठी आर्थिक बेशिस्त स्विकारुन त्यांच्या फायद्याचे धोरण राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंत्री महोदयांनी जे म्हटले आहे की, हा अर्थसंकल्प शेतक-यांना समर्पित करणारा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प शेतक-यांना स्वप्न दाखविणारा अर्थसंकल्प आहे असे सरकारला वाटत असेल. शेतकरी फासावर लटकून मरतो आहे. त्याच्याबाबतीची भूमिका स्पष्ट दिसत नाही. आपल्या भाषणात सावकारचीच्या कर्जमाफी बाबत उल्लेख केला. एका बाजूला सावकारकीला कंटाळून आत्महत्या केल्या. मागच्या संपूर्ण वर्षामध्ये सावकारकीला प्रोत्साहन देता, त्यांचे कर्ज माफ करता. महाराष्ट्रामध्ये 10 टक्यांनी सावकारांची संख्या वाढली. या दोन्ही सभागृहांनी सावकारविरोधी कायदा संमत केला. केंद्राकडून तो मान्य करुन आणला. ते केल्यानंतरही सावकारकी शाहीच्या मुसक्या आवळण्यासाठी शेतक-यांच्या आत्महत्येला कारणीभूत ठरणा-यांना व्यवस्थेला कायम स्वरुपी या व्यवस्थेतून बाजूला करण्यासंबंधीचा विचार केला. परंतु सावकारी कर्ज माफ करुन फायदा कोणाला मिळाला ? आपण अशा प्रकारच्या नकारात्मक भूमिका किंबहूना शेतक-यांच्या आत्महत्येला कारणीभूत ठरलेल्या सावकारांची पाटराखण कराल याची आपल्याकडून अपेक्षा नव्हती. तुम्ही अर्थसंकल्प मांडत असताना सांगितले सर्व सामान्य माणूस हा अर्थसंकल्पाचा केंद्र बिंदू, दूवा आहे. अर्थसंकल्पाचे भाषण होईपर्यंत त्या सामान्य माणसाचा चेहरा सापडायला तयार नाही. सक्षम शेतकरी हा मेक ईन इंडियाचा पाया आहे असे भाषणात म्हटले.

AA-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, गिरगाव चौपाटीवर झालेल्या मेन इन इंडियाच्या कार्यक्रमास कोणता शेतकरी हजर होता ? सन्माननीय सदस्य डॉ.संजय कुटे उपस्थित होते, ज्यांना मंत्रिमंडळात जाण्याची इच्छा आहे असे सदस्य तेथे हजर होते. तेथे नरेंद्रहृदयसम्राट, हिंदुहृदयसम्राट होते, अभिनेते, उद्योजक व व्यापारी होते. शेवटी वाजले की बारा हे महाराष्ट्राने तेथे पाहिले आहे. यामध्ये शेतकरी कोठे होता ? 2016-2017 हे शेतकरी स्वाभीमान वर्ष म्हणून साजरे करण्याची आपण घोषणा केली आहे. मुळातच या राज्यातील शेतकऱ्यांचा स्वाभीमान फासावर लटकलेला आहे. आपल्या सरकारला पाठिंबा देणारा जो स्वाभीमानी पक्ष सरकारविरुध्द रोज आंदोलन करीत आहे. माननीय अर्थमंत्री कशाविषयी बोलत आहेत हे आम्हाला कळू द्या. तुमचा उद्योगधार्जीणा अर्थसंकल्प आहे. तुम्ही तो बळीराजाला समर्पित केल्याचे म्हटले आहे. तुम्ही चांगले शब्द वापरता. अर्थमंत्री महोदय तुम्ही माझे चांगले जुने मित्र आहात. मागील 20-25 वर्षांपासून आपण सभागृहामध्ये आहोत. आज आपण चांगल्या प्रकारे भाषण करीत आहात. भाषणात तुम्ही समर्पित, अर्पित केले असे शब्दप्रयोग करता. जेव्हा तुम्ही हा अर्थसंकल्प शेतकऱ्याला समर्पित केलेला आहे असे म्हणता पण सरकारला जगण्याचा आधार राहिला नाही. बळीराजा फासावर असताना त्याला तुम्ही अर्थसंकल्प अर्पित केलेला आहे, असे चित्र व वास्तव्य तुम्ही मान्य केले पाहिजे. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर कृषी औद्योगिक समाजरचनेचा पाया स्व.यशवंतराव चव्हाण यांनी घातला. त्यांनी राज्याच्या निर्मितीनंतर दिव्यस्वप्न पाहिले होते. यानंतर पहिल्यांदा महाराष्ट्राची एवढी दुरावस्था झालेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना नसणारा किंबहुना एकूणच शेती व्यवस्थेची दुरावस्था करणारा अर्थसंकल्प आपण मांडलेला आहे. 25 हजार कोटीबाबत आपण मोठया आविर्भावाने घोषणा केलेली आहे. तुम्ही सांगितले की, माझ्या पुढील भाषणात मी याचा ब्रेक-अप देईल. आम्ही जयहिंद, जयमहाराष्ट्र होईपर्यंत याची वाट पाहिली पण तुमच्याकडून शेवटपर्यंत ब्रेकअप आला नाही. आता मेन इन महाराष्ट्र ऐवजी ब्रेक इन महाराष्ट्र पाहिजे आहे का ?

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

अध्यक्ष महोदय, सभागृहातील सदस्यांनी या 25 हजार कोटीच्या या तरतुदी पाहिल्या तर लक्षात येईल की, शेतकऱ्यांना अनेक विशेषणे जोडून त्याला खुश करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 25 हजार कोटीची तरतुद करताना आपण पाठ थोपटून घेतली तरी यामध्ये वास्तव्य काय आहे. यामधील दुष्काळ निवारणाकरिताचा निधी 3360 कोटी 35 लाख रुपये आहे. सिंचनाचे 7850 कोटी, मनरेगाचे 3473 कोटी, वीज पंपासाठी 3500 कोटी आहेत. हे सर्व मिळून 25 हजार कोटी आहेत. मनरेगा, शेतीवरील वीज पंप या सर्व जुन्याच योजना आहेत. सिंचनाकरिता आपण वेगळी तरतूद करावयास पाहिजे होती. 7200 कोटी रुपये मागील वर्षी तरतूद होती यावर्षी 7800 कोटी तरतूद केली आहे. यावर्षी 600 कोटी तरतूद वाढविली आहे. मालगुजारी तलावासाठी 150 कोटी, पांदन रस्त्यासाठी 100 कोटी, पीक कर्जाकरिता 100 ते 110 कोटी, तेलबिया उत्पादनाकरिता 180 कोटी, कृषी प्रक्रिया उद्योगासाठी 50 कोटी, पंडित दिनदयाळ कृषी मार्गदर्शक योजनेसाठी 60 कोटी, कृषी महोत्सवासाठी 6 कोटी 80 लाख अशा तरतुदी केलेल्या आहेत. मला आश्चर्य वाटते की, अर्थमंत्री राज्याचा अर्थसंकल्प मांडत आहेत की क वर्ग महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मांडत आहेत, फक्त फसवे आकडेवारी दिली जात आहे, या योजना कधी कार्यान्वीत होणार आहेत, याचे प्रत्यक्ष फायदे शेतकऱ्यांना कधी पहावयास मिळणार आहेत ? तुम्ही 25 हजार कोटीची घोषणा करताना असे वाटले होते की बरे झाले 25 हजार कोटी मिळाले. पण त्यामध्ये मनरेगा, सिंचनाचेही पैसे आहेत.

अध्यक्ष महोदय, आपण गोवर्धन गोवंश नावाची नवीन योजना जाहीर केली आहे. ही अफलातून कल्पना कोणी काढली आहे हे मला माहिती नाही. माननीय महसूल मंत्री यांची गोग्राम योजना आहे. माननीय अर्थमंत्री यांची गोवर्धन गोवंश नावाची योजना आहे. त्याऐवजी एकनाथ ग्राम अशी योजना तुम्ही केली पाहिजे होती. माननीय श्री.एकनाथराव खडसे यांच्या नावाने गायींनी खूप चारा खाल्ला असता, दूध दिले असते. निदान लोकांचे कल्याण झाले तरी असते. आपण त्या योजनेला 1 कोटी अनुदान देण्याचे ठरविले आहे. हे काम तुम्ही करणार नाही, हे काम एखाद्या सेवाभावी संस्थेने करावयाचे आहे. म्हणजे सरकार कोणतीही जबाबदारी घ्यायला तयार नाही.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

सेवाभावी संस्थेने गोवंश ग्राम काढावे. गोवर्धन गोवंश रक्षा केंद्राची स्थापना करावी. शासन त्याकरिता 1 कोटी रुपये देणार आहे. शेतकऱ्यांना जगण्याचे साधन तुम्ही दिलेले नाही पण मुक्या जनावरांनाही मारण्याची योजना तुम्ही तयार केलेली आहे. बळीराजाला समर्पित केलेला अर्थसंकल्प असा आपण दावा केलेला आहे, हा तुमचा दावा पोकळ आहे. आज मराठवाड्यात जनावरांच्या छावण्या उघडलेल्या आहेत. या छावण्यांना चार-चार महिन्यांपासून अनुदान मिळत नाही. भाजपा युवा मोर्चाचा राज्याचा पदाधिकारी माझ्या गाडीला बीड जिल्हयामध्ये आडवा होतो. मला बीड जिल्हयातील छावण्या पाहण्याकरिता घेऊन जातो. तेथील छावणी वादळामध्ये उडून गेली होती. मी त्यांना सांगितले की, तुमचे सरकार आहे, तुम्ही सरकारकडे पाठपुरावा करावा. त्यांनी मला सांगितले की, तुम्हाला त्यासाठीच तर बोलावले आहे की, आमचे सरकार काही करीत नाही. तोंड दाबून बुक्क्याचा मार चाललेला आहे ही आपल्या पदाधिकाऱ्याची अवस्था आहे. पदाधिकाऱ्यांची ही अवस्था असेल तर जनावरांची काय अवस्था असेल हे माहित नाही. आपण गोवंश गोग्राम योजना काढताना याचा विचार केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री यांनी नवीन घोषणेद्वारे जलजागृतीचा संकल्प केलेला आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या डोळयातील पाणी सोडले तर राज्यामध्ये कोठेही पाण्याचा थेंब नाही. जलाशय आटलेले आहेत. लोक स्थलांतर करीत आहेत. राज्यातील टंचाईवर मात करण्यासाठी तुमच्याकडे कोणतीही दूरदर्शी योजना नाही. योजना नियमांच्या जोखाडात आहेत. दुष्काळ निवारणासाठी पैसा कसा खर्च होणार नाही अशा आपल्या योजना आहेत. कर्जमाफी मागून शेतकऱ्याच्या डोळयाचे पाणी आता आटले आहे पण तुम्हाला पाझर फुटायला तयार नाही. आम्हाला असे वाटले होते की, दिर्घकालीन उपाययोजनांकरिता तुम्ही काही पुढाकार घेणार आहात. पण तुम्ही पाण्यासाठी कोणती साक्षरता व जागृती करणार आहात हे एकदा आम्हाला कळू द्या. आपण मोठमोठे शब्द वापरत आहात.

अध्यक्ष महोदय, आमची अपेक्षा होती की, सर्वात मोठे तुटीचे खोरे गोदावरीचे आहे. या गोदावरी खोऱ्याची तुट कशी भागवता येईल. नगर, नाशिक, खान्देश, मराठवाडा हा प्रादेशिकवाद

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील .....

उभा राहिलेला आहे. या परिसराची तहान कशी भागविता येईल. कायमस्वरूपी दुष्काळ निवारणासाठी किमान 110 टीएमसी पश्चिम वाहिनीकडे जाणारे पाणी ते गोदावरी खोऱ्यात कसे आणता येईल, यासाठी कायमस्वरूपी योजना कशा करता येतील हे पहावे. आमच्या सरकारचे अपयश मी मान्य करतो. आम्हाला जमले नाही. आमच्या सरकारच्या वेळीसुध्दा सांगून थकलो. अगोदरच्या सरकारची प्राथमिकता कृष्णा खोऱ्यातील लवादाचे पाणी अडविण्याची होती, त्यामुळे आमचा नाईलाज होता. आता तरी दुष्काळाच्या निमित्ताने आपण पाण्याकरिता काही उपाययोजना करणार आहात की नाही ? मागील वर्षी 1 लाख हेक्टर सिंचन करण्याचे माननीय अर्थमंत्री यांनी भाषणात सांगितले होते. 2015-2016 मध्ये किती सिंचन वाढले आहे याचा आर्थिक पाहणी अहवालात उल्लेख नाही तसेच तुमच्या भाषणातही त्याचा उल्लेख नाही. आज सकाळी सभागृहात चर्चा झाली की, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सरकारला फटकारले आहे.

यानंतर बीबी-2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.........

शेतक-याला समर्पित अशा या अर्थसंकल्पामध्ये शेतक-याला आणेवारीमध्ये सवलत देण्याकरिता निधीची तरतूद करण्यास काय हरकत होती ? अधिका-यांवर दडपण आणून त्यांना आणेवारी घेऊ नका असे सांगितले जात आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर आणेवारीसंदर्भात शासन सुधारित शुध्दिपत्रक काढत आहे. अशा या संवेदनाहीन सरकारला शेतक-यांबाबत कोणत्या संवेदना आहेत ? असा प्रश्न जनतेच्या मनामध्ये उभा राहिलेला आहे. उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतरही या संवेदनाहीन सरकारवर त्याचा काहीच परिणाम होत नाही,असेच दुर्दैवाने म्हणावे लागत आहे. या संवेदनाहीन सरकारला माननीय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा फटकारलेले आहे. विरोधक सभागृहामध्ये ज्या भावना प्रामाणिकपणे शेतक-यांच्या व जनतेच्या हिताकरिता मांडत असतात, त्या तर शासन गांभीर्याने घेत नाहीच. परंतु माननीय न्यायालय व सर्वोच्च न्यायालयायाने शासनाला वेळोवेळी अशा प्रकारे फटकारणे हे या शासनाला शोभनीय नाही.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री यांनी अर्थसंकल्प मांडत असतांना अतिशय जड अंत:करणाने माननीय मुख्यमंत्री यांचे अभिनंदन केले. 20924 कि.मी.लांबीच्या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्ग करण्याकरिता केंद्र शासनाने भरीव मदत केलेली आहे, अशी आपण घोषणा केली असता सर्वांनी बाके वाजविली. या घोषणेऐवजी जर शेतक-यांच्या कर्जमाफीसंबंधीची घोषणा करण्यात आली असती तर आम्हीही आनंदाने बाके वाजविली असती. यामध्ये आम्हाला राजकारण करावयाचे नाही. आम्हाला या अर्थसंकल्पातून शेतक-यांच्या कर्जमाफीविषयीच्या घोषणेची अपेक्षा होती. माननीय अर्थमंत्री आपल्या धोरणात स्पष्टता असणे आवश्यक आहे. माननीय अर्थमंत्री महोदयांच्या भाषणात शेर व कविता नसेल तर आपले भाषण पूर्ण होत नाही. मागील अर्थसंकल्पाच्या वेळी आपण प्रश्नांकित व चिन्हांकित असे शब्द प्रयोग केले होते. ते भाषण माननीय अर्थमंत्री यांनी गाजविले होते. माननीय मुख्यमंत्री यांनी आपल्याला त्याबाबत कानमंत्र दिलेला आहे. मी असे म्हणत नाही की, त्यांनी आपले कान पिळलेले आहेत. यावेळेस चिन्हांकित व प्रश्नांकित या शब्दांचे प्रयोग केलेले आढळून आलेले नाहीत.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.........

अध्यक्ष महाराज,छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात आपण सर्वच राज्यकारभार चालवित आहोत. माननीय अर्थमंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये एक कविता सादर केलेली आहे.

" पराक्रमाचा सूर्य जणू तो रयतेचा आधारू,
या त्या तेजाचे, चैतन्याचे स्मारक जगी आम्ही उभारु "

अशा या जाणत्या राजाचे स्मारक उभारण्याचे काम हे शासन करणार नाही. बाहेरच्या राज्यात जे अन्य स्मारक उभारण्यात येणार आहेत, ते लोक राज्यातील स्मारक उभारण्याचा मार्ग शोधणार आहेत. यामध्ये आपले राज्य शासन केवळ भागीदारी करणार आहे. शासन छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याकरिता कोणत्या वारसांचा व माणसाचा शोध घेत आहे ? आम्हाला शासनाला विचारावयाचे आहे की, आता महापुरुषांचे स्मारक बीओटी तत्त्वावर उभारण्यात येणार आहेत का ? बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर राज्यातील महापुरुष व राष्ट्रपुरुष यांचे स्मारक या राज्यात उभारले जाणार आहे का ? या तत्त्वावर आता शासन राष्ट्रपुरुषांचा अपमान व अवमान करणार आहे का ?छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आज आपण येथे सत्ता संपादित करुन राज्यकारभार करीत आहात. ज्यांच्या नावाच्या मोठमोठया घोषणा व शिवरायांचा उद्‌घोष केला जातो. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आपण मते मागत असता. शिवराय यांच्या नावाने अनेक शब्दप्रयोगही केले जातात. शिव वडापाव, शिव धनुष्य शिवसृष्टी, शिवबंधन, शिवशाही असे विविध नावे छत्रपती शिवरायांच्या नावाने दिली जातात. त्याच जाणत्या राजाच्या व राज्याच्या आराध्य दैवताच्या स्मारकाकरिता केवळ शासन 0.001 टक्के एवढी नाममात्र तरतूद केलेली आहे. एवढा मोठा अवमान या शासनाने राष्ट्रपुरुषांच्या स्मारकांसंदर्भात केलेला आहे. यामुळे राज्यातील जनतेच्या मनामध्ये संतापाची लाट उसळलेली आहे, याची आपल्याला कल्पनाही करता येणार नाही. 0.001 टक्के म्हणजे या स्मारकाकरिता शासनाने केवळ 5 कोटी रुपयांचीच तरतूद केलेली आहे. यातून आपण छत्रपती शिवाजी महाराजांची किंमत 5 कोटी एवढीच केलेली आहे, असे दिसून येते. माननीय अर्थमंत्री आपण पुन्हा ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासमोर नतमस्तक होण्याकरिता जाणार, त्यावेळी छत्रपती तुम्हाला म्हणतील की,

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.........

" बांधा स्मारके अन्य कोठेही अथवा बांधू नका,
गिरी, सागरी झडेल माझ्या किर्तीचा डंका.

महापुरुषांची किर्ती ही केवळ त्यांच्या स्मारकानेच वाढणार नाही. आज छत्रपती शिवाजी महाराजांमुळे आपल्या सर्वांची किर्ती आहे. ज्यांच्या नावाने आपण मते मागून सत्ता स्थापन केली त्या राष्ट्रपुरुषांचा अवमान होणार नाही, याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्री महोदयांनी भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांचा उल्लेख केलेला आहे. स्वातंत्र्य लढयातील त्यांचे योगदान महान होते, असा उल्लेख त्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केलेला आहे. त्यांचे स्मारक उभे करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. युती शासनातील असंतोषाचे जनक कोण आहे ? ते कोठे बसलेले आहेत ? ते सर्वांना माहिती आहे. हे सभागृहालाही कळू द्यावे. ज्या लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्याचा मंत्र दिला त्यांच्या स्मारकाकरिता केवळ 5 कोटी इतकीच तरतूद केली जात आहे. हे शासन अशा प्रकारे तुटपुंजी तरतूद करुन पदोपदी राष्ट्रपुरुषांचा अवमान करीत आहे. स्वातंत्र्य सेनानी यांचाही अवमान हे शासन करीत आहे, हे ऐकून मनाला वेदना होतात. ज्यांच्या नावाने आपण मते मागितली...(अडथळा )

श्री.गिरीष बापट ( खाली बसून ): आम्ही लोकमान्य टिळक यांच्या स्मारकाकरिता निदान तेवढी तरी तरतूद केली. तुमच्या शासनाच्या काळात आपण तेही केले नव्हते.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय संसदीय कार्यमंत्री ...(अडथळा )

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य, आपण बसून बोललेले ध्यानात घेत नसतो.

श्री.गिरीष बापट : याबाबत मी आपलाच आदर्श पाळलेला आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते अतिशय चांगले शांतपणे भाषण करीत असतांना खाली बसून सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात,

......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

आपण समजू शकतो. परंतु प्रत्यक्ष संसदीय कार्यमंत्री महोदय अशा प्रकारे खाली बसून जर आपल्या भावना व्यक्त करीत असतील तर आपण कोणाकडे बघायचे ? संसदीय कार्यमंत्री यांच्यावर सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालविण्याची जबाबदारी असते. तेच जर अशा प्रकारे बसून बोलावयाला लागले तर आपण कोणाकडे बघणार ?

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे कामकाज व्यवस्थित, शांततेने व हसत खेळत चालले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी गेल्या पंधरा-वीस वर्षापासून ओळखत आहे. त्यांनीच यापूर्वीच्या काळामध्ये खाली बसून वातावरण चांगले होण्याच्या संदर्भात बोलल्याचे मला आढळून आलेले आहे. गेल्या पंधरा वर्षांमध्ये आपण लोकमान्य टिळक यांच्या स्मारककरिता आपण काय केले ? या प्रश्नाचे उत्तर मी खाली बसून मागत होतो. आपण हे उत्तर टाळण्याकरिता तिसराच काहीतरी मुद्दा मांडत आहात. आम्ही सुरुवात तरी केली हेच मला सभागृहात सांगावयाचे होते.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, हे शासन स्मारकांवरच उभे राहिलेले आहे, असेच मला आता वाटू लागलेले आहे. पुढील काळात आपल्या कामांचे स्मारक बांधण्याची आमच्यावर जबाबदारी येऊ नये, असे आम्हाला वाटत आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात खर्च आणि तूट व्यस्त प्रमाणात वाढत चालली आहे. याच्यामध्ये राज्याचा अर्थसंकल्प औचित्यासारखा मांडलेला आहे. यामुळे राज्याचे अतोनात नुकसान करण्याचा प्रयत्न चालू आहे, हे पाहण्यासारखे आहे. व्यापारी आणि मुठभर लोकांचे भले करण्यासाठी राज्याच्या तिजोरीवर भार टाकून बॅड बजेटिंग करण्याचा उत्तम नमूना म्हणून या अर्थसंकल्पाकडे पाहता येणार आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातून राज्यात आर्थिक बेशिस्त वाढत आहे, असेच दिसून येत आहे. अर्थसंकल्पात तूट कमी करण्याचा प्रयत्न तर होतांना दिसत नाही. परंतु तूट कमी दाखविण्याची हातोटी शासनाने दाखविलेली आहे, ते वाखाणण्यासारखी आहे. ते तुमचे समाधान करु शकेल परंतु आमचे समाधान यातून होत नाही. यातून शासनाचा फोलपणा लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 मध्ये 3,644.55. कोटी रुपये इतकी तूट दाखविलेली आहे. सन 2015-2016 मध्ये शासनाने 3757.40 कोटी रुपये इतकी तूट दाखविली होती. यंदाच्या भाषणात माननीय अर्थमंत्री यांचा या वर्षीची तूट सांगत असतांना मंदावल्यासारखा वाटला होता. माननीय अर्थमंत्री महोदयांनी आपला चढा आवाज कमी करत दबक्या आवाजात यंदाची तूट सांगितलेली आहे. 2,990.43 कोटी रुपये इतकी या वर्षीची तूट वाढलेली आहे, हे त्यांनी कोणालाही ऐकू येणार नाही, अशा आवाजामध्ये सांगितलेले आहे.

सीसी-1/----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील........

मार्च महिना संपणार आहे. म्हणून मला त्याबाबत अधिक चिंता वाटू लागली आहे. मार्च महिना संपल्यानंतर 15 हजार कोटी रुपयांपर्यंत तूट जाते काय, अशी चिंता मला वाटू लागली आहे. मी भाषणाच्या सुरुवातीलाच वित्तमंत्री महोदयांचे आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केलेले होते. मुख्यमंत्री महोदयांनी सेल्स मॅनेजमेंटबद्दल माहिती असणाऱ्या श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्यासारख्या एका अचूक माणसाची निवड केलेली आहे. अर्थव्यवस्थेची जी दूरावस्था झालेली आहे, त्याचे चित्रण व्यवस्थितपणे मांडण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, सद्य:स्थितीत तिजोरीत खडखडाट आहे. महसूली तूट वाढलेली आहे. आज राज्याची अर्थव्यवस्था बिकट झालेली असूनसुध्दा माननीय वित्तमंत्र्यांनी शेरोशायरीतून सन 2016-2017 चा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. माननीय वित्तमंत्री हे मुख्यमंत्र्याच्या स्पर्धेत आहे. माननीय वित्तमंत्री हे विदर्भातील एक सक्षम नेते आहेत. आता त्यांच्याकडे विक्री व्यवस्थापनाची जबाबदारी आलेली आहे, हे मात्र राज्याचे दुर्दैव्य आहे, असेच म्हणावे लागत आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी अर्थव्यवस्थेचे खरे वास्तव लोकांसमोर मांडण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, महसुली तूट वाढत असताना वित्तमंत्र्यांनी खर्चाच्या अधिक वल्गना केलेल्या आहेत. यासाठी वित्तमंत्री महोदयांनी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. हे मी आकडेवारी वाचून त्यांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे. या वर्षी खर्चाचा अंदाज 2 कोटी 24 लाख 454 कोटी 61 लाख एवढा धरलेला असली तरी, आपण तो उपलब्ध करुन देऊ शकणार नाही. म्हणून मागिल कल पाहता 10 हजार कोटी रुपये निधीअभावी कमी होणार आहे. सन 2015-2016 च्या महसुली खर्चाचा अंदाज 2 कोटी 1 लाख 987 कोटी 90 लाख इतका दाखविण्यात आलेला होता. आता तो सुधारित अंदाज वाढून 2 कोटी 7 लाख 611 कोटी 34 लाख इतका दाखविलेला आहे. म्हणजे 1 लाख 31 हजार 845 कोटी 96 लाख इतका खर्च आतापर्यंत झालेला आहे. एकूण अंदाजित खर्चेच्या तुलनेत फक्त 46 टक्के खर्च झालेला आहे. मी परवा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दूरदर्शनवर चर्चेच्या वेळी याच मुद्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील........

केलेला होता. उर्वरित 54 टक्के खर्च कसा करणार असा माझा प्रश्न आहे. फेब्रुवारी महिना संपून मार्च महिना संपण्यास काही दिवसच शिल्लक राहिलेले आहेत. अशा वेळी 54 टक्के खर्च घाईघाईने केला जाणार आहे. खर्च करीत असताना कोणतीही गुणवत्ता तपासली जाणार नाही. यामधून वारेमाफ खर्च खतवले जाणार आहेत. प्रसंगी मार्च महिन्याच्या शवेटी मंत्रालयाबाहेर पोलिसांना पाचारण करावे लागते. सर्व खर्चाचे विवरणपत्र घेऊन खर्च खतवावे लागतात. रक्कमा काढाव्या लागतात. मार्च, महिना संपण्यासाठी काही दिवस शिल्लक असताना आतापर्यंत 46 टक्के एवढा खर्च झालेला आहे. हे राज्याच्या कोणत्या आर्थिक शिस्तीचे लक्षण आहे ?

अध्यक्ष महोदय, मागिल अर्थसंकल्पाच्या वेळी वित्तमंत्री महोदय असे म्हणाले होते की, नियतव्ययाला एक रुपयाची देखील कात्री लावली जाणार नाही.

श्री. गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्याचा आदर ठेऊन मी सभागृहाला माहिती देणार आहे. रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. फेब्रुवारीमध्ये 77 टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झालेला आहे. परंतु, माननीय विरोधी पक्षनेते आतापर्यंत 46 टक्के एवढा खर्च झालेला अशी माहिती देत आहेत. मला असे वाटत आहे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांना जे माहिती देणारे अधिकारी आहेत, ते बहुतेक त्यांची फसवणूक करीत असावे. माननीय विरोधी पक्षनेत्यांची फसवणूक केली जात आहे. त्यांचा काही दोष नाही, ते लिहून दिलेले या ठिकाणी वाचून सांगत आहेत. याबद्दल आमचे कोणतेही म्हणणे नाही. पण ते चुकीचे लिहून दिलेले आहे, एवढे मात्र मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. 77 टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झालेला असताना माननीय विरोधी पक्षनेते आतापर्यंत 46 टक्के एवढा खर्च झालेला आहे अशी माहिती देत आहेत. यामध्ये त्यांची चूक नाही. ही लिहून देणाऱ्यांची चूक आहे.

श्री. अब्दुल सत्तार : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय वित्तमंत्री सक्षम आहेत. परंतु, संसदीय कार्यमंत्री हे वित्तमंत्र्यांपेक्षा हुशार असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. असे नाही. खरे पाहता माननीय वित्तमंत्र्यांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. वित्तमंत्री महोदय निश्चितपणे उत्तर देतील आणि माननीय विरोधी पक्षनेत्याचे भाषण सुरु असताना कधीही मध्येच थांबविण्याचा प्रयत्न करु नये.

......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी माननीय श्री. गिरीष बापट यांचे एका गोष्टीबाबत अभिनंदन करणार आहे. माननीय वित्तमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार हे त्यांच्या विभागाला कंटाळलेले आहेत. यासंदर्भात मी हवे असल्यास माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करु शकतो. आज अन्न व नागरी पुरवठा व्यवस्थितपणे होत नाही. मी अर्थ विभागाची जबाबदारी घेण्यास तयार आहे असे त्यांनी अप्रत्यक्षपणे सुचविण्याचे काम केलेले आहे. याबद्दल मी माननीय श्री. गिरीष बापट यांचे अभिनंदन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मागिल अर्थसंकल्पाच्या वेळी वित्तमंत्री महोदय असे म्हणाले होते की, नियतव्ययाला एक रुपयाची देखील कात्री लावली जाणार नाही. जर मी 1 रुपयांची कात्री लावली तर पुढील अर्थसंकल्प सादर करणार नाही, असे ते म्हणाले होते. सन 2015-2016 मधील खर्चाचा अंदाज वाढवून दाखविलेला असला तरी 10 हजार कोटी रुपयाहून खर्च कमी झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपण सर्वजण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहु महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा भाषणामध्ये नेहमीच उल्लेख करीत असतो. परंतु, वित्तमंत्री महोदय हे प्रिय असणाऱ्या दुर्बल घटकांना विसरलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2015-2016 मध्ये आदिवासी उप योजनेसाठी मंजुर नियतव्ययापैकी 1 हजार 718 कोटी 12 लाख रुपयांचा निधी खर्च केलेला आहे. म्हणजे 3 हजार 451 कोटी 88 लाख रुपयांचा निधी अजून देखील खर्च केलेला नाही. हा निधी मार्चपर्यंत घाईने खर्च केला तर त्याची गुणवत्ता कशी तपासणार असा देखील प्रश्न निर्माण होणार आहे. अशीच अवस्था अनुसूचित जाती उपयोजनेच्या संदर्भात होत आहे. सन 2015-2016 मध्ये 6490 कोटी रुपयांपैकी 2 हजार 17 कोटी 32 लाख रुपयांचा खर्च केलेला आहे. म्हणजे अनुसूचित जातीसाठी 4 हजार 472 कोटी रुपयांची कात्री लावण्यात आलेली आहे. मागिल अर्थसंकल्पाच्या वेळी वित्तमंत्री महोदय असे म्हणाले होते की, नियतव्ययाला एक रुपयाची देखील कात्री लावली जाणार नाही. जर मी 1 रुपयांची कात्री

......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील........

लावली तर पुढील अर्थसंकल्प सादर करणार नाही, असे ते म्हणाले होते. आता वित्तमंत्र्यांनी कशी कात्री लावलेली आहे हे मी आकडेवारीवरुन सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता वित्तमंत्री सुरा लावतील किंवा कसे याची मला माहिती नाही. माननीय वित्तमंत्र्यांडून सामाजिक न्याय विभागासाठी कात्री लावण्याचा प्रयत्न केला जाणार असेल तर अशा वेळी सोनेरी किरणे वंचिताच्या दारात कशी पोहचणार असा माझा प्रश्न आहे. परंतु, माननीय वित्तमंत्री या माध्यमातून किती असाध्य गोष्ट करुन दाखविली हे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. जनतेला उज्वलो का समुंदर दिलेले नाही, तुम्ही अंधाराची डुबकी दिलेली आहे, अशी वस्तुस्थिती आहे. हे मान्यच केले पाहिजे. वंचितासाठी असेलेल्या योजनेतील निधी खर्च होत नाही. हे शासनाचे सर्वात मोठे अपयश आहे. महसुली जमेच्याबाबतीत वेगळी स्थिती नाही. अंदाजापेक्षा जमा कमी होत आलेली आहे. म्हणजे 48 हजार 668 कोटी रुपये एवढ्या कराची वसुली झालेली नाही. तुटीच्या अर्थसंकल्पाचा विचार केला तर सन 2015-2016 मध्ये जमेचा अंदाज 1 लाख 98 हजार 230 कोटी 50 लाख इतका दाखविलेला असला तरी ती जमा 18 हजार कोटी रुपयांनी कमी होणार आहे. अशा प्रकारचे चित्र आज निर्माण झालेले आहे. आज अर्थसंकल्पात 3 हजार 757 कोटी 40 लाख रुपये एवढी महसुली तूट सन 2015-2016 मध्ये अंदाजित केली होती. माननीय वित्तमंत्र्यांनी 9 हजार 290 कोटी 43 लाख रुपयांपर्यंत तूट गेलेली आहे असे मान्य केलेले आहे. प्रत्यक्ष 15 हजार कोटी रुपयांपर्यंत तूट जाणार आहे. 18 हजार कोटी रुपयांपेक्षा कमी जमा होणार आहेत आणि खर्च देखील 10 हजार कोटी रुपयांपेक्षा कमी होईल असे म्हणाले होते. आज राज्यावर 3 लाख 84 हजार 433 कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यामुळे खर्चाच्या कमी झालेल्या अंदाजामुळे किंवा तूट वाढल्यामुळे आणखी 43 हजार कोटी रुपयांची भर पडणार आहे. त्यामुळे राज्यावर 4 कोटी 27 लाख 433 कोटी रुपयांवर कर्ज होणार आहे. हे वास्तव आपण स्वीकारले पाहिजे. आपल्या राज्याची कर्जाची मर्यादा अजून शिल्लक आहे. महसुली खर्चाकरिता कर्ज काढणे हे कोणत्याही अर्थशास्त्रात बसत नाही. हे वास्तव स्वीकारल्यानंतर राज्याची आर्थिक घडी कशी व्यवस्थित करणार असा माझा प्रश्न आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील........

अध्यक्ष महोदय, शासनाने एलबीटी रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. दरवर्षी प्रत्येक महानगरपालिकेला भरपाई म्हणून 3328 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. शासनाने 53 टोलनाके रद्द केले आहेत. यासाठी 800 कोटी रुपये सन 2015-2016 मध्ये देण्याचे मान्य केलेले आहे. व्हॅट प्रणाली लागू केल्यामुळे 12.5 टक्क्यांपेक्षा जास्त कर्ज आकारणी करता येणार नाही. आता शासनावर सातव्या वेतना आयोगाचा बोजा पडणार आहे. आर्थिक बेशिस्तीच्या डोलाऱ्याबाबत चिंता वाढू लागली आहे. या सर्व परिस्थितीला कशा प्रकारे सामारे जाणार असा माझा प्रश्न आहे.

DD-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

या राज्याची आम्हाला आता चिंता लागून राहिलेली आहे.

अध्यक्ष महाराज, माननीय वित्तमंत्र्यांनी महिला सक्षमीकरणाकरिता, तसेच राज्यातील महिलांना आधार देण्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या शासनाने 300 तेजस्विनी बसेससाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली. या बसेसमध्ये महिला बसल्या की महिला सक्षमीकरण झाले हे सरकारचे धोरण आहे काय ? महिलांना बसेसमध्ये बसविण्यापेक्षा सार्वजनिक परिवहन व्यवस्था कशी सक्षम करता येईल, यासबंधी आपण विचार करायला हवा होता. सन्माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी स्वातंत्र्य सैनिकांना घरे विकत घेण्यासाठी 10 लाख रुपयांची योजना जाहिर केली. देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास 68 वर्षे झाली आहेत त्यामुळे आता त्या स्वातंत्र्य सैनिकांचे वय 90, 95, 98, 100 वर्षे झालेले असेल. स्वातंत्र्य सैनिकांना राहण्यासाठी दहा लाख रुपये देणार आणि उर्वरित पैशांसाठी त्यांना बँकांकडून कर्ज घ्यावे लागेल. या दहा लाख रुपयांमध्ये काय होणार आहे? या 95 वर्षांच्या स्वातंत्र्य सैनिकांना कोणत्या बँका कर्ज देणार? माननीय अर्थ मंत्री आपणाला असा अफलातून कोण सल्ला देतो, हा सल्ला आपणास कोणी दिला, नागपूरचे कोण सल्लागार आहात ? हे शासन स्वातंत्र्य सैनिकांसाठी मदत करु शकत नाही तर किमान त्यांची चेष्टा तरी करु नका, एवढीच आपल्याकडून आम्हाला अपेक्षा आहे.

अध्यक्ष महाराज, माननीय अर्थ मंत्र्यांनी केंद्राचा निधी मिळविण्यासाठी, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी वित्त विभागामार्फत वॉर रुम तयार करण्याची संकल्पना मांडली आहे. जेणेकरुन केंद्रामधून अधिकाधिक निधी मिळेल अशी आपली भाबडी अपेक्षा आहे. जेथे वॉरच नसेल तर रुम तरी कशाला करता. या शासनाची केंद्रात पत राहिलेली नाही. या शासनाने वॉर रुम उघडली आणि कितीही लढाया लढल्या तरी आपले केंद्रामध्ये पानीपत झाल्याशिवाय राहणार नाही.

अध्यक्ष महाराज, नमामी चंद्रभागा अभियान ही योजना शासनाने आणली आहे. योजना चांगली आहे. खरेतर आपल्या भाषणात नमोमी अभियानाची अपेक्षा होती. आपले सरकार नमो धोरणावर सरु आहे. चंद्रभागेत नमोमी असेच सुरु असते. भविष्यकाळात इकडे तिकडे सरकण्याची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

चिंता आहे म्हणून चंद्रभागेच्या ठिकाणी नामेमिनी अभियान राबविण्यास हरकत नव्हती. अध्यक्ष महाराज, पुष्कळ काही बोलण्यासारखे आहे, परंतु वेळ फार कमी आहे.

अध्यक्ष महाराज, शिक्षणासाठी तरतूद वाढविण्याऐवजी या शासनाने कमी केली आहे. डिजीटल महाराष्ट्रासाठी राज्यातील 44 हजार 367 शाळांना अजूनही संगणक उपलब्ध नाही. ग्राम बालविकास केंद्र बंद करुन डॉ.ए.जी. अब्दुल कलाम साहेबांच्या नावाने आपण अमृत योजना आणली. ही योजना कार्यान्वित केली असल्याचे माननीय अर्थ मंत्र्यांनी डिसेंबर, 2015 मध्ये आपल्या भाषणात सांगितले. या योजनेसाठी निधीची तरतूद केली नसून ही योजना अद्यापहि सुरु झालेली नाही. माननीय अर्थ मंत्र्यांच्या भाषणात गेल्यावर्षी उल्लेख झाला आणि याही वर्ष मात्र उल्लेख झाला. आंगणवाड्यांमधील जुन्या योजना आपण बंद केल्या आणि नवीन योजनेमध्ये चार महिलांची समिती करुन त्यांनी बाजारातून धान्य, अन्य सामुग्री आणावयाची आहे. या योजनेचा पुरता बोजवारा उडणार आहे. हा निधीच खर्च होणार नाही. नवीन आंगणवाडी योजना आणली आहे, त्यावर आता आंगणवाड्या सेविकांनी बहिष्कार घातला आहे.

सन्माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात वारली कला, वारली हट जोपासण्याची घोषणा केली. आदिवासी भागातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे, याचा विचार आपण कधी केला नाही. राज्याचे बजेट अधिवेशन दिनांक 9 मार्च, 2016 रोजी सुरु झाले. दिनांक 10 मार्च, 2016 रोजी जव्हार येथे श्री.सुरेश निकोडे या आदिवासी बांधवाने आपल्या कुटुंबियांना खायला आपण काही देऊ शकत नाही म्हणून स्वतःला जाळून घेतले. आज आदिवासींना निवारा नाही. कोरकु, कोलम, कातकरी, या आदिवासी बांधवांची अवस्था राज्यभरात बिकट आहे. या आदिवासींना रहायला घरे नाहीत. कुळाच्या घरात रहातात. माननीय अर्थ मंत्री आपण या आदिवासींची अवस्था बदला त्यानंतर वारली हट सारख्या योजनांची घोषणा करा. आदिवासी संस्कृती जोपासण्याची आपल्याला हौस आहे तर निदान त्यांना दोन वेळचे जेवण मिळाले पाहिजे, त्यानंतरच त्यांची संस्कृती जोपासा. आपण मेळघाट येथे कृपया जाऊन बघावे, तेथिल परिस्थिती काय आहे? मेळघाट येथे एनजीओंनी धुमाकूळ घातला आहे. मी आदिवासी विभागाच्या मागण्यांवरील चर्चेच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

वेळेस बोलीन. केवळ घोषणा केवळ करून समाजाला आकर्षित करण्याचा प्रयत्न असेल तर ते पूर्णत: चुकीचे आहे.

अध्यक्ष महाराज, मनरेगाची तर केंद्र सरकारला ॲलर्जी झाली होती. सुरुवातीला माननीय पंतप्रधानांनी सांगितले होते की, मनरेगा हे काँग्रेसचे पाप आम्ही बंद करणार. दीड वर्षानंतर परवाच्या अर्थसंकल्पामध्ये माननीय केंद्रिय अर्थ मंत्री श्री. अरूण जेटली यांनी मनरेगाची व्याप्ती वाढाविणार, रक्कम वाढविणार, शेवटी काँग्रेसचेच धोरण तुम्हाला तारणार, हे आपण मान्य केलेले आहे. म्हणून मनरेगा अंतर्गत दुष्काळामध्ये राज्यातील लोक स्थलांतरित होणार नाहीत, दुष्काळी भागातील लोकांना गावातल्या गावात काम मिळेल, त्यांच्या हाताची क्रियाशक्ती वाढेल, त्यांना उत्पन्नाची साधने निर्माण करून दिली पाहिजेत. मनरेगा योजनेतंर्गत किमान वेतन वाढविण्यासंबंधी माननीय अर्थ मंत्र्यांच्या भाषणात आम्हाला अभिप्रेत होते.

अध्यक्ष महाराज, सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत सन 2015 मध्ये 1 हजार 996 कोटी 48 लाख रूपयांची तरतूद केली होती, परंतु यावर्षीच्या बजेटमध्ये केवळ 970 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. मागे आरोग्य खात्याने समुपदेशन केंद्र सुरु करण्याची घोषणा केली होती. राज्याची अवस्था अगोदरच बिकट आहे. सार्वजनिक आरोग्याची दुरवस्था होत चाललेली आहे. ही एवढी कमी तरतूद करणे म्हणजे निरोगी शासनाचे लक्षण नाही. आपल्याला त्याची गरज आहे, असे आपल्या भाषणात आम्हाला अभिप्रेत होते. सार्वजनिक आरोग्य खात्यासाठी एवढी कमी तरतूद केलेली आहे, त्यातून कोणाचे आरोग्य आपण साधणार आहात? समुपदेशन केंद्र कोणासाठी हवे आहे, असा आम्हाला प्रश्न पडला आहे. असंघटित कामगारांचा प्रश्न तसाच आहे. मुख्यमंत्री महोदयांचा स्मार्ट हा शब्द आवडता आहे. आपले मंत्री स्मार्ट आहेत. स्मार्ट मंत्री स्मार्ट गावे करणार आहेत. आपल्या राज्यात 50 हजार आदिवासी कुटुंब कुपोषित असतांना अशी घोषणा करणे संयुक्तिक नाही.

यानंतर EE-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

लोकांना आता स्मार्ट सिटी नको आहे व ओव्हर स्मार्टही नको आहे. किमान कुपोषण तसेच लोकांचे स्थलांतर थांबविण्याकरिता आपण काही करु शकतो का, याचा विचार केला पाहिजे. माझ्या मनात सातत्याने एक प्रश्न येतो की, आपण स्मार्ट नावाचा काही मोल्ड तयार केला आहे काय ? आपण असा मोल्ड तयार केला आहे असे मला वाटते. मुख्यमंत्री महोदयांना कोणीही भेटले की, घे शहर साच्यामध्ये टाकायचे आणि बाहेर काढले की ते स्मार्ट झाले, अशी आपली परिस्थिती आहे. याचा अर्थ घे गाव, टाक साच्यामध्ये, काढ बाहेर, झाले स्मार्ट. माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांना घ्या, साच्यात टाका, बाहेर काढा झाले स्मार्ट. स्मार्ट सिटीची कल्पना काही मला समजायला तयार नाही.

अध्यक्ष महोदय, अनेक विषय बोलण्यासारखे आहेत, स्मार्ट सिटीच्या बाबतीत सन 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे अशी नवीन घोषणा आपण केलेली आहे. आज शहराची काय अवस्था आहे हे आपण जाणताच. माझे काही सहकारी या विषयावर नंतर बोलणारच आहेत. या सर्व स्मार्ट सिटीमध्ये ॲफोर्डेबल हाऊसिंगचा मुद्दा सारखा चर्चिला जातो, त्याबाबतीत कुठेही उल्लेख नाही. सर्वांसाठी घरे हे बरोबर आहे. परंतु, त्यासाठी नियोजन काय आहे, त्यासाठी कोणत्या प्रकारच्या व काय सुविधा आपण निर्माण करणार आहात, त्याकरिता निधी कसा उभा राहणार आहे, याचा कुठेही उल्लेख तुमच्या सर्वांसाठी घरे या योजनेत दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे महाराष्ट्र हे लघु उद्योगाचे केंद्र होते. परंतु, मेक इन महाराष्ट्रामध्ये आज लघु उद्योजक कोठेच दिसत नाहीत. 8 लाख 50 हजार कोटी रुपयांचे एमओयु केल्याचे मुख्यमंत्री महोदयांनी भाषणात सांगितले आहे. त्यामध्ये आमच्या येथील लघु उद्योजक कोठे आहे, त्याचा एकदा खुलासा होण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, कोणत्याही प्रकारच्या नियोजनाच्या अभावी राज्याच्या आर्थिक व्यवस्थेची दूरवस्था झाली असल्याचे मी बोललो आहे. राज्याची आर्थिक अवस्था पाहून आपण घोषणा केल्या पाहिजेत. परंतु, आपला केवळ घोषणांचा सपाटा चाललेला आहे. राज्याच्या आर्थिक वास्तवाचे भान ठेवून आपण केवळ घोषणा करुन चालणार नाही. आपण राज्य कर्जाच्या अधिक खाईत, अधोगतीच्या

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

खाईत ढकलण्याचा प्रयत्न करीत आहात. कर्जमाफीच्या घोषणेबाबत आम्ही वर्षभर मागणी करीत आहोत. आपण आता मान्य केलेले आहे. परवा मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात मान्य केले की, आम्ही कर्जमाफीच्या विरोधात नाही. आता तुम्हाला ते पटलेले आहे. परंतु, योग्य वेळ कधी येईल ते मला माहीत नाही. अजून किती शेतकऱ्यांनी आत्महत्या करायच्या हे माहीत नाही.

माननीय वित्त मंत्री अर्थसंकल्प मांडताना आपण एकत्रितपणे मार्ग काढला पाहिजे असे आपण म्हणत आहात. आपण महाराष्ट्र की तकदीर बदल जाएगी असे आपण म्हटले आहे. तकदीर बदलेगी और तस्वीर भी बदलेगी. त्याप्रमाणे तकदीर बदलली आहे, हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. तस्वीर बदलण्यात तर तुम्ही माहीरच आहात. फोटोसेशनमध्ये या शासनाचा हात कोणी धरू शकणार नाही.

माननीय वित्त मंत्री आम्ही काहीच केले नाही असे तुमचे सारखे म्हणणे असते, मला शेवटी आपल्याला हे सांगावयाचे आहे की,

मेरे सीने में नहीं तो तेरे सीने में सही,
हों कहीं भी आग, लेकीन यह आग सुलगनी चाहिए."

मुख्यमंत्री महोदयांना मला वित्त मंत्री महोदयांच्या माध्यमातून हे सांगावयाचे आहे की,

"सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं,
मेरी कोशिश है कि ये सूरत बदलनी चाहिए."

या निमित्ताने तरी सरकारने आता लोकांच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्याबाबत गांभीर्याने विचार करावा, नाही तर माननीय वित्त मंत्री भविष्यकाळ तुम्हाला माफ करणार नाही, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

...............

**अध्यक्ष :** आपण या चर्चेकरिता 3 तास इतका वेळ ठरविलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी इतर सन्माननीय सदस्यांनाही बोलण्याकरिता वेळ ठेवावा.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील (इस्लामपूर) : अध्यक्ष महोदय, मी जास्त वेळ बोलणार नाही. मी केवळ 5 मिनिटांतच बोलून उरलेले बहुतेक सर्व मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवेन.

अध्यक्ष महोदय, माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दुसरा अर्थसंकल्प मांडला आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या फार मोठ्या आशा, आकांक्षा, अपेक्षा या उमद्या अर्थ मंत्री महोदयांकडून होत्या. केंद्र शासनाचा अर्थसंकल्प सादर झाला, त्यावेळेस माननीय श्री. अरुण जेटली साहेबांनी व हा दुसरा अर्थसंकल्प मांडत असताना माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी मागच्या 16 महिन्यांमध्ये आणि केंद्राच्या 2 वर्षांच्या कालावधीत या देशातील शेतकरी आपल्यापासून लांब गेलेला आहे आणि ग्रामीण भागात आपल्या विरोधी लाट निर्माण झालेली आहे, याची नोंद घेऊन त्या घटकाला चुचकारण्याचा एक छोटासा प्रयत्न केलेला दिसतो. त्या पलीकडे माझ्या मते या अर्थसंकल्पाला फार अर्थ आहे असे नाही.

अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प मांडताना अर्थ मंत्र्यांचा प्रयत्न नेहमी महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडण्याचा असला पाहिजे. परंतु, आमच्या वित्त मंत्री महोदयांनी याही वर्षी 3644 कोटी रुपयांच्या महसुली तुटीचा अर्थसंकल्प मांडला आहे. खरे म्हणजे सन 2012-2013 मध्ये राज्यात 4210 कोटी रुपयांच्या महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडण्यात आला होता. सन 2013-2014 मध्ये 5081 कोटी रुपयांचा मांडण्यात आला होता. नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी सन 2014-2015 मध्ये भरमसाठ आकडेवारीच्या पुरवणी मागण्या मांडल्या.

श्री. सुधीर मुनगंटीवार (बसून) : आपण पूर्ण आकडेवारी सांगावी.

श्री. जयंत पाटील : मंत्री महोदय आपण याबाबत आपल्या उत्तरात सांगावे. अध्यक्ष महोदय, मला गरिबाला संरक्षण द्यावे

अध्यक्ष महोदय, सन 2014-2015 मध्ये नवे सरकार आले आणि महसुली तूट थेट 12138 कोटी रुपयांवर पोहोचली. सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पात अर्थ मंत्री महोदयांनी 3757 कोटी रुपयांची तूट मांडली. ती तूट थेट 9290 कोटी रुपयांवर पोहोचली. त्यात तर आमचा काही भाग नाही. सन 2016-2017 मध्ये सर्व दुरुस्त्या करण्याची संधी असताना देखील राज्याच्या अर्थ मंत्री महोदयांनी 3645 कोटी रुपयांच्या तुटीचा अर्थसंकल्प आपल्या सर्वांसमोर मांडला.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील ....

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला अनेक आकडेवारी दाखवू शकतो, उदाहरणे देऊ शकतो की, ज्यामध्ये ही 3645 कोटी रूपयांची तूट यापेक्षा किती तरी जास्त होती. मी आपल्याला साधे उदाहरण देतो, या हिरव्या पुस्तकात सातव्या पानावर गृहनिर्माण या हेडिंगखाली मागच्या वर्षी 1067 कोटी रूपयांचा महसूल गोळा होईल असे सरकारने अर्थसंकल्पात म्हटले होते. परंतु, 67 कोटी रूपयांचा महसूल गोळा झाला. याचे कारण काय तर, झोपडपट्टी पुनर्निर्माण योजनेंतर्गत अतिरिक्त चटई निर्देशांकाच्या माध्यमातून अपेक्षित महसूल प्राप्त झाला नाही. नगर विकास खात्याच्या बाब क्रमांक 0217 बाबत मला हे सांगावयाचे आहे की, 5 हजार कोटी रूपये मिळणार असे या सरकारने घोषित केले.

FF-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. जयंत पाटील.....*

*यापैकी किती रक्कम मिळाली, तर १ हजार कोटी रुपये मिळाले. म्हणजेच ४ हजार कोटी रुपये गोळा करण्यास या सरकारला अपयश आले. त्याबद्दल माझी काही तक्रार नाही. मागील वर्षी जे आकडे आहे, तेच यावर्षी धरुन पुन्हा ते गृहित धरलेले आहे.*

*अध्यक्ष महोदय, आपण पान ११ वरील आकडे पहावेत. यावर्षी त्यांनी पुन्हा गृह निर्माण विभागाला ६७ कोटी रुपये धरले आहेत. गेल्या वर्षी ६७ कोटी रुपये गोळा झाले. पुन्हा नगरविकास खात्याला ५ हजार कोटी रुपये धरले आहेत. परंतु १ हजार कोटी रुपये गोळा झाले आहेत. म्हणजे याचाच अर्थ असा आहे की, जवळपास ५ हजार कोटी रुपये जे मागील वर्षी गोळा झाले नाही, तेच या वर्षी देखील गोळा होणार नाही. म्हणजेच ५ हजार अधिक ३.५० हजार कोटी रुपये म्हणजेच ८.५० हजार कोटी रुपयांच्या महसुली तुटीचा अर्थसंकल्प आपण मांडला आहे, असा यावरुन अर्थ निघतो. आपण दोन्ही कारणे दिलेली आहेत. गेल्या वर्षी दिलेली आकडेवारी पुढील वर्षी दाखविणार नाही आणि पुढील वर्षी हे दाखविलेल्या रकमा गोळा कराल, याची काय शाश्वती आहे. मागील वर्षी जे गृहित धरले, जी कारणे आज देत आहात, तीच कारणे उद्या दिली जाणार आहे, परिस्थिती बदलणार नाही. म्हणजेच जवळपास राज्य सरकारने अर्थसंकल्प मांडताना यामध्ये ५ हजार कोटी रुपये दडविलेले आहेत. म्हणजेच ५ हजार कोटी रुपये फुगवून दाखविलेले आहेत. म्हणजेच हा अर्थसंकल्प ३.५० हजार कोटी रुपये तुटीचा नसून जवळपास ८.५० हजार कोटी रुपये तुटीचा होतो. असे अनेक आकडे आहेत. परंतु मला आपण मर्यादित वेळ देणार असल्यामुळे मी जास्त वेळ बोलणार नाही.*

*अध्यक्ष महोदय, आपण याकरिता केलेल्या प्रोव्हिजन्स खर्च होणे आवश्यक आहे. ९ हजार २०० कोटी रुपयांची तूट असली तरी माझ्याकडील हे छोटेशे कात्रण काय सांगते बघा. राज्याच्या ३५ योजनांवरील तरतूद कागदावरच. पहिल्याच अर्थसंकल्पात ७० योजनांचा सुकाळ, दुष्काळाला उतारा नाही, वगैरे यामध्ये दिलेले आहे. परंतु माननीय वित्त मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार काय म्हणतात, हे महत्वाचे आहे. ते असे म्हणतात की, अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या माझ्या विभागातील ९० टक्के योजनांच्या कार्यवाहीची अंमलबजावणी सुरु आहे. म्हणजेच फायनान्स आणि प्लॅनिंग या विभागाची. इतर योजनांचे अध्यादेश काढले आहेत. मागील सरकारने घोषणा केलेल्या*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. जयंत पाटील.....*

*योजनांच्या काही फाईल्स आता अर्थ खात्याकडे मिळत आहेत. त्यांची जंत्री तयार आहे. अर्थसंकल्पामध्ये जाहीर केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी व्यक्तिगत पाठपुरावा केलेला आहे.*

*अध्यक्ष महोदय, माझ्याकडे काही आकडेवारी आणि योजनांची माहिती आहे. ज्या योजनांवर सरकारने अजिबातच खर्च केलेला नाही. घोषणा मोठ्या परंतु अंमलबजावणी शुन्य अशी काही उदाहरणे आहेत. सौर कृषी पंप, पथदर्शी प्रकल्प म्हणून ५ हजार ५४० कृषी पंप बसविण्यात येणार होते. महाराष्ट्रात एकही कृषी पंप, सौरपंप अजून बसविलेला नाही. जी आकडेवारी ठरली, जे टेंडर निघाले, त्यापेक्षा गुजरातचे टेंडर कमी आणि म्हणून त्यांच्या सर्व खरेदीलाच ब्रेक लावण्याची वेळ आली.*

*अध्यक्ष महोदय, चंद्रपूर नवीन सिटी विकसीत करण्याकरिताची मागील वर्षीची बाब आहे. परंतु याकरिता एक रुपयाही खर्च केलेला नाही. परंतु या वर्षी १०० कोटी रुपये दिलेले आहेत. आपल्या मतदार संघात चांगली प्रगती व्हावी, राज्याच्या वित्त मंत्र्यांच्या गावामध्ये चांगली प्रगती व्हावी, हे कोणाला वाटणार नाही, आमची तक्रार नाही. परंतु आपण मागील वर्षीचा एक रुपयाही खर्च केलेला नाही. असे करु नका. आता परत या वर्षी १०० कोटी दाखविण्यात आलेले आहेत.*

*अध्यक्ष महोदय, "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेची मागील वर्षी घोषणा करण्यात आली. २०० कोटी रुपयांचा निधी चिंन्हांकीत करण्यात आला. मी आपले प्रथम अभिनंदन करतो की, या वर्षी काही निधी चिन्हांकीत केलेला नाही. ही चांगली बाब आहे. तसेच आमचे आर. आर. पाटील म्हणजेच स्वर्गीय आबांच्या स्मारकासाठी आपण ५ कोटी रुपये दिल्याबद्दल देखील मी आपले अभिनंदन करतो. ही चांगली बाब आहे. आपण काही चांगले केले नाही, असे मी म्हणणार नाही. केवळ पुढील बजेट मांडतांना यापेक्षा अधिक चांगले बजेट मांडावे, याकरिताच मी सूचना करीत आहे. परंतु आपण चिंन्हांकीत निधीबाबत आमच्या मागील वर्षीच्या शंकेचे निरसन केले.*

*श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, यावर्षी देखील "माझी कन्या भाग्यश्री" याच योजनेची घोषणा करण्यात आलेली आहे. याकरिता १ एप्रिल २०१६ रोजीचा मुहूर्त शोधण्यात आलेला आहे. मागील वर्षी २०० कोटीची तरतूद केली होती. परंतु या वर्षी योजना सुरु करीत असताना केवळ २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच वित्त मंत्री महोदय सावध झाले, असेच समजावे लागेल.*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. जयंत पाटील.....*

*अध्यक्ष महोदय, आदिवासी बीपीएल हाऊसिंग योजना, आदिवासी युपीएम एमपीएससी प्रशिक्षण केंद्र अशा बऱ्याच बाबी आहेत. अल्पसंख्यांकाचा किती द्वेष करायचा? मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळ आमच्या सरकारने सुरु केले. शेकडो कोटी रुपये आम्ही दिले. त्यातून अनेक मुस्लीम समाजातील तरुणांनी, तसेच अल्पसंख्यांक समाजातील वेगवेगळ्या तरुणांनी अनेक छोटे, मोठे उद्योग सुरु केले. ७५ कोटी रुपये चिन्हांकीत केलेले म्हणजेच यातून मला चिन्हांकितचा अर्थ असा कळला की, प्रश्नचिन्ह म्हणजेच अर्थमंत्र्यांच्याच मनात प्रश्न चिन्ह आहे की, याबाबत निधी द्यायचा किंवा नाही. याचा काय रिझल्ट लागला. तर प्रत्यक्षात महामंडळाला निधी देण्यात आला नाही.*

*अध्यक्ष महोदय, कामठी येथील येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकावर अजूनपर्यंत काहीच निधी खर्च झाला नसल्याची माझी माहिती आहे...(अडथळा)...आपण नारळ फोडून आलात, सर्व झाले परंतु त्यानंतर काम काही चालू झाले नाही. निधी दिला असेल तर आपले स्वागत आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेबाबत अशा बऱ्याच योजना आहेत. परंतु मी त्याबाबत बोलणार नाही.*

*अध्यक्ष महोदय, सिंधुदुर्ग येथे सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावीत होते. हा प्रकल्प सुरु झाला काय, तर नाही. आपल्या सी वर्ल्ड प्रकल्पाकरिता आपण काहीच निधी खर्च केलेला नाही, अशी माझी माहिती आहे. याबाबत आपल्या उत्तरामध्ये माहिती द्यावी. अशा अनेक योजना असून त्या सुरु झालेल्या नाहीत. या योजना मागील वर्षी सुरु होण्याची अपेक्षा होती.*

*अध्यक्ष महोदय, खरे म्हणजे या वर्षी ५६,९९७ कोटी रुपयांची वार्षीक योजना मांडली. ही मागील वर्षी पेक्षा केवळ २ हजार कोटी रुपये जास्तीची योजना आहे. माझ्या माहितीप्रमाणे गुजरातची योजना आता ८५,७५७ कोटी रुपयांवर गेली. कर्नाटकची ८५ हजार कोटी रुपयांवर पोहोचली. तेलंगणा हे राज्य आताच निर्माण झालेले आहे. तेथील योजना ६७ हजार कोटी रुपयांवर पोचली. याबाबत आपण आपल्या सचिवांकडून माहिती घ्यावी. त्यामध्ये काहीतरी कमी जास्तपणा असेल. परंतु ही राज्ये महाराष्ट्राच्या एवढी पुढे गेलेली मी पाहिली नाही. महाराष्ट्र ५६, ५७ हजार कोटी रुपयांवर आणि गुजरात, कर्नाटक, तेलंगणा ८५ हजार कोटी रुपयांवर पोचले असेल तर याबाबत आपण आत्मचिंतन करण्याची गरज आहे. आपला नॉन प्लॅनवर जास्त*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. जयंत पाटील.....*

*एक्सपेंडीचर होतो आणि प्लॅनवर कमी खर्च होतो, असा त्याचा डायरेक्ट अर्थ निघू शकतो. त्यामुळे आपण याचे आत्मचिंतन करावे. आता पुढील चार दिवस सुट्टया असून आपल्याला उद्याच उत्तर देण्याची आवश्यकता नाही. आपल्या सचिवांना घेऊन बसावे, मी देखील येतो, आपला प्लॅन एवढा कमी का आहे, याबाबत आपण चर्चा करु. याचा शोध घेण्याची गरज आहे.*

*अध्यक्ष महोदय, मागील काही काळात आमचे सरकार असताना आम्ही फार कर्ज वाढविले अशी सतत व जोरदारपणाने आमच्यावर टीका केली जात होती. मागील वर्षी पेक्षा पुढील वर्षी किती कर्ज वाढले, कर्ज वाढण्याचा दराबाबत मी २०१२-२०१३ पासूनची आकडेवारी सांगतो. मागील वर्षीपेक्षा २०१२-२०१३ या वर्षी ९.५० टक्क्यांनी कर्ज वाढले. २०१३-२०१४ मध्ये ९.१ टक्यांनी कर्ज वाढले. २०१४-२०१५ मध्ये ९.२ टक्क्यांनी कर्ज वाढले. या वर्षी २०१६-२०१७ मध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ११.२ टक्क्यांनी कर्ज वाढले. मला हे निदर्शनास आणायचे आहे की, २०१४-२०१५ मध्ये आपण २४ हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले. २०१५-२०१६ मध्ये २५ हजार ९४९ कोटी रुपयांचे कर्ज काढले. परंतु हे सरकार या वर्षी एकदम ३६ हजार कोटी रुपयांचे कर्ज काढायला निघाले आहे. म्हणजेच आपण एका वर्षामध्ये अधिकचे १२ हजार कोटी रुपयांनी कर्ज वाढविणार आहात. आम्ही कर्ज वाढवित आहोत, अशी आपण आमच्यावर टिका करीत होतात. परंतु मंत्री महोदय आपण कर्ज काढण्याचे बंद करावे. कर्ज न काढता सरकार चालविले तर आपल्या मागील पाच, दहा वर्षे या बाजूने जी भाषणे केली त्याला सुसंगत आपण काम करीत आहात, असे होईल.*

*...GG/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

अध्यक्ष महोदय, मी नमूद करु इच्छितो की, केंद्र शासनाकडून मागील वर्षी राज्य सरकारला कराचा हिस्सा 1 हजार कोटी रुपयांनी कमी मिळाला आहे. केंद्रीय अर्थ मंत्री श्री.अरुण जेटली यांचेशी राज्याच्या वित्त मंत्री महोदयांचे चांगले संबंध आहेत. त्यांनी त्यांच्याकडे जाऊन केंद्राकडून राज्याला देण्यात येणारा कराचा 1 हजार कोटी रुपये हिस्सा कमी का दिला, याचा हिशोब घेतला पाहिजे. मागील वर्षी केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने कमी प्राप्त झाली आहेत. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करण्यासाठी हे सरकार कमी पडते का, याचाही सरकारने विचार करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, मागील वर्षी केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा 32 टक्के टू 42 टक्के हा नवा विचार श्री.नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व राज्यांना दिला. त्यामधून राज्य सरकारला 10 हजार कोटी रुपये ज्यादा आले, तरी देखील सरकारने साडे तीन हजार कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प मांडला. अशा प्रकारे एकूण तूट झाली 9,200 कोटी रुपये. केंद्र शासनाकडून पैसे कमी मिळाले हा वेगळा विषय आहे. परंतु मुळात केंद्र शासनाने वाढवून दिलेली रक्कम राज्य शासनाला मिळूनही राज्य दुरुस्त करण्याची संधी सरकारने गमावली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प मांडताना अर्थ मंत्री महोदयांनी येणाऱ्या सर्वच संकटाचा विचार करावयाचा असतो. मी मघाशी सांगितले, दोन टॅक्स गोळा करण्यासंबंधी मागील वर्षी हे सरकार फेल झाले व यावर्षी फेल झाले, त्याचे साडे आठ हजार कोटी रुपयांचे गणित झाले.

अध्यक्ष महोदय, सरकारने सातव्या वेतन आयोगा संदर्भात चर्चा, विचार काहीच केले नाही, त्याबाबत पुसटसा उल्लेखही केला नाही. राज्यातील जवळपास 20-22 लाख कर्मचारी सरकार सातवा वेतन आयोग कधी देणार, कसा देणार, हे जाणून घेण्यासाठी उत्सूक आहेत. राज्य सरकारी संघटना सातव्या वेतन आयोगाबाबत लवकर चर्चा करण्यासाठी, त्याबाबत विचार करण्याकरिता सरकारच्या मागे लागली आहे. याप्रकरणी निर्णय केल्यानंतर यावर्षी सरकारला कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग द्यावा लागणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

सांगतो मला आठवते की, 6 वा वेतन आयोग जाहीर होण्यापूर्वी मी महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये त्यावर्षी 8 हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्यावेळी त्याबाबत मी सदनामध्ये चर्चा केली नव्हती. परंतु 8 हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. 6 व्या वेतन आयोगाचा निकाल आल्यानंतर राज्याची आर्थिक परिस्थिती कोलमडू दिली नाही व त्याची तोशिष ही राज्यातील जनतेला लागू दिली नाही. माझी वित्त मंत्री महोदयांकडून अपेक्षा होती की, त्यांनी यावर्षी 7 व्या वेतन आयोगाकरिता 10-15 हजार कोटी रुपये तरतूद करावी. त्यांनी ती केली असेल तर जाहीर करावे, सभागृहाला त्याबाबत विश्वासात घेऊन माहिती द्यावी. 7 वा वेतन आयोग आला असून ते संकट आहे अशी सामान्य माणसाची व सभागृहातील सर्व बाजूच्या सन्माननीय सदस्यांची धारणा आहे. त्यासंदर्भात वित्त मंत्री महोदय उत्तराच्या भाषणातून सभागृहाचे ज्ञान वाढतील, असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प सादर करीत असताना या सरकारने अनेक योजना मांडल्या. त्या मांडत असताना राज्यातील शेतकऱ्यांना भावनिक आवाहन करण्याचा प्रयत्न केला आहे. वित्त मंत्री महोदय श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी, मागच्या वेळी त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प वाचावा. त्यावेळी त्यांनी घोषणा केली होती की, या राज्याच्या कृषी विकासाचा दर मी 6 टक्क्यापर्यंत नेईन. राज्यात दुष्काळ आहे, हे मला माहित आहे. मागच्याच्या मागच्या वर्षी -16 टक्के ॲग्रीकल्चर सेक्टरचे कॉन्ट्रीब्यूशन होते. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल देशमुख यांना सांगू इच्छितो की, राज्यातील सर्व भागामध्ये दुष्काळ असताना तसेच त्यांच्या अमरावती भागामध्ये दुष्काळ असताना सरकारचे म्हणणे आहे राज्याच्या ग्रोथ रेट मधील ॲग्रीकल्चर कॉन्ट्रीब्यूशन -2.7 टक्के आहे. माननीय वित्त मंत्री महोदयांनी राज्याचा कृषी विकासाचा दर 6 टक्के वाढवतो असे म्हटले होते. त्याकडे दुर्लक्ष केले तरी -16 टक्क्यावरुन -2.7 टक्क्यापर्यंत म्हणजे 14 टक्क्यांची वाढ महाराष्ट्राच्या ॲग्रीकल्चर सेक्टरमध्ये झाली, असा त्याचा मी अर्थ गृहीत धरतो.

**अध्यक्ष :** सन्मानीय सदस्य श्री.सुनिल देशमुख यांना ही बाब सन्माननीय सदस्य का सांगत आहेत, ही बाब मी माहितीसाठी विचारतो.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्मानीय सदस्य श्री.सुनिल देशमुख हे माजी अर्थ मंत्री आहेत. त्यांनी पक्ष बदलला तरी माझे त्यांच्यावरचे प्रेम कमी होत नाही, ते कोणत्याही पक्षात असले तरी माझे त्यांच्यावर प्रेम आहे. त्यांना आता कविता सूचत आहे, आमच्या बाजूने होते त्यावेळी ते बरे होते.

अध्यक्ष महोदय, राज्यातील सर्व भागामध्ये दुष्काळ असताना ॲग्रीकल्चर सेक्टरमध्ये 14 टक्के ग्रोथ कोठून आली ? तसेच राज्यातील ॲग्रीकल्चरचा ग्रोथ रेट 6 टक्के करुन दाखवू अशी घोषणा मागील अर्थसंकल्पाच्या भाषणत केली होती, याचा खुलासा वित्त मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये करावा. मागील वेळी केलेल्या घोषणेचा पुरावा आज रात्री त्यांना भेटून मी त्यांना देईन, त्यांनी शांत चित्ताने माझे म्हणणे ऐकावे. श्री.अणे यांनी ज्याप्रमाणे राज्यपाल महोदयांकडे राजीनामा दिला त्याप्रमाणे मी माझ्याकडील पुरावा माननीय मुख्यमंत्री यांना देतो.

अध्यक्ष महोदय, श्री.अणे अजून गप्प बसलेले नाहीत, ते अजून बोलत आहेत. ते म्हणतात मला, मुख्यमंत्र्यांनी राजीनामा देण्यासाठी सांगितलेले नाही, सुमोटो दिला. आम्ही सदनामध्ये एवढा गदारोळ करुन देखील तुम्ही त्यांना मेसेज दिला नाही, हा सभागृहाचा अपमान नाही का ? पूर्ण दिवस सदनाचे कामकाज बंद पडले परंतु तुम्ही तिकडे कळवले नाही की, बाबा रे मला त्रास होतो आहे, राजीनामा द्या !

अध्यक्ष महोदय, मला सदनाला सांगावयाचे आहे की, सरकारने शेतकऱ्यांना मदतीची घोषणा केली. शिवसेनेचे सन्माननीय सदस्यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, 25 हजार कोटी रुपये कोठे दिले आम्हाला कळत नाही. आम्ही असे म्हणणारच परंतु आपल्या मित्र पक्षाचे सन्माननीय सदस्य देखील असे म्हणत आहेत. त्यांचे नाव मी सांगतो पण त्यांना पुन्हा तुम्ही त्रास द्याल. त्या सन्माननीय सदस्यांचे नाव श्री.अर्जून खोतकर आहे, त्यांनी बजेट ऐकल्यानंतर टी.व्हि.च्या प्रसार माध्यमांच्या समोर सदर बाब सांगितली होती.

अध्यक्ष महोदय, या सरकारच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये वित्त मंत्री महोदयांनी सांगितले की, दुष्काळावरील खर्च 5 हजार कोटी रुपये आहे. राज्याचे मुख्यमंत्री महोदय, साडे तीन हजार कोटी रुपये, आठ हजार कोटी रुपये आणि परवा म्हणाले 18 हजार कोटी रुपये दुष्काळावरील

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

खर्च आहे. आम्ही गरीब लोक आहोत, आम्ही मान्य करतो. आम्हाला बोलण्याची संधी कमी वेळा मिळते, त्यामुळे अम्हाला जास्त बोलता येत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी 18 हजार कोटी रुपयांचा आकडा सांगितला असला तरी राज्याचे वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार खरे बोलतात ते कधी खोटे बोलत नाहीत. जे सत्य आहे, तेच सांगतात. त्यामुळे त्यांनी यावर्षीच्या अर्थसंकल्पावरील भाषणामध्ये मागील आर्थिक वर्षामध्ये 5 हजार कोटी रुपये खर्च झाले असे सांगितले. त्यापूर्वी झालेला खर्च वेगळा आहे. त्वेशाने व उत्स्फूर्तपणे जे आकडे मुख्यमंत्री महोदय सांगतात त्यापेक्षा वेगळा आकडा आपण सांगतो, याचे भान राज्याचे अर्थ मंत्री यांनी ठेवणे आवश्यक आहे. कारण "Boss is always right".

अध्यक्ष महोदय, वित्त मंत्री महोदयांनी 25 हजार कोटी रुपयांचा हिशेब दिला आहे. त्यांची व माझी अलीकडे भेट होत नाही. एक्साईट होऊन जास्त माहिती बाहेर द्यावयाची नसते तुम्ही सर्व आकडे बाहेर दिले. त्याचा परिणाम असा झाला त्यामुळे आमच्या ज्ञानामध्ये भर पडली, बजेटचे पुस्तक मिळाले नाही पण आकडेवारीचे कागद आम्हाला मिळाले. दुष्काळासाठी 3,360 कोटी रुपये तरतूद केली आहे व ती करावयास पाहिजे. दुष्काळाचा विषय वेगळा आहे. शेतकऱ्यांना काय मदत करता येईल विषय अधिक महत्वाचा आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मागील वर्षी 10 हजार कोटी रुपये तरतूद केली होती. त्यासंबंधातील कागद माझ्याकडे आता नाहीत. यावर्षी ती तरतूद आपण 9 हजार कोटी रुपये करुन खाली आणली. हा शेतकऱ्यांचा अर्थसंकल्प आहे असे सरकारने सांगितले असले तरी त्याच्या विरोधी कृती केल्याचे अर्थसंकल्पातील आकडेवारीतून दिसून येते.

यानंतर HH-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

आपण सांगितले की, हा शेतकऱ्यांचा अर्थसंकल्प आहे. त्यांच्या विरोधी कृती आपल्या अर्थसंकल्पातील आकडेवारी बघून होते. आपण 10, 10.5 हजार कोटी रुपयांची तरतूद केली. या गुलाबी पुस्तकात कृषी व संलग्न सेवा यासाठी असलेल्या गुलाबी पुस्तकात तक्ता क्रमांक 2 वर अनुक्रमांक 1 मध्ये लिहिलेले आहे की, मागच्या वर्षी सुधारलेले अंदाज 10505 कोटी रुपये आणि राज्याच्या शेतकऱ्यांच्या कृषी व संलग्न सेवांसाठी या वर्षी 9349 कोटी रुपये दिले आहेत. आपण हा खर्च कमी केला आहे. एका बाजूला आपली दोन अडीच पाने व त्यामधील भावनिक आवाहन महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचले आहे. पण त्यानंतर ती जनत उत्सुकतेने टी.व्ही.समोर बसली आणि त्यांना वाटले की, फार चांगले केले आहे. पण आपल्या तरतूद कमी आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आपण या अर्थसंकल्पातून शेततळ्यांसाठी 2000 कोटी रुपयांची घोषणा केली आहे. आपण घोषणा केली त्याबद्दल आनंद आहे. आपला तसा प्रयत्न आहे. पण महाराष्ट्रातला शेतकरी आडाणी आहे, त्याला काही कळत नाही, अज्ञानी आहे, त्याला आपण कसेही फसवू शकतो, काहीही केले तरी चालू शकते असे थोडेसे भावनिक आवाहन केले तरी "सब कूछ हो जाएगा". हळूहळू ही जी आपली मानसिकता व्हायला लागली आहे, आपण तसे नाहीत हे मला माहिती आहे. पण आपल्या माहितीसाठी सांगतो की, 2009-10 ते 2011-12 या राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि रोजगार हमी योजनेंतर्गत दर वर्षी आपण महाराष्ट्रामध्ये 80 ते 90 हजार शेततळ्यांचा इष्टांक ठेऊन आपण कामे पूर्ण करण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. आता हीच योजना आपण वेगळ्या शब्दात सांगत आहात, त्याबद्दल माझी तक्रार नाही. पण यामध्ये वार्षिक इष्टांक 50 हजार इतका कमी का केला. 80 ते 90 हजार शेततळी निघत असताना आज आपण एकदम 50 हजार संख्येवर आलो आहोत. 30x30x3 मिटर्स डेप्टचे एक शेततळे काढावयाचे असेल तर आपण त्यांना 82 हजार रुपये अनुदान देत होतो. आपण राणा भिमदेवी थाटात घोषणा केली की, 50 हजार शेततळी बांधू. पण त्यांचा खर्च आपण 50 हजार रुपयांपर्यंत मर्यादित केला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

2......

श्री. जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात शेतकऱ्यांची संख्या अर्थमंत्र्यांना माहिती असेल. ही संख्या 1 कोटी 37 लाख आहे. मग वार्षिक 50 हजार शेततळी आपण सांगतो आहोत. किमान 1 लाखापर्यंत तरी महाराष्ट्रात शेततळी निर्माण करावीत. पण आपण "मागेल त्याला शेततळे" ही योजना आणली आहे. बरेच लोक ऐकत असतात, वाचत असतात. काही वेळेस शेततळ्याची डिमांडही नसते. पण त्यांना वाटते बघा सरकार किती चांगली घोषणा केली की, मागेल त्याला शेततळे. त्या बिचाऱ्याने शेततळ्यामध्ये काय करायचे, तर शासनाकडे ऑनलाईन अर्ज करायचा. अध्यक्ष महोदय, आपण शेतकरी आहात, आपण अनेक वर्षे शेती केलेली आहे. समजा, आपल्याला ऑनलाईन अर्ज करण्यास सांगितले तर, की आज संध्याकाळी आपल्या दालनातून एक ऑनलाईन अर्ज करु या सरकारकडे....

**अध्यक्ष :** आता पोरासोरांना हे ऑनलाईन अर्ज करता येतात.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपण त्या तरुण मुलांना अर्ज करायला सांगतो की, ज्याच्या घरात जेवायला अन्न नाही. पिण्याच्या पाण्यासाठी भ्रांत आहे. त्याच्याकडे मोबाईल फोन आहे, त्याच्याकडे कॉम्प्यूटर आहे आणि त्याने कोठे तरी जाऊन सेवा करावी, असे गृहित धरायचे नसते. आपला अर्थसंकल्प गरीबातल्या गरीब माणसासाठी असला पाहिजे. आपण जरा बऱ्यापैकी परिस्थिती असणाऱ्यांचा विचार करुन अर्थसंकल्प मांडायला लागलो तर या देशातल्या आणि या राज्यातल्या झोपडीत राहणाऱ्या गरीबाने कुणाकडे बघायचे, हा प्रश्न विचारात घेऊन अर्थसंकल्प मांडायचा असतो. त्यामुळे ऑनलाईनची प्रक्रिया काढा, बिडीओकडे अर्ज पाठवा आणि आपला हट्ट असेल तर ऑनलाईन प्लस बिडीओ असे करा, अशी माझी कृपा करुन विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अन्न सुरक्षा योजनेतून आपण धान्य पुरवठा करीत आहात, ही चांगली गोष्ट आहे. विदर्भ, मराठवाड्यातील 14 जिल्ह्यांसाठी आपण ही योजना राबवित आहात. पण राज्यकर्त्याने कोणत्याही विभागाचा राज्यकर्ता असला तरी राज्य आपलं आहे असे समजून दुष्काळ असणाऱ्या, संकटात असणाऱ्या प्रत्येक जिल्ह्याला मदत करावयाची असते. दुष्काळ मराठवाड्यात आहे काय, तर आहे. विदर्भात आहे काय तर त्यासंबंधी आज सकाळीच चर्चा झाली. कोर्टाने आता आपल्याला आदेश दिले की, हेही दुष्काळी भाग समजावेत, त्यानुसार तेही आपण समजणार

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

आहात. पश्चिम महाराष्ट्रात काही तालुके आहेत, ज्यांची 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आहे. खान्देशामध्ये काही तालुके 50 पैशापेक्षा कमी आणेवारीचे धुळे, नंदूरबार आणि नाशिक जिल्ह्यामध्ये आहेत. जळगावमध्ये जलसंपदा मंत्री सन्माननीय श्री. गिरीश महाजन तेथील असल्यामुळे तेथे 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी येऊ शकत नाही, अशा आर्विभावात त्यांच्याकडे नाही बघितले तरी चालेल. पण कोकणात देखील परिस्थिती फार वाईट आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, ही योजना विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ज्या ठिकाणी 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आली आहे त्या सर्व गावातील लोकांसाठी ही योजना एक्स्टेंट करावी अशी माझी त्या जनतेच्या वतीने विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय अर्थमंत्र्यांनी आणखी एक घोषणा केली की, पालकमंत्री पांदण रस्ते योजना असे या योजनेचे नाव आहे. आमचे सन्माननीय सदस्य श्री. बाळासाहेब थोरात महसूल मंत्री होते. त्यांनी अनेक चांगल्या योजना केल्या होत्या. त्यामध्ये सुवर्ण जयंती राजस्व अभियानाच्या अंतर्गत त्यांनी एक चांगली योजना सुरू केली होती. लोकसहभागातून आपण महाराष्ट्रामध्ये पांदण रस्त्यांची कामे केली आहेत. अतिक्रमणे बाजूला करुन रस्ते निर्माण केले. रस्ते नसतील आणि लोकांची मागणी असेल तर त्या ठिकाणी रस्ते केले. कोट्यावधी रुपयांची कामे महाराष्ट्रात त्यावेळी झाली आहेत. आपल्या सर्वांना ते माहिती आहे, कारण ती आपापल्या मतदार संघामध्ये झाली आहेत. आज आपण पालकमंत्री पांदण रस्त्यांसाठी 100 कोटी रुपये देत आहोत. त्यामध्ये आणखी एका बाबीचा समावेश केलेला आहे की, मशिनरी खरेदी करण्यासाठी पालकमंत्र्यांना बरे वाटतील, बरे दिसतील अशा लोकांना मशिनरी खरेदी केल्यावर त्यांना व्याजाची पूर्ण रक्कम देण्याची आपली योजना आहे. महाराष्ट्रात मुंबई सोडले तर इतर 30-35 जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येणार आहे. मी उद्या समजा, एखादे पोकलॅन मशिन घेतले, एखाद्याने बुलडोझर घेतला तर त्याचे व्याज माफ करण्यासाठी आपण निघालो आहोत. राज्यात लाखो किलोमिटर्सचे पांदण रस्ते आहेत. हे 100 कोटी रुपये कुठे मुरतील ते कळायचे पण नाही. एमआरईजीएस मधून आपण यामध्ये भर घातली पाहिजे. त्याला सपोर्ट दिला पाहिजे. पण त्या पलिकडे जाऊन सांगतो की, आपण जी मशिनरी खरेदी करणार आहात त्याच्या व्याजामध्ये सूट देणार आहात. त्यामुळे लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे की, आपण यामध्ये कोणाची निवड करणार आहात. आपल्या

4......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

पालकमंत्र्यांचे जवळचे असणार काय, त्यांच्या ओळखीचे असणार काय, यापूर्वी आपण नेहमी आमच्यावर आरोप करायचे की, आम्ही आमच्या बाजूच्या जवळच्या नातेवाईकांसाठी अशा योजना करतो. आता अलिकडेच अर्धी चड्डी जाऊन आता फुलपॅन्ट आलेला आहे.

**अध्यक्ष :** या ठिकाणी त्याचा काहीही संबंध नाही. या चर्चेशी त्याचा काही संबंध नाही.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी कोणाचे नाव घेतलेले नाही. मी कुणाचा अनादर करीत नाही. मला उलट त्याबद्दल आदर आहे.

**अध्यक्ष :** पण चड्डीवर का अन्याय करीत आहात.

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला वाटते अर्धी चड्डी चांगली होती. अगदी माननीय नितीन गडकरींपासून माननीय मुख्यमंत्र्यांना आम्ही त्या अर्ध्या चड्डीत बघितले आहे आणि ते छान दिसते, शोभून दिसते. मला आश्चर्य वाटते की, फुलपॅन्टचा का असा निर्णय घेण्यात आला आहे. इतरांपेक्षा आमचा पक्ष, आमचा विचार, आमची विचारधारा वेगळी आहे असे सांगणारे आपण सर्व आता अर्ध्या चड्डीला लाजायला लागलेत. अध्यक्ष महोदय, आमच्या जिल्ह्यातील बरेचजण भारतीय जनता पक्षामध्ये जाऊन आमदार झाले आहेत. आम्ही त्यांचे फोटो हुडकत होतो की, कोण कोण अर्ध्या चड्डीत दिसते काय, पुण्याचे सन्माननीय सदस्य श्री. लक्ष्मणराव जगताप यांचे फोटो बाहेर लोकांमध्ये आणि व्हॉटॲपवर एवढे मेसेज येत होते की, त्या श्री. लक्ष्मणराव जगताप यांनी हात जोडले की, अरे आता थांबा. आपल्याशी निष्ठा दाखविण्याचा हे सर्व प्रयत्न करीत आहेत, त्याबद्दल मला आनंद आहे. आमच्याकडून तुमच्याकडे आलेल्या सर्वांना मागचीच बाके देण्यात आली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. लक्ष्मणराव जगताप यांच्या अर्धा चड्डीवरील फोटो लोकप्रिय झाला आहे.

यानंतर II-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..........

अध्यक्ष महोदय आपण चड्डीचे महत्त्व काय विचारले म्हणून मी हे सांगितले. 100 कोटी रुपयांच्या या योजनेत लाभधारक कोण याचाही खुलासा राज्याच्या अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात करायला पाहिजे. भाषणात त्यांनी अडचणीत असलेल्या वेगवेगळ्या समाजातील लोकांची, घटकांची नावे घेतली. त्याच घटकांना देणार असे माननीय अर्थमंत्री महोदयांनी याठिकाणी उभे राहून सांगावे. याचे धोरण जाहीर करावे की, कोणी असे पोकलॅन घेतले, अर्थ मोहिम मशनरी घेतली, कोणासाठी ही योजना आहे याचे स्पष्टीकरण झाले नाही तर मी मघाशी म्हटले तसे होण्याची दाट शक्यता आहे.

अध्यक्ष महोदय, पंजाबराव देशमुख व्याज सवलत ही जुनीच योजना आहे. माझी सरकारला एक सूचना आहे की, व्याजाच्या सवलतीपेक्षा शेतकऱ्याला कर्ज माफ करत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आम्हाला वाटेल त्यावेळेस कर्ज माफ करू. किती लोकांच्या आत्महत्या झाल्यानंतर कर्ज माफ करणार हे माहिती नाही. मुख्यमंत्री महोदय हुशार आहेत, निर्णायक आहेत, योग्य वेळी विचारपूर्वक निर्णय घेतील. व्याज सवलतीपेक्षा एखादी अशी योजना असायला पाहिजे की, कदाचित उद्या पाऊस पडेल. जी परमेश्वराकडे आपण सर्व प्रार्थना करतो. ज्याच्या घरात चार वर्षापासून दुष्काळ आहे तो पाऊस पडल्यानंतर त्याच्याकडे बियाणे आणण्यासाठी, नांगरट करण्यासाठी प्राथमिक कामासाठी शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज देण्याची योजना शासनाने शेतकऱ्यांसाठी आणली पाहिजे. अशी योजना आणली नाही तर पुढच्या वर्षी महाराष्ट्रात पाऊस आहे. पण घरात काही नाही म्हणून आम्ही काही करु शकलो नाही. त्याची पुन्हा एक संधी वाया गेली तर मराठवाडा, विदर्भ आणि दुष्काळी भागातील शेतकऱ्याला दुसरा कोणता पर्याय राहणार नाही.

अध्यक्ष महोदय, पंडित दिनदयाळ उपाध्याय कृषी मार्गदर्शक योजना आहे. आत्मा सारखी योजना सरकारने बंद केली काय? याचा खुलासा व्हावा. हा शेतकऱ्यांचा अर्थसंकल्प आहे म्हणून कृषी महोत्सव साजरा केला. प्रत्येक जिल्ह्यामध्ये हा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. राज्यामध्ये सगळीकडे दुष्काळ आहे, दुष्काळाला सर्व तोंड देत आहेत. शेतकऱ्यांना थेट मदतीची योजना जाहीर केली असती तर समजू शकलो असतो. पण सुगीच्या दिवसात महोत्सव साजरा

.......2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

करतो. आता दुष्काळ आहे, विहिरीत पाणी नाही, हाताला काम नाही, शेतात पीक नाही. रोजगार हमीची कामे उपलब्ध होत नाही आणि कृषी महोत्सव करण्याची कल्पना कशी काय सुचते. शेतकऱ्यांच्या दारामध्ये संकट आहे, घराघरामध्ये अन्न नाही सरकारला अन्न द्यावे लागत आहे. अशा शेतकऱ्याला कृषी महोत्सव साजरा करायला सांगणे हा विरोधाभास आहे असे मला वाटते. म्हणून माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे की, आता भाषणे नकोत. आता शेतकऱ्याला प्रत्यक्ष मदत करण्याची गरज आहे. मदत करीत असताना सर्वांना विनंती आहे की, या कृषी महोत्सवाची खरोखर गरज आहे काय? सर्व आलबेल होऊ द्या. मग करा, आमचा विरोध नाही. पॉझिटिव्ह राहिले पाहिजे याबाबत माझ्या मनात शंका नाही. आज परिस्थिती उलटी आहे. राज्य दुष्काळाने होरपळत आहे, अशा वेळी कृषी महोत्सवासारखी कल्पना अर्थसंकल्पात मांडून त्याची चेष्ठा करतो की काय याचे आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सेंद्रीय शेतीला चालना देण्याचा प्रयत्न केला, विचार चांगला आहे, कल्पना चांगली आहे. यात महत्व कशाला तर शेतीला प्रमाणिकरणाची व्यवस्था करण्याची गरज आहे. कृषी विद्यापीठाला 2-2 कोटी रुपये देणार आणि सांगणार केंद्र सुरु करा याने समाधान होणार नाही. प्रमाणिकरण करण्याची व्यवस्था करा. लोक सेंद्रीय शेती करायला सुरुवात करतील. सेंद्रीय शेती करण्यासाठी आपल्या मार्गदर्शनाची गरज आहे. पण ती नंतर करा अशी माझी विनंती आहे. मघाशी चड्डी योजना सांगितली तशी आणखी एक योजना काढलेली आहे. गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र सुरु करण्याची घोषणा केली. याआधी गोवंश हत्या बंदी केली. शेतकऱ्यांना जनावरांचे काय करायचे समजेनासे झालेले आहे. चाऱ्याच्या छावण्या सुरु करायला सांगितल्यातर तीन जिल्ह्याशिवाय कोणत्याच जिल्ह्यात सुरु करण्यात आलेल्या नाहीत. सन्माननीय सदस्य श्री.अनिल बाबर, सन्माननीय सदस्य विलासराव जगताप याठिकाणी बसलेले आहेत. यांच्या जिल्ह्यात किती दुष्काळ आहे हे सर्वांना माहिती आहे पण चाऱ्याच्या छावण्या चालू नाहीत. चारा छावण्या नसल्यामुळे जनावरांचे काय हा प्रश्न निर्माण होतो आहे. चारा छावण्या काढा, लोकांना मदत करा. राज्य संकटात आल्यावर दिलदारपणाने सढळ हस्ताने मदत करायची असते. परंतु सरकारने गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र निर्माण करायला लागलात. प्रत्येकाला एक कोटी रुपयांची मदत देणार आहात.

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

सन्माननीय सदस्या श्रीमती स्नेहलता कोल्हे यांना माझी विनंती आहे की, तुमच्या तालुक्यामध्ये गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र घेऊन दाखवा. तुम्ही आता त्या पक्षात गेलात, तुम्हाला नाही मिळणार. पण कधी ज्याचे नाव ऐकले नसेल अशा माणसाला हे गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र मिळणार. ही एक कोटी रुपयांची रक्कम मिळणार. शासनाची जमीन द्यायला सरकार तयार आहे. सन 2016-2017 मध्ये 34 कोटी रुपयांची तरतूद देखील आहे.

अध्यक्ष महोदय, सिंचनाचा विषय महाराष्ट्रात फार महत्वाचा आहे. या सिंचनामध्ये तरतूद केली. तरतूद करीत असताना इकडे बसलेले सर्व आमच्यावर टीका करायचे. टीका करीत असताना महाराष्ट्रातील बॅकलॉक दूर करण्यासाठी 3 ते 3.5 कोटी रुपयांची रक्कम हळूहळू वाढत 6 हजार, 8 हजार, 10 हजार जाहीर शेवटी एकदा 12 हजार कोटी रुपये जाहीर केली. तपशीलात बघा दुसऱ्यांदा प्रोव्हीजन केली. मघाशी त्यांनी चूक झाली तरी कबूल केली नाही. आपले तसे नाही. जास्त खर्च करण्याची प्रवृत्ती आमच्या सरकारने दाखविली. आज महाराष्ट्रातील बॅकलॉक कमी करण्याचे श्रेय कोणते असेल तर ते म्हणजे कै.विलासराव देशमुख असताना इंडीकेटर बॅकलॉक समितीचा अहवाल आम्ही स्वीकारला. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे सन 2003-2004 पासून व्हायला लागली. त्यावेळी महाराष्ट्रातील सर्व विभागांना माननीय राज्यपाल सांगतील तसे पैसे खर्च करायचा प्रयत्न केला. जास्त खर्च होतो म्हटल्यानंतर हा पैसा दिल्यावर बॅकलॉक दूर होणार. आपण 7 हजार 800 कोटी रुपये दिले. मागच्यावेळी 7 हजार 200 कोटी रुपये दिले. आज 12-13 हजार कोटी रुपयांपर्यंत न पोहचल्यामुळे विदर्भाची एकत्रित विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय अंतिम नियत वाटप झाले त्यात मागच्या वर्षीपेक्षा विदर्भाला 150 कोटी रुपये कमी मिळाले. सत्तारुढ पक्षात असताना असे शांत कधी बसला नव्हता. पण मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. मी त्यांचे नाव घेतलेले नाही. सभागृहामध्ये अनेक डॉक्टर आहेत. मी नाव घेतले नाही तर माझ्यावर अन्याय का. महाराष्ट्रामध्ये एकमेव डॉक्टर आहेत असा त्यांचा समज झ ाालेला दिसतो.

डॉ.सुनिल देशमुख : अध्यक्ष महोदय सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील वारंवार माझे नाव

......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुनिल देशमुख......

घेत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या माझ्या स्थानाला प्रश्नांकित आणि चिन्हांकित करण्याचे काम करीत आहेत. माझ्या राजकीय अस्तित्वाचा प्रश्न आहे. माझे भविष्य खराब करण्याचे काम कृपया करु नये. मी याठिकाणी सुखी-समाधानी आहे. यांनी विदर्भाला किती उदारमनाने विदर्भाला पैसा दिला ते मी माझ्या भाषणामध्ये सांगणार आहे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, हे राज्यामध्ये माझ्याबरोबर राज्यमंत्री म्हणून काम करीत होते. काम करीत असताना माझ्याबरोबर कधी तक्रार करता आली काय? मी त्यांच्याबद्दल चांगले बोलल्यामुळे माननीय श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महोदय त्यांना मंत्रिमंडळात घेणार नाहीत हा गैरसमज कसा काय तयार झाला. मी तुमच्याबद्दल चांगले बोललो, तुमचे चांगले गुण सांगत राहिलो तर ते तुम्हाला मंत्रिमंडळात घेतील.

JJ-1..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील..........

मला काही समजत नाही. एखाद्याचे हित चिंतायचे असेल तर किती प्रामाणिपणे मदत आणि प्रयत्न चालले आहेत. 5360 कोटी रुपये ही विभाज्य नियतव्ययाची विगतवारी आहे. 5300 कोटी रुपयाने महाराष्ट्रातील वेगवेगळया भागाचे भल कसे होणार. येथे सन्माननीय सदस्य श्री.शिवाजीराव नाईक बसलेले आहेत. वाकुर्डे योजनेला मागच्या काळात कमी निधी दिला. या सभागृहातील प्रत्येक सन्माननीय आमदारांना प्रोजेक्ट पूर्ण व्हावा असे वाटत असते. 5300 कोटी रुपयात या महाराष्ट्रातल्या उर्वरित सगळया भागातील विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातल्या प्रोजेक्टना 0, 50, दहा हजार, एक लाख, एक कोटी, अडीच हजार कोटीचा प्रोजेक्ट यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केली. हे प्रकल्प आपण कधी पूर्ण करणार. महाराष्ट्राला सिंचनाची तरतूद जास्त केल्याशिवाय महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील व्यवस्था सुधारणार नाही. हे आम्हाला या ठिकाणी सांगायचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, जलयुक्त शिवारामध्ये 24 टी.एम.सी. पाणी अडविले आहे. आपले काम फ्लेक्सिबल आहे. 24 टी.एम.सी. पाणी कशाला म्हणतात हे माहीत आहे का ? इतक्या मोठया प्रमाणात पाण्याचासाठा जर झाला तर पण पाऊस वरुन पडला नाही. सिंचनाची गरज जाणीवपूर्वक वाढविली पाहिजे. तेलंगणा सारख्या राज्याने 26 हजार कोटी रुपयांची तरतूद केली. महाराष्ट्रातील सर्वाधिक 452 जास्त प्रकल्प आपल्याकडे आहेत. मी 50 हजार कोटी रुपयांची तरतुद करा असे म्हणणार नाही. किमान 12, 13, 14, 15 हजार केली तर त्या त्या आमदारांना वाटते बरच जोरात काम चालू आहे. मतदार संघातील वातावरण टिकविण्यासाठी काम चालू आहे असे दाखविले पाहिजे. या सभागृहातील 70 टक्के आमदारांना आता मतदार संघात गेल्यावर काम चालू नाही याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही. स्मार्ट गावाची योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना मागच्या वर्षी होती. खरे म्हणजे मागच्याकाळामध्ये आम्ही धोरण ठरविले होते. त्याची मुहूर्तमेढ कधी लावायची याचा निर्णय झाला नाही. मागच्या अर्थसंकल्पात आपण घोषणा केली. काम सुरु झाले नाही. मागच्यावर्षी मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना होती. शब्दांचा बदल आणि शब्दात कसे माणसांना खेळवायचे हे श्री.सुधीर भाऊ तुमच्याकडून शिकले पाहिजे. ग्रामीण मार्ग योजनेच्या ऐवजी ग्राम

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .......

सडक योजना नावाने योजना काढली. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत पुढील काळामध्ये 2500 कोटी रुपये तरतूद याच्यावर करणार आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक योजना हीची मगाशी सांगितल्याप्रमाणे फार मोठी संख्या आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, पुढच्या वर्षी अर्थसंकल्प मांडण्याच्या अगोदर भाषणच्या प्रती 8 दिवस अगोदर देता येतील का ? अस काही करता आले तर पहावे.

श्री.जयंत पाटील : आपला आकडा फिक्स आहे. हा फ्लेक्सिबल नाही. तुम्ही असे बोलून माझी फ्लेक्सिबिलीटी कमी करायला लागला आहात.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील तुम्हाला वेळ मिळत नाही असे म्हणता. आपले भाषण सुरु होऊन 50 मिनिटे झाली आहेत.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, माझे भाषण लवकर संपवितो. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना घ्या, मागचे पूर्ण वर्ष पाणीपुरवठयाच्या विषयात फुकट गेले. केंद्र सरकारने सांगितले आम्ही राज्यांकडे दिले आहे. राज्याने म्हटले आम्हाला किती दिले ते माहित नाही. मला आठवते राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये मागच्यावेळी चर्चा उपस्थित केलेली होती. त्या चर्चेमध्ये सांगितलेले होते की, केंद्र सरकारने अनेक योजना हातामध्ये घेतलेल्या असल्यामुळे नव्या योजना घेऊ नका असे आम्हाला सूचविले आहे. आता आम्ही नव्या योजना घेत नाही. बरेच आमदार यावेळी नीवन निवडून आले आहेत. मतदार संघात एकही नवी योजना चालू झाली नाही. पाणीपुरवठा योजना हा एवढया गांभीर्याने अतिशय महत्वाचा प्रश्न असतो. त्यामुळे महाराष्ट्रात सुमारे 3500 योजना बंद आहेत. पूर्वीचे नाव बदलून आता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम ही नवी योजना आणली. आगामी काळात बजेटमध्ये म्हटले आहे की, 2500 कोटी रुपये प्रस्तावित आहेत. त्यात आता 500 कोटी या वर्षी दिलेले आहेत. माझी आपणाला नम्र विनंती आहे की, महाराष्ट्रात दरवर्षी 1800 ते 2000 कोटी रुपयापर्यंत रक्कम किमान 1100 ते 1500 कोटी रुपयाची रक्कम खर्च केल्याशिवाय आपल्याला काही झाले तरी पाणी पुरवठयाचा प्रश्न समाधानकारक सोडविण्यात यश येणार नाही. ही तरतूद माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषणात वाढवावी आणि महाराष्ट्रातल्या बंद पडलेल्या पाणी योजनांना थोडासा दिलासा द्यावा.

..3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील ............

अध्यक्ष महोदय, ज्यांच्या पाठींब्याने, आर्शिवादाने काम करतो त्यांच्यासाठी तरतूद भक्कम असावी. श्री बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्राम पंचायत व महिला सक्षमीकरण अभियान असे एक मोठे अभियान निर्माण केलेले आहे. एवढया मोठया नावाचा श्री.सुधीर भाऊ शॉर्टफॉर्म काढतील. महाराष्ट्रात 3000 ते 3500 ग्रामपंचायती आहेत. त्यांची कार्यालये अजून उभी राहिलेली नाहीत. ग्रामपंचायतीची इमारत नाही. 3500 राहीले नाहीत. त्याच्याआधी 5500 पूर्ण झाले. तुम्हाला कामाची संधी द्यावी म्हणून शिल्लक ठेवले आहे. सर्वच काम आम्ही केले तर हे सत्तेवर आले असते तर पुढे काय करणार, आम्ही विचाराने सत्ता सोडलेली आहे. पूर्ण विचारांती सत्ता सोडलेली आहे. आमचे प्लॅन पूर्वक पाऊल पडलेले आहे. मला हे सांगायचे आहे की, यामध्ये ग्रामपंचायतीचे बांधकाम, तांत्रिक मनुष्यबळ, प्रभाग, जिल्हा परिषद प्रभाग बळकट करणे, ग्रामपंचायतीचे आर्थिक, भौतिक नियोजनात, महिलांचा, लोकसंस्थाचा सहभाग वाढविणे याच्यासाठी तरतुद किती एक कोटी रुपयांची. अरे जनाची नाही तरी मनाची तरी बाळगा.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरेंच्या नावाने ही पहिली योजना आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील ही महाराष्ट्रातील ग्रामीण भागात पोहचविण्याची व्यवस्था आहे. तुमच्या सर्व मंत्री महोदयांनी आग्रह केला असेल पण तरतूद देताना तुमचा हात अडखळला. व अडखळताना एक कोटी रुपयांची तरतूद केली. राज्याच्या अर्थ मंत्र्याने बघायचे असते विभागाने केली असे म्हणून चालत नाही. जबाबदारी वित्त मंत्र्याची असते. आपण अर्थसंकल्प मांडला आहे. माननीय श्रीमती पंकजा मुंडे यांनी मांडलेला नाही. श्रीमती पंकजा मुंडेवर यातील काही ढकलू नका. मला दोन तीन महत्वाचे मुद्दे मांडायचे आहेत.

अध्यक्ष महोदय, उद्योजकांना वीज सवलत देण्याचा एक चांगला निर्णय केला. मराठवाडा आणि विदर्भातील उद्योजकांची नवीन इनव्हेस्टमेंट येईल त्यांना एक हजार कोटीचे अनुदान देणार आहे. आपणच विचार करा. औरंगाबाद जिल्हयामध्ये असणा-या सगळया उद्योगांना 7 रुपयाचा वीज दर लागतो. उदाहरण म्हणून सांगतो नवीन इनव्हेस्टमेंट करणार त्याला 6 रुपयाचा वीज दर. हा दर जुन्या उद्योगांना आहे का ? तसे म्हटलेले नाही. तुम्ही वाचा तोपर्यंत मी सांगतो.

**अध्यक्ष** : जे आहे ते तुम्ही मान्य करा. भाषण सुरु ठेवावे.

KK-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, विदर्भ व मराठवाडयात नवनवीन उद्योग यावेत व औद्योगिक वीज वापर वाढावा याकरिता औद्योगिक घटकास सर्वसाधारण प्रोत्साहनात्मक बाबीवर वीज दरात सवलत सवलत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. याकरिता सुमारे 1000 कोटीची तरतूद केलेली आहे.

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी औद्योगिक घटकापासून परत पुढे वाचावे म्हणजे लक्षात येईल.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, दोन्ही विभागात अधिकाधिक नवीन उद्योग यावेत असे लिहिलेले आहे. म्हणजे नवीन उद्योगाला सवलत आहे की नाही ? जुन्या उद्योगालाही सवलत असेल तर आम्हाला हेच पाहिजे होते. पण आपण डायरेक्ट तरतूद केलेली दिसत नाही. नवीन उद्योगांनाही सवलत देणार असाल तर 1000 कोटी कमी पडतील. आपण ठोक तरतूद 1000 कोटी रुपये सांगण्याऐवजी युनीटला आम्ही 20 पैसे, 50 पैसे, 1 रुपया देणार आहोत अशी उत्तराच्या भाषणात घोषणा केली तर लोकांच्या ज्ञानात अधिक भर पडेल असा मला विश्वास आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पात वेगवेगळे मुद्दे आहेत पण एक नवीन कल्पना आणली आहे. हायब्रीड ॲन्युएटी मॉडेल असे एक नवीन मॉडेल माननीय अर्थमंत्री यांच्या भाषणात आहे. तुमच्या उत्तराच्या भाषणात हायब्रीड ॲन्युएटी मॉडेल म्हणजे काय हे सांगितले तर बरे होईल. आपण बांधा वापरा हस्तांतरीत करा या बीओटी तत्वावर कल्याण शीव हा रस्ता घेणार आहात. आपण टोल बंद केलेला आहे. टोलचे नवीन रस्ते सुरु करावयाचे नाहीत असे आपण ठरविलेले आहे. अस्तित्वात असलेले बरेचसे टोल बंद करण्याची अपेक्षा आहे. नव्या पध्दतीने नवा टोल चालू करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे का ? हे आपल्या उत्तराच्या भाषणातून कळणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, स्मार्ट सिटीमध्ये मुंबई शहर घेतलेले नाही. पुणे व सोलापूर घेतलेले आहे. जोपर्यंत मुंबई ताब्यात येत नाही तोपर्यंत मुंबईला स्मार्ट करायचे नाही असे तुमचे काही धोरण आहे का ? मुंबई शहर आपली राजधानी आहे. पण सरकारने मुंबई शहरावर लक्ष द्यावे. काल सभागृहात श्री.श्रीहरी अणे प्रकरणावरुन गोंधळ चालू असताना माननीय मुख्यमंत्री एमएमआरडीएमध्ये जाऊन बसले. मुंबई शहरात कोणकोणते प्रकल्प चालू करायचे आहेत, याचा निर्णय करुन ते आले. त्यामुळे त्या विषयावर मी जास्त बोलणार नाही.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अध्यक्ष महोदय, मला आपल्या निदर्शनास आणावाचे आहे की अर्थमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या तरतूदीचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये रोजगार हमी योजनेचे 3500 हजार कोटी, विद्युत पंप वीज दर सवलत 3500 कोटी या जुन्या योजना आहेत. अशी 25 हजार कोटीची बेरीज केलेली आहे ती महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी आहे असे मला येथे सांगावयाचे आहे. अर्थमंत्री महोदयांनी दिनांक 18 मार्च रोजी अर्थसंकल्प मांडला आहे. त्यानंतर 24 तासाच्या आत नाशिकला आमच्या शिवसैनिकांनी प्रचंड मोठा मोर्चा काढला होता. सध्या श्री.श्रीहरी अणे प्रकरणामुळे शिवसेनेचे सदस्य आमच्या बाजूने आहेत. पण त्यांनी मघाशी शेपूट घातले. काय झाले कोणास ठाऊक. नाशिकमध्ये घोषणा करणारे सरकारमध्ये आहेत. तेथे घोषणा दिल्या की, खान्देशवर अन्याय करणारे सरकार, विदर्भाला झुकते माप देणारे सरकार, आपकी बार घोषणा सरकार. तुमचाच मित्र पक्ष तुमच्या सरकारमध्ये आहे. मांडीला मांडी लावून बसतो.

अध्यक्ष महोदय, हे बजेट आत्मस्तुतीचे आहे. तुम्ही तुमच्या मुत्रपक्ष, मित्रपक्षाला खुश करु शकत नाही.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**अध्यक्ष** : सदरील शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येत आहे.

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, अतिशय विद्वान सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील येथे भाषण करीत आहेत. आम्ही अतिशय खिलाडूपणे त्यांचे मनोगत ऐकत आहोत. मला वाटते की, या सभागृहाची एक मर्यादा आहे, संस्कृती आहे. त्यांनी पातळी सोडून असे बोलणे उचित नाही. पातळी सोडायची ठरली तर आम्ही त्या पुढील चार पातळया सोडू शकतो. आम्हीसुध्दा दुसऱ्याला अशा शब्दात बोलू शकतो. आम्ही का ऐकून घ्यावे ? तुमच्या विषयीही आम्ही काहीही बोलू शकतो.

**अध्यक्ष** : तो शब्द आपण रेकॉर्डवरुन काढून टाकला आहे.

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी वापरलेली भाषा योग्य नाही. त्यांनी माफी मागितली पाहिजे.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**अध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी तो शब्द परत घेतला आहे. तो शब्द आपण रेकॉर्डवरुन काढून टाकला आहे.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे भाषण आम्ही शांततेने ऐकत आहोत. ते बोलले की, आम्ही शेपूट घातली त्यावर आम्ही शांत बसलो. ते 4-5 शब्द वेगळे बोलले त्यावर आम्ही काही एक बोललो नाही. माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाकरिता 1 कोटीची तरतूद केली असेही ते बोलले, जे सत्य असेल ते आम्ही ऐकतो. पण मुत्रपक्ष असे शब्द वापरायला सन्माननीय सदस्य श्री.अजित पवारांचा रोग यांना झाला आहे का ? आम्हाला यांच्यापेक्षा भयानक बोलता येईल. आम्ही असे बोलायला लागलो तर हे सभागृहात बसू शकणार नाहीत.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाला सांगू इच्छितो की, माझी तशी बोलण्याची इच्छा नव्हती. आपल्या भावना दुखावल्या असतील तर मी माफी मागतो. माझा काही प्रॉब्लेम नाही. माझा तसा बोलण्याचा उद्देश नव्हता. माझी स्लीप ऑप टंग झाली आहे. माझ्याकडून चुकून असा शब्द उच्चारला गेला आहे, मी तो शब्द मागे घेतो. स्वाभावीकपणे त्यांच्या भावना दुखावल्या असतील त्याबद्दल मी त्यांची माफी मागतो. मी मुद्दाम बोललो नाही असे मी सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांना सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, काही सन्माननीय सदस्यांच्या भावना माझ्या बोलण्याने दुखावल्या असतील. तसेच आपणही सदरील शब्द रेकॉर्डवरुन काढलेला आहे.

अध्यक्ष महोदय, माझे भाषण पुढे सुरु करतो. शासनाने ज्यावेळी पेट्रोल डिझेलवर टॅक्स बसविला त्यावेळी मित्र पक्षाने पाकीटमार असा उल्लेख केला. यावर्षीही माननीय अर्थमंत्री यांनी ही पाकीटमारी कायम चालू ठेवलेली आहे. यावर मोठे संपादकीय लिहून आले. पेट्रोल डिझेल वाढीने मोठी टीका सरकारवर झाली. यावर्षी हा टॅक्स आपण दुष्काळामुळे चालू ठेवलेला आहे.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील .....

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी 2019 मध्ये कोणते प्रकल्प पूर्ण होणार आहेत हे सांगितले आहे. मेट्रो-3 ची व्हॅल्यू 23 हजार कोटीची असून आपण 90 कोटीची तरतूद दिलेली आहे. काल एमएमआरडीएमधूनही काही तरतूद केलेली आहे. आपण ट्रान्स हर्बर लिंकसाठी 1 हजार कोटी रुपये एमएमआरडीएमधून देणार असल्याचे सांगितले. राज्य सरकारकडून देण्यात येणाऱ्या पैशाबाबत आपण यामध्ये जास्त आग्रहपूर्वक काम करीत आहे असे दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, मेट्रो-3 करिता शासनाला आरे कॉलनीची जागा घ्यावयाची आहे. आपल्या युवा नेत्याने सांगितले की, तेथे हिरवळ राहिली पाहिजे. त्यामुळे तेथे आपणास हात लावता येणार नाही. त्यांनी ट्विटरवर हिरवळीचे महत्व सांगितले आहे.

यानंतर एलएल-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.जावडेकर साहेबांनी झाड एका ठिकाणाहून काढून दुस-या ठिकाणी लावण्याचे काहीतरी नवीन मशिन आणलेले आहे. त्या मशिनच्या आधारे झाडाच्या अवती भोवती जमिनीत अस काहीतरी घालून ते झाड काढून दुसरीकडे लावून जगविता येते. माननीय श्री.जावडेकर यांचे म्हणणे आहे की, या प्रकल्पाकरिता केवळ 350 झाडे काढावे लागतील. त्यांचे असे म्हणणे असले तरीही एमएमआरडीएचा असा दावा या प्रकल्पाकरिता एकूण 2300 झाडे काढावे लागतील आहे. याबाबत वाद आहे, विसंगती आहे. त्या भागातील लोकांचा याबाबत संघर्ष करण्याचा पवित्रा आहे. तरीदेखील शासनाने प्रत्येक प्रकल्प पूर्ण होण्याकरिता सन 2019 या सालाचा उल्लेख केलेला आहे. मला काळजी आहे याबाबतची मी हे सर्व प्रकल्पांबाबत बोलत नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस (खाली बसून): आपण याबाबत मध्यस्थी करावी.

श्री.जयंत पाटील : मी जर मध्यस्थी करावी, असे असेल तर सन 2019 मध्ये हे प्रकल्प पूर्ण होतील, याची आठवण ठेवून तुम्हाला आज या ठिकाणी असे म्हणत आहे की, सन 2022 मध्ये आम्ही तुम्हाला याच मेट्रोमधून घेऊन जाण्याकरिता निमंत्रित करीत आहोत. त्यावेळी आम्ही त्या बाजूला बसूनच आपल्याला निमंत्रण देणार आहोत.

अध्यक्ष महोदय, मुलुंड आणि देवनार येथील कचरा डेपोमध्ये जी आग लागत आहे, त्याची अवस्था व त्यामुळे होणारे प्रदूषण आपणा सर्वांना माहिती आहे. महानगरपालिकेपुढे या दोन डेपांचे डिस्पोजल कसे करावयाचे हा प्रश्न उभा आहे. ही आग या डेपांमध्ये वारंवार कोण लावत आहे ? याचा शोध घेतला पाहिजे. मागील वेळी या विषयावर लक्षवेधी सूचना लावण्यात आली होती. पुन्हा अधिवेशन चालू असतांना या डेपोमध्ये दोन वेळा आग लावण्यात आलेली आहे. विधीमंडळाच्या पाय-यांवर सन्माननीय सदस्या श्रीमती मनिषा चौधरी, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री.राज पुरोहित हे सकाळी कचरा डेपोच्या डिस्पोजल व त्यामुळे होणारे प्रदूषण या संदर्भात धरणे धरून बसले होते. मुंबईत यामुळे होणा-या प्रदूषणाकरिता काहीतरी मार्ग काढणे आवश्यक आहे, असे म्हणून त्यांनी महानगरपालिकेच्या कामावर यासंदर्भात आजच सकाळी असमाधान व्यक्त केलेले आहे. तुमचा कार्यक्रम ठरलेला आहे. मी कोणाचे नाव आता घेत नाही.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.....

त्यांच्या ताब्यात आता महानगरपालिका आहे. सभागृहात मुंबईसह सर्वांचा समान विकास करण्याचे धोरण आहे. मुंबई तुमच्या ताब्यात जरी नसली तरीही मुंबईच्या विकासाला गती व चालना देण्याची जबाबदारी माननीय अर्थमंत्री म्हणून आपलीच आहे. उद्या आपल्या ताब्यात महानगरपालिका येईल न येईल तो भाग वेगळा आहे. अर्थमंत्री महोदय आपण उत्तर देतांना आपल्या शासनाने पंधरा वर्षे काही केले नाही, ही भाषा आता बंद करा. आम्ही चुकलो म्हणून आम्हाला जनतेने येथे बसविलेले आहे. आता आपले सरकार स्थापन होऊन पंधरा सोळा महिने झालेले आहेत. या राज्याच्या अर्थसंकल्पामुळे काय होणार आहे, राज्य कोणत्या दिशेला घेऊन जाणार आहे, याचे उत्तर सर्वांना अपेक्षित आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री यांच्या बीजेपी पक्षाने अर्थमंत्री महोदयांचे अर्थसंकल्प जनतेच्या दारी हे पुस्तक मागील वर्षी अर्थसंकल्प मांडल्यानंतर वितरित केले होते. यावर मुख्यमंत्री महोदयांचा फोटो असेल किंवा नाही, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. परंतु यावर अर्थमंत्री यांचा फोटो आहे. या वर्षी अद्यापहि ते पुस्तक निघालेले नाही. पुढील वर्षी हे पुस्तक त्या बॅगेतूनच देण्यात यावे, म्हणजे या पुस्तिकेला उशिर होण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प मांडतांना त्यामध्ये समतोल राज्याचा विकास ही संकल्पना असली पाहिजे. त्याचप्रमाणे मंत्रिमंडळात देखील निधीवाटपाच्या दृष्टीकोनातून समतोल असणे आवश्यक आहे. शिवसेना पक्षाच्या मंत्रिमहोदयांच्या खात्यांकरिता एवढी कमी तरतूद आहे की, त्यांच्या समर्थकांना आता असे वाटत आहे की, शिवसेना पक्षाच्या मंत्री महोदयांनी मंत्रिमंडळात का राहावे ? सन्माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे जी खाती आहेत, त्या खात्यांकरिता 2805 कोटी रूपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय महसूल मंत्री यांच्याकडे असलेल्या सर्व खात्यांकरिता 2799 कोटी रूपये इतकी तरतूद केलेली आहे. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांच्याकडे असलेल्या खात्यांकरिता 1067 कोटी रूपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांच्याकडे असलेल्या खात्यांकरिता 1803 कोटी रूपये इतकी तरतूद केलेली आहे.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील.......

सन्माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकडे असलेल्या खात्याकरिता 3338 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे असलेल्या खात्यांकरिता 2859 कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय मंत्री श्री.गिरीश महाजन यांच्याकडे असलेल्या खात्याकरिता 7808 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. उर्वरित शिवसेना पक्षाच्या मंत्री महोदयांकडे असलेल्या खात्यांकरिता मात्र 20 कोटी, 50 कोटी, 35 कोटी, 40 कोटी रुपये इतकी तुटपुजी तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय अर्थमंत्री महोदयांनी अर्थमंत्री या नात्याने सर्व विभागांकरिता समान तरतूद करणे आवश्यक होते. बीजेपीच्या ताब्यात असलेल्या खात्यांकरिता भरघोस तरतूद करण्यात आल्याचे दिसून येत आहे. शिवसेना पक्षाच्या ताब्यात असलेल्या खात्यांकरिता तुटपुंजी तरतूद केल्याचे दिसून येत आहे. आमच्या शिवसेना या मित्रपक्षाच्या मनात वारंवार असा विचार येत आहे की, असे असेल तर या मंत्रिमंडळात का राहावे ? यात दुरुस्ती करावी. आपले सरकार सुखाने चालावे, अशीच आमची अपेक्षा आहे. परंतु आम्हाला काळजी वाटत आहे की, राज्यातील जनतेला आपण वारंवार जी आश्वासने दिलेली आहेत, ती पूर्ण होत नाहीत. राज्य आर्थिकदृष्टया संकटात जात आहे. एफआरबीएमच्या नियमांचे पालन करीत असतांना कर्ज कितीही काढा असे आम्ही सांगत नाही. परंतु खर्च ताब्यात ठेवा, असेच आम्हाला सांगता येईल. राज्याकरिता योग्य असा पाटबंधारे खात्याचा सर्व पैसा वितरित करण्यात आलेला आहे. अर्थमंत्री म्हणून केवळ सर्व पैसा वितरित करण्यासंबंधीची एवढीच जबाबदारी आपली नाही. प्रत्येक क्वार्टरला योग्य पैसा वितरित होऊन तो खर्च होतो का हे बघण्याची जबाबदारी देखील अर्थमंत्री महोदय यांची आहे. माझ्याकडे पुरेसा वेळ नाही अन्यथा सभागृहातील ब-याच आमदार महोदयांच्या मतदारसंघातील पाटबंधारे प्रकल्पांना किती व कसा निधी प्राप्त झालेला आहे, याचीही माहिती मी सभागृहामध्ये सादर केली असती. राज्य संतूलितपणाने पुढे नेण्यासाठी उत्पन्न वाढणे आवश्यक आहे. मागच्या वर्षीच्या उत्पन्नाचे आकडे या वर्षीही गृहित धरण्यात आलेले आहेत. दिनांक 31 मार्च नंतर आम्हाला या उत्पन्नाच्या आकडयांविषयी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती द्यावी, आम्ही या संबंधीचे पत्र आपल्याला देतो.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील....

शासनाने विक्रीकर कलेक्शनचे आकडे, स्टॅम्प डयूटी, एक्साईज डयूटीच्या कलेक्शनचे आकडे 31 मार्च पर्यंतचे मागील वर्षाप्रमाणे गृहित धरलेले आहेत, ते योग्य आहेत का याची तपासणी करावी. ती तेवढीच असेल तर आनंद आहे. अन्यथा महसूली कलेक्शनमध्ये तूट आलेली असल्याचे आढळून आलेले आहे. या वर्षी 35000 कोटी रुपयांच्या महसूली तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. पुढील वर्षी अर्थमंत्री महोदय अर्थसंकल्प मांडत असतांना 10,000 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तूट येणार नाही, अशी अपेक्षा करतो.

अध्यक्ष महोदय, अर्थमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, वेळीच आपण राज्य दुरुस्त करा. आपल्याच हातात आहे. आपण कठोर निर्णय घ्यावे. आपल्याला माननीय मुख्यमंत्री यांनी काहीही सांगितले तरीही आपण आपल्या मनाचेच ऐकावे. अर्थसंकल्प कसा मांडावा हा राज्याच्या अर्थमंत्री महोदयांचा अधिकार आहे. आपण अर्थसंकल्पाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला दिलासा देणे आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसंकल्प मंजुरीबाबात.

**मु.शी.** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसंकल्प मंजुरी या संबंधी माननीय मुख्यमंत्री यांचे निवेदन

श्री.देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** श्रीसंत मुंगसाजी महाराज समाधीस्थळ, धामणगाव देव या स्थळाच्या विकासाबाबत

**मु.शी. :** श्रीसंत मुंगसाजी महाराज समाधीस्थळ, धामणगाव देव या स्थळाच्या विकासासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46/47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. योगेश सागर )**

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जे पहिले निवेदन केलले आहे, त्या निवेदनाच्या अनुषंगाने मी माननीय मुख्यमंत्र्यांना एक प्रश्न विचारणार आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरहू कामे महानगरपलिका करणार आहे की, दुसरी एजन्सी करणार आहे या प्रश्नाचे उत्तर आम्हाला देण्याची गरज आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी एमएमआरडीएने मंजूर केलेल्या कामांची यादी वाचून दाखविलेली आहे.

......3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु. शी.** : सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे सुरु........

श्री. अमित साटम ( अंधेरी पश्चिम ) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी ऊभा आह.

अध्यक्ष महोदय, शुक्रवार दिनांक 18 मार्च, 2016 रोजी माननीय वित्तमंत्र्यांनी सभागृहात अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सदर अर्थसंकल्प ऐकताना कौटील्याच्या अर्थशास्त्रातील एक वाक्य मी सर्वांना सांगणार आहे. ते वाक्य असे आहे की, "सुख्यस्य मूल धर्म, धर्मस्य मूल अर्थ आणि अर्थस्य मूल राज्य" अशा प्रकारचा अर्थसंकल्प माननीय वित्तमंत्र्यांनी शुक्रवार दिनांक 18 मार्च, 2016 रोजी सभागृहात अर्थसंकल्प सादर केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 मधील अर्थसंकल्पाचा ढाचा हा पहिल्या वाक्यामध्ये आहे. ते पहिले वाक्य पुढील प्रमाणे आहे. "सक्षम शेतकरी व समृध्द ग्रामीण क्षेत्र हाच खऱ्याअर्थाने मेक ईन इंडियाचा कणा आहे" या अनुषंगाने सन 2016-2017 हे वर्ष स्वाभीमानी शेतकरी म्हणून घोषित करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, मी शहरी भागातून निवडून आलेलो आहे. मी महानगरपलिकेत काम केलेले आहे. मी गेल्या 16 ते 17 महिन्यांमध्ये सभागृहातील अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी शेतीविषय जी केलेली भाषणे केलेली आहेत ती मी मनःपूर्वक ऐकलेली आहेत. त्यावेळी शेतीच्या संदर्भात काही तरी अभ्यास होण्यास सुरुवात झाली असे माझ्या लक्षात आले होते.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पामध्ये शेतीसाठी 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या माध्यमातून शेती प्रधान अर्थसंकल्प सादर करीत असताना 25 हजार कोटी रुपयांपैकी 1855 कोटी रुपये पीक विमा याजनेसाठी, सिंचनासाठी 7800 कोटी रुपये आणि 1600 जलयुक्त शिवार योजनेसाठी तरतूद केलेली आहे. देशातील शेती क्षेत्रामध्ये इतिहास घडविण्याची ताकद ही जलयुक्त शिवार योजनेमध्ये आहे. यासाठी राजस्थान आणि मध्यप्रदेशमधील माननीय मुख्यमंत्र्यांनी जलयुक्त शिवार योजनेचे कौतूक केलेले आहे. त्यांनी देखील जलयुक्त

......4.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम.......

शिवार योजना राज्यामध्ये राबविली जाणार असल्याचे जाहीर केलेले आहे. तसेच राजस्थान आणि मध्यप्रदेशमधील माननीय मुख्यमंत्र्यांनी जलयुक्त शिवार योजना ही सर्व राज्यांमध्ये राबविली गेली पाहिजे, अशा प्रकारचे वक्तव्य केलेले आहे. पण काही लोकांकडून जलयुक्त शिवार योजनेच्या बाबतीत टीका केली जात आहे. काही सन्माननीय सदस्य जलयुक्त शिवार योजना ही ज्यावेळी पाऊस पडेल तेव्हा ती चांगली होणार असे सांगत आहेत.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी जलयुक्त शिवार योजनेसाठी निधीची तरतूद केलेली आहे. जर पाऊसच पडला नाही तर जलयुक्त शिवार योजनेचे काय होणार अशा प्रकारची टीका काही सन्माननीय सदस्यांकडून केला जात आहे. अशा प्रकारे टीका करणाऱ्यांना मी "ओम शांती ओम" सिनेमातील एक डायलॉग सांगणार आहे. तो डायलॉग असा आहे की, "जब तुम किसी चीज को तहे दिल से चाहते हो, तो पुरी कायनात तुम्हें उसे मिलाने की कोशिश में लग जाती है." या माध्यमातून खऱ्याअर्थाने माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार गेल्या 16 ते 17 महिन्यांपासून जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत. माझा पूर्ण विश्वास आहे की, "जब तुम किसी चीज को तहे दिल से चाहते हो, तो पुरी कायनात तुम्हें उसे मिलाने की कोशिश में लग जाती है." या वर्षी असा अंदाज आहे की....

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. अमित साटम यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणल्याबद्दल त्यांची माफी मागतो.

माननीय पीठासीन अधिकारी हे पुढील कामकाजाचे नियोजन कशा पध्दतीने करणार आहेत, याबाबत मार्गदर्शन केले तर सन्माननीय सदस्यांना सभागृहात उपस्थित राहणे सोईचे जाणार आहे. माननीय ऊर्जा मंत्र्याचे उत्तर प्रलंबित आहे. अर्थसंकल्पावरील चर्चा अर्धवट आहे. तसेच सत्तारूढ पक्षाचा देखील प्रस्ताव आहे. त्यामुळे आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविण्यात आलेले कामकाज कशा पध्दतीने केले जाणार आहे, याबाबत माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले तर सन्माननीय सदस्यांना त्याप्रमाणे सभागृहात उपस्थित राहणे सोईचे होणार आहे.

.....5......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. यागेश सागर )** : मी सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी 3 तासांचा वेळ निश्चित केलेला आहे. सदरहू चर्चा सायंकाळी 6 वाजता संपणार आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, अर्थसंक्लपावरील चर्चेसाठी जो वेळ निश्चित केलेला आहे, त्यामध्ये आणखी वाढ करावी लागणार आहे. अजून अनेक सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची आहे. उद्या देखील अर्थसंकल्पावरील चर्चा होणार आहे.

NN-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील ...

अध्यक्ष महाराज, आपण सभागृहाच्या आजच्या कामकाजासंदर्भात निर्णय दिला तर आम्हाला पुढील वेळेचे नियोजन करता येईल.

श्री.चंद्रशेखर बानवकुळे : अध्यक्ष महाराज, मागील तीन दिवसापासून ऊर्जा खात्याचे उत्तर द्यावयाचे बाकी आहे. एक चर्चा पूर्ण होत नाही तोपर्यंत दुसरी चर्चा सुरु होते त्यामुळे ऊर्जा खात्याचा रिप्लॉय केंव्हा सुरु करायचा?

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) :** मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, परिस्थितीनुसार आपण निर्णय घेत आहोत. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले भाषण सुरु ठेवावे तोपर्यंत माननीय अध्यक्षांशी याबाबत निर्णय घेता येईल. अर्थसंकल्पावरील चर्चा सायंकाळी 6.15 पर्यंत चालू ठेवण्यात येईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महाराज, ऊर्जा खात्याचा रिप्लॉय केव्हा द्यावयाचे याबाबत आपल्याला निर्णय घ्यावा लागेल.

श्री.अमित साटम : अध्यक्ष महाराज, जलयुक्त शिवार योजनेबद्दल मी बोलत होतो. यावर्षी हवामान खात्याने अंदाज दिलेला आहे की, एल निलो इफेक्टस जाणवणार नाही. या एल निनो इफेक्टमुळे मान्सूनवर परिणाम झाला. पाऊस कमी पडला, परंतु यावर्षी तशी परिस्थिती नसेल.

**तालिका सभाध्यक्ष** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, अर्थसंकल्पावरील चर्चा सायंकाळी 6.15 पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यानंतर विरोधी पक्षाचा नियम 293 अन्वयेचा प्रस्तावावरील उत्तर आहे. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य नियम 293 अन्वये चर्चा पुढे चालू ठेवणार नसाल तर माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. आपल्याला सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव ऑन लेग ठेवता येईल.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महाराज, आम्हाला विरोधी पक्षाच्या नियम 293 च्या प्रस्तावावर दोन, चार मुद्दे मांडावयाचे आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** मी माननीय अध्यक्षांना यासंदर्भात विचारणा करुन यानंतरचे कामकाज ठरवू.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** अर्थसंकल्पावरील चर्चा

**मु.शी.:** सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

.... चर्चा पुढे सुरु)

श्री.अमित साटम : अध्यक्ष महाराज, यावर्षी तो एल निनो इफेक्ट नसल्यामुळे खूप चांगला मान्सून, खूप चांगला पाऊस पडणार आहे. हा पाऊस पडल्यानंतर मला पूर्ण विश्वास आहे की, गेली सतरा महिने आपल्या सरकारने जलयुक्त शिवार योजनेत फक्त 1300 कोटी रुपयांची योजना महाराष्ट्रातील पाच हजार गावामध्ये राबविलेली आहे. आपल्याला माहिती नाही की, 70 हजार कोटी रुपये खर्च करुन सुध्दा महाराष्ट्रात गेल्या दहा, बारा वर्षात इरिगेशन मागे का राहिला? तो विषय वेगळा आहे, त्याची वेगळी चर्चा होऊ शकते. त्या विषयावर तासन्तास सभागृहात डिबेट होऊ शकते. मी त्या गोष्टीला बगल देऊन माझे मनोगत व्यक्त करणार आहे. माझ्यासारखा एक शहरी भागात राहणारा माणूस जेव्हा या शेतीकडे बघतो, जेव्हा शेती प्रधान अर्थसंकल्पाकडे बघतो, तेव्हा आपल्याकडे जो ॲग्रेरियन क्रायसिस, हायड्रोलॉजिकल ड्राऊट किंवा ॲग्रीक्लचरल ड्राऊट निर्माण झालेला आहे. यावर्षी जो दुष्काळ पडलेला आहे त्यावर मला असे वाटते की यावर दोन तोडगे आहेत. पहिला म्हणजे सिंचन आणि दुसरा सर्वात महत्वाचा तोडगा म्हणजे या सरकारने हवामानाचा अचूक अंदाज येण्यासाठी 107 कोटी रुपयांची तरतूद करुन त्याकडे लक्ष दिलेले आहे. तो तोडगा म्हणजे हवामानाचा अचूक अंदाज. गेल्या आठ, दहा वर्षापासून निसर्गाचा लहरीपणा, वातावरणातील बदल, ग्लोबल वार्मिंग अशा अनेक विषयांची चर्चा आपल्या देशामध्ये बुध्दीजीवि समाजापर्यंत सीमित राहिली आहे. आता त्यावर रिसर्च होऊन ग्लोबल वार्मिंग आणि वातावरणातील बदलामुळे याचा सर्वात जास्त परिणाम शेतीवर होतो. अर्थसंकल्पामध्ये 107 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये हवामानाच्या अचूक अंदाज व्यक्त करण्यासाठी केली. महसूल आणि मंडळ स्तरावर 2065 हवामान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. हा निर्णय अतिशय क्रांतीकारक आहे. आपल्याला जेव्हा हवामानाचा अचूक अंदाज येईल, जेव्हा आपल्या शेतकऱ्यांना कळेल की, कधी जास्त पाऊस पडणार आहे, कधी गारा पडणार आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, या अर्थसंकल्पामध्ये केलेल्या 107 कोटी रुपयांची तरतूद अजून जास्त वाढविली पाहिजे. खूप मोठ्या प्रमाणात पाश्चात्य देशांमध्ये करण्यात

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमित साटम.....

आलेले रिसर्च, आपल्या देशात करण्यात यावे. फार छोटया छोटया गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज आहे. जनावरांचा आहार कसा असावा, अशी कोणती पिके आहेत की, ज्याच्यामुळे जंतू होऊन त्या पिकांचा नाश होऊ शकतो. ड्राऊट रेझिस्टंट क्रॅाप कोणता आहे, अशा प्रकारचे संशोधन होऊन आपल्या बळीराजाला अशी माहिती मिळाली तर जी दुष्काळी परिस्थिती निर्माण होते, त्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी अशा प्रकारचे रिसर्च करण्यासाठी निधीची तरतूद मोठ्या प्रमाणावर उपयोगी ठरेल. यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडच्या वाढत्या प्रमाणाचा सामना करावयाचा असेल तर मला असे वाटते की, वन क्षेत्र वाढविणे आवश्यक आहे. यावर एक चांगला योगायोग आहे. आपल्या राज्यामध्ये अर्थ खाते आणि वन खाते ही दोन्ही खाते सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुधीर मुनगंटीवार यांचेकडे आहे. या दोन्ही खात्याचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे, असे माझे मत आहे. सन 2013 मध्ये United Nations Framework for Climate Change and Clean Energy या विषयावर पोलंडमध्ये झालेल्या एका परिषदेमध्ये एक करार करण्यात आलेला आहे. रेड प्लस कॉन्सेप्ट त्यामध्ये आणण्यात आली की, Reduction in emissions from deforestation and forest degradation. वातावरणामधील बदल हे वनक्षेत्र वाढवून जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणात झाडे वाढवून आपण करु शकतो. पूर्ण देशामध्ये 21 टक्के भौगोलिक परिसर वन क्षेत्राने व्यापलेला आहे. ही वनक्षेत्रे जपायची, अजून जास्त वनक्षेत्र निर्माण करायची, या बाबी आपल्याला करता येतील. हे वन क्षेत्र जोपण्यासाठी, त्याला संरक्षण देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. जो शेतकरी वनाचे संरक्षण करील, त्याची जोपासना करील, जो जितक्या वर्षासाठी, जोपासना, संरक्षण करील, त्यांच्यासाठी त्याला तेवढे पैसे दिले जातील, अशा प्रकारची योजना संयुक्त राष्ट्रांनी काढलेली आहे. यामध्ये भारत सरकारची रेड प्लस पॉलिसी तयार आहे. जसे कार्बन क्रेडिटस जशी असतात. कार्बनडॉय ऑक्साईडचे प्रमाण कमी करुन आपल्याला कार्बन क्रेडिटस मिळतील जे शेयर मार्केटमध्ये शेअर सारखे विकता येतात व त्यातून आपल्याला पैसे मिळू शकतात. अशा प्रकारे, आपल्या शेतकऱ्याला वन जोपासण्यासाठी, वनाचे संरक्षण करण्यासाठी, पैसे मिळू शकतात. माझी माननीय अर्थ मंत्री महोदयांना मागणी आहे की, आपण भारत सरकारची ड्राफ्ट



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

22-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN-4

ADB/ ST/ AKN/ 17:30

श्री.अमित साटम...

रेड प्लसची पॉलिसी एक पायलट प्रोजेक्ट म्हणून राबविली तर आपला बळीराजा वन सुरक्षित करु शकेल. त्यातून फॉरेस्ट इकॉनॉमी, फॉरेस्ट इकॉलॉजी तयार होऊ शकेल. वनाचे संरक्षण करण्यासाठी त्याला पैसेही मिळू शकतात, त्यामुळे वातावरणामध्ये होणारे बदल आपण टाळू शकू. एकंदरित शेतीवर हवामान बदलाचा परिणाम आपण कसा कमी करु शकतो यावर जास्त भर देणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, पर्यावरण रक्षण संस्था महाराष्ट्र राज्यात स्थापन करावी.

यानंतर OO-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम ...

महाराष्ट्राने या देशात असे पहिले राज्य होण्याची गरज आहे की, ज्यांनी एन्व्हायरनमेंट प्रोटेक्शन एजन्सी आपली स्थापन केली. जी या विषयाबाबत रिसर्च करील, शेतकऱ्यांना दिशा दाखवेल, कांदळवनांचे संरक्षण करील, वेस्ट वॉटरचे ट्रिटमेंट करील व या विषयाबाबत महाराष्ट्र राज्याची एक पॉलिसी तयार करील. पाश्चात्य देश व बाकीच्या युरोपियन कंट्रीजमध्ये प्रत्येक राज्यातच नाही तर प्रत्येक शहराची एक एन्व्हायरनमेंट प्रोटेक्शन एजन्सी असते तशाप्रकारची एक एन्व्हायरनमेंट प्रोटेक्शन एजन्सी महाराष्ट्रानेही स्थापन करावी व या क्षेत्रात जास्तीत जास्त रिसर्च करुन केवळ शेतकऱ्यांनाच नाही तर शहरी भागात राहणाऱ्या जनतेला देखील आपण विजेची बचत कशी करु शकतो हे सांगावे. एलईडीचे बल्ब्स वापरल्यानेही विजेचे कंन्झमप्शन कमी होते, कार्बन डाय ऑक्साईडचे वातावरणातील प्रमाण कमी होते. या पूर्ण विषयाबाबत आपण एक पॉलिसी तयार करु शकतो. आपण ही एन्व्हायरनमेंट प्रोटेक्शन एजन्सी स्थापन करुन आपल्या राज्याला पुढची दिशा देण्याचे काम करु शकतो.

अध्यक्ष महोदय, मेक इन इंडियाचा सप्ताह झाला. 8 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक या महाराष्ट्रात आपण आणली. मुख्यमंत्री महोदयांनी त्या दिवशी सभागृहात सांगितले की, असे तीनच करार झाले होते की, जे माननीय पंतप्रधानांसमोर झाले. ते तिन्ही करार शेतीशी निगडित होते. त्यामध्ये एक ऑरेंज उन्नतीचा, एक रेमंड बरोबर केलेला करार व अजून एक करार होता.

अध्यक्ष महोदय, मला या चर्चेच्या माध्यमातून हे सांगावयाचे आहे की, हल्ली या सभागृहात कोकणाचा आवाज थोडासा कमी ऐकू येतो. कोकणाबद्दल फार कमी मागण्या केल्या जातात. कोकाकोला आणि जैन इरिगेशन यांच्या माध्यमातून ऑरेंज उन्नतीच्या योजनेचा नागपूरला करार झाला. तशाच प्रकारची मँगो उन्नतीची योजना त्यांनी कोकणासाठी करावी. अशाप्रकारची योजना त्या दोन कंपन्या कर्नाटक, आंध्र प्रदेश व तामिळनाडूमध्ये करीत आहेत. परंतु, ही खेदाची बाब आहे की, संपूर्ण जगात आपला देवगडचा हापूस आंबा जेथून एक्सपोर्ट होतो, त्या आमच्या महाराष्ट्रातील कोकणात अशाप्रकारची कोणतीही योजना किंवा अशाप्रकारचा कोणताही करार अद्याप पर्यंत करण्यात आलेला नाही.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम ...

केवळ मँगो उन्नतीच नाही तर, काजू, फणस, कोकम उन्नती अशा योजनांची आवश्यकता आहे. माननीय पंतप्रधानांनी 3-4 दिवसांपूर्वीच असे म्हटले आहे की, शेती बरोबरच शेतीशी संलग्न उद्योगांकडेही शेतकऱ्यांनी गेले पाहिजे, त्या मार्गाचीही चाचपणी त्यांनी केली पाहिजे. कोकणामध्ये मँगो, काजू, कोकम उन्नती सारखे **11.26 मेमोरेंडम ऑफ अंडरस्टँडिंग** आपल्या उद्योग खात्याने केले तर, मला असे वाटते की, खूप मोठ्या प्रमाणावर आमच्या कोकणची इकॉनॉमी सुधारु शकेल.

अध्यक्ष महोदय, कोकण हे खऱ्या अर्थाने आपल्या हिंदुस्थानातील कॅलीफोर्निया आहे. परंतु, हे हिंदुस्थानातील कॅलीफोर्निया कोठे तरी दिशाहिन झालेले दिसते, त्याचा मार्ग चुकलेला दिसतो. आपल्या कोकणातील गोरगरिब जनतेला अशा एका चांगल्या अशाप्रकारच्या उद्योगाच्या सोबतीची आज गरज आहे. जेणेकरुन आपले कोकण खऱ्या अर्थाने हिंदुस्थानचे कॅलीफोर्निया होऊ शकेल. कोकणात पाऊसही चांगला पडतो. तेथे अशाप्रकारचे उद्योग आल्यामुळे कोकणातील हापूस आंबा हा मुंबईला न येता अशाप्रकारच्या उद्योगांमध्ये कोकणातील शेतकऱ्यांचा हापूस विकला जाईल, त्याच्या त्या शेतमालाला चांगला भाव मिळेल. अशाप्रकारचे एक सुजलाम सुफलाम कोकण नाही तर कॅलीफोर्निया आपण या महाराष्ट्रात निर्माण करु शकतो. आपल्या नवीन पिढिबाबत सांगावयाचे झाले तर, कोकणामध्ये इंजिनिअरिंग कॉलेजेस आहेत. त्यामुळे तेथील तरुणांना चांगले नवीन रोजगारही मिळू शकतील.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी 5 मिनिटांपूर्वी मेट्रो - 3 साठी 90 कोटी रुपयांची एमएमआरडीएच्या बजेट मधून तरतूद करण्यात आलेली आहे, याबाबत एक निवेदन केले. मला असे वाटते की, गेल्या 20 वर्षांमध्ये जे प्रकल्प मुंबई शहरात झाले पाहिजे होते, त्या सर्व प्रकल्पांना दिशा देण्याचे काम राज्याच्या व एमएमआरडीएच्या अशा दोन्ही बजेटमध्ये मुख्यमंत्री महोदयांनी केलेले आहे, त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, मेट्रो-2, मेट्रो-3 असे प्रकल्प असोत, या निमित्ताने मला हे सांगावयाचे आहे की**, मेट्रोचे जाळे दहिसर इस्ट ते बांद्रा, मेट्रो-3 कुलाबा, बांद्रा, सीप्झ** असे असणार आहे. मुंबई शहरातील कोणताही रस्ता किंवा कोपरा न सोडता पूर्ण मेट्रोचे पूर्ण जाळे पसरणार आहे. त्या दिवशी मिश्किलतेने असे विचारण्यात आले

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम ...

होते की, सन 2019 ? परंतु, आमचा पूर्ण विश्वास आहे होय, सन 2019 पूर्वीच हे सर्व प्रकल्प मार्गी लागतील. तुम्ही गेल्या 15-20 वर्षांत जे करु शकला नाहीत, ते येत्या 4 वर्षांत हे सरकार करुन दाखवेल. कारण त्याकरिता केवळ निधीचीच तरतूद केलेली नाही तर, त्याचे टेंडर निघालेले आहेत, त्याचे एन्व्हायरमेंटल क्लिअरन्सेस निघालेले आहेत, त्याच्या सर्व प्रकारच्या परवानग्या मिळालेल्या आहेत. कोस्टल रोडलाही आपण चालना दिलेली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, पुन्हा एकदा मुंबई शहर आणि शेती विषयाचे थोडेसे इंटरकनेक्शन करण्याची वेळ आलेली आहे.

अध्यक्ष महोदय, **इस्त्राएल** या देशामध्ये पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर त्यांनी तेथे **डि-सॅलिनेशन प्लांट** सुरु केले. मुंबई शहरातही पाण्याची खूप मोठी टंचाई आहे. ऑन पेपर येथे 20 टक्के पाणी कपात आहे. मात्र प्रत्यक्षात घरात जेव्हा पाणी येते तेव्हा 40 ते 50 टक्के पाणी कपात झालेली असते. **एमएमआर रिजन**मध्येही तीच परिस्थिती आहे. हवामानाच्या बदलामुळे येणाऱ्या काळात आपण मान्सुनवर आपल्या पाण्याच्या गरजेकरिता जास्त निर्भर राहू शकत नाही. याचाच अर्थ असा होतो की, आपल्याला **15.22पाण्याचे ऑल्टरनेट सोर्सेस शोधावे** लागतील. मुंबई शहराला खूप मोठा समुद्र किनारा लाभलेला आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला अद्याप पर्यंत जे करणे जमलेले नाही ते मुख्यमंत्री महोदयांनी करावे. आपण जशी पार्किंग पॉलिसी **स्टे** केली, जसा चुकीचा बनविलेला मुंबईचा डी.पी. कचऱ्याच्या डब्यात टाकला, तशाच प्रकारे आपण यामध्ये मध्यस्थी करुन मुंबई शहरातील पाण्याची टंचाई दूर करण्याठी **डी सॅलिनेशन प्लांटचे प्रपोजल** करावे. आपण ते आज केले नाही तर येत्या 10 वर्षांत आपल्याला ते करावेच लागेल. 10 वर्षांनंतर त्याची कॉस्ट अजून वाढलेली असेल, त्यामुळे 10 वर्षांनंतर ते न करता आपण आजच मध्यस्थी करुन मुंबई महानगरपालिकेला **डी सॅलिनेशन प्लांटच्या** अनुषंगाने त्वरित आदेश द्यावेत, अशी माझी आपणांस विनंती आहे.

मुख्यमंत्री महोदय व अर्थ मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आजच सकाळी मुंबईतील सर्व आमदारांनी देवनार येथील डंपिंग ग्राऊंडच्या विषयाबाबत छोटेसे प्रतिकात्मक आंदोलन केले.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित साटम ...

कधी कधी आपण स्वीडन, नॉर्वे या सारख्या देशांबाबत विचार करतो, त्यावेळेस तेथील देश दुसऱ्या देशांकडून कचरा विकत घेतात व त्यातून एनर्जी तयार करतात हे दिसून येईल. ते दुसऱ्या देशांतून कचरा ट्रान्सपोर्ट करतात, त्या कचऱ्यासाठी पैसे मोजले जातात, त्या कचऱ्यातून विजेची निर्मिती केली जाते. मात्र आपल्या मुंबईमध्ये दर दिवशी 10 हजार मेट्रिक टन इतका कचरा निर्माण होतो, त्याचे काय करायचे असा प्रश्न आपल्याला पडतो. आपण यामध्येही मध्यस्थी करावी. **17.30 बायो मिथेनायझेशनचे प्लांट लावावे. वेस्ट एनर्जीचे** प्लांट लावावे. मला असे वाटते की, त्यामध्ये सर्वात मोठा मुद्दा म्हणजे ॲट सोर्स जोपर्यंत कचरा **सेग्रिगेट** होत नाही, तोपर्यंत अशाप्रकारचे प्लांट आपण करु शकत नाही, ते सक्सेसफुल होणार नाहीत. कारण जेव्हा ॲट सोर्स **ड्राय व वेट** असे मिक्स गार्बेज येते तेव्हा त्याची **17.49 क्लेरिफीक व्हॅल्यू फार लो** असते. त्यामुळे आपण ॲट सोर्स मोठया प्रमाणावर सेग्रिगेशन करु शकू तेव्हा आपण अशाप्रकारच्या **वेस्ट एनर्जीचे** प्लांटससुध्दा इंम्प्लीमेंट करु शकू.

...PP-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. अमित साटम.....*

*अध्यक्ष महोदय, पर्यटनाच्या विषयावर मी आपले लक्ष वेधू इच्छितो. पर्यटनाकरिता २८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असून ही स्वागतार्ह बाब आहे. मुख्यमंत्री महोदयांनी या सभागृहामध्ये पर्यटनाचे खूप चांगले धोरण गेल्या १५ दिवसापूर्वी जाहीर केले. परंतु मला असे वाटते की, २८५ कोटी रुपयांची तरतूद फार छोटी आणि तुटपुंजी आहे. कारण पूर्ण देशामध्ये जेवढ्या नोकऱ्या आहेत, त्याच्या ८ टक्के नोकऱ्या पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योगांमध्ये आहेत. जीडीपी मध्ये ६ टक्के पर्यटन क्षेत्राचा वाटा आहे. त्यामुळे अनेक वेगवेगळ्या प्रकारचे पर्यटन महाराष्ट्रात होऊ शकते. फॉरेस्ट ट्युरिझम, कोश्टल ट्युरिझम, रिलीजीअस आणि स्प्रिच्युअल ट्युरिझम होऊ शकते. अजेंठा-ऐलोरा सारखे हेरिटेज ट्युरिझम देखील होऊ शकते आणि मुंबई शहरामध्ये अर्बन ट्युरिझम सुद्धा होऊ शकते. परंतु अशा वेगवेगळ्या प्रकारच्या ट्युरिझमला चालना देण्यासाठी २८५ कोटी रुपयांची तरतूद फारच कमी आणि तुटपुंजी आहे. मला असे वाटते की, या तरतुदीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे. फॉरेस्ट, कोश्टल अशा प्रकारच्या वेगवेगळ्या प्रकारच्या ट्युरिझमचे ब्रँचींग करुन प्रत्येक ब्रँचसाठी वेगवेगळा निधी देण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये बाहेरुन येणारे इंटरनॅशनल ट्युरीश्ट हे ट्रान्झीट करण्यासाठी येतात, असे इंटरनॅशनल सर्व्हे सांगतो. म्हणजेच आयदर ते मुंबईतून औरंगाबादला अजेंठा-एलोरा बघण्यासाठी जातात किंवा कश्मिर, केरळ, राजस्थान येथे जातात. आणि कोकणात देखील जातात.*

*अध्यक्ष महोदय, कोकणाच्या ट्युरीझमचे तर एवढे पोटॅन्शीअल आहे की, आजुबाजूचे कोश्टल राज्य सोडून कोकण हे थेट थायलंड आणि सिंगापुरचे ट्युरिझम संपवून टाकेल. त्यामुळे कोकणातील सी वर्ल्ड प्रोजेक्ट असेल किंवा कोकणातील आंबोली, कुणकेश्वर, देवगड अशा तीन, चार स्थळांना जोडणारी इंटरनल मेट्रो व इत्यादी प्रोजेक्ट असेल, त्याकरिता लवकरात लवकर निधीची तरतूद करण्याची गरज असून ते पूर्ण केल्यास साऊथ इश्ट एशियन देशामध्ये जाणारे सर्व ट्युरिझम कोकणात येईल. कालच लोकसत्ता वर्तमान पत्रात बातमी छापून आली होती. चार दिवस होळी व इतर लागून सुट्टी असल्यामुळे चिपेश्ट हॉलीडेज डेस्टीनेशनचा विचार करता आपल्याकडील लोक थायलंड आणि दुबईला खूप मोठ्या प्रमाणावर जातात. मला असे वाटते की, थायलंड आणि दुबईलाही जायची गरज पडणार नाही. थायलंड, हाँगकाँग, सिंगापूर, मलेशिया या*



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. अमित साटम.....*

*सर्वांना पुरुन उरण्याची ताकद एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आहे. रत्नागिरीच्या किनाऱ्यापासून सिंधुदुर्ग पर्यंतचा प्रवास, म्हणजेच गणपतीपुळे, देवगड, विजयदुर्गचा किल्ला, सिंधुदुर्गचा किल्ला, आंबोलीचा घाट प्रवास अप्रतिम वाटतो. येथे उत्तम प्रकारचे बिचेस आहेत. थायलंड आणि सिंगापूर किंवा बिंतार आणि बाली येथील बिजेस यापुढे फिके आहेत, असे मला वाटते. परंतु कोकणाचे ट्युरिझम मोठ्या प्रमाणात वाढविण्यासाठी तेथील प्रोजेक्टसाठी केलेल्या निधीची तरतूद ऑन ग्राऊंड इम्लीमेंट झाली पाहिजे, खर्च झाला पाहिजे, त्याला जास्त निधी दिला पाहिजे, तरच या ट्युरिझममध्ये वाढ होऊ शकते.*

*अध्यक्ष महोदय, आपण मला कोकणाकडे वळविल्यामुळे मी कोकणावर बोललो. आता मी पुन्हा मुंबईवर येतो. मोठ्या प्रमाणावर मुंबईत येणाऱ्या ट्युरिस्ट पैकी जे मुंबईमध्ये रहातात ते बीजनेसच्या परपजसाठी येतात आणि येथे रहातात. जे ट्युरिझमच्या परपज साठी येतात ते आयदर श्रीनगर, केरळ, कोकण इत्यादी आजुबाजूच्या पर्यटन स्थळी जातात. परंतु मुंबईमध्ये मुंबई बघण्यासाठी जास्त रहात नाही, असे मी नाही तर सर्व्हे म्हणतो. आपण मुंबई सारख्या इतर देशांची किंवा इतर शहरांची तुलना केली असता दुबई, हाँगकाँग, सिंगापूर इत्यादी सर्व शहरे मुंबई सारखीच आहेत. तेथे नॅचरल बाबी काही नाहीत. परंतु तेथील सरकारने, महानगरपालिकेने तेथील ॲट्रॅक्शन्स तयार केलेली आहेत. गव्हर्नमेंट क्रियेटेड ॲट्रॅक्शन आहेत आणि मला असे वाटते की, मुंबई महानगरपालिकेला तर कचरा, रस्ता आणि नाला यातूनच फुरसत मिळत नाही. त्यामुळे याबाबीकडे आता राज्याने लक्ष देण्याची गरज आहे. पुढील वेळेस म्हणजेच पर्यटन क्षेत्राच्या निधीची तरतूद करतांना महाराष्ट्राच्या पर्यटनाची एक वेगळी तरतूद आणि फक्त मुंबई शहराला इंटरनॅशनल ट्युरिस्ट डेस्टिनेशन म्हणून डेव्हलप करण्यासाठी एका वेगळ्या तरतुदीची आवश्यकता आहे. जेणे करुन मी म्हटल्या प्रमाणे थायलंडकडे जाणारे लोक कोकणाकडे येऊ शकतात, तसेच सिंगापूर आणि दुबईकडे जाणारे पर्यटक मुंबईकडे येऊ शकतात. खऱ्या अर्थाने आपण हे करुन दाखवू शकतो.*

*अध्यक्ष महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडणार आहे. आम्ही सर्व आमदारांनी आपल्या मतदार संघातील जनतेला आश्वासने दिलेली असतात, त्यांना काही स्वप्न दाखविलेली असतात. ती स्वप्न*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. अमित साटम.....*

*साकार करण्यासाठी आपण आपल्या आमदार निधीचा, सौंदर्यीकरण निधीचा किंवा अनेक प्रकारच्या निधीचा वापर करीत असतो. आमदार निधीतील कामे आणि ब्युटीफिकेशनच्या निधीतील कामांसाठी प्रस्तावित असलेला निधी खर्च झाला नाही, तर आमची स्वप्न पूर्ण होणार नाही व तरतूद केलेला निधीही खर्च होणार नाही. त्यामुळे ई-टेंडरींग ही बाब चांगली आहे. त्यामुळे यामध्ये ट्रान्सपरन्सी आलेली आहे. त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही, परंतु ई-टेंडरींगच्या प्रोसीजरमध्ये एखादे काम आमदार प्रस्तावित करतो, त्यानंतर जिल्हाधिकारी ॲक्सेपटन्स देतात, त्यानंतर म्हाडा अंदाजपत्रक तयार करते. त्याचे ड्राफ्ट टेंडर केले जाते, नंतर ते ई-टेंडर होते, नंतर एल-१ होते, नंतर वर्क ऑर्डर दिली जाते या सर्व प्रोसिजरला अख्ख वर्ष निघून गेले. सांगायचे म्हणजे आमच्या सर्व निधीतील कामांची वर्क ऑर्डर आता म्हणजेच मार्च महिन्यातील तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात दिली जात आहे. आमदारांच्या काही सजेशन असतील तर त्या द्याव्यात, यासंदर्भातील माननीय वित्त मंत्र्यांचे पत्र आम्हाला आज सकाळी मिळाले. आमचे एवढेच सजेशन आहे की, आमदारांनी काम सुचविल्यावर त्या कामाची वर्क ऑर्डर देईपर्यंत त्यामधील कालावधी हा ३० दिवसांपेक्षा जास्त नसावा, काम प्रस्तावित केल्यानंतर ३० दिवसांच्या आत वर्क ऑर्डर दिली गेली पाहिजे. जेणे करुन संबंधित फायनान्सीअल वर्षामध्ये ज्या बाबीकरिता काम प्रस्तावित आहे, त्याच फायनान्सीअल वर्षाध्ये काम पूर्ण होऊ शकेल, अशी माझी वित्त मंत्री महोदयांना विनंती आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, वित्त मंत्री महोदयांनी मांडलेला अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणारा असून नवीन दिशा देणारा आहे. तसेच हा शेती प्रधान अर्थसंकल्प आहे. मी एका कवितेतील ओळी वाचून दाखवितो.* "एक किसान की सुनो कहानी, आँखों में दुख का पानी." ***पण या शेतीप्रधान अर्थसंकल्पानंतर*** "एक किसान की सुनो कहानी, आँखों में नई उमंग सुहानी." ***अशा प्रकारे या महाराष्ट्राला सुजलाम-सुफलाम, सुखी-समृद्धी आणि समाधानी महाराष्ट्राच्या निर्मितीकडे नेण्याकरिता चांगले पाऊल टाकल्याबद्दल माननीय वित्त मंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि माझे बोलणे संपवितो, जय हिंद जय महाराष्ट्र.***

*तालिका सभाध्यक्ष : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गुलाबराव पाटील बोलण्यास सुरुवात करतील. परंतु त्यापूर्वी मी थोडे बोलणार आहे.*

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*तालिका सभाध्यक्ष.....*

*सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेला तीन तासाच्या अनुषंगाने सव्वा सहा वाजेपर्यंत वेळ ठरविला होता. परंतु यामध्ये आणखी वेळ वाढविण्यास हरकत नाही. म.वि.स. नियम २९३ च्या विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर माननीय ऊर्जा मंत्री उत्तर देणार आहेत. अध्यक्ष महोदयांबरोबर झालेल्या चर्चेनुसार त्याची स्पेशल सिटींग उद्या सकाळी १०.०० वाजता सुरु करुन १०.४५ वाजेपर्यंत उत्तरासह प्रस्ताव पूर्ण करण्यात येणार आहे. आज अर्थसंकल्पावर सभागृह ठरवेल तेवढा वेळ बालून झाल्यावर सत्ताधारी पक्षाच्या म.वि.स.नियम २९३ च्या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्यात येईल.*

*श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, म.वि.स.नियम २९३ च्या प्रस्तावावर विरोधी पक्षाने पावणे तीन तास भाषण केले आहे. माझ्या उत्तराला ४५ मिनिटांचा कालावधी लागणार आहे. सकाळी उर्वरित सन्माननीय सदस्यांचे भाषण झाल्यानंतर माझे उत्तर होणार असेल तर १५ मिनिटांमध्ये माझे उत्तर संपणार नाही. माझ्या उत्तरासाठी ४५ मिनिटे लागणार असल्यामुळे त्यानुसार स्पेशल सिटींग ठेवावी, अशी माझी विनंती आहे.*

*...QQ/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर)** : उद्या अर्थसंकल्पावरील चर्चेचा शेवटचा दिवस आहे. ऊर्जा मंत्री महोदयांना त्यांच्या उत्तरासाठी 5-10 मिनिटे वेळ वाढवून देण्यात येईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक घ्यावी सकाळी 9.30 ते 10.00 या वेळेत सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर मी 10 वाजता विभागावरील चर्चेस उत्तर देण्यास सुरुवात करतो.

**तालिका सभाध्यक्ष** : सदरहू प्रकरणी माननीय विधानसभा अध्यक्ष यांना संदेश देण्यात येईल व त्यांचा निर्णय माननीय ऊर्जा मंत्री यांना कळविण्यात येईल.

प्रा.मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, सदनामध्ये अर्थसंकल्पावर सन्माननीय सदस्यांची भाषणे सुरु असून वित्त विभागाचे अधिकारी हे सदनातील अधिकाऱ्यांच्या गॅलरीमध्ये उपस्थित नाहीत. त्यांच्या दृष्टीने अर्थसंकल्पावरील चर्चा गौण आहे काय, सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्यांची नोंद घेणे त्यांना आवश्यक वाटत नाही काय ?

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्या यांच्या माहितीसाठी सांगतो की, अधिकाऱ्यांची सदनातील उपस्थिती अन्सीन असते, याप्रकरणी सदनामध्ये वारंवार चर्चा झालेली आहे. विभागाचे अधिकारी सदनामध्ये उपस्थित असले किंवा नसले तरी त्यांचेशी सभागृहाचा वेगळा संबंध येत नाही. यानंतर सत्ताधारी पक्षाची चर्चा घेण्यात येणार असून त्यानंतर वेळ मिळाला तर अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनी अर्थसंकल्पावरील भाषणास सुरुवात करावी.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, गरीबांच्या घराखेरीज व शेतकऱ्यांच्या झोपड्या याशिवाय महाराष्ट्रात दुसरे काही लहान नाही, असे लहान राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र. या राज्याचा अर्थसंकल्प शुक्रवारी जाहीर करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाचा मी विचार करीत असताना या सभागृहामध्ये सगळ्यात महत्वाचा विषय ग्रामीण भागातील तेथून 52 टक्के रोजगार उपलब्ध करुन देणारा व्यवसाय म्हणजे शेती व्यवसाय आहे. ज्याप्रमाणे जीवनाचा सट्टा माणूस खेळत असतो त्याप्रमाणे शेतीवर सट्टा खेळणारा माझा शेतकरी आहे. या शेतकऱ्याच्या बाबतीत अर्थसंकल्पामध्ये विचार केला गेला असल्याची मांडणी अर्थसंकल्पात केली गेली आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचा अर्थसंकल्प 2 लाख 70 हजार कोटी रुपयांचा आहे. राज्यावर 3 लाख 20 हजार कोटी रुपये कर्ज आहे. पुढील वर्षी राज्यावर 3 लाख 56 कोटी रुपये कर्ज होणार असून त्यावरील व्याज 29 हजार कोटी रुपये आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये 9 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक तूट दाखविण्यात आली आहे. राज्याच्या आर्थिक योजना 57 हजार कोटी रुपयांच्या आहेत व आपल्या शेजारील गुजरात राज्यात या योजना 85 हजार कोटी रुपयांचा आहेत. यावर्षी राज्यातील अनेक भागात दुष्काळ आहे.

अध्यक्ष महोदय, सन 1972 मधील दुष्काळ अन्नधान्याचा दुष्काळ होता, असे म्हणतात. त्यावेळी मिलो सारखी ज्वारी बाहेरील देशातून आणून दुष्काळाचा सामना करण्यात त्यावेळचे सरकार यशस्वी झाले. यावर्षीचा राज्यातील दुष्काळ हा अन्नधान्याचा नसून पाणी टंचाईचा भयंकर दुष्काळ आहे. सरकारकडे साधने सुविधा उपलब्ध असली तरी पाणी कोठून आणणार, त्याकरिता कोणती उपाययोजना करणार ? हा यावर्षीचा सर्वात महत्वाचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, तेलंगणा सारख्या लहान राज्याने 65 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडल्याचे आपण पाहतो. एकीकडे शेतकरी राजासाठी 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केली असे राज्य सरकारमार्फत सांगण्यात येते. परंतु दुसरीकडे लक्ष दिले तर शेतकऱ्यांसाठी धरणे बांधली पाहिजे ही सर्व आमदारांची मानसिकता असताना खात्यासाठी 7,200 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. माझ्या जळगाव जिल्ह्यातील उदाहरण सांगावयाचे झाले तर निम्न तापी प्रकल्पाचा फायदा 4-5 तालुक्यांना होणार आहे, त्याप्रकल्पासाठी हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून त्यासाठी 6 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. याप्रकल्पाचा 10 टक्के डी.एस.आर.गृहीत धरला तर या 1100 कोटी रुपयांच्या प्रकल्पाची किंमत 1210 कोटी रुपये होणार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याप्रकल्पासाठी सरकारने केवळ 6 कोटी रुपये तरतूद केली आहे. "राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला". अशी ही तरतूद आहे.

अध्यक्ष महोदय, आम्हाला 15 वर्षांची राजवट आठवते. माननीय श्री.अजित पवार साहेब पाटबंधारे खात्याचे मंत्री असताना त्यांनी सांगितले की, निम्न तापी प्रकल्प असलेल्या अंमळनेर मधून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा आमदार निवडून द्या, आम्ही तुम्हाला पैसे देतो. त्यांनी किती पैसे दिले तर 20 कोटी रुपये, 40 कोटी रुपये याप्रमाणे प्रकल्पासाठी पैसे दिले. आम्हाला वाटले होते की, आमच्या जिल्ह्याचे मंत्री आहेत, आम्हाला या प्रकल्पाकरिता 100 ते 150 कोटी रुपये मिळतील. परंतु जर विभागासाठी केवळ 7,200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असेल तर त्यामधून आम्ही अपेक्षा कशी ठेवणार. या खात्याकरिता कमीत कमी 15 हजार कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक होते. दरवर्षी 15 हजार कोटी रुपये याप्रमाणे पुढील 4 वर्षे तरतूद केल्याशिवाय 273 लघु प्रकल्पांचे काम पूर्ण होऊ शकत नाही. सदनामध्ये बसलेला आमदार सत्तेतील असो किंवा सत्तेबाहेरील असो.... मित्रांनो आज विरोधातील आमदार कमीत कमी बोलू शकतील परंतू तुम्ही सत्तेत आहात, दोन वर्षानंतर तुमच्या प्रकल्पाची चालना दिसली नाही तर तुम्ही मत मागण्यासाठी मतदार संघामध्ये जाऊ शकणार नाही, ही सत्य गोष्ट मी सांगत आहे.

अध्यक्ष महोदय, पद्मालय प्रकल्प हा एरंडोल मतदार संघामध्ये आहे. सदर प्रकल्पावर 150 कोटी रुपये मागील काळामध्ये खर्च झाले असून केवळ 24 कोटी रुपयांची आवश्यकता प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आहे. याप्रकल्पासाठी 24 कोटी रुपयांची तरतूद केली तर आज 5 टी.एम.सी.पाणी त्या प्रकल्पामध्ये साठवणे शक्य आहे. परंतु त्याकरिता केवळ 10 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी अजून 14 कोटी रुपये तरतूद उपलब्ध करुन दिली तर आज आम्ही त्या ठिकाणी 4-5 टी.एम.सी.पाणी थांबवू शकतो व त्यामुळे कमीत कमी 3 तालुक्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो.

अध्यक्ष महोदय, मला सरकारवर टिका करावयाची नसली तरी आम्ही शेतकऱ्यांच्या भरवशावर सदनामध्ये आलो आहोत. मी ज्या मतदार संघातून निवडून येतो तेथे 100 टक्के शेतकरी आहेत. शेतकरी राजा, राजा म्हणून त्याला हिणवत असाल तर... सिंचनावर पैसे उपलब्ध करुन दिल्या शिवाय या सरकारची प्रगती होणे शक्य नाही. 400 लोकांचा कारखाना बुडत असेल तर त्याकरिता हजारो कोटी रुपये देण्यात येतात, परंतु 52 टक्के रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या शेतकऱ्याला किती वाटा देण्यात येतो ?

अध्यक्ष महोदय, राज्यातील जवळपास 3,800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांच्या कुटुंबाची आज काय स्थिती आहे ? माझी संवेदनशील अर्थ मंत्री महोदय श्री.सुधीर मुनगंटीवार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यांना विनंती आहे की, त्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना महिन्याला 5 हजार रुपये पेन्शने सुरु करावे. राज्यातील कर्मचाऱ्यांसाठी 7 वा वेतन आयोग लागणार आहे. कर्मचारी 33 ते 35 वर्षे काम करतो त्यापेक्षा जास्त काम करीत नाही. परंतु आमचा बापजादा शेती करीत मेला आहे, आमचा मुलगा मरतोय, आमचा नातू मरणार आहे. तीस वर्षे सेवा करणाऱ्या व दररोज 8 तास काम करणाऱ्या माणसाला पेंशन देण्यात येते परंतु जो 12-12 तास शेतीमध्ये हाडाची काडे करतो, रक्ताचे पाणी करतो, रात्रीच्या वेळी शेतीला पाणी देण्याकरिता मोटर लावायला गेला तर साप चावून तेथेच मरतो, त्या 24 तास काम करणाऱ्या शेतकऱ्याला आत्महत्या केल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याला केवळ 1 लाख रुपये देण्यात येतात.

यानंतर RR-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गुलाबराव पाटील......

गुलाबराव दारु प्यायला तर तो शौक होतो, कारण तो आमदार आहे. कलेक्टर दारु प्यायला तर विरंगुळा केला, एन्जॉय केला, कारण तो कलेक्टर आहे आणि शेतकरी दारु प्यायला तर तो बेवडा आहे. देशी दारुची दुकाने का उघडली आहेत, सरकारमान्य देशी दारुची दुकाने आहेत. दुकाने सरकारने उघडायची, सेल्स टॅक्स आणि टॅक्स आपण घ्यायचा. त्यावर सरकार चालवायचे आणि शेतकरी दारु पित होता म्हणून त्याला मदत केली जाणार नाही असा नियम टाकायचा. तो आता सरकारने शिथिल केला आहे. त्याबद्दल मी सरकारचा आभारी आहे. पण आज शेतकरी मेल्यानंतर 1 लाख रुपयाने काय होते ? म्हणून मी आपल्याला विनंती करणार आहे की, 3800 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत केली तर 1 कोटी 90 लाख रुपये महिन्याला भार पडेल. 19 कोटी म्हणून 20 कोटी रुपये वर्षाला होतील. पण सरकारने हे करावे. सरकारच्या मनामध्ये असेल तर प्रत्येक शेतकऱ्याला हजार, दोन हजार रुपये प्रत्येक शेतकऱ्याला पेन्शन म्हणून मानधन द्यावे. बाकीच्या योजना बंद कराव्यात. या शेतकऱ्याने हाडाची काडे केली आहेत. त्यामुळे असे ठरवा की, पहिल्या टप्प्यात अल्पभूधारक, दुसऱ्या टप्प्यात 10 एकरपर्यंत, तिसऱ्या टप्प्यात, 50 एकरवाले असे ठरवावे. आपण वर्ग-4, वर्ग-3, वर्ग-2 आणि कलेक्टरला पेन्शन देता तर मग शेतकऱ्याला काय देता ? म्हणून मी आपल्याला सांगणार आहे की, या राज्यामध्ये शेतकरी मूलभूत पाया समजला आहे तर पेड पेंडींगची काय अवस्था आहे, आपल्याकडे 2010-11 चे पेड पेंडींगचे कनेक्शन सुरू आहे आणि उत्तरात काय येते तर आम्ही 2015 पर्यंत देऊन टाकले आहे. चला, जळगाव जिल्ह्यात आपण जाऊ या. सन्माननीय ऊर्जामंत्री महोदय आमचा आपल्यावर आरोप नाही. आपण दिलदार आणि काम करणारे मंत्री आहात. चलती फिरती हॉटेल आहे, रामभरोसे हिंदू हॉटेल आहे. आपल्याला मंत्री पदाचा आर्विभाव नाही. आपण काम करणारे मंत्री आहात, पण आम्हाला हे सांगण्यात आले की, 2015 पर्यंतची कनेक्शन्स देण्यात आली आहेत. ही माहिती असत्य आहे. सन 2011 पासून पेड पेंडींगची कनेक्शन्स जेवढी आहेत ती बाकी आहेत. सन 20111 किंवा 2012 ची धरली तरी फार लांब आहेत. आता आपण सन 2016 मध्ये आहोत. आपण शेतकऱ्याची कसली प्रगती करणार आहात, तो विहिरीत पाणी पाहतो. शेत नांगरतो, वखरणी करतो, वीज कनेक्शन नसेल तर तो घरी येतो. त्यामुळे वीज कनेक्शन लवकर द्या.

2........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गुलाबराव पाटील......

सरकार दुसरे कनेक्शन देऊ शकत नसेल तर कमीत कमी शेताची लाईन द्या.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी शेतकऱ्याच्या बाबतीत शासनाने राबवावयाच्या ठरविलेल्या शासनाच्या योजना किती आहेत. चला आपण या ठिकाणी जलसंपदा खात्याकडे जाऊ. किती लोकांची पदे रिक्त आहेत त्या खात्यात तर 8 हजार इंजिनिअर्स हवे आहेत. आता फक्त 3500 लोक आहेत. आपण 25 हजार कोटी द्या किंवा 30 हजार कोटी द्या. कामकाज चालविणारी गाडी खाली नाही. पण आपल्याकडे मॅनपॉवर नाही. मागच्या वर्षीचे 30 टक्के खर्च झालेले नाहीत. हा निधी खर्च का होत नाही, त्यासाठी आपण टाईमबाऊन्ड आखून द्यावा. आमदार निधीची परिस्थिती कशी आहे तर नांदेडचा माणूस जळगावचे टेंडर घेतो. त्याचे तोंड मी पाहिले नाही आणि माझे तोंड त्याने पाहिले नाही. ई-टेंडर, बाकीकरिता ई-टेंडर नाही आणि आमदारांच्या 2 कोटी रुपयांकरिता ई-टेंडर आहे. आपण ई-टेंडरींग करावे, चांगली गोष्ट आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या मनात स्वच्छ विषय आहे, आम्हाला मान्य आहे. पण आता नांदेड माझ्यापासून 500 किलोमिटरवर आहे. आता ई-टेंडरचे कसे आहे की, ऑनलाईन किदरसे भी बटन दबाया और डाल दिया, आता तो नांदेडवाला जळगावचे टेंडर्स टाकले आणि यामध्ये मी त्याला पाहिले नाही आणि त्यानेही मला पाहिले नाही, त्याने गाव पाहिले नाही आणि तो काम टाईमाच्या आत करीत नाही. शेवटी आमदाराची बदनामी होते. मेक इन इंडिया आणि अमूक इंडिया, हे काही लोकांना कळत नाही. बोटावर मोजण्याइतके जे मोजके लोकं आहेत त्यांनाच हे कळते. आमच्या शेतात पाणी मिळते काय, आमच्या शेतात पाणी आहे काय, आमच्या शेतात लाईट आहे काय, आमच्या मालाला भाव मिळतो काय, आमच्या शेताला भाव मिळत नसेल तर गेल्या दीड वर्षापासून कोरडवाहू शेतकऱ्याकडे आम्ही काय लक्ष दिले आहे. सन्माननीय मंत्री पंकजाताई मुंडे आपण जलमंडळाची आपण स्थापना केली आहे. आपली जलयुक्त शिवार योजना चांगली आहे. पण आपल्या जलयुक्त शिवारचे आणि आमच्या वीज मंडळाचे काही घेणे-देणे नाही. पण सरकार म्हणून कोरडवाहू शेतकऱ्यांकडे आमचे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. कृषी सुधारणांच्या माध्यमातून आपण काय केले आहे. आता आपण डिक्लेअर केले की, महाराष्ट्र राज्य दुष्काळी असल्यामुळे शेतकऱ्यांची जप्ती होणार नाही. माझे चॅलेंज आहे की, कालपर्यंत सुध्दा सोसायट्यांची वसुली सुरू होती. कालपर्यंत बँकांची

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गुलाबराव पाटील......

वसुली सुरू आहे. या ठिकाणी एमएसईबीचे वीज कटींग सुरू आहे. मंत्री बोलला, मुख्यमंत्री बोलला तर राजा बोले दल हाले, असा कारभार चालला पाहिजे. मंत्री आणि मुख्यमंत्री बोलल्यानंतर कोण हा सेक्रेटरी आणि कोण हा कलेक्टर आहे. आम्ही साडे तीन लाख लोकांमधून निवडून येतो. कलेक्टर आमच्या पगारावर आहे, सेक्रेटरी आमच्या पगारावर आहे. बाप दाखव नाही तर श्राध्द कर. सरकारच्या मनामध्ये चांगले आहे, पण खाली अंमल नाही. परक्युलेशन खाली होत नाही. खाली कोणी ऐकत नाही आणि ठराविक लोकांचेच ऐकले जाते. काहींचे ऐकले जाते तर काहींचे ऐकले जात नाही.

अध्यक्ष महोदय, आमचा जळगाव जिल्हा हा केळी उत्पादनाचा जिल्हा आहे. केळीला सरकार फळामध्ये समाविष्ट करणार. आपली केळीचा मुलांच्या शालेय पोषण आहारामध्ये समावेश करण्यात येईल. केळीचा भाव बोर्डावर 550 रुपये क्विंटल इतका आहे, आणि प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या हातात भाव मिळतो फक्त 350 रुपये. शेतकऱ्याला एक घड तयार करावयाचा असेल तर दीडशे रुपये खर्च आहे. शेतकऱ्याच्या हातात पैसे किती मिळतात तर 22 रुपये. संत्र्याच्या ज्यूस बाबतीत आपण कोका-कोलाशी कोलॅबरेशन करता, पार्टनरशीप करता, आय लव्ह यू म्हणता, मग आमच्या केळ्याचे काय ? आपण मेक इन इंडियाच्या कार्यक्रमामध्ये संत्र्याचा समावेश केला आहे, आनंदाची गोष्ट आहे. नागपूरमध्ये, अमरावतीमध्ये शेतकरी आहे. कोकणात देखील शेतकरी आहे आणि आमच्या खान्देशामध्येही आमचा केळी उत्पादक शेतकरी आहे. केळीसाठी महामंडळ स्थापन करणार आहात, नक्की करा, चांगली गोष्ट आहे. पण भाव जो 550 रुपये बोर्डावर डिक्लेअर आहे त्यासंबंधी शेतकऱ्याला लुटले जाते. याकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष नाही की, तेथील व्यापारी बोर्डावर 550 रुपये देतो आणि शेतकऱ्याच्या हातामध्ये 350 रुपये येतात. शेतकऱ्याला नागविले जात आहे. शेतकऱ्याला लुटले जात आहे. अर्थसंकल्प शेतकऱ्यांकरिता आहे हे आम्हाला मान्य आहे. आमचे म्हणणे हे आहे की, आमच्या केळीपासून ज्यूस तयार होऊ शकते. आमच्या केळीपासून बिअर तयार होऊ शकते, वाईन तयार होऊ शकते. त्याचप्रमाणे अल्कोहोल सुध्दा चांगल्या प्रकारे तयार होऊ शकते. आमची हात जोडून विनंती आहे की, अर्थसंकल्पामध्ये नागपूरच्या संत्र्यांचाच उल्लेख केलेला आहे. आम्ही मागच्या आईची लेकरे आहोत काय, आम्ही



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गुलाबराव पाटील......

खान्देशवाल्यांनी काय पाप केले आहे. आमच्या खान्देशाच्या चार जिल्ह्यांचा पाय एकमेकांच्यात नाही. तुझी तंगडी माझ्या हातात तर माझी तंगडी तुझ्या हातात. आमच्या खान्देशात 56 आमदार आहेत. पण आमची एकजूट नसल्यामुळे हे चालले आहे. आपण 14 जिल्ह्यांना दुष्काळी जिल्हे म्हणून जाहीर करता, अन्नधान्याच्या बाबतीत त्यांना आपण लाभ देता. पण खान्देशचे चारही जिल्हे पाहिले तर 50 टक्क्यांच्या आणेवारीच्या आतमध्ये आहेत. आपण या जिल्ह्यांना अन्न सुरक्षा अंतर्गत मदत देता याबद्दल आमचे दुमत नाही. आम्ही मराठवाड्याकरिता लढतो, आम्ही विदर्भाकरिता लढतो तर खान्देशने काय पाप केले आहे. खान्देशच्या 4 जिल्ह्यांना मदत देऊन आपल्या तिजोरीवर फार मोठा भार पडणार आहे काय, यामध्ये नंदूरबार जिल्हा असून तेथील अक्राणी तालुका असा आहे की, तेथील लोकांना अजूनही पॅन्ट माहिती नाही. डोंगरामध्ये राहणारे लोक अजूनही झाडाच्या पत्त्यांवर राहतात. चला, अक्कलकुवा तालुक्यामध्ये आपणास तेथील आदिवासी कसा राहतो ते दाखवून देतो. या ठिकाणी आमचे सन्माननीय सदस्य श्री. जयकुमार रावलसाहेब बसले आहेत.

यानंतर SS-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.........

जळगाव, नंदूरबार, धुळे, नाशिकमधील काही भाग दुष्काळी आहे. अन्न सुरक्षा कायद्यामध्ये आपण भरपूर लोकांना मदत करीत आहात. हे 4 जिल्हे काय दुसऱ्या आईची लेकरे आहेत काय? मला खात्री आहे की, माननीय अर्थमंत्री या चारही जिल्ह्यांचा समावेश करतील. अर्थसंकल्पामध्ये 75 हजार कोटी रुपये म्हणजे 60 टक्के रक्कम ही फक्त महाराष्ट्रात वेतनावर आणि निवृत्ती वेतनावर खर्च हाते आणि 39 टक्के निधी इतर कामाकरिता खर्च होतो. महाराष्ट्रामध्ये स्वाभीमान वर्ष राबवितो आहोत. माझी हात जोडून विनंती आहे की, अर्थसंकल्पामध्ये बाकी लोकांना काय दिले माहिती नाही. पण शेतकऱ्यांच्या खिशामध्ये दमडी नाही. उद्याच्या दिवशी तो शेती कशी पेरेल यासाठी काहीही तरतूद नाही. यामुळे अजून अधिवेशन संपलेले नाही. ज्याठिकाणी तुमच्या पीक पेरायच्या जागा उपलब्ध आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये कपाशी, सोयाबीन, मका, ज्वारी, उडीद, मूग, तूर यांची लागवड किती झाली त्याप्रमाणे जिल्ह्यावाईज जे जिल्हे दुष्काळी आहेत त्याची माहिती घ्या आणि त्याप्रमाणे बियाणे शेतकऱ्यांना फुकट उपलब्ध करुन द्या.

अध्यक्ष महोदय, कृषी विद्यापीठात किती पदे रिकामी आहेत? धरणगाव तालुक्यामध्ये 79 गावे आहेत आणि फक्त 6 कृषी अधिकारी आहेत. जलयुक्त शिवाराकरिता सहा कृषी सहायक आहेत. कृषी मंत्री महोदय आमचेच आहेत. गावातील फौजदार झाला की माणसाला काय वाटते शिटी वाजली तर फटफटी सुटेल. तरी आम्हाला कृषी सहायक नाही अशी परिस्थिती आहे. राज्याने मागायला पाहिजे तर आम्हीच आमच्याकडे मागत आहोत. आज 6 कृषी सहायक आणि जलयुक्त शिवाराची संकल्पना आहे. ग्रामसेवकांना बोलावून त्यांची मते घेतो. ऐनवेळी कृषी सहायकाची नियुक्ती करुन देतो. एरंडोलमध्ये दोन मंडळ आहेत. तुमच्याकडे 64 गावे आहेत आणि 37 कृषी सहायक आहेत. आमच्या जिल्ह्यामध्ये 79 गावे आहेत आणि 6 कृषी सहायक आहेत. त्यातील 1-2 रजेवर असतात. कृषी सहायकाला सांगायला बरे होऊन जाते की, 10-12 गावे आहेत. भादली को बोला तो टाकली बोलता और टाकली को बोला तो फुलपाट बोलता. एक माणूस पटवून दिलेला असतो तो सांगून देतो भाऊचा फोन आला तर तिथेच होतो. तुमचे

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.........

काम एकदम टिपटॉप आहे. पण तुमचा गल्ला आमच्याकडे पडून असल्याने मॅनपॉवर वाढवायला पाहिजे. आम्ही सुध्दा शिवक्रांती योजना जाहीर केली. जे गाव जलयुक्त शिवारामध्ये बसत नाही. टँकरफिड गावे आहेत त्याठिकाणी नियम लागू केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मी स्वतः पोकलॅन घेतले. स्वतः जेसीबी घेतले आणि जेथे नियमात बसत नाही त्याठिकाणी उपकरणे सुरु केली. डिजल डालो और चलने दो. मोठ्या धरणांचे आम्हाला महत्व राहिलेले नाही. काही लोक टीका करतात. पण पाणी पडलेच नाही तर साठेल कुठून. तुम 71 हजार करोड रुपये का हिसाब हमको नदीं दे रहे है और हजार करोड का हिसाब मांग रहे हो. सांगायचा अर्थ असा की, 71 हजार कोटी रुपयांचे पाणी गेले कुठे? मुरले कुठे ते सापडले नाही आणि तुम्ही हजार कोटी रुपयांचा हिशोब मागत आहात. आमचे कमीत कमी खड्डे तरी दिसत आहे. तुमचे कुठे बांधले तेच दिसत नाही. आम्ही जे करतो, ऊकरतो आहोत, नाला करतो आहोत, सिमेंट बंधारे बांधतो आहोत, विहिरी खोदतो आहोत, विहिर पुनर्भरण करीत आहोत हे सर्व दिसत आहे. बघा मी दोन्ही साईडने बोलतो आहे. यावर्षी तुम्हाला चॅलेंज देतो. मी दुसऱ्या तालुक्याचे सांगत नाही, मी माझ्या तालुक्याचे सांगतो आहे.

अध्यक्ष महोदय, जालना जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कामे आहेत. मराठवाड्यामध्ये भरपूर कामे आहेत. शासनाने माझ्या तहसिलला 15 गावे दिलेली आहेत. शिवक्रांती योजनेद्वारे मी सहा गावे दत्तक घेतली. डिजेल डालो, जेब में से डालो, पब्लिक का डालो और चलने दो. ही योजना काढली आहे. दोन राज्यांनी काय योजना घेतली? पूर्ण देश त्या योजनेला स्वीकारल्याशिवाय राहणार नाही. जे चांगले आहे त्याला चांगले बोललेच पाहिजे आणि जे वाईट आहे त्याला वाईट म्हटलेच पाहिजे. याचे कारण वाईट म्हणणे म्हणजे सरकारवर टीका करणे असे माझे मत नाही. सरकारची काय चूक होत आहे हे सांगण्याची संधी आम्हाला आहे. जर हे सांगितले नाही तर आम्ही आमच्या देवाला फसवतो आहोत. देव्हाऱ्याच्या समोर आले आणि देवाला सांगितले की, तू देशील तर टाकीन गल्ल्यात हे जमणार नाही. देवबाप्पा तू चुकला आहे. मुख्यमंत्री महोदय चुकत असतील तर सांगितले पाहिजे. मंत्री महोदय चुकत असतील तर सांगितले पाहिजे. त्यांनी ऐकले

......3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.........

पाहिजे. नाहीतर हे 15 वर्ष बसले आपण 5 वर्षामध्ये दुसऱ्या बाजूला जाऊ. तुम्ही काय स्वीकारायचे हा तुमचा विषय आहे.

अध्यक्ष महोदय, मला खात्री आहे की, शेती सुधारण्यामध्ये आत्महत्या येते. राज्यामध्ये शेतकऱ्याला कृषी मुल्य आयोगाची आणि मालाची किंमत मिळण्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. नेहमी 15 टक्के नफा हा गृहीत धरीत असतो. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या किमतीच्या भावामधील तफावत बघितली तर जवळपास केंद्र सरकारने जाहीर केलेल्या खर्चामध्ये 25 ते 35 टक्के भाव कमी मिळत असतो. आजच्या काळामध्ये कपाशीचा भाव 3100 रुपये असताना शेतकऱ्यांच्या हातात 2350 रुपये मिळाले. अशा पध्दतीने चालत असेल आणि शेतकऱ्याला सांगत असाल की, आम्ही तुमचे भले करीत आहोत तर निश्चितपणाने शेतकऱ्याचे भले करण्याकरिता पाणी अडविणे, पाणी जिरविणे, शेतकऱ्याला लाईट देणे आणि मालाला भाव देणे याशिवाय दुसरा इलाज या अर्थसंकल्पामध्ये असणे गरजेचे आहे. श्री. सुनिल शेट्टी चॅनेलवर बोलले की, एक टक्का आयकर आकारावा. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करायचे असेल तर एक टक्का आयकर जास्त करा म्हणजे शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होऊ शकते. हे स्वीकारण्याचे धोरण सरकारचे आहे. अशा पध्दतीने नाना पाटेकर, अमुल पाटेकर, सुनिल शेट्टी हे पिच्चरवाले म्हणत असतील आणि त्यांच्या जर सूचना असतील आणि त्याची अंमलबजावणी केल्यानंतर खरच शेतकऱ्यांचा फायदा होत असेल तर सरकारने हे करणे अत्यंत गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, आर्थिक पाहणीमध्ये असे सांगितले आहे की, शासन दरवर्षी 50 हजार कोटींची रासायनिक सबसिडी देते. पण फक्त 15 टक्के म्हणजे 15 हजार कोटी रुपये आपल्यापर्यंत पोहचतात. याचे कारण असे की गळती रोखणे, उपभोक्ता कर कमी करणे या गोष्टींकडे सरकारचे लक्ष नाही. शासनाने काही गोष्टी चांगल्या केल्या. कॅन्सरसारख्या आजारावरील महागड्या औषधांवरील कर कमी करण्यात आलेला आहे. याकरिता माननीय मुख्यमंत्री व माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे. एलईडी लाईटचा विषय सन्माननीय सदस्य श्री.अमित साटम यांनी मांडला. मंत्री महोदयांनी जे काम केले ते अतिशय सुंदर आहे.

.......4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.........

मुख्यमंत्री सडक योजना लागू करण्यात आली. माननीय आमदारांनी दिलेली कामे घ्यावीत असा त्यामध्ये नियम केला. पण त्यामध्ये माननीय आमदारांनी न दिलेली कामे आली आहेत. माननीय आमदार ज्या फिल्डवर काम करतो ते पाहता माननीय आमदारांची स्थिती वाईट आहे. झेंडावंदनचा नियम करण्यात आला. 1 मे रोजी झेंडावंदन केले जाते. नंतर झेंडा कुठे जातो आणि आम्ही कुठे जातो? त्यानंतर जून, जुलै, ऑगस्टला झेंडावंदन होईल असे वाटल्यामुळे कपडे शिवले. मंत्री काही झालो नव्हतो, कोट तसाच पडलेला होता. असा विचार केला की, आता 15 ऑगस्टचे झेंडावंदन करु या. यासंबंधी विचारणा केली तर सांगण्यात आले की, झेंडावंदन करण्याचे आदेश नाहीत. सदर कार्यक्रम फक्त 1 मे पुरताच होता. दरवेळेस जीआर काढावा लागेल तर झेंडावंदन होईल.

TT-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील ....

पालकमंत्री सुध्दा आमदार असतो. तो पहिला आमदार नंतर पालकमंत्री असतो. तो कलेक्टरच्या समोर झेंडावंदन करतो. आमचा सभापती पंचायत समिती मेंबर असतो, तो 13 हजारच्या मताच्या गटातून निवडून आलेला सभापती होतो. तो झेंडावंदन करतो. बी.डी.ओ. बाजूला उभा असतो साडेतीन लाख लोकांमधून निवडून आलेला आमदार बाजूला उभा राहतो. तहसिलदार तो पहिला नायब तहसिलदार असतो. अव्वल कारकूनपण असतो. तो वाढत वाढत वरच्या पदाला येतो. आम्ही त्याच्या बाजूला असतो. अशी आमदाराची किंमत असते. आमची काळजी घेणारे माननीय अध्यक्ष महोदय आहात. कमीत कमी आमदाराची एवढी हेलावणी करु नका. ज्या प्रमाणे आम्ही रस्ते देतो झेंडावंदन करता तुम्ही एक वेळ झेंडा फडकवायला लावला, पाणी टंचाईबाबत किंवा इतर विषयाबाबत आम्ही तहसिलदाराची अधिकृत मिटींग घेऊ शकतो का ? सर्व आमदारांमध्ये डॅशिंगपणा असतो. आमदार काही साधा नसतो, तो साडेतीन लाखांमधून निवडून येतो. प्रत्येकाच्या काम करण्याच्या वेगवेगळया स्टाईल्स् आहेत. कोणी गोड बोलून करतो, कोणी दादागिरी करुन करतो, कोणी प्रेमाणे करतो, कोणी कायद्याने करतो, कोणी कायद्या मोडून करतो त्यामुळे साडेतीन लाखांमधून निवडून येणारा आमदार असो किंवा आमदारीन बाई असो ही सर्वसाधारण गोष्ट आहे. ताई तुम्हाला नाही बोलत. हा आमचा विषय आहे. तुम्ही माननीय मंत्री आहात. म्हणून आमदाराची प्रतिष्ठा वाढवा. जलयुक्त शिवारमध्ये एस.डी.एम. आमचा बाप आहे का ? आपल्याला हात जोडून विनंती आहे की, तुम्ही आमदाराला त्या कमिटीचा चेअरमन करा, पालकमंत्र्याला केले त्याच्या बरोबर दोन आमदार दिले. हे मान्य आहे. परंतु दोन आमदारांचा जिल्हा नसतो. अकरा आमदार, बारा आमदार, 15 आमदार यांचा जिल्हा असतो. तालुक्यावर आमदाराला द्या. मी तुम्हाला लिहून देतो, आज कृषी अधिका-याच्या मालमत्तेचे चेकींग घ्या. त्यांचा ठरलेला रेट आहे. कृषि अधिकारी कार्यक्रम वाजवितो. सेक्शन जे.ई. चे घर आणि एका आमदाराचे घर सारखे आहे. हे खरे असेल तर सांगा सर्व आमदारांना पेन्शनसुध्दा मिळणार नाही. आम्हाला पंन्नास हजार पेन्शन आहे.

अध्यक्ष महोदय, माजी आमदारांना एका एका रुममध्ये चार जणांना ठेवता. जशा बक-या बांधता तसे ठेवता. 180 स्वे.फू. ची मनोरा आमदार निवासातील सदनिका आहे. तेवढया जागेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील......

आमच्या घरी म्हैस राहते. अशी वस्तुस्थिती आहे. हा विनोदाचा भाग नाही, पटत नसेल बसतो खाली. मंत्री महोदयांचे ठिक आहे. तुमच्या पी.ए. ची कॅबिन आहे. तेवढा आमचा झोपण्याचा रुम आहे. अशी परिस्थिती आहे. तुम्ही काय हाल केले आमदाराच्या पदाचे, आमदाराची प्रतिमा खराब होत चालली. तुम्हीपण कधी आमदार व्हाल. आमदाराचा पी.ए. तहसिलदार असला पाहिजे. जर पालकमंत्र्याचा पी.ए. कलेक्टर असावा. तुम्ही आमदाराला का कमी करता. म्हणून आमच्या रस्त्यांची कामे घेत नाहीत. त्याला माहिती आहे की, क्या करेगा आमदार. आमदारको ऊतनी पावर नही है. जलयुक्त शिवारमध्ये आमची ताई उदार आहे. तुम्ही आमदाराला चेअरमन करा आणि कृषि अधिका-याकडे पहा. कृषि अधिका-याच्या मालमत्तेचे विवरण मागवा, जसे फार्म भरताना आमदाराच्या मालमत्तेचे विविरण पत्र घेता. तो यावर्षाचा टॅक्स किती भरतो आणि त्याची किती घरे किती, पुढच्या वर्षी त्याचे घर बदलले सापडेल. ही खरी परिस्थिती आहे. त्याचा ठरलेला रेट आहे. त्यांची करप्शन ही फॅशन आहे. सेक्शन जे.ई. 1 टक्का, डेप्युटी इंजिनिअर 2 टक्का, कृषि सहाय्यक 1 टक्का, कृषि अधिकारी 3 टक्का वरती बसतो त्याचा टक्का वेगळा, एस.डी.एम. वेगळा यांना पैसे देणे ही फॅशन आहे. जशी परकरला झालर लावावी तशी हयांची पैसे खाण्याची फॅशन आहे. म्हणून आमदाराला तुम्ही मजबूत करा. तो कमीत कमी जलयुक्त शिरामध्ये पाप करणार नाही. त्याला रोज शेतक-यांच्या समोर जायचे आहे. त्याला रोज शेतक-याच्या गावात जायचे आहे. त्याला रोज लग्नामध्ये आणि मरणामध्ये जायचे आहे. त्याला कमीत कमी लाज आहे की, मी या गावात गेलो आणि जलयुक्त शिवाराचे काम खराब झाले तर लोक मला गावामध्ये घुसू देणार नाहीत. त्याला मतांची लाज आहे. त्याला माहिती आहे की, मला पुन्हा आमदारकीला उभे रहायचे आहे. मग तो कोणत्याही पक्षाचा आमदार असो. म्हणून आमची विनंती आहे. शासनाची जलयुक्त शिवार ही माझी आवडती योजना आहे. ताईंचे आभार मानतो एम.एस.ई.बी. ची तर चिंता नाही. तुम्ही पेडवाले आहे ते फटाफट करा. तुम्ही लवकरात लवकर कनेक्शन देण्याचे प्रयत्न करा. याठिकाणी आमच्या आमदारांना आपण मोठे करण्याचा प्रयत्न करा अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.....

अध्यक्ष महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले सन 2015 पर्यंत सर्व कनेक्शन देऊ टाकली. आमच्याकडे दिली नाहीत. आम्ही दुस-या आईची लेकरे आहोत. आमचे तेच म्हणणे आहे. अधिका-यांची परिस्थिती वाईट आहे. सरकार अंमलबजाणीकरिता नियम करते त्या प्रमाणे होत नाही. न्युटनचा नियम काय होता ? वजन ठेवल तर कागद स्थिर राहतो असा न्युटनचा नियम होता. आता असे झाले आहे की, सरकारी अधिकारी सांगतात, कागदावर वजन ठेवले तर कागद हलेल चित्र बदलेल. वजन ठेवणे म्हणजे काय हे समजला असाल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला 5 कोटी रुपये तुम्ही बाहेरच्या राज्यात दिले. वजन ठेवल्यानंतर नोटा हलतात हे मान्य आहे. इतकडे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करावे म्हणून सांगता आहेत. शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून आम्ही राज्य चालवितो आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात असे सांगितले जायचे की, शेतक-याच्या शेताच्या बांधावरुन घोडा जाताना त्याच्या मुस्क्या बांधून घोडा जायचा. महाराजांकडे कोणी तक्रार केली की, महाराज त्याला शिक्षा द्यायचे. त्यांचा आदर्श घेऊन आम्ही हे सरकार चालवितो आहे. इथे न्युटनच्या नियमाप्रमाणे कागद स्थिर राहयला पाहिजे. तर कागदावर वजन ठेवल्यावर कागद चालतो. म्हणून या यंत्रणेकडे लक्ष ठेवा. आता खाली शिपायापासून रेट ठरलेला आहे. अँटी करप्शनच्या रेट पहा, रेतीचा विषय पहा, तुम्ही योजना करता, रेतीचे लिलाव चालू आहेत. आता काय परिस्थिती आहे रेतीची ? लहानपणी ज्या नदया पहायचो त्या सर्व बोचकल्या गेल्या आहेत. नदीमध्ये मुले क्रिकेट खेळत आहेत. जलयुक्त शिवारची योजना यशस्वी करायची असेल प्रत्येक 10 कि.मी. च्या अंतरावर एक बांध घालावा. आम्हाला मोठी मोठी 5000, 10000 कोटीची स्वप्ने दाखवू नका. अर्थमंत्री महोदयांनी जी योजना हातामध्ये घेतली त्याच्यावर तरतूद जास्त केली पाहिजे. और 1000 कोटी बढाने को होना. जेथे नदी आहे तेथे पाणी थांबवा, जेथे छोटी नदी आहे तेथे पाणी थांबवा. दोन किलो मिटरच्या आत नदी नाला मिळतो तेथे पाणी थांबवा तुम्ही याच्यावर 25000 कोटी रुपयांची तरतूद केलेली असेल आम्हाला मान्य आहे. ज्याप्रमाणे आपण इतर खात्यांकरिता जास्त पैशांची तरतूद केली त्याप्रमाणे जलयुक्त शिवाराकरिता करावी. शेतकरी हा मुळ पाया समजून 52 टक्के लोकांना रोजगार देतो. जो

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गुलाबराव पाटील.....

शेतकरी या जगाचा आणि राज्याचा पोशिंदा आहे. त्याला जर भिकारी होऊ द्यायचे नसेल त्याला आत्महत्येच्या तोंडावर पाटवायचे नसेल तर या योजनेकरिता माननीय अर्थमंत्र्यांना पुन्हा पुनर्विचार करावा लागेल. या योजनेकरिता जास्त तरतुद करावी लागेल. कृषी अधिकारी, टेक्निकल इंजिनिअर यांच्यामध्ये पाचर आमदार ठेवावा लागेल. तेव्हाच तुमची योजना आणखी जास्त यशस्वी होईल. अशी आपल्याला या ठिकाणी विनंती करतो. मला बोलण्याची भरपूर संधी त्याबद्दल मी आभार मानतो. आमदार निधीला तुम्ही 5 कोटी रुपये द्या. आमचे याबाबत काही म्हणणे नाही. मागायला काय, पण देने वाला होना चाहिए भाई. याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली होती. आता आपण सर्वजन मिळून त्यांना विनंती करु की, सन्माननीय सदस्यांचा आमदार फंड वाढला पाहिजे. ई-टेंडरींगमध्ये थोडीशी सूट दिली पाहिजे. ई-टेंडरमुळे आमचे काम होत नाही. 2 लाख 99 हजार मध्ये एका गल्लीचे काम होते. 30-30 टक्के बिलोमुळे ही परिस्थिती आहे. ही मर्यादा कमीत कमी 10 लाख रुपयापर्यंत तरी वाढवावी अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो.

UU-1......

श्री.गुलाबराव पाटील .....

आमदारांना 1 मे नंतर 15 ऑगस्टला झेंडावंदन करता येईल. झेंडावंदन केल्यानंतर आम्ही दोन फुट वाढू असे काही नाही. पण जो व्यक्ती अव्वल कारकूनचा तहसिलदार झाला आहे तो झेंडा फडकावतो आणि आम्ही बाजूला उभे राहातो. एवढी तरी आमची इज्जत ठेऊ नका. किमान तो विचार आपण करावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांना मुळ मानून मांडण्यात आलेला आहे. असे म्हणतात की, "आईने खुद अपनी शक्ल बता देते है, कीना नहीं रखते कमीनों की तरह." म्हणजे आरसा आपला चेहरा नीट दाखवत असतो त्याच्या मनात काही किंतू परंतु नसतो, तो नालायकपणा ठेवत नाही. तसा सुंदर अर्थसंकल्प मांडण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. आमदार व शेतकरी या नात्याने त्रुटी मांडण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय अर्थमंत्री हे आम्ही यामध्ये सुचविलेल्या सुधारणा करतील अशी खात्री बाळगतो व माझे दोन शब्द संपवितो.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....2

श्री.शरद सोनवणे (जुन्नर) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावर बोलताना सांगतो की, मी सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनी मांडलेल्या बाबींशी सहमत झालेलो आहे. त्यांनी आरसा व धोरण शेतकऱ्यांसाठी पारदर्शक ठेवण्याची भूमिका घेतली. आमदार हा जनमाणसांचा कणा आहे, आमदारांना विश्वासात घेऊन जलयुक्त शिवार योजना राबवली तर ज्या दुष्काळाचा शेतकरी सामना करीत झगडत आहे, यावर निश्चितपणे मात करण्यासाठी जलयुक्त शिवाराच्या भूमिकेशी संलग्न होऊन सरकारला मदत करण्याचे काम सर्व आमदार करतील. मी नेहमी मागणी केली आहे की, 2016-2017 हे शेतकरी वर्ष म्हणून साजरे करावे. मेट्रो किंवा इतर बाबी थोडयाशा पुढे-मागे झाल्या तरी चालतील. परंतु बियाणे, खते, हवामान यंत्रे, शेड नेट, दूधाचा हमीभाव, डाळींब, द्राक्षे इत्यादींचा विषय महत्वाचा आहे. सध्या हार्वेस्टींगचा कालावधी सुरु आहे. बदलत्या हवामानाचा फटका, गारपिटीचा त्रास हा सातत्याने शेतकरी अनुभवत आहेत. मी जेथे काम करतो तेथे 100 टक्के शेती असून तेथे कोणतीही इंडस्ट्री नाही. तेथील दु:ख पाहून मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हे सर्वसामान्य जनतेचे शासन आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने जनतेने शासन उभे केलेले आहे.

अध्यक्ष महोदय, 2016-2017 मध्ये जर कोणत्याही शेतकऱ्याच्या बिलाची थकबाकी झाली असेल तर त्याचे कनेक्शन कापता कामा नये. दुष्काळामुळे विद्यार्थ्यांचे विविध शुल्क माफ केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या कर्जाचे संवर्धन करीत असताना शेतकऱ्यांना आत्महत्येपासून प्रवृत्त करावयाचे असेल तर कर्जमाफीचे धोरण व व्याजाची सवलत ही राज्य सरकारने आपल्या खांद्यावर घेतली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, दोन कोटी असलेल्या आमदार निधीतून सध्या विशेष काही काम करता येत नाही. त्यामुळे आमदार निधी पाच कोटी करण्यात यावा. निदान यामध्ये काही तरी वाढ करावी. याकरिता आम्ही किती वेळा बोलायचे. आमची व सभागृहाची इज्जत ठेवा. आम्ही आमदार असल्याने या संलग्न असलेल्या व्यवस्थेचा याकरिता विचार झालेला पाहिजे. शेवटी तुम्ही आम्ही रोज जनतेसमोर जाणारी मंडळी दुष्काळाच्या मनस्थितीचा आपण सामना करीत आहोत. दुष्काळातून बाहेर पडावे, सरकारने चांगले काम करावे, महाराष्ट्राचे चांगले धोरण पुढे यावे, एवढेच नव्हे तर देशात महाराष्ट्र पुढे असावा म्हणून हे सभागृह तुम्ही आम्ही एकमताने चालवित

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनवणे.....

आहोत. याकरिता कोणताही विभाग, जात, पक्ष नाही. विचाराचे धोरण व आयुष्यातील यशाचे तोरण बांधून मात्र महाराष्ट्राला क्षितीजावर पोहचविण्याची आपली जबाबदारी आहे. मी या अर्थसंकल्पाबाबत माननीय मुख्यमंत्री व माननीय अर्थमंत्री यांचे स्वागत करतो. ही बाब खरी आहे की, त्यांना ही सर्व परिस्थिती बदलावयाची आहे. परंतु अधिकाऱ्यावर वचक बसणे फार गरजेचे आहे. आजही आम्हाला अधिकाऱ्यांना विनंती करुन त्यांना साहेब साहेब म्हणून काम करुन घ्यावे लागते. आमची अशी परिस्थिती झाली आहे की, सभागृहात ठरविलेल्या बाबींची अंमलबजावणी होत नाही. मतदारसंघात काम करताना अधिकाऱ्यांना साहेब साहेब म्हणून पाच वर्षे काम करावे लागते ही अतिशय दुदैवी बाब आमच्यासमोर सातत्याने येत आहे.

अध्यक्ष महोदय, ई-टेंडरींगच्या बाबतीत आमदारांना 10 लाखाची मुभा दिली पाहिजे. कारण आता दीड वर्षे गेले आहे, साडेतीन वर्षे हातामध्ये राहिली आहेत. खालची मंडळी म्हणतात की, तुमचा चालू वर्षाचा फंड आला नाही. आमदार फंडातून अद्याप एक रुपयाही खर्च झाला नाही ही खूप दु:खाची बाब आहे. माझ्यासारखा तरुण आमदार पहिल्यांदा निवडून आलेला आहे. पक्ष हा भाग वेगळा आहे. कोणी मला मनसे, शिवसेना, काँग्रेस किंवा राष्ट्रवादीचा आमदार म्हणतात. आमदार म्हणून स्वायत्ततेच्या माध्यमातून निवडून आल्यानंतर सर्वसामान्य माणसाची आपल्याकडे पाहण्याची दृष्टी वेगळी झालेली आहे. या संपूर्ण परिस्थितीत धोरणात्मक निर्णय घेताना अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीबाबत काही सन्माननीय सदस्य बोलले मला त्यांचे अभिनंदन करावेसे वाटते. 30 दिवसाच्या आत आमची आमदार फंडाची सर्व प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे. झेंडावंदन करण्याचा आमचा अधिकार आहे. साडेतीन चार लाख मतदारांतून आम्ही आमदार म्हणून निवडून येतो पण आमचे तलाठीसुध्दा ऐकत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे कधी कधी धोरणात्मक निर्णयाच्याबाहेर जाऊन काम करावे लागते. आपला तेथे सत्तेवर अंकुश असणे गरजेचे आहे म्हणून या सर्व बाबी कराव्या लागतात. आमदारांना सबळ ताकदीचे संरक्षण तुम्ही द्यावे. आमदारांची ताकद महाराष्ट्राच्या जनतेसाठी खर्च करु द्या. जनहितासाठी तुम्हाला सांगतो की, समाजसेवेची भूमिका सातत्याने पुढे घेऊन जाणारा कोणी असेल तर तो आमदार या चार शब्दाचा माणूस आहे. सुख

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.राहूल बोंद्रे )**

श्री.शरद सोनवणे .....

दु:खाचा साथीदार आमदार आहे. त्याची सेवा 24 तास उपलब्ध आहे. तो कधी म्हणत नाही की, रात्रीचे 2 किंवा पहाटेचे 4 वाजलेले आहे. अध्यक्ष महोदयांनाही कल्पना आहे की, आपण आमदार म्हणून निवडून आल्यामुळे कोणत्याही बाबतीत आपल्याला स्पेस ठेवता येत नाही.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांकरिता धोरण ठरवित असताना 2016-2017 मध्ये 50 टक्केच्या खाली आणेवारी असलेल्या गावात संपूर्ण महाराष्ट्राचे एकदा समान विवरण तयार करावे. त्या सर्व शेतकऱ्यांना आपण मुभा देऊन त्याला पीक विम्याचे संरक्षण द्यावे. विशेषतः आत्महत्याग्रस्त कुटूंबांना आपण मदत जाहीर करावी. निश्चितपणे या धोरणात्मक निर्णयामुळे त्या शेतकऱ्यांचा दुवा सरकार व आमदारांना मिळाल्याशिवाय राहणार नाही. माझ्या भाषणाच्या शेवटी सांगतो की, समाजसेवा विचार आमचा पोटात कसले पाप नाही. परंतु आमदारांच्या या भूमिकेशी संलग्न असलेल्या विचारांना जर कोणा अधिकाऱ्याचे किंवा चुकीचे धोरण आड येत असेल तर तेथे कोणाच्या बापाची टाप नाही.

अध्यक्ष महोदय, शेततळयाचे अनुदान व निधी वाढविला पाहिजे. विहीरीकरिता जास्तीत जास्त मदत उभी राहिली पाहिजे. शेतकऱ्याच्या हिताचे धोरण माननीय मुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री व सभागृहाने आमच्या सर्व भाषणांचा विचार करुन पारित करावे एवढी अपेक्षा सर्व आमदारांच्या व सर्व पक्षांच्या वतीने सभागृहासमोर मांडतो व माझ्या शब्दांना विराम देतो. धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप ( धामणगाव रेल्वे ): अध्यक्ष महोदय, राज्याचे माननीय अर्थमंत्री महोदयांनी मांडलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेऊन त्याबाबत माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

माननीय वित्तमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय भाषणाची सुरुवात अतिशय चांगली केलेली आहे. " ज्याच्या घामाच्या सुगंधाने भू-माता प्रसन्न होते आणि हिरवळीचे ताटवे फुलून येतात, तो शेतकरी या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू आहे. स्वातंत्र्याच्या सात दशकांमध्ये विकासाची सोनेरी किरणे ज्याच्या दारात पोहोचलेली नाहीत, अशा सर्व दीन दुर्बल, शोषित, पीडित, अंध, अपंग, निराधार विधवा, परितक्त्या, दलित, आदिवासी, असहाय बांधवांच्या विकासाचा निर्धार त्यांनी आपल्या भाषणामध्ये व्यक्त केलेला आहे."

अध्यक्ष महोदय, गेल्या तीन वर्षांपासून विदर्भ आणि मराठवाडा हा दुष्काळात होरपळत आहे. सन 2015-2016 च्या दुष्काळामध्ये नैसर्गिक आपत्ती म्हणजे गारपीट, अवकाळी पाऊस, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींच्या दुष्टचक्रात सापडलेल्या शेतक-याला प्रति हेक्टरी दिल्या जाणा-या मदतीमध्ये लक्षणीय वाढ केल्याचे भाषणात सांगितले गेले. शेतक-यांना भरीव मदत करुन देण्याची तयारी युती शासनाने अर्थसंकल्पातून दर्शविलेली आहे. " राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिली. अशीच या भाषणाच्या माध्यमातून सरकारची शेतक-यासंदर्भात गत झालेली आहे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.गुलाबराव पाटील यांनीही आपल्या भाषणात उल्लेख केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नागपूर येथील अधिवेशनामध्ये शेतक-यांकरिता 10200 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले होते. या पॅकेजमध्ये दुसरे तिसरे काहीही नसून शेततळयांकरिता एक हजार कोटी रुपये होते. विम्याच्या माध्यमातून मिळणारे 4500 कोटी रुपये, शेतक-यांना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहिरींकरिता मिळणारा निधी शेतकरी विशेष घटक योजनेच्या माध्यमातून मिळणा-या निधीचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. विहिरींच्या अनेक योजनांच्या माध्यमातून मिळणारा निधी पॅकेजस्वरुपात शेतक-यांकरिता घोषित करण्यात आला होता. ज्याप्रमाणे शासन जलयुक्त शिवार ही योजना विविध शासकीय योजनांचे एकत्रिकरण करुन राबविण्यात येत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....2

प्रा.विरेंद्र जगताप.........

त्याच प्रमाणे शेतक-यांना विविध खात्याच्या माध्यमातून मिळणारा निधी एकत्रितपणे पॅकेजच्या स्वरुपात देण्यात आलेला होता. शेतक-यांकरिता असलेला पैसा त्यांनाच फसव्या पॅकेजच्या स्वरुपात देण्यात आला होता. प्रत्यक्षात शेतक-यांच्या हातात काय पडणार आहे याचा साधा उल्लेख माननीय अर्थमंत्री यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये दिसून आलेला नाही. शेतक-यांना केंद्रबिंदू मानून अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री प्रत्यक्षात मात्र शेतक-यांच्या पदरात काहीच टाकू शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. शेतक-यांमध्ये निराशा उत्पन्न करणारा, शेतक-यांच्या आत्महत्या वाढविणारा हा अर्थसंकल्प आहे, असे स्पष्टपणे मला या निमित्ताने नमूद करावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात सर्वत्र जलयुक्त शिवार योजनेचे कौतुक होत आहे. जलयुक्त शिवार योजनेकरिता निधीची तरतूद जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून केली जात आहे. या योजनेच्या कामांना डीपीडीसीच्या माध्यमातून मंजूरी दिली जाते. जिल्हाधिकारी आणि एसडीओ जिल्हा समितीचे अध्यक्ष असतात. जिल्हा वार्षिक योजनेचे सर्वसाधारण या निधीची तरतूद आहे. दिनांक 17 डिसेंबर,2014 रोजीच्या शासन निर्णयानुसार डीपीडीसीच्या योजनांसाठी अंतिम मंजूरी डीपीडीसीच्या सदस्यांची घेणे आवश्यक आहे. डीपीडीसीच्या माध्यमातून आमच्या मतदारसंघातून कोणती कामे घेतली जात आहेत ? सिमेंट नाला, नाला खोलीकरण, नदीजोड प्रकल्प कुठे व कसे घेतले जात आहेत, याची आमदारांना माहिती नसते. एसडीओमार्फत ही कामे दिली जातात, जिल्हाधिकारी या कामांना मंजूरी देतात. सन्माननीय सदस्य श्री.चरण वाघमारे यांनी याबाबत हायकोर्टामध्ये रिट पिटीशन दाखल केली होती. या पिटीशनच्या निकालाच्या आधारावर दिनांक 17 डिसेंबर,2014 रोजीचा जी.आर.निघाला होता. हा जी.आर.निर्गमित झालेला असतांनाही जिल्हाधिकारी डीपीडीसीची मान्यता न घेता कामे देतात. एसडीओ कोणती कामे पाठवितात, याची माहिती सन्माननीय सदस्यांना नसते. याकरिता डीपीडीसी सदस्यांची मंजूरी घेतली जात नाही. माझी अर्थमंत्री महोदयांना विनंती आहे की, डीपीडीसीचे हेड वेगळे करा किंवा डीपीडीसी सदस्यांच्या मान्यतेशिवाय जलयुक्त शिवार योजनेच्या कामांना सुरुवात करण्यात येऊ नये.

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप.....

सन्माननीय देवेंद्रभाऊ व सन्माननीय सुधीरभाऊ विरोधामध्ये बसत असतांना माननीय राज्यपालांच्या निदेशांची अंमलबजावणी झाली पाहिजे, याबाबत आग्रही असत. सिंचनाच्या व रस्त्यांच्या अनुशेषाबाबत आग्रही होते.

श्री.जयकुमार रावळ : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.विरेंद्र जगताप हे ज्येष्ठ व अनुभवी सदस्य आहेत. त्यांनी माननीय मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांची नावे सन्मानाने घ्यावीत,अशीच माझी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.राहुल बोंद्रे ):** सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचे पालन केले जावे.

प्रा.विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, यंदा राज्यपाल महोदयांचे निदेश एक दिवस आधी वितरित होऊन देखील विदर्भातील अनुशेष कधी पूर्ण करण्यात येणार आहे, त्याकरिता काय नियोजन आहे, याचा कुठेही उल्लेख माननीय अर्थमंत्री यांनी केलेला नाही.

अध्यक्ष महोदय, राज्यपाल महोदयांच्या निदेशामधील मुद्दा क्रमांक 06 मध्ये विदर्भात सर्वाधिक आत्महत्या झालेल्या आहेत. असे असताना विदर्भातील 04 जिल्हयांचा अनुशेष संपलेला नाही. राज्यपाल महोदयांनी याबाबतची चिंता आपल्या निदेशांमध्ये व्यक्त केलेली आहे. माननीय राज्यपालांचे निदेश सभागृहामध्ये वाचून दाखवून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. अनुशेष निर्मूलनासाठी रिक्त पदे भरणे, प्रलंबित सुप्रमा देणे, निविदा पूर्व परवानग्या, निविदा संकेतांक या बाबतीत परवानगी मिळत नसल्यामुळे दीर्घ काळ लागत आहे. प्रकल्पांना सुप्रमा दिल्या जात नाहीत म्हणून निधी शिल्लक असतो तो सुप्रमा न मिळाल्यामुळे खर्च होत नाही. याबाबत माननीय अर्थमंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये उल्लेख करावा. माननीय राज्यपालांच्या निदेशांचे तंतोतंत पालन केले जाईल,असेही भाषणामध्ये सांगितले गेले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण म्हणजे सिंचन क्षेत्राचा अभाव आहे. वित्तमंत्री महोदय पूर्वी सिंचन सोयींमध्ये वाढ झाली पाहिजे, याबाबत आग्रही असत. आज विदर्भातील अनेक प्रकल्पांची 20-25 वर्षांपासून 90 टक्के पूर्ण झालेली आहेत, त्या प्रकल्पांमध्ये पाणी देखील अडविलेले आहेत.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.विरेंद्र जगताप......

परंतु ते अडविलेले पाणी शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याकरिता प्रकल्पांचे कालव्यांचे व पाटच-यांचे काम झालेले नाही म्हणून ते पोहोचवू शकत नाही. अप्पर वर्धा, लोअर वर्धा, बेंबळा, कोहळ प्रकल्पांची हीच परिस्थिती आहे. कोहळ प्रकल्पाचे काम 99 टक्के पूर्ण झालेला आहे. माझा माननीय वित्तमंत्री महोदयांकडे आग्रह आहे की, सिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याकरिता जास्तीत जास्त व पुरेशा निधीची तरतूद केली तर शेतक-यांपर्यंत पाणी पोहोचून त्यांच्या आत्महत्या कमी होतील. याकरिता कालबध्द कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भातील रस्त्यांचा अनुशेष संपलेला आहे, असे जे बोलले जाते, ते साफ खोटे आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणली गेलेली आहे. ही योजना आणल्यानंतर पूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून जी कामे घेतली गेलेली होती, ती कामे सुरु झाली होती. परंतु मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आल्यानंतर या योजनांच्या कामांकरिता निधी उपलब्ध होत नाही. माननीय ग्रामविकास मंत्री महोदया या कामांच्या निधीकरिता केंद्रीय ग्रामविकास मंत्री महोदयांना भेटल्या. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या अनुषंगाने हाती घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यात येणार आहेत की नाही ? याबाबत शासनाने निर्णय घ्यावा. या अर्धवट कामांमुळे, रस्त्यांच्या मातीकामामुळे गैरसोय होते.

डब्ल्यूडब्ल्यू-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप........

यासंदर्भात माननीय वित्तमंत्र्यांनी त्यांच्या भाषणातून उल्लेख करावा, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहे. विदर्भातील रस्त्यांचा अनुशेष खूप मोठ्या प्रमाणावर वाढत चालला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे महाधिवक्ता श्री. श्रीहरी अणेंनी काल केलेल्या विधानामुळे त्यांना आज राजीनामा द्यावा लागला होता. उर्वरित महाराष्ट्रात 78 टक्के रस्ते पूर्ण झाले आहेत. मराठवाड्यात 91 टक्के रस्ते पूर्ण झाले आहेत. परंतु, विदर्भात मात्र 70 टक्केच रस्ते पूर्ण झाले आहेत. सर्वांना समन्याय द्यायचा असेल तर विदर्भातील 13 हजार 654 कि.मी. रस्त्यांचा अनुशेष पहिल्या प्रथम दूर करण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील 2 हजार खेडी ही डांबरी रस्त्यांनी जोडावयाची आहेत. हे काम किती दिवसांमध्ये पूर्ण केले जाणार आहे, याचे उत्तर वित्तमंत्र्यांनी आम्हाला देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, अमरावती जिल्ह्यातील एमआयडीसीमध्ये 5 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सादर केल्याचे सांगितले जात आहे. परंतु, ही गुंतवणुक प्रत्यक्षात कागदावरच आहे. शासनाने अनेक घोषणा केलेल्या आहेत. तत्कालिन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील खूप घोषणा केलेल्या होत्या. मुख्यमंत्र्यांच्या मामाचे गाव आहे. आदरणीय श्री. गडकरी साहेबांच्या मामाचे गाव आहे. महिन्यातून दोन-दोन वेळा मुख्यमंत्री गावामध्ये येतात. याचप्रमाणे आदरणीय श्री. गडकरी साहेब हे देखील महिन्यातून दोन-दोन वेळा गावामध्ये येतात. अशा वेळी अमरावती विभागाचा झपाट्याने विकास होईल असे आम्हाला वाटत असते. त्यांचे सर्व लक्ष नागपूरवर केंद्रीत आहे. केंद्रीय मार्ग निधीमधून रस्त्यांसाठी 500 कोटी रुपयांची तरतूद नागपूर जिल्ह्यासाठी केली आहे. अमरावती जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामासाठी फक्त 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. बिलोरा विमानतळाचा विकास रखडलेला आहे. आवश्यक तेवढ्या जागेचे भूपांदन केलेले आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा अभ्यास थोडासा कमी असल्याचे दिसून येत आहे. सन्माननीय सदस्य प्रा. विरेंद्र जगताप यांनी त्यांच्या भाषणातून माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांचा उल्लेख केलेला आहे. या वर्षीचा अर्थसंकल्प तपासला तर महाराष्ट्रातील रस्त्यांसाठी 3 हजार कोटी रुपये मंजूर केलेले आहे.

.......2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, केंद्रीय मार्ग निधीमधून रस्त्यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद नागपूर जिल्ह्यासाठी केलेली आहे. तर अमरावती जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामासाठी फक्त 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही बाब माननीय ऊर्जा मंत्र्यांनी पुन्हा तपासून घेण्याची आवश्यकता आहे. नागपूर आणि अमरावतीमध्ये भेदभाव केला जातो ही सत्य परिस्थिती आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागच्या 15 वर्षाचा इतिहास लक्षात घेता जेवढा निधी रस्त्यांच्या कामासाठी मिळालेला नव्हता, त्यापेक्षा किती तरी अधिक निधी या वर्षी दिलेला आहे.

प्रा. विरेंद्र जगताप : अध्यक्ष महोदय, आज 5 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव कागदावरच आहेत. यासंदर्भात वित्तमंत्र्यांनी उत्तराच्या भाषणातून आम्हाला माहिती द्यावी, अशी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाला कशा प्रकारे केराची टोपली दाखविले जाते हे सांगून मी माझे भाषण संपविणार आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे जन्माने आंधळे होते. असे असताना देखील त्यांचे लिखाणावर आणि अभ्यासावर वर्चस्व होते. त्यांचे जन्मस्थळ माझ्या मतदारसंघातील लोणी गावात आहे. लोणी गावाचा विकास आराखडा तयार करून त्याचा समावेश अर्थसंकल्पात करावा असे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले असता माननीय वित्तमंत्र्यानी त्यांच्या अर्थसंकल्पात त्याचा साधा उल्लेखही केलेला नाही. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशाला केराची टोपली दाखविली जाते की काय, अशी शंका या निमित्ताने उपस्थित होत आहे. यासंदर्भात मी माननीय वित्तमंत्र्यांची भेट घेतली होती. त्याचप्रमाणे मी अप्पर मुख्य सचिव, वित्त, अप्पर मुख्य सचिव, नियोजन आणि प्रधान सचिव, ग्रामविकास यांना मुख्यमंत्र्याचे आदेश दाखविले होते. तरी, देखील गुलाबराव महाराज संस्थान, लोणी, तालुका नांदगाव खांडेश्वर याचा उल्लेख माननीय वित्तमंत्र्याच्या भाषणात केलेला नाही. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी 6 कोटी रुपयांचा प्रस्ताव

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. विरेंद्र जगताप........

शासनाकडे दिलेला आहे. मला वित्तमंत्री महोदयांनी सांगितले होते की, अर्थसंकल्पात उल्लेख झालेला नसला तरी मी माझ्या उत्तराच्या भाषणात आश्वासन देणार आहे. सभागृहात माननीय वित्तमंत्री आता उपस्थित नाहीत. यासंदर्भात ऊर्जा मंत्र्यांनी माननीय वित्तमंत्र्यांच्या लक्षात ही गोष्ट आणून द्यावी, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आदरणीय वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्पाची सुरुवात चांगल्या उद्देशाने केलेली आहे. परंतु, या अर्थसंकल्पाचा शेवट मात्र शेतकरी, गोरगरीब, अंध, दुर्बल, शोषित पीडित, निराधार विधवा परितक्त्या, दलित आदिवासी समाजाला आणि शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही म्हणून मी हे अर्थसंकल्पीय भाषण संयुक्तिक नाही असा आक्षेप नोंदवून मी या ठिकाणी थांबतो. धन्यवाद.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण ( बागलाण ) : अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी सन 2016-2017 चा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी ऊभी आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात जिल्हा परिषद ते राज्याचे उप मुख्यमंत्री असा राजकीय प्रवास करणारे अवघ्या महाराष्ट्राचे लाडके नेते आर.आर.पाटील (आबा) यांना नियतीने आपल्यातून अकाली हिराऊन नेलेले आहे. राज्याचे गृहमंत्री या नात्याने आबांनी गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वतःहून स्वीकारले होते. तसेच महात्मा गांधी तंटामुक्ती योजना, डान्सबार बंदी अस निर्णय घेत राजकारण व नितीमत्ता यांची सांगडत घालत राजकारणात एक आदर्श निर्माण केलेला होता. अशा उत्तुंग व्यक्तीमत्वाच्या स्मारकासाठी राज्याचे वित्तमंत्री माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी 5 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्य गेल्या 3 वर्षापासून दुष्काळाला सामोरे जात आहे. पाऊस कमी पडत असल्याने त्याचा परिणाम शेतकऱ्यांना भोगावा लागत आहे. पाऊस कमी असला तरी घोषणांचा पाऊस मात्र अवघ्या महाराष्ट्राला चिंब भिजवित आहे. गेल्या 2 वर्षात ग्रामीण भाग आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे केलेल्या दुर्लक्षांमुळे जे चटके निवडणुकीत बसायला लागलेत तेव्हा कुठे केंद्र आणि राज्य सरकारला शेतकऱ्यांची आणि ग्रामिण भागातील लोकांची दया आली होती. शेतकरी भिकेचे कटोरे घेऊन दारात उभा नाही. तर त्याला स्वाभीमानाचे जगणे हवे आहे. पुढील वर्ष शेतकरी स्वाभीमानी वर्ष म्हणून जाहीर केलेले असले तरी त्यामुळे शेतकरी लगेच कर्जमुक्त होऊन त्यांच्या घरी सुबत्ता पाणी भरणार आहे असे नाही.

अध्यक्ष महोदय, लाखो हजारो कोटी रुपयांची आकडेवारी जाहीर करुन शेतकऱ्यांचे पोट भरणार नाही. शेतकऱ्यांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करायलाच हव्या याबाबत दुमत असल्याचे काहीही कारण नाही. परंतु, त्याबाबत केलेल्या घोषणा आणि त्यातील हजारो कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारची तिजोरी तेवढी सक्षम आहे का, याचा विचार केलेला दिसत नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण........

गेल्या वर्षी माननीय वित्तमंत्र्यांनी 54 हजार कोटी रूपयांचा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यानंतर वर्षभरात 35 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करुन घेतल्या. आर्थिक डोलारा कोसळल्याचे हे लक्षण आहे. राज्यावरील 3 लाख 36 हजार कोटी रूपयांचे कर्ज हे राज्याच्या अर्थ व्यवस्थेचा आकार पाहता तर फार मोठे नाही. परंतु, संधी असताना आर्थिक शिस्त पाळली नाही तर पंजाब राज्यासारखी वेळ येईल याचे भान ठेवायला हवे. दुष्काळामुळे शेतकऱ्यांना मदत करावी लागली, ही वस्तुस्थिती असली तरी शेतकऱ्यांना केलेल्या मदतीचा आणि वित्तीय तुटीच्या आकड्यामध्ये मोठी तफावत आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी अर्थसंकल्प जाहीर होण्याच्या काही तास अगोदरच राज्याच्या बिघडलेल्या वित्तीय शिस्तीबद्दल वाभाडे काढले होते. राज्याची वित्तीय तूट 3 हजार 757 कोटी रूपये राहील असे गृहीत धरले असताना राज्याची प्रत्यक्षात वित्तीय तूट माननीय वित्तमंत्री यांच्या आकडेवाडीनुसार 9 हजार 289 कोटी रूपये इतकी झाली. एकीकडे केंद्र सरकार वित्तीय तूट साडेतीन टक्क्याच्या आत आणण्याचा प्रयत्न करीत असताना देशातील प्रगत राज्यात गणना होणाऱ्या महाराष्ट्राची वित्तीय तूट वाढली असून ते धोकादायक आहे. अशा परिस्थितीत निवडणुकीच्या वर्षासारखा अर्थसंकल्प सादर करण्याची खरेतर आवश्यकता नव्हती. माननीय महसूल मंत्री श्री. खडसे यांनी राज्याची विस्कटलेली आर्थिक घडी बसविण्यासाठी कठोर निर्णय घेण्याच्या आवश्यकतेवर भर दिला असताना माननीय वित्तमंत्री यांनी आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या भावनेकडे अर्थसंकल्प सादर करताना दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षी बहुतांशी विभागातील विकास कामांना 30 टक्केपर्यंत कात्री लावलेली होती. करात वाढ केली की, उद्योग परराज्यात जातात हा अनुभव आहे. त्यामुळे काही अनुदानाच्या योजना बंद करायला हव्या होत्या. त्याऐवजी पूर्वीच्या योजनांवर अनुदानाची बरसात करत माननीय वित्तमंत्री यांनी सरकारच्या तिजोरीवरील ताण वाढविलेला आहे. सरकारने पुढील

.....6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण........

वर्षाचे उत्पन्न 2 लाख 20हजार 810 कोटी रुपये गृहीत धरले आहे. तर महसूली खर्च 2 लाख 24 हजार 454 कोटी रुपये होण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पीय भाषणात ठराविक तरतूद करताना पुरवणी मागण्याच्या वेळी आणखी तरतूद करण्याचे माननीय वित्तमंत्र्यांनी दिलेले आश्वासन पहाता महसूली खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांसाठी 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु, गेल्या तीन वर्षापासून ठिबक सिंचन संचाचे अनुदान ही न देऊ शकणारे सरकार आत्ताच्या कोटीच्या कोटी घोषणा प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत खरच पोहचवेल तेव्हाच शेतकऱ्यांना स्वाभीमानाने जगणे शक्य होईल. पायाभूत सुविधा पिकविमा योजना, जलयुक्त शिवार योजना, शेततळी, कडधान्य, तेलबिया, उत्पादनासाठी अनुदान, सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन विदर्भातील मालगुजार तलावांचे पुनरुज्जीवन आदर्श शेतकरी गुरुकूल कृषीपूरक उद्योगाला चालना, पंडीत दिनदयाळ कृषी मार्गदर्शन योजना आदी योजनांच्या घोषणांचा पाऊस माननीय वित्तमंत्र्यांनी पाडलेला आहे.

XX-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण...

एकीकडे पिण्याच्या पाण्यासाठी दंगली होऊ नयेत म्हणून मराठवाड्यात जमावबंदी आदेश लागू करण्यात आला असताना दुसरीकडे राज्याचे अर्थ मंत्री यांनी एकामागून एक घोषणांचा पाऊस पाडला. त्यातील काही घोषणा तर जुन्याच आहेत. महिला बचत गटांना शून्य टक्के व्याजाने कर्ज देण्यासाठी त्यांनी केवळ दहा कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाची तीव्रता जास्त आहे. तेथे शेतीला पुरक जोडधंदा नाही. अशा पार्श्वभूमिवर मराठवाडा आणि विदर्भात दुग्ध व्यवसायाला चालना देण्याचा निर्णय चांगला असला तरी राज्यातील दुधाचे दर दुध उत्पादकांना परवडणारे नाहीत. राज्यात दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली व त्यात अठरा लाख युवकांना रोजगार मिळाला असे अर्थ मंत्री सांगत असले तरी, गेल्याच आठवड्यात प्रसिध्द झालेल्या एका अहवालात महाराष्ट्र अजूनही उद्योगपुरक भूमिका घेण्यात कसा मागे आहे, हे उघड झाले आहे. महसूल मंत्री व कृषी मंत्री यांना त्यांच्या त्यांच्या तालुक्यात कृ्षी महाविद्यालये देऊन त्यांना खूश करण्याचा प्रयत्न केला आहे. चंद्रपूर या आपल्या स्वतःच्या जिल्ह्यासाठी शंभर कोटी रुपयांची तरतूद करुन वाढपी आपल्या ओळखीच्या व्यक्तिच्या ताटात जादा टाकतो. याचा प्रत्यय अर्थ मंत्री यांनी आणून दिला आहे.

अध्यक्ष महाराज, ग्रामविकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कोणतीही ठोस योजना या वर्षीच्या अर्थसंकल्पात मांडण्यात आलेली नाही. या सर्व जुन्याच योजना चालू ठेवण्यात आल्या आहेत. त्याची माहती ग्रामीण जनतेला व्हावी म्हणून प्रत्येक ग्रामपंचायतीत डिजीटल बोर्ड लावण्याचे ठरले खरे पण ही संकल्पना जुनीच आहे

गावांच्या शाश्वत विकासासाठी स्मार्ट गाव योजना प्रस्तावित आहे, असे अर्थ मंत्र्यांनी म्हटले आहे, मात्र ते कसे होणार, त्यासाठी कोणती योजना आहे, हे अद्यापहि स्पष्ट झालेले नाही. आदर्श ग्राम योजना, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान किंवा महात्मा गांधी तंटामुक्ती यासारख्या संपूर्ण देशभरात आदर्श मानल्या गेलेल्या योजनांचे पुढील भवितव्य काय, हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामपंचायती अधिक सक्षम करण्यात येतील, असे अर्थ मंत्र्यांनी सांगितले खरे, पण त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद व ज्या योजनेतून ग्रामपंचायती सक्षम होणार आहेत, त्याबाबत काहीच स्पष्टता दिसत नाही. शिवाय ग्रामविकासात

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दिपीका चव्हाण...

अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या जिल्हा परिषदा व तालुका पंचायत समित्या सक्षम करण्यासाठी कुठलेच उपाय या अर्थसंकल्पात करण्यात आलेले नाहीत. यामुळे ग्रामीण भागाच्या विकासासाठी यंदाचा अर्थसंकल्प निराशाजनक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

--------------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : अध्यक्ष महाराज, मी सर्वप्रथम अतिशय समतोल असा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल माननीय अर्थ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांचे मनापसून अभिनंदन करते. कृषी विकास, ग्रामविकास, शहर विकास त्याचबरोबर महिलांचा आत्मसन्मान जोपासणारा हा अर्थसंकल्प आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. महिलांसाठी स्वतंत्र तेजस्विनी बसेसची कल्पना, स्व. सुमतीताई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना, स्व. बाळासाहेब ठाकरे ग्राम योजना, राज्य महामार्गावर स्वच्छतागृहांची योजना, अशा अनेक योजनांच्या माध्यमातून महिलांसाठी या अर्थसंकल्पामध्ये अनेकी चांगल्या योजना केलेल्या आहेत. शेतकरी स्वाभिमानी वर्ष या दृष्टीकोनातून अर्थसंकल्प अतिशय चांगला म्हणता येईल.

अध्यक्ष महाराज, या अर्थसंकल्पातील काही चांगल्या गोष्टी टाळण्याचा मोह टाळून मी फक्त दोन गोष्टींवर स्पेसिफिक बोलणार आहे. "स्वच्छ भारत" हे माननीय पंतप्रधानाचे स्वप्न असून "एक एक कदम स्वच्छता की और" असा नारा त्यांनी दिलेला असताना भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील तिर्थक्षेत्र पवित्र तिथक्षेत्र म्हणत असताना अस्वच्छतेमुळे ती अपवित्र झालेली दिसतात. विशेषकरुन आषाढी वारीच्या वेळेला 12 लाख भाविक, तेथे जातात. त्यांच्या जेवणाची आणि राहण्याची व्यवस्था होत असताना स्वच्छता गृहाची व्यवस्था मात्र तेथे झालेली दिसत नाही. जवळ जवळ 21 दिवस तेथे घाणीचे साम्राज्य पसरते त्यामुळे दुर्गंधी आणि आजाराचा फैलाव होतो. यावर्षी एक वेगळा प्रयोग "सेवा सहयोग" या संस्थेच्या माध्यमातून केला गेला. त्यामध्ये माजी खासदार श्री.प्रदिप रावत आहेत. अनेक स्वयंसेवी संस्थानी यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात भाग घेतला. यामध्ये एक प्रायोगिक तत्वावर लोणी आणि यावत येथे 400 स्वच्छतागृहाची योजना केली. 34 हजार नागरिकांनी याचा लाभ घेतला. जवळ जवळ 3000 स्वयंसेवी संस्थांनी अहोरात्र काम करुन वारकऱ्यांना स्वच्छतागृहे वापरण्यासाठी प्रेरणा देत होते. मी शासनाचे यावेळी अभिनंदन करते. त्यांनी अशाच प्रकारचा प्रयोग पंढरपूर येथे करुन जवळ जवळ एक हजार टॉयलेटस बसविली. पाच लाख भाविकांनी याचा लाभ घेतला. एवढेच नव्हेतर टॉयलेटस सोबतच तयार झालेले सिव्हरेजचे पाणी ट्रिटमेंट प्लॉन्टपर्यत पोहाचविण्यापर्यंत काम केले. त्यामुळे 100 टक्के स्वच्छता पाळली गेली, त्यामुळे ग्रामस्थांनी सुध्दा या बदलाचा अनुभव आला.

अध्यक्ष महाराज, माननीय वित्त मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मला माननीय अर्थमंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मेधा कुलकर्णी...

यांना विनंती करावयाची आहे की, देहू ते पंढरपूर आणि आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मार्गावर प्रत्येक मुक्कामाच्या टप्प्यावर ही योजना राबविली तर फारसा खर्च येणार नाही. जवळपास दहा ते बारा कोटी रुपये एवढाच खर्च अपेक्षित आहे. एवढी तरतूद आपण यावर्षी करावी. यावर्षीच्या वारीमध्ये आपण हा परिणाम दाखवून द्यावा, अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महाराज, आपल्या जाहिरनाम्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठीची वयाची मर्यादा 65 वरुन 60 वर आणली आहे. मागील हिवाळी अधिवेशनात संबधित खात्याच्या मंत्री महोदयांनी घोषणा केली, परंतु या अर्थसंकल्पात अशी तरतूद झालेली नाही. ही तरतूद केली तर नक्कची याची अंमलबजावणी होईल. पुणे हे विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक केंद्र, आयटीआय हब आहे. पुणे शहराच्या शेजारी पिंपरी चिंचवड उद्योग नगरी असून यावर्षीच्या अर्थसंकल्पात पुणे शहरावर थोडासा अन्याय झालेला दिसतो आहे. यावर्षी पुणे मेट्रोसाठी थोडीशी भरीव तरतूद करण्याची मी विनंती करते. माझ्या कोथरुड मतदार संघामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांनींसाठी होस्टेल मंजूर झालेले असून निधीअभावी आम्ही बांधकाम करु शकले नाही. म्हणून मी वित्त मंत्री महोदयांना विनंती करते की, यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद यावर्षीच्या अर्थसंकल्पात करावी. त्याचबरोबर या भागामध्ये मल्टीसुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल एकही नाही. अशा प्रको हॉस्पिटलचे बांधकाम करण्यासाठी तरतूद केली तर त्याचा उपयोग गरीब नागरिकांना होईल.

अध्यक्ष महाराज, आपण मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपली आभारी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रदीप नरके (करवीर): अध्यक्ष महाराज, माननीय अर्थमंत्र्यांनी यावर्षीचा अर्थसंकल्प मांडत असताना हा शेतकऱ्यांचा अर्थसंकल्प, माझा शेतकरी स्वावलंबी, दुष्काळ निवारण, कृषी क्षेत्र, पशु संवर्धन, सिंचन क्षेत्र, ग्रामविकास, उद्योग आणि कौशल्याकरिता, वस्त्रोद्योग आणि पणन, पायाभूत सुविधा, निवास नागरिकीकरण, आरोग्य, शिक्षण, क्रिडा सार्वजनिक वितरण व्यवस्थेसह पर्यावरणापासून ते पर्यटनापर्यंत अशा अनेक योजनांमध्ये सर्वसमावेशक अशा पध्दतीने हा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी प्रिाम माननीय अर्थमंत्र्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

यानंतर YY-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके ...

राज्यातील सर्व विभागांचा गोषवारा पाहून प्रत्येक विभागाला राज्याला कराच्या माध्यमातून जमा होणारे पैसे पोहोचले पाहिजेत हा दृष्टिकोन समोर ठेवून अर्थसंकल्प जाहीर केला. त्याच बरोबर या अर्थसंकल्पामध्ये आपण जो निधी ज्याकरिता वितरित केला आहे, तो योग्य तऱ्हेने तेथे जात आहे की, नाही हे पाहण्याकरिता प्रशासनाची यंत्रणा योग्य तऱ्हेने कार्यक्षम करणे ही सुद्धा येथून पुढच्या काळातील गरज आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र हे कृषी प्रधान राज्य आहे. आज आपण पाहिले तर, शहरी विभागात 45.5 टक्के लोक ग्रामीण अर्थव्यवस्थेतून येऊ लागले आणि केवळ 55 टक्के इतकी ग्रामीण अर्थव्यवस्था किंवा ग्रामीण भाग राहिलेला आहे. शेतकऱ्याला शक्ती देणे, त्याला स्वतःच्या पायावर उभा करणे गरजेचे आहे. आपल्या भाषणातही अर्थ मंत्री महोदयांनी सांगितले की, सक्षम शेतकरी आणि समृद्ध ग्रामीण क्षेत्र हाच मेक इन इंडियाचा खरा पाया आहे. हा पाया मजबूत करण्यासाठी ग्रामीण भागातून आलेला लोकप्रतिनिधी म्हणून, एक शेतकरी म्हणून मी आपल्यासमोर काही मुद्दे मांडणार आहे. आज शेतकऱ्याला वेळेवर पाणी, वीज, खते व सुलभ कर्ज उपलब्ध झाले पाहिजे. या 4-5 गोष्टी प्रामुख्याने केल्या तर हा शेतकरी अधिकाधिक उत्पन्न घेऊन या राज्याला अधिक सक्षम करण्याकरिता निश्चितपणे त्याचे योगदान देईल.

अध्यक्ष महोदय, 25 हजार कोटीं रूपयांमध्ये जलयुक्त शिवार अभियान योजनेसाठी, दुष्काळ निवारणासाठी पैसे दिलेले आहेत. 2 हजार कोटी रूपये, 1 लाख शेततळ्यांकरिता, 37500 विहिरी आणि 90 हजार विद्युत पंप जोडणीकरिता ठेवलेले आहेत. मला या निमित्ताने आपल्याला हे सांगावयाचे आहे की, मागच्या 5 वर्षांमध्ये पाहिले तर, विद्युत जोडणीसाठी एवढे पैसे उपलब्ध नव्हते. अजूनही आपण मागच्या वर्षी अर्थसंकल्पात वितरित केलेला निधी पाहिला तर, आताच्या युती सरकारने वीज जोडणीसाठी चांगले पैसे उपलब्ध करून दिले आहेत हे समजेल. सन 2012-2013 पर्यंतच्या विद्युत जोडण्या मागे दिल्या जात नव्हत्या. आज सन 2013-2014 पर्यंत विद्युत जोडण्या आल्या आहेत. तरीही माझे हेच सांगणे आहे की, आजही विद्युत कनेक्शन देत असताना ज्यांनी सन 2013-2014 मध्ये पैसे भरले, त्यांच्याही विद्युत जोडण्या अपुऱ्या आहेत. शेतकऱ्याला

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके ...

वेळेवर विद्युत जोडणी मिळाली तर, आजही त्याला शेताला पाणी देता येईल. या कृषी प्रधान राज्यामध्ये किती लोकप्रतिनिधी शेतकरी आहेत, याची आपण खात्री केली पाहिजे. आज मेक इन इंडियाच्या माध्यमातून आपण उद्योगांकरिता पायघड्या घालतो, त्यांना जमीन उपलब्ध करुन देतो, त्यांच्याकरिता विजेची सोय करतो, त्यांना स्वस्त वीज देता येईल का ते पाहतो. आपण भाषणात सांगितले की, ग्रामीण क्षेत्रातील समृद्ध शेतकरी व सक्षम शेतकरी हा मेक इन इंडियाचा पाया आहे. परंतु, त्या शेतकऱ्याला वेळेवर वीज उपलब्ध होते काय ? या सभागृहात मला हे सांगावयाचे आहे की, शेतकऱ्याला शेतीला पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता 3 दिवस सकाळी व 4 दिवस रात्री वीज दिली जाते. आपण रात्री 10-12 वाजल्यापासून ते सकाळी 6 वाजेपर्यंत शेतकऱ्याला वीज देता. आज आपल्याला वीज अपुरी पडते म्हणून शेतकऱ्यांवर भार नियमन केले जाते. उद्योग क्षेत्राला जादा दराने वीज देता येते, याकरिता आपण त्यांना 24 तास वीज उपलब्ध करुन देतो आणि शेतकऱ्याला मात्र आपण 8 तास वीज उपलब्ध करुन देता ? त्याला 4 दिवस सकाळी 10 ते संध्याकाळी 6 असे 8 तास वीज देता व रात्री 10 ते सकाळी 6 वाजेपर्यंत वीज देता. या ठिकाणी एसीमध्ये बसणाऱ्या शहरी भागातील अधिकाऱ्यांनी एकदा आमच्या बरोबर शेतात यावे आणि रात्री 10 व 11 वाजता शेतीला पाणी देताना काय हाल होतात हे एकदा पहावे. चंदगड, गगनबावड्या सारख्या ठिकाणी हत्ती व गव्यांचा त्रास होतो. तेथे गव्यांचे कळप असतात. तसेच, सर्पही असतात. ज्या शेतकऱ्याला आपण मेक इन इंडियाचा पाया समजता, त्या शेतकऱ्याला आपण रात्रीची वीज देता ? आपण एक समिती करावी, त्यामध्ये 2-3 मंत्री महोदयांचा समावेश करावा, शासकीय अधिकारी घ्यावेत. शेतकरी पाटाला पाणी कसे पाजतो हे त्यांच्या हातात एकदा खोरे व पाटी दिली तर त्यांना समजेल.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्याला सकाळच्या सत्रात वीज दिली तर, ऊसाच्या क्षेत्रात शेतकऱ्याचे उत्पन्न किमान 10 टनांनी वाढेल. एका साखर कारखान्यात 10-10 हजार हेक्टर क्षेत्राची नोंद असते, त्याचे उत्पन्न जर किमान 10 टनांनी वाढले तर, शेतकऱ्याला आपल्याला वेगळे काही द्यावे लागणार नाही. शेतीमालाला आपण हमी भाव दिला काय ? आपण शेतकऱ्याला वेळेवर वीज द्यावी.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके ...

शेतकऱ्याच्या शेतीमालाला हमी भाव द्यावा. कांद्याचे भाव 35 रुपये प्रती किलो झाले तर सरकार त्यावर लगेच नियंत्रण आणते. परंतु, ज्यावेळेस कांद्याचा भाव 5 ते 7 रुपये प्रती किलो होतो त्यावेळेस तो फेकून द्यावा लागतो. आजच्या ऊसाच्या शेतकऱ्याला एफआरपी प्रमाणे दर देत असताना, साखरेचे बाजारभाव पडले तर, सरकार आपल्याला कर्ज म्हणून मदत देते. परंतु, साखरेचे भाव वाढले तर, शहरी भागात ताबडतोब ओरड होते. मला एवढेच सांगावयाचे आहे की, जर या शेतकऱ्याला हमी भाव ठरवून दिला तर, खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठी हा अर्थसंकल्प केला आहे असे होईल.

अध्यक्ष महोदय, आज रस्ते विकासाकरिता चांगल्या पध्दतीचा निधी दिलेला आहे. नाबार्डची योजना ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्गाकरिता होती. नाबार्ड पूर्वी पैसे किंवा निधी देत होते तेव्हा शेतकऱ्याचा कृषी माल हा ग्रामीण रस्त्यांवरुन, इतर जिल्हा मार्गावरुन प्रमुख जिल्हा मार्गावर यावा, यासाठी निधी देत होते. परंतु, अलीकडच्या काळात नाबार्डच्या माध्यमातून शेतकऱ्याला या ग्रामीण मार्गाकरिता पैसे उपलब्ध होत नाहीत. माझी विनंती आहे की, आपण प्रमुख जिल्हा मार्गाला राज्य बजेट मधून पैसे द्यावेत. ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गांसाठी नाबार्डच्या माध्यमातून पुन्हा एकदा पैसे देण्यासाठी सरकारने नियोजन करावे.

अध्यक्ष महोदय, आज मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या योजनेचे मी अभिनंदन करतो. ही योजना आणली परंतु, त्याचा एकूण लेआऊट पाहिला तर, मला असे वाटते की, 500 कोटी रुपये हे या ग्रामीण रस्त्यांकरिता पुरेसे नाहीत. माझ्या कोल्हापूर जिल्ह्यातील उदाहरण घेतले तर, 130 कि.मी. चे रस्ते मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून करण्यात येणार आहेत. या अंतर्गत प्रत्येक मतदारसंघात 8 ते 9 कि.मी.चा रस्ता होणार आहे. ग्रामीण मार्गांची व इतर जिल्हा मार्गांची लांबी आपण पाहिली तर, हा निधी अपुरा आहे. याकरिता किमान अडीच ते तीन हजार कोटी रुपयांचा निधी दिला असता तर, ही योजना सफलतेच्या दृष्टीने पुढे गेली असती.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके ...

अध्यक्ष महोदय, आपल्याला कल्पना आहे की, वीज निर्मिती प्रकल्पासाठी 784 कोटी रुपये दिलेले आहेत. महाराष्ट्रात अनेक सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून बगॅस बेसवर को-जनरेशनचे प्रकल्प सुरु आहेत. अनेक सहकारी साखर कारखान्यांचे को-जनरेशन प्रकल्प कार्यान्वित नाहीत. आज महाराष्ट्रात 1400 मेगावॅट इतकी वीज निर्मिती सहकारी व खाजगी साखर कारखान्यांच्या माध्यमातून होत आहे.

ZZ-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. चंद्रदीप नरके.....*

*आज अनेक सहकारी साखर कारखाने वीज निर्मिती करु शकत नाही. त्यांची अवस्था एवढ्यासाठीच आहे. जर महाराष्ट्राने राहिलेल्या साखर कारखान्यांना स्वत:हून स्वॉफ्ट लोन दिले तर, त्यांना वेगवेगळ्या पद्धतीने प्रेरित केले तर राहिलेल्या साखर कारखान्याच्या माध्यमातून १ हजार मेगावॅट वीज निर्मिती होईल. परंतु या अर्थसंकल्पामध्ये सहकारी साखर कारखान्यांच्या मदतीचा उल्लेख केलेला नाही. सहकार खात्यामार्फत आणि ऊर्जा खात्यामार्फत या ठिकाणी पर्यावरणाला प्रदुषण विरहित वीज निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.*

*अध्यक्ष महोदय, आपल्याला समृद्ध पिढी निर्माण करायची असेल तर क्रीडा क्षेत्रासाठी विशेष अनुदान देण्याची आवश्यकता आहे. २०२० मध्ये होणाऱ्या ऑलोंपिक स्पर्धेमध्ये राज्यातील खेळाडूंनी भाग घ्यावा याकरिता ३ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. परंतु मला वाटते की, सारासार विचार केला तर महाराष्ट्रातील किती खेळाडू ऑलिंपिंकला जातात याची आपण माहिती घ्यावी. क्रीडा क्षेत्राकरिता भरीव निधी देण्यात आलेला नाही. तालुका क्रीडा संकूल, जिल्हा क्रीडा संकूल अपूर्ण अवस्थेत आहेत. आपल्याला ऑलिंपीकसाठी खेळाडू तयार करायचे असतील तर क्रीडा खात्याचा भार स्वतंत्र मंत्र्यांना देण्याची गरज आहे. या खात्याचा भार इतर खात्यातील मंत्र्यांना देऊन क्रीडा क्षेत्राला दुय्यम समजले जाते. आज महाराष्ट्रातील मल्ल, नेमबाजीचे स्पर्धक तसेच विविध खेळात जागतिक कॅडरमध्ये ज्यांनी पदके जिंकली, नंबर मिळविला, अशा खेळाडूंना सरळसेवेमध्ये घेण्याच्या नियोजनाची अधिक व्याप्ती वाढविण्यात यावी. क्रीडा क्षेत्र महत्वाचे आहे. याकरिता केलेली तरतूद अतिशय कमी आहे. माझी मागणी आहे की, या राज्याला स्वतंत्र क्रीडा मंत्री देण्यात यावा. शिक्षण व क्रीडा विभागाचा भार एकाच मंत्र्यांकडे देण्यात येऊ नये. क्रीडा मंत्री पदाचा भार स्वतंत्र मंत्र्यांवर दिल्यास आपल्याला महाराष्ट्रातून चांगले खेळाडून निर्माण होऊ शकतील.*

*अध्यक्ष महोदय, कोल्हापूरची अंबाबाई किंवा महालक्ष्मी करिता आपण तरतूद केलेली नाही. मी अंबाबाई मुद्दाम म्हणतो. कोल्हापूरची अंबाबाई आहे व महालक्ष्मी देखील आहे. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी आम्हाला कल्पना दिली होती की, या अर्थसंकल्पातून ६५ कोटी रुपयांचा निधी दिला जाईल. कोल्हापूर तिर्थक्षेत्राचा आराखडा आला परंतु कोल्हापूरच्या महालक्ष्मीचा आणि अंबाबाईचा साधा उल्लेकही करण्यात आलेला नाही. याकरिता*

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. चंद्रदीप नरके.....*

*निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. यासाठी आपण १२५ कोटी रुपयांचा आराखडा केला होता. पुणे येथे नियोजन समितीच्या आराखड्यासंदर्भात झालेल्या बैठकीत आपण सांगितले होते की, कोल्हापूर येथील तिर्थक्षेत्राचा आराखडा व्यवस्थीतपणे तयार करावा. त्याकरिता किमान ६५ कोटी रुपयांचा निधी देण्यासंदर्भात संदर्भात माननीय पालक मंत्री यांनी सांगितले होते. परंतु अर्थसंकल्पात याबाबीचा साधा उल्लेखही करण्यात आलेला नाही. आपण सर्वजण महालक्ष्मी, अंबाबाईच्या दर्शनाकरिता जात असतो, त्यांच्याकडे आपले गऱ्हाणे मांडत असतो. परंतु महालक्ष्मी, अंबाबाईच्या तिर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याला मागील सरकारने व याही सरकारने निधी दिला नाही. मंत्री महोदय म्हणतात त्याप्रमाणे निधी दिला असेल तर चांगली बाब आहे. परंतु या अर्थसंकल्पामध्ये निधी दिल्याचे मला आढळून आलेले नाही. आपण अंबाबाईकडे व महालक्ष्मीकडे दुर्लक्ष करु नका. मागील वेळी आघाडी सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे अंबाबाई त्यांच्यावर कोपली असून युती सरकावर कोपायला नको, यासाठी आपण अंबाबाई व महालक्ष्मी यांच्याकडे दुर्लक्ष करु नये.*

*अध्यक्ष महोदय, पर्यटन विकास आराखड्यामध्ये कोल्हापूर जिल्हा पर्यटन म्हणून जाहीर करण्याबाबतची आम्ही मागणी केली होती. आपण औरंगाबाद जिल्ह्याचे नाव जाहीर केले. परंतु कोल्हापूरकडे दुर्लक्ष केले आहे. कोल्हापूरमध्ये गगनबावडा, पन्हाळा, ज्योतीबा इत्यादी पर्यटन स्थळे असून ही उणीव येणाऱ्या काळामध्ये भरुन काढावी, अशी माझी विनंती आहे.*

*अध्यक्ष महोदय, या अर्थसंकल्पात सिंचन व्यवस्थेसाठी ७ हजार ८०० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माझ्यामतदार संघामधील धामणी प्रकल्पासंदर्भात आम्ही आपल्याकडे सातत्याने मागणी केलेली आहे. हा प्रकल्प साडेतीन टीएमसीचा असून याचे जवळजवळ ५० टक्के काम पूर्ण झालेले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी आपल्याकडे प्रस्ताव आलेला आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समितीने त्यास मान्यता दिलेली आहे. मुख्यमंत्री महोदय व आपल्याकडे यासंदर्भात आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. माझी या निमित्ताने आपल्याकडे मागणी आहे की, याकरिता करण्यात आलेल्या तीन सदस्यीय समितीमध्ये यास मान्यता देऊन कॅबिनेटपुढे मान्यता घेऊन याची सुप्रमा द्यावी. या प्रकल्पामुळे १४०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. आपण किमान पावसाळी*

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. चंद्रदीप नरके.....*

*अधिवेशनापूर्वी मान्यता देऊन पुरवणी बजेटमध्ये याचा निधी देण्यात यावा, अशी मी मागणी करतो. या अर्थसंकल्पामध्ये आपण सर्वच क्षेत्राला प्राधान्य दिलेले आहे. हा अर्थसंकल्प चांगला असून मी मांडलेल्या सूचनांचा विचार करण्यात यावा. धन्यवाद.*

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर) : अध्यक्ष महोदय, मी २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी उभा आहे.*

*अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री यांनी या अर्थसंकल्पामध्ये एकूण १०८ मुद्यांचा परामर्श केला. मी एकाच मुद्यावर अध्यक्षांच्या माध्यमातून आपले लक्ष वेधू इच्छितो. मागेल त्याला शेततळे या योजनेचा समावेश अर्थसंकल्पामध्ये केलेला आहे. या योजनेनुसार शेततळ्याची साईज ३० बाय ३० मीटर असणार आहे. याकरिता आपण २ हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. माननीय मंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना मी सांगू इच्छितो की, या सदनामधील बरेचसे आमदार शेतकरी आहेत. माझ्या इंदापूर तालुक्याचा विचार केला तर आमच्या तालुक्यातील शेततळ्याची साठवण क्षमता १ कोटी पासून ते ८ कोटी लीटरपर्यंत आहे. याकरिता जास्त खर्च येतो. गोरगरीब, सामान्य ५ ते १० एकर शेती असलेला शेतकऱ्याला हे परवडणारे होणार नाही. आपल्या योजनेनुसार ३० बाय ३० च्या शेततळ्याची साठवण क्षमता २५ ते ३० लाख लीटर एवढीच रहाणार आहे. त्यामुळे यामध्ये वाढ करुन हे शेततळे ६० बाय ६० मीटर करण्याची आवश्यकता आहे. असे झाले तर यामध्ये ५५ ते ६० लाख लीटर पाणी साठवता येऊ शकेल. त्यामुळे या शेततळ्याची क्षमता वाढविण्यात यावी व यामधील अनुदानामध्ये वाढ करुन १ लाख रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मी विनंती करतो. १ लाख रुपये अनुदान देऊन शेततळ्याचा आकार ६० बाय ६० असा केल्यास ही योजना निश्चितपणे खऱ्या अर्थाने चांगल्या पद्धतीने मार्गी लागल्यासारखे होईल.*

*अध्यक्ष महोदय, आपण मघाशी सभागृहामध्ये नव्हतात. आमदार फंड वाढवावा अशी सर्वच सन्माननीय सदस्यांची प्रामुख्याने मागणी आहे. आम्ही नवीन आमदार आहोत, आमदार फंड ५ कोटी रुपये करण्यात यावा, अशी आमच्याद्वारे केली जाईल. परंतु आपल्याला बजेटचा विचार करुन त्यामध्ये वाढ करावी लागणार आहे. त्यामुळे आमदार फंड ५ कोटी रुपये करण्यात यावा, असे मी म्हणणार नाही, परंतु सद्या दिल्या जाणाऱ्या आमदार फंडामध्ये निश्चितपणे वाढ करण्यात यावी, अशी मी विनंती करतो. इतर कोणी सन्माननीय सदस्य आपले नाव घेतील हे मी सांगू शकणार नाही, परंतु या बाजूचे आमदार निश्चितपणे आपले नाव घेतील, हे मी अध्यक्ष महोदयांच्या माध्यमातून सांगू इच्छितो. आपण याबाबींचा विचार करावा, अशी विनंती करतो.*

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

***श्री. दत्तात्रय भरणे.....***

*अध्यक्ष महोदय, आपण शेतकरी आहोत. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. गोरे साहेबांच्या माण तालुक्यात फार मोठी शेततळी आहेत. आपण जाहीर केलेल्या योजनेतील शेततळ्याची साठवण क्षमता कमी आहे. त्यामुळे माझी आपणास विनंती आहे की, शेततळ्याची साईज ६० बाय ६० मीटर वाढवून त्याकरिता १ लाख रुपये अनुदान देण्यात यावे. धन्यवाद.*

---*---

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*श्री. राहुल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, मी २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी उभा आहे.*

*अध्यक्ष महोदय, आपल्याला मागील दीड वर्षापासून अतिशय प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. आपल्याला प्रचंड दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीमध्ये माननीय मंत्री श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी सादर केलेला अर्थसंकल्प निश्चित अतिशय प्रतिकूल परिस्थितीत चांगल्या प्रकारे राज्याचे नियोजन करणारा आहे, असे माझे मत आहे. आपण हे वर्षे शेतकरी वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. आज ज्या प्रतिकूल परिस्थितीतून ग्रामीण भाग आणि शेतकरी जात आहे, त्यामध्ये सुधारणा होण्याकरिता आपण चांगल्या उपाययोजना करण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

*अध्यक्ष महोदय, मी माझ्या काही सूचना आपल्यासमोर मांडणार आहे. शेतकऱ्यांच्या पिकाला संरक्षण देण्यासाठी पीक विमा योजना अजून सक्षम करण्याच्या दृष्टीने धोरण राबविण्याची आवश्यकता आहे. पाणी आहे तर शेतकरी आहे, शेतकऱ्यांच्या हातात पैसा असेल तर ग्रामीण अर्थव्यवस्था चांगली चालणार आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा परिणाम ग्रामीण उद्योगाबरोबर शहरी उद्योगावर देखील होतो. आज ग्रामीण भागात सोनारा पासून ते किराणा मालाच्या व्यवसायापर्यंत प्रत्येक व्यवसायावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते.*

*...AAA/-*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहूल कुल.......

त्याचे कारण म्हणजे दुष्काळ आणि दुष्काळामुळे शेतकऱ्याची अडचणीत आलेली अर्थव्यवस्था आहे. शेतकऱ्याची अर्थव्यवस्था शेतीपुरती मर्यादित आहे एवढे मानू नये. उद्याच्या काळात शेतकरी संपूर्ण ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेतील घटक आहे असे गृहीत धरुन नियोजन केले तर अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी उपयुक्त ठरेल.

अध्यक्ष महोदय, सरकारने यावर्षी सिंचनासाठी 7,850 कोटी रुपयांचे नियोजन केले असून मागील वर्षी ते 7,200 कोटी रुपये करण्यात आले होते. राज्यातील एकंदर सिंचन प्रकल्पाची परिस्थिती पाहता नवीन प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे. परंतु जुन्या प्रकल्पांची दुरवस्था झालेली असून त्यामधून 50 ते 70 टक्के पाणी वाया जात आहे. जुने प्रकल्प दुरुस्ती करण्यासाठी वेगळे लेखाशिर्ष निर्माण करण्यात यावे व राज्यातील महत्वाच्या प्रकल्पांच्या दुरुस्तीचे धोरण हाती घेण्यात यावे. अशा प्रकल्पापैकी पुणे येथील खडकवासला प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले तर पुणे शहर व ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होणार आहे.

अध्यक्ष महोदय, जलयुक्त शिवार योजनेकरिता मागील वर्षी 1,600 कोटी रुपये तरतूद केली होती व यावर्षी 1 हजार रुपये तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचा चांगला परिणाम दिसून येत आहे. या योजनेस तांत्रिक जोड देऊन निधीची वाढ केली व लोकप्रतिनिधींचा त्यामध्ये समावेश केला तर संपूर्ण राज्याचा कायापालट झाल्याचे चित्र राज्यात निर्माण होऊ शकते. ही योजना राज्याच्या ग्रामीण भागाचे चित्र बदलण्याकरिता उपयोगी ठरणार आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्यापूर्वी मामांनी उल्लेख केला होता की, मागेल त्याला शेततळे व विहीर देण्याची घोषणा वित्त मंत्री महोदयांनी केली. रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात अधिक निधी खर्च कसा होईल याकरिता रोजगार हमी योजना समितीच्या माध्यमातून समितीचे सन्माननीय सदस्य प्रयत्न करीत आहेत. अनेक वेळा रोजगार हमी योजनेतून विहिरीची योजना राबवताना तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर टार्गेटचे कारण देण्यात येते. शेततळ्याच्या संदर्भात आर्थिक मर्यादा आहेत. परंतु विहिरींसाठी मर्यादित टार्गेचे कारण देऊन विहिरीचा प्रस्ताव नियमात बसत असतानाही मंजूर करण्यात येत नाही. त्यामुळे सदरहू प्रकरणी अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली तरतूद वाढवून देण्यात यावी.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहूल कुल.......

अध्यक्ष महोदय, पांदण योजना सरकारने घोषित केली आहे. त्याकरिता 100 कोटी रुपये तरतूद करण्यात आली असून ती अपुरी आहे. या निधीतून या योजनेचे काहीच काम होणे शक्य नाही. पांदण रस्ते व शिव रस्ते खुले करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारची आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध नाही. त्याकरिता वेगळी तरतूद करण्यात यावी. पांदण रस्ता किंवा शीव रस्त्याची मोजणी करावयाची असेल तर त्याकरिता जवळपास 1 ते 6 वर्षे लागतात. शीव व पांदण रस्त्याच्या मोजणीकरिता शासनाकडे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध नसून शेतकरी त्याकरिता पैसे भरु शकत नाही. त्यामुळे सदरहू मोजणीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. मोजणी करुन पांदण रस्ते व शीव रस्ते खुले झाल्यानंतर त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनेसाठी तरतूद करण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेय जल योजनेसाठी 500 कोटी रुपये व राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमासाठी 170 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ती अतिशय अपूरी आहे. मागील दीड वर्षामध्ये कोणतीही योजना नव्याने मंजूर करण्यात आली नाही. तसेच, सुरु असलेल्या योजनेकरिता कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला नाही. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी निधी कमी पडणार नाही इतकी वाढीव तरतूद मंजूर करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, पुणे व नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी 180 कोटी रुपयंची तरतूद केल्याबद्दल मी वित्त मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. यामुळे पुणे येथील वाहतुक समस्या कमी होण्यास मदत होणार आहे. अर्थसंकल्पामध्ये पुणे चक्राकार मार्गाकरिता नियोजन करणे अपेक्षित होते परंतु ते करण्यात आले नाही. त्याकरिता आर्थिक तरतूद उपलब्ध करण्यात यावी, अशी माझी विंनती आहे.

अध्यक्ष महोदय, सरकारने 8 हजार कोटी रुपयांचा ॲन्युईटीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. संपूर्ण राज्याच्या दृष्टीने पवित्र असणाऱ्या अष्टविनायकाच्या मार्गाची घोषणा बांधकाम मंत्री महोदयांनी केली आहे. हा प्रकल्प ॲन्युईटीच्या माध्यमातून पूर्ण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. या प्रकल्पाचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करणे अपेक्षित होते. परंतु तो केला

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहूल कुल.......

नसला तरी ॲन्युईटीच्या कार्यक्रमामध्ये या प्रकल्पाचा समावेश करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, ग्रामीण भागाच्या विकासासाठी जिल्हावार डी.पी.डी.सी.च्या बैठका घेण्यात आल्या आहेत, त्यावेळी मी विंनती केली होती. सन 2012 मध्ये ठिबक सिंचन योजनेकरिता अनुदान देण्याचे सरकारने जाहीर केल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ठिबक सिंचनाच्या योजना हाती घेतल्या होत्या. परंतु सदरहू योजनेचे अनुदान आजपर्यंत शेतकऱ्यांना मिळालेले नाही. सदरहू अनुदान प्रथम देऊन ठिबक सिंचनास प्रोत्साहन देण्याकरिता नवीन योजना जाहीर करण्यात यावी. याबाबीचा समावेश वित्त मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

-------------------

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संग्राम थोपटे (भोर) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पाबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मत मांडताना विविध तज्ज्ञांचे मत सदनामध्ये मांडलेले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पाकडून प्रत्येकाला वेगळ्या पध्दतीची आस होती. हा अर्थसंकल्प राज्यातील सर्व जनतेची दिशाभूल करणारा अर्थसंकल्प आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

अध्यक्ष महोदय, राज्याच्या मागील वर्षीच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून केलेल्या खर्चाबाबत सांगावयाचे झाले तर तरतुदीमधील प्रत्येक 100 रुपयामागे 60 रुपयांचा खर्च अद्याप झालेला नाही. केवळ वेतन, निवृत्तीवेतन व कर्जाची परतफेड यावर खर्च करण्यात आला आहे. भांडवली गुंतवणुकीसाठी दीर्घकालीन, अंशकालीन सुखसुविधांसाठी केवळ 11 टक्के रक्कम शिल्लक राहते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, जवळपास 9,281 कोटी रुपयांच्या तुटीचा अर्थसंकल्प वित्त मंत्री महोदयांनी मांडलेला आहे. अर्थसंकल्प सादर करताना तूट भरुन काढण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये नवीन उत्पन्नाचे मार्ग निर्माण करणे अपेक्षित होते ते निर्माण करण्यात आले नाही.

अध्यक्ष महोदय, राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीमुळे शेतकरी विवंचनेत आहे. त्यांना कर्जमाफी देण्याकरिता वारंवार सदनामध्ये मागणी करण्यात येत आहे. परंतु शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याऐवजी त्यांच्याकरिता 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असे अर्थसंकल्प सादर करताना सुरुवातीला वित्त मंत्री महोदयांनी सांगितले. मंत्री महोदयांनी चांगली योजना मांडली असे सुरुवातीला वाटले होते. शेतकऱ्यांच्या पदरामध्ये काही तरी पडेल अशी अपेक्षा निर्माण झाली होती. परंतु मंत्री महोदयांनी राज्याचा व केंद्राचा हिस्सा मिळून वेगवेळ्या योजना मांडण्याचा प्रयत्न केला. नियमित योजनेत महिला बाल कल्याण विकासाच्या योजना, राष्ट्रीय पेय जल कार्यक्रम, मुख्यमंत्री पेय जल योजना, पंतप्रधान सडक योजना, यासर्व केंद्राचा व राज्याचा वाटा असलेल्या योजनांचा समावेश त्यांनी अर्थसंकल्पात केल्याचे नमूद केले. राज्य सरकारकडून नवीन योजना निर्माण करणे किंवा शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा करणे अपेक्षित होते.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संग्राम थोपटे......

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट दिले होते की, शेतकऱ्यांसाठी राज्याची तिजोरी रिकामी करण्याची वेळ आली तरी मागे पुढे पाहणार नाही. आज 25 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी मांडल्याचे सांगण्यात येते. यासंदर्भात आकड्यांची जुळवणी करण्याच प्रयत्न केला तर प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या हितासाठी काही करण्यात आले की नाही, असा प्रश्न पडतो.

अध्यक्ष महोदय, अर्थमुव्हींग योजनेच्या संदर्भात ग्रामीण तरुणांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णय अतिशय चांगला आहे. परंतु त्यासाठी केवळ 100 कोटी रुपये नियतव्यय मंजूर केला आहे. एका पोकलॅन युनिटची किंमती 45 ते 50 लाख रुपये आहे. एका जिल्ह्याकरिता 1-2 कोटी रुपये निधी योजनेसाठी वितरीत केला तरी देखील 2 पेक्षा जास्त मशीन या योजनेंतर्गत खरेदी करता येणार नाहीत. तसेच, या योजनेतून दोन पेक्षा अधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. त्यामुळे यायोजनेंतर्गत अधिकाधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अधिक निधी उपलब्ध करुन देण्याचा विचार करावा, अशी माझी यानिमित्ताने मंत्री महोदयांना विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, गोमाता संवर्धन योजनेसंदर्भात प्रत्येक जिल्ह्यात प्रथम येणाऱ्या संस्थेस प्राधान्य देऊन योजना राबविण्याकरिता 1 कोटी रुपये निधी देण्याची सरकारने घोषणा केली आहे.

यानंतर BBB-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.संग्राम थोपटे....

अध्यक्ष महोदय, आज राज्यामध्ये जी दुष्काळी परिस्थिती आहे. त्या निमित्ताने ठिकठिकाणी छावण्या उघडण्याची मागणी होत आहे. मध्यंतरी छावण्या बंद करण्याचा निर्णय शासनाने अचानकपणे घेतला होता. त्यानंतर या निर्णयाला अनुसरुन शासनाला अचानकपणे जाग आली आणि त्या छावण्या पुन्हा सुरू ठेवण्याचा प्रयत्न झाला आहे. आज खऱ्या अर्थाने पशुधन जगविण्यास शासन अपयशी ठरत आहे. त्यामुळे गोमाता संवर्धन करणे हे निश्चितपणे योग्य असले तरी छावण्यामध्ये असलेल्या जनावरांचे पशुधन जगविण्याचा विचार आपण भविष्यकाळात करण्याची गरज आहे. मी या ठिकाणी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. गाव स्मार्ट योजना ही गण असेल, तालुका असेल आणि जिल्हास्तरावर प्रोत्साहन देण्याची योजना सुरू केली आहे. पण या योजनेसाठी किती निधीची तरतूद आहे याची स्पष्टोक्ती झालेली नाही. मुख्यमंत्री पेयजल योजनेसाठी जवळपास 2500 कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. वीज निर्मितीसाठी जवळपास 784 कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे. परंतु यामध्ये हा निधी कोणकोणत्या प्रकल्पावर आणि कशाप्रकारे खर्च करण्यात येणार आहे याची स्पष्टोक्ती नाही. विदर्भ आणि मराठवाड्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील वीजेच्या बाबतीत 1 हजार कोटी रुपयांची सवलत देणार अशी घोषणा या ठिकाणी केली आहे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा असेल या विभागात असलेल्या उद्योगधंद्यांना निश्चितपणे घरघर लागेल की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज जरी विदर्भात प्रकल्प येऊन रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न होत असले तरी सुध्दा उर्वरित महाराष्ट्रासाठी अशा प्रकारचा विचार निश्चितपणे केला पाहिजे. महिलांच्या बचतगटाच्या बाबतीत आपण शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्यासाठी जवळपास 10 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु हे 10 कोटी रुपये महाराष्ट्राच्या कोणत्या कान्याकोपऱ्यात जातील हे सांगता येत नाही. म्हणून त्यासाठी भविष्यकाळात ही तरतूद वाढविण्याची गरज आहे. दुसरी आपण एक महत्वाची म्हणजे महामार्गाच्या प्रत्येक 100 किलोमिटर्सवर आपण शौचालये बांधण्याची योजना आखली आहे, ही निश्चितपणे चांगली योजना आहे. परंतु जे राज्य मार्गाव्यतिरिक्त इतर जे जिल्हा मार्ग असतील, ओडीआर, व्हीडीआर असतील त्या संदर्भात एक वेगळी योजना राबविणे गरजेचे आहे. केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत सन 2014-15 मध्ये....

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी आता शेवटची सूचना करावी.

2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. संग्राम थोपटे : अध्यक्ष महोदय, होय मी 5 मिनिटात शेवटच करीत आहे. केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत सन 2014-15 मध्ये 1700 कोटी रुपये केंद्र शासनाने दिले आहेत. आज सन 2015-16 मध्ये असे सांगण्यात आले की, 2947 कोटी रुपये देण्यात आले आहेत. हा निधी आणल्याबद्दल सरकारचे अभिनंदन आहे. कारण राज्यात आणि केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेचे सरकार काम करीत आहे. मागच्या वर्षी आणि या वर्षीचा निधी बघितला तर हा फक्त विदर्भामध्येच नेण्याचा प्रयत्न होत आहे. माझ्या मतदार संघामध्ये मी वेळोवेळी सीआरएफमधून कामे करण्यासाठी मागणी करीत आहे. पण अद्यापपर्यंत 1 रुपयासुध्दा या ठिकाणी उपलब्ध झालेला नाही. माझ्या मतदार संघात राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे, राज्य महामार्ग गेलेला आहे. परंतु या जिल्ह्याला किंवा दोन्ही जिल्ह्यांना जोडणाऱ्या रस्त्यांसाठी सीआरएफचा निधी उपलब्ध होत नाही, याबद्दल शासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मेट्रोच्या बाबतीत माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी म्हणणे मांडलेले आहेच. मला निश्चितपणे सांगावेसे वाटते की, राष्ट्रीय समाज पक्षाच्या माध्यमातून ते या ठिकाणी निवडून आले आहे. सांगण्याचे कारण एवढेच आहे की, ज्या पक्षाच्या माध्यमातून ते निवडून आले आहेत, तो पक्ष खऱ्या अर्थाने सरकारच्या बरोबर आहे किंवा नाही हेही संशयास्पद असल्याचे माझ्यासारख्याला वाटते. जर बरोबर आहे तर त्यांनी त्यांची भूमिका या ठिकाणी मांडली पाहिजे होती. आज राष्ट्रीय समाज पक्ष हा सरकारमध्ये सहयोगी पक्ष आहे. महसुली तुटीच्या संदर्भात 9291 कोटी रुपयांची तूट असल्याची फार खराब अवस्था असल्याचे बोलले जाते. आज पुणे जिल्ह्याच्या वर्तमान पत्रातून एक बातमी आली होती की, पुणे जिल्ह्यातील महसूल विभागाकडून मिळालेल्या उत्पन्नाची तालुकावार आकडेवारी आली होती. मला हे गांभीर्यपूर्वक सांगावेसे वाटते की, एकीकडे राज्याच्या अर्थसंकल्पात तूट आहे. परंतु पुणे जिल्ह्यामध्ये विशेषत: माझ्या तालुक्यामधून जवळपास 15 कोटी रुपयांची महसूल उत्पन्नात या वर्षी वाढ झाली आहे. गेल्या 10 वर्षातील उद्दिष्ट काढले तर दरवर्षी तीन ते चार कोटी रुपये ते असते. या पण वर्षी 14 कोटी रुपयांचे उद्दिष्ट होते. आमच्या पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या मतदार संघातील वसुली पाहिली तर ती काही लाखामध्ये थकित होती. हा नेमका विरोधाभास का आहे ? महसुलाच्या माध्यमातून जर उत्पन्न जास्त मिळत असेल तर त्या ठिकाणी निधी वाढवून देण्याची गरज आहे, असे माझे या

3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.संग्राम थोपटे....

ठिकाणी प्रामाणिक मत आहे. साखर उद्योगाच्या संदर्भात शेवटचे बोलतो. कारण साखर उद्योगाच्या संदर्भात अलिकडे गेल्या दोन वर्षामध्ये दरामध्ये फार मोठ्या प्रमाणात घसरण आली आहे. हा प्रसंग सर्वच कारखानदारांवर आलेला आहे. या दराच्या घसरणीमुळे केंद्र सरकारने व्याजमाफीचे अनुदान एफआरपीच्या संदर्भात घेतला आहे. परंतु आज राज्यातील जवळपास 40 ते 42 साखर कारखाने या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत. राज्य सरकारकडे आम्ही मागणी करतो की, या सहकारी साखर कारखान्यांसाठी पुढील पाच वर्षासाठी व्याज प्रतिपूर्तीसाठी शासनाने निर्णय घ्यावा. आज तो प्रश्न प्रलंबित आहे. माझी वित्तमंत्री सन्माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार साहेबांना विशेष विनंती आहे की, सहकार विभागाच्या माध्यमातून हा निर्णय होणे गरजेचे आहे. एफआरपीची ही रक्कम आहे. शेतकऱ्यांसाठी जर आपण 25 हजार कोटी रुपयांची एखादी योजना जाहीर करीत असाल तर शेतकऱ्यांचे एफआरपीचे राहिलेले पैसे देण्यासाठी बँकांना हमी आणि व्याज प्रतिपूर्तीचा निर्णय आपण भविष्यात घेतला पाहिजे. सरकारच्या सततच्या अपयशामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक योजनेचा आराखडा दिवसेंदिवस आकुंचित पावत चालला आहे. या वर्षी तेलंगणासारख्या चिमुकल्या राज्यापेक्षाही तो कमी झाला आहे. नवीन राज्य असलेल्या तेलंगणापेक्षाही आपला अर्थसंकल्प कमी आहे. असे होण्याचे कारण की, महसुलाचा प्रवाह वाढण्याच्या दृष्टीने सरकार कोणत्याही हालचाली करताना दिसत नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प महाराष्ट्रातील जनतेची निव्वळ दिशाभूल करणार व धूळफेक करणार आहे. म्हणून मी यास असमर्थता दर्शवून थांबतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

--------

4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदिप नरके आपला काय विषय आहे.

श्री. चंद्रदिप नरके : अध्यक्ष महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये काही विधेयके आहेत आणि ती आपण घेणार आहात काय ? यामध्ये एक जे महत्वाचे विधेयक आहे त्यामध्ये आज विधेयक क्रमांक 8, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ हे असून त्यातून औरंगाबाद जलसंधारण महामंडळास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव आहे. राज्याच्या जलसंधारण खात्यामार्फत लघु पाटबंधाऱ्यांची असंख्य कामे सुरू आहेत. या महामंडळाला आज मुदतवाढ दिली नाही तर हे विधेयक विधान परिषदेमध्ये जाऊन माननीय राज्यपाल महोदयांची मान्यता मिळाल्यानंतर त्यासंबंधी अध्यादेश निघेल. या ठिकाणी 240 कोटी रुपयांचा निधी वितरीत होण्यासाठी थांबलेला आहे. हे विधेयक आता मंजूर केले नाही तर पुढे चार दिवस सुट्ट्या आहेत. यामध्ये दर्शविलेला 240 कोटी रुपयांचा निधी लॅप्स होण्याची शक्यता आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. आपण हा निर्णय राखून ठेवू.

श्री. चंद्रदिप नरके : अध्यक्ष महोदय, लघु पाटबंधाऱ्यांची कामे आज थांबल्यामुळे ज्या पाण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत ती सर्व कामे अर्धवट राहतील. यामध्ये कोणताही विरोध असण्याचे कारण नाही. आवश्यकता वाटत असेल तर आपण माननीय अर्थमंत्र्यांकडून माहिती घ्यावी. हे विधेयक सर्वांच्या बाबतीत अतिशय महत्वाचे असल्यामुळे ते मंजूर करणे आवश्यक आहे.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी सुरू असलेली चर्चा महत्वाची आहे. पण सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदिप नरके यांनी जी भावना व्यक्त केली त्यासंबंधी आज जर हे विधेयक मंजूर केले तर ते विधान परिषदेमध्ये जाईल आणि त्यानंतर ते 31 मार्चपूर्वी त्यांचा अखर्चित निधी त्यांना खर्च करण्यासाठी जी तांत्रिक, कायदेशीर आणि नियमांची अडचण आहे ती सोडवून त्यातून लोकांना चांगला फायदा होईल. मला वाटते सभागृहाने यावर विचार करावा.

**तालिका सभाध्यक्ष** : मला वाटते आता आपण शेवटचा राऊंड पूर्ण करु आणि त्यानंतर यासंबंधी निर्णय घेऊ.

यानंतर CCC-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : अध्यक्ष महोदय, महिलांचा आत्मसन्मान जपण्याची भूमिका घेणारा कृषी विकास, ग्रामविकास, शहरी विकास असे विकासाचे चौफेर भान बाळगत महिलांचा आत्मसन्मान जपण्याची भूमिका घेणारा अर्थसंकल्प माननीय वित्तमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी सादर केला आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देत महिलांसाठी स्वतंत्र तेजस्विनी बसेस उपलब्ध करणे वा स्व.सुमतीबाई सुळकीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना असो, ग्रामीण व दुर्गम भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे असो, स्व.बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियान असो, राज्य महामार्गावर महिलांसाठी 400 स्वच्छतागृहे असो, तसेच राज्य महामार्गावर महिलांसाठी स्वच्छता गृहांच्या बांधकामाचा संकल्प असो, या माध्यमातून महिलांचा आत्मसन्मान जपण्याची भूमिका माननीय वित्तमंत्र्यांनी घेतली आहे. यासोबतच सांस्कृतिक क्षेत्रासाठी महत्वपूर्ण असणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धेच्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. माननीय वित्तमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडत असताना समाजातील सर्व घटकांना समाविष्ट करुन घेताना, सर्व घटकांचा प्रामाणिकपणे विचार केला आहे. या सर्वसमावेशक भूमिकेबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करते.

अध्यक्ष महोदय, मुंबई उपनगरातून गुणवान खेळाडू घडविण्यासाठी, खेळाच्याप्रती युवकांमध्ये उत्साह वाढविण्यासाठी माननीय खासदार श्री.गोपाळ शेट्टी यांनी व मी केलेल्या पाठपुरव्यामुळे शिंपोली, कांदिवली पश्चिम येथील भूखंड मनोरंजनासाठी आरक्षित ठेवून त्यासाठी सदर बजेटमध्ये स्टेडियम बांधकाम व कंपाऊंड वॉल बांधण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली आहे याकरिता मी सर्वप्रथम माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करते.

अध्यक्ष महोदय, दहिसर नदी मृत होत चालली होती. सदर नदीला जिवंत करण्यासाठी नॅशनल पार्क ते एनएल कॉम्प्लेक्स, मीरा रोडपर्यंत दहिसर नदीचे साबरमतीप्रमाणे सुशोभिकरण करणे व सिव्हरेज लाईन तयार करण्याकरिता माननीय वित्तमंत्र्यांनी विशेष तरतूद केली आहे. माझ्या मतदारसंघातील दहिसर गणपत पाटील नगरच्या मागील बाजूस विविध जातींचे पक्षी स्थलांतर करुन येत असतात. सदर पक्षांना पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक याठिकाणाला भेट देत आहेत. तिवर संवर्धन प्रतिष्ठाणच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्यावरील सुशिक्षित बेरोजगार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी.......

युवकांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच व्यवसाय, रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी निधीची तरतूद केली आहे. दहिसर गणपत पाटील नगर येथील मोठ्या प्रमाणात तिवरांच्या झाडांचे संवर्धन करण्यासाठी गणपत पाटील नगरच्या मागील बाजूस तिवरांच्या झाडांमध्ये मार्गिका व मँग्रोज पार्क बनविण्यासाठी निधीची तरतूद केली आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये दलित लोकवस्त्यांमध्ये रस्ते, शौचालय, गटारे, पिण्याचे पाणी, फुटपाथ व दिवाबत्ती या नागरी सुविधा पुरविण्याकरिता निधीची तरतूद केली आहे. तसेच सन्मानीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी महोदयांचे मन:पूर्वक अभिनंदन करते की, त्यांनी सीआरएफ याजनेअंतर्गत दहिसर चेकनाका तरे कंपाऊंड ते एन.एल.कॉम्प्लेक्सकडून मीरारोडकडे जाणाऱ्या जोड रस्त्याचे बांधकाम करणे व सिव्हरेज लाईन तयार करण्याकरिता 30 कोटी रुपयांचा विशेष निधी दिला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. दहिसर गावठाण व मीरारोडला जोडणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करण्याकरिता विशेष तरतूद केली आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राला 720 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. या समुद्रात मच्छीमारी करीत असताना दूरवर गेल्यावर मच्छीमारी बोटीस अपघात झाल्यास जसे बोट बुडणे, खलाशी समुद्रात पडणे, आग लागणे अशा आपातकालीन परिस्थितीच्या वेळी जलद मदत व शोध घेता येण्याकरिता भारतीय तटरक्षक दलाने इस्त्रोच्या सहकार्याने DATS (Distress Alert Transmeter) या नावाने यंत्र बोटीत वापरण्याकरिता तयार केले आहे. महाराष्ट्र राज्यात सुमारे 300 युनिट यापूर्वी प्रायोगिक तत्त्वावर भारतीय तटरक्षक दलाने मत्स्य व्यवसाय खात्याच्या शिफारशीनुसार विनामुल्य दिलेले आहे. समुद्रात एखादी आपातकालीन परिस्थिती उद्‌भवल्यास जलद मदत मिळणे व शोध घेण्याकरिता सदर यंत्र 5 सेकंदात आपले ठिकाण सेटेलाईटद्वारे कोस्ट गार्डच्या नियंत्रण कक्षाला संदेशाद्वारे कळवित असते. मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला त्यावेळेस अतिरेकी समुद्र मार्गाने आले होते. ही बाब लक्षात घेऊन सर्व मच्छिमारी बोटीत DATS (Distress Alert Transmeter) यंत्र बसविणे आवश्यक आहे. सदर यंत्र बसविण्याकरिता माननीय अर्थमंत्र्यांनी तरतूद करावी अशी मी यानिमित्ताने विनंती करते. अर्थसंकल्पामध्ये माझ्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मतदारसंघातील दहिसर ते डी.एन. नगर आणि दहिसर ते अंधेरी पूर्व या दोन मेट्रो मार्गासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माझ्या ज्या सूचना आहेत त्या मी पटलावर ठेवते आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद देते.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मैं सन 2016-17 के अर्थसंकल्प पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, रेवेन्यू एक्सपेंडिचर 2 लाख 24 हजार 454 करोड़ रूपये और 2 लाख 20 हजार 810 करोड़ रूपये रेवेन्यू इन्कम बतायी गई है. मुझे बहुत ताज्जूब है कि मायनॉरिटी को इतना निग्लेक्ट क्यों किया गया ? आपने 405 करोड़ रूपये बताया, वह भी केंद्र सरकार की योजना का पैसा मिलाकर है. सन 2011 का यदि सेन्सस देखा जाए, मायनॉरिटी में मुस्लिम, बौध्द, क्रिश्चन, सिख, जैन आदि का समावेश होता है. ये आबादी के 20 प्रतिशत होते है. मैं यह नहीं कह रहा हूं कि किसको ज्यादा पैसा मिला, किसको कम पैसा क्यों मिला. लेकिन मैं तुलना करता हूं. एससी और एसटी का आँकड़ा देखता हूं, तो महाराष्ट्र में उनकी आबादी का आँकड़ा 20 प्रतिशत होती है. इस बजट में मायनॉरिटी के लिए जो बजट दिया है वह 0.18 प्रतिशत आँकड़ा होता है. एससी और एसटी के लिए बजट में 10,833 करोड़ रूपये दिए है. इनको और बजट दीजिए, मुझे खुशी है, मैं तालियाँ बजाऊंगा. एक तरफ 10,800 करोड़ रूपये 20 प्रतिशत लोगों को और दूसरी तरफ 405 करोड़ रूपये दिए जाते है. यह आँकड़ा रेवेन्यू बजट का चार प्रतिशत होता है. एससी और एसटी के लिए जो वार्षिक योजना है, 20 प्रतिशत रकम हर मिनिस्ट्री देती है. आपके बजट के क्रमांक 107 में 56997 करोड़ रूपये में से 6725 करोड़ 65 लाख रूपये आबादी के हिसाब से एससी, एसटी के लिए प्रपोज किए गए है. एससी के लिए 5357 करोड़ 71 लाख रूपये, ट्राईबल के सबप्लान में 9.5 प्रतिशत प्रपोज किया गया है. डिस्ट्रीक्ट प्लान स्कीम में 7572 करोड़ रूपये बताए गए है. लेकिन मायनॉरिटी के लिए कोई योजना नहीं है. योजनाएं चंद कदमों में लिपट कर रह गई, सारी नदियाँ कुछ जटाओं में सिमटकर रह गई. मेरे बच्चे प्लास्टीक की थैलियां चुनकर रह गए, नेमटे दो चार दस कुंबों में बंटकर रह गई.

अध्यक्ष महोदय, मैं उत्तरप्रदेश के मायनॉरिटी के बजट के संबंध में आपको बताना चाहता हूं. मायनॉरिटी कम्युनिटी के स्कूल के लड़कों-लड़कियों के लिए स्कॉलरशीप का बजट 536 करोड़ रूपये है. कॉलेज की छात्रवृत्ति के लिए 153 करोड़ रूपये का बजट है. मायनॉरिटी की

.......5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी.......

स्कूल की फीस भरपाई के लिए 150 करोड़ रुपये. मान्यताप्राप्त मदरसे, मजहब तालिम, धार्मिक तालिम, मॉडर्न एज्युकेशन के लिए 394 करोड़ रुपये. मायनॉरिटी इलाकों में हेल्थ तालिम और मल्टीसेक्टर डिस्ट्रीक्ट डेवलपमेंट प्लान के लिए 395 करोड़ रुपये. उत्तर प्रदेश में मायनॉरिटी के लिए बजट में इतनी रकम दी जाती है. मायनॉरिटीज की कब्रिस्तान की बाऊण्ड्री के लिए इस बजट में 400 करोड़ रुपये. आपने सब कुछ मिलाकर 200-400 करोड़ रुपया बजट में दिया है. यह रकम बहुत कम है. आप इस रकम को बढ़ाईए. मायनॉरिटीज के साथ चारों तरफ नाइन्साफी हो रही है. इस देश के अंदर मायनॉरिटीज के लोगों ने कौनसी गलती की है ?

अध्यक्ष महोदय, नेताजी सुभाषचंद्र बोस ने आजाद हिंद फौज बनायी थी. तब इसी मुल्क का रहने वाला श्री मेमन हबीब युसूफ फरमामी, उस वक्त उनका बर्मा में बहुत बड़ा कारोबार था. उन्होंने अपना कारोबार बेचकर एक करोड़ रुपया उस वक्त नेताजी सुभाषचंद्र बोस की फौज को दिया था. वह मुसलमान था. उसे इस देश से मोहब्बत थी. उस वक्त नेताजी ने कहा था कि सेलके हिंद का किताब इस मुसलमान को दिया जा रहा है. यह योगदान हमेशा याद किया जाएगा. आज हमारे यहाँ क्या योगदान है ? ऊंट के मुंह में जिरा. मायनॉरिटी के मुंह के जिरा. ऊंट के मुंह में जिरे की तरह रकम दे रहे है. नेताजी की फौज में 40 प्रतिशत मुसलमान थे.

अध्यक्ष महोदय, आज चारों तरफ भारत माता की जय कहा जा रहा है. जयहिंद का नारा किसने दिया, यह किसी को मालूम है ? जयहिंद का नारा देने वाले आजाद हिंद फौज का फौजी श्री आबिद हसन जो इसी देश का था. जिसने लंडन से इंजीनियरिंग की परीक्षा पास की और आजाद हिंद फौज में शामिल हुआ और जयहिंद का नारा दिया. आज उस कौम के साथ क्या हो रहा है ? आज इन्साफ नहीं हो रहा है. मेरी मांग है कि मायनॉरिटीज के लोगों को कम से कम 1500 करोड़ रुपये दिए जाने चाहिए. जो दलित बस्ती सुधार कार्यक्रम है, इसके लिए आप अलग से फंड देते है क्योंकि इनकी हालत बहुत खराब है. लेकिन सभी आयोग ने कहा है कि मुसलमानों की हालत बहुत खराब है. आप मुस्लिम बस्ती सुधार के लिए अलग से फंड दीजिए, ऐसी मेरी मांग है. किसानों के लिए 25 हजार करोड़ रुपये दिए गए है. चालिसगांव में 15447

......6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी......

सूखे से प्रभावित है. सन 2015 में 3228 किसानों ने खुदकुशी की है. सन 2012 में जानवरों का लाईव स्टॉक, सेन्सस हुआ. एनिमल हस्बन्डरी कमिश्नर ने जब सेन्सस किया, तो बकरे और भेड़ 1 लाख 10 हजार 1600. भैंसे 55 लाख 95 हजार, गाय, बैल, बछड़े सब से ज्यादा, 1 करोड़ 54 लाख 84 हजार. आप कहते है कि गोवंश खतरे में है. सब से ज्यादा आँकड़े यदि किसी के है तो वह 1 लाख 54 हजार 84 हजार है. खतरे में कैसे है ? जो गाय दूध नहीं देगी, किसानों का जो बैल बूढ़ा हो गया, जो बैल खेती का काम नहीं कर सकता, वह किसान बैल को बेचता था, आपने उसको रोक दिया. क्या उस बैल और गाय को खरीदने के लिए बजट में कोई प्रोविजन की है ? आज किसान आत्महत्या कर रहा है. आज उसके पास पीने के लिए पानी नहीं है, खाने के लिए अनाज नहीं है. उस जानवर को खरीदने के लिए कोई प्रोविजन नहीं है. जो गाय, बैल बेकार हो गए, उसको खरीदने के लिए क्या प्रोविजन की गई है ? यदि आप कोई प्रोविजन नहीं कर रहे है तो मैं समझता हूं कि यह सरकार किसान विरोधी है. किसान खुद खाना नहीं खा सकता तो वह जानवरों को कहां से संभालेगा.

अध्यक्ष महोदय, स्लम एरिया के लिए एमएलए को जो फंड मिलता है, यदि आप डेवलप एरिया के लिए दो करोड़ रुपये दे दे, जहां पर गटर नहीं है, सड़क नहीं है, बिल्कुल बेकार बस्ती है, सारा का सारा स्लम एरिया है, वहां के लिए भी आप दो करोड़ रुपये देते है. मेरा कहना यह है कि जहां पर सड़क, गटर की व्यवस्था नहीं है, उस एरिया के लिए फंड में बढ़ोतरी की जानी चाहिए.

अध्यक्ष महोदय, गोवंडी में आग लगी हुई है. 6 महीने का एक बच्चा साँस न ले पाने के कारण मर गया. हमारे देश में स्वच्छता अभियान चल रहा है. हमारे प्रधान मंत्री जी दुनिया में चारों तरफ जा रहे है. वे स्वच्छता अभियान की बात कर रहे है. लेकिन आज डम्पींग ग्राऊण्ड की आग का धुंआ 10-15 किलोमीटर पर फैल रहा है, लोग बीमार हो रहे है. इस बारे में कोई कार्यवाही नहीं हो रही है. मेरी मांग है कि डम्पींग ग्राऊण्ड में अब डम्पींग बंद कर दी जाए. वहां पर जा आग लगी है उसको बुझाने का कोई तरीका निकाला जाए. आपने मुझे बोलने का समय दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.... 3 डी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** :सिंधुदुर्ग जिल्हयात एक लाखांहून अधिक झाडे तोडण्याचे 25/2 चे दाखले दिल्याबाबत.

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात एक लाखांहून अधिक झाडे तोडण्याचे 25/2 चे दाखले दिल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 36110 ला दिनांक 14 डिसेंबर 2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.शरद सोनावणे, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. शरद सोनावणे ( जुन्नर ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सिंधुदुर्ग जिल्हयात एक लाखांहून अधिक झाडे तोडण्याचे 25/2 चे दाखले दिल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 36110 ला दिनांक 14 डिसेंबर 2015 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात नियम 94 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

श्री.शरद सोनावणे : अध्यक्ष महोदय, मी अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने आपले लक्ष वेधू इच्छितो, सिंधुदुर्ग जिल्हयात एक लाखांहून अधिक झाडे तोडण्याचे 25/2 चे दाखले दिल्याबाबत या विषयावरील श्री.बसवराज पाटील, विधानसभा सदस्य यांच्या तारांकित प्रश्न 36110 ला दिनांक 14 डिसेंबर 2015 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे. नियम 94 अन्वये उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने मी आपल्या समोर उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील विषय मांडीत आहे. मला बोलण्याची संधी त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. या विषयासंदर्भात जे उत्तर आलेले आहे. त्या उत्तराने माझे समाधान झालेले नाही. हे उत्तर योग्य आले नाहीत असे माझे मत आहे व माननीय जिल्हाधिकारी आणि न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणारे आहे. ज्या पध्दतीचा उल्लंघनाचा वापर अधिकारी करता आहेत. ही माझ्या दृष्टीने अतिशय खेदाची बाब आहे. दिनांक 30 नोव्हेंबर 2013 पासून देण्यात आलेल्या अंतर्गत 25/2 च्या दाखल्या बाबतची माहिती, माहिती अधिकारात मागविली असता वैभववाडी ही सिंधुदुर्गमधील वैभववाडी तेथे 1567, कुडाळ 1026, सावंतवाडी 4787, कणकवली

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनावणे .........

तहसिल कार्यालयाकडून 3070 असे एकूण मिळून 10437 झाडांच्या तोडीचे दाखले दिल्याचे उघडकीस आले आहे. ही बाब अतिशय गंभीर असून न्यायालयाचे तसेच जिल्हाधिका-याच्या आदेशाचे उल्लंघन करणारी आहे. आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे उघड झालेले असल्याने सर्व संबंधित दोषींविरुध्द निलंबनाची कारवाई होणे अगत्याचे असताना शासन या दोषींना पाठीशी घालत आहे का ? असा विचार माझ्या मनात येतो आहे. सप्टेंबर 2015 रोजी प्रसिध्द झालेल्या गॅजेटनुसार सिंधुदुर्ग जिल्हयातील 192 गावाचा इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये असल्याचे दिसून येते. त्यामुळे निदान यापुढे तरी संबंधित गावामध्ये वृक्ष तोडीची परवानगी देण्यात येऊ नये. याबाबत संबंधित 192 गावांचा उल्लेख करुन नव्याने आदेश देण्यात यावेत. अशी मागणी श्री.बरेगार, माहिती अधिकार कार्यकर्ता यांनी केलेली आहे. त्याची तात्काळ अंमलबजावणी मंत्री महोदय आपले सरकार करणार का ? माझी अशी मागणी आहे की, उप संरक्षक सावंतवाडी तसेच कणकवली, सावंतवाडी, कुडाळ वैभववाडी दोडामार्ग या पाच तालुक्यातील तहसिलदारांनी जाणीवपूर्वक जिल्हाधिका-यांच्या तसेच माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली करुन आर्थिक हातमिळवणी व गैरव्यवहार केला असल्यामुळे त्याला विनाविलंब निलंबित करुन चौकशी करावी, अशी मागणी मी आपल्या समोर करतो आहे. जेणेकरुन यापुढे कोणत्याही नियमाचे उल्लंघन किंवा न्यायालयाचा अपमान करण्याचे धाडस कोणी करणार नाही. अवैध वृक्ष तोडीस कोणी परवानगी देण्यास अधिकारी धजावणार नाही. याची सुध्दा आपण काळजी घेतली पाहिजे. हा विषय अतिशय गंभीर असल्यामुळे शासन उपवन संरक्षक तसेच तहसिलदारांना का निलंबित करणार नाही. याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये उत्तराच्यावेळी माहिती द्यावी एवढे बोलून मी माझे आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर )**

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी अर्धातास चर्चा उपस्थित केली आहे. त्यांनी जी माहिती सांगितली त्या माहितीच्या संदर्भामध्ये मी सन्मानीय सदस्याचे लक्षवेधू इच्छितो. ते असे म्हणाले की, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्याबाबीच्या संदर्भामध्ये

......3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद सोनावणे.........

कोणाचीही उच्च न्यायालयाच्या विरुध्द वागण्याची, कृती करण्याची हिम्मत होता कामानये सन्माननीय सदस्यांना नम्रतेने लक्षात आणून देतो की, देशामध्ये न्याय व्यवस्थेचे महत्व आहे. अधिकारी, मंत्री, मुख्यमंत्री किंवा देशाचे प्रधान मंत्री असतील कोणालाही न्यायालयाच्या निर्णयाच्या बाहेर बागता येत नाही, कृती करता येत नाही आणि आचरण करता येत नाही. कोणत्याही व्यक्तिने अशी हिम्मत केली तर त्याच्यावर कंटेम्ट ऑफ कोर्ट होते. म्हणून पहिल्या मुद्याचे उत्तर असे आहे की, न्यायालयाने जो आदेश दिला. त्या आदेशाच्या विरुध्द कोणतीही कृती राज्य सरकारचा अधिकारी, कर्मचारी किंवा विभागाकडून झालेली नाही. एक खरे आहे की, ज्यांचे नाव आपण घेतले श्री.जयंत बरेगा यांचा काही गैरसमज होता. गैरसमज असा होता की, इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये झाडे कापता येत नाही. इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये जी झाडे येतात त्या गावामध्ये परवानगी घेतल्याशिवाय झाडे कापता येत नाहीत. परंतु परवानगी घेतल्यावर मात्र झाडे कापता येतात. परवानगी देण्याचे अधिकार काही वन विभागाला आहेत. काही महसूल विभागाला आहेत. त्यांनी जो माहिती अधिकारामध्ये प्रश्न उपस्थित केला तो असा होता की, उच्च न्यायालय मुंबई यांची जनहित याचिका क्रमांक 179/2012 किंवा रिटपिटीशन क्रमांक 4095/2011 मध्ये दोडामार्ग सावंतवाडी, वन्य प्राणी कॅरिडॉरमध्ये 25 गावे वृक्ष तोडीवर प्रतिबंध घातला आहे. हे खरे आहे. परंतु ज्या ठिकाणी वृक्ष तोड झाली ती काही हायकोर्टाच्या प्रतिबंध घातलेल्या गावामध्ये नाही. तरी श्री.जयंत बरेगा यांचा काही तरी गैरसमज झाला आहे. जी 25 गावे ज्याच्यावर हायकोर्टाने बंदी घातली. त्या 25 गावाच्या यादीमध्ये ही 9 गावे नाहीत.

3E-1..........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार .....

ज्या गावामध्ये परवानगी देण्यात आली, ती 9 गावे या गावामध्ये नाहीत. समजा ही 9 गावे 25 गावापैकी असतील, ज्याच्यावर उच्च न्यायालयाने बंधन टाकलेले आहे तर कोर्टात अवमान याचिका दाखल करता आली असती. पण यामध्ये अवमान याचिका दाखल झालेली नाही. याबाबत उच्च न्यायालयानेही कोणतेही भाष्य केलेले नाही. तरीही या प्रकरणामध्ये आग्रही भूमिका घेऊन ही गावे हायकोर्टाच्या आदेशात आहेत असे सांगण्यात आले. पण ती गावे हायकोर्टाच्या आदेशामध्ये नव्हती. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेच्या उत्तरात मी सांगतो की, येथे कोणत्याही पध्दतीने कायद्याचे व उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झालेले नाही. तरीही याबाबत सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नसेल तर त्यांच्याकडे असणारी कागदपत्रे तसेच हायकोर्टाचे आदेश दाखविण्यासाठी एक बैठक मी त्यांच्यासोबत कधीही घेण्यास तयार आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आता अर्धा-तास चर्चा क्रमांक 1 संपली आहे. अर्धा-तास चर्चा क्रमांक 2 व 3 पुढे ढकलण्यात येत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार दिनांक 23 मार्च, 2016 रोजी सकाळी 9.30 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 9.30 ते 10.45 पर्यत विशेष बैठकीत विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा व मंत्र्यांचे उत्तर घेण्यात येईल. त्यानंतर सकाळी 11 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 22 मिनिटांनी बुधवार, दिनांक 23 मार्च, 2011 च्या सकाळी 9.30 वाजेपर्यत स्थगित झाली.)

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION